स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य.
सं. नं. १३२८
१९५६

सचित्र

# आरती-सागर



REFBK-0009119
REFBK-0009119

## मराठींतील सर्व आरत्यांचा संग्रह



# आरती सागर

सचित्र

# आरती-सागर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७१८

संपादक

ह. भ. प. दामोदर हरी निंबकर

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 20682
क्रमांक 9336
REFBK-0009119
REFBK-0009119

निंबकर आणि मंडळी, माधवबाग मुंबई ४.

किंमत दीड रुपया

— प्रकाशक —
विश्वनाथ नारायण निंबकर
निंबकर आणि मंडळी, माधवबाग
मुंबई ४ करितां.

पहिली आवृत्ति, सप्टेंबर १९५६

सर्व हक्क का. अ. जोशी यांचे स्वाधीन

— मुद्रक —
ज. शं. मेढेकर
इंदिरा प्रेस, २७० सदाशिव,
पुणें २.

अनुक्रमांक २०४१२ वि ...
क्रमांक ९३३६ नों: दि: २.५.२०१५

# निवेदन

प्रचलित सर्व आरत्यांचा मोठा संग्रह आज बरेच दिवस दुर्मिळ आहे. आणि मराठींत बऱ्याच नव्या नव्या प्रासादिक आरत्याहि तयार झालेल्या आहेत. म्हणून मराठींतील आजपर्यंतच्या सर्व आरत्यांचा संग्रह एकत्र काढण्याची कल्पना मनांत आली. बाजारांत आज नानाविध रंगाचीं मुखपृष्ठें असलेलीं बरीच छोटीं मोठीं पुस्तकें मिळत असूनाहि आम्ही हा आरती-सागर प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत आहोंत.

हा संग्रह प्रसिद्ध करण्याचे ठरल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यांतील जांभारी गांवचे रहिवासी ह. भ. प. दामोदर हरी निंबकर यांचेकडे आरत्यांच्या संपादनाचें कार्य सोंपविलें. त्यांनीं बरीच दुर्मिळ पुस्तकें एकत्र संकलित करून व कांहीं नवीन आरत्यांची भर घालून हा संग्रह अद्ययावत् तयार करण्याचें काम अल्पावधींत करून दिलें. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढें थोडेच आहेत.

मिळाल्या तेवढ्या संगीत आरत्यांचा समावेश या संग्रहांत केला आहे.

या संग्रहांत कोठली आरती आली आहे हे पाहण्यासाठीं अकारविल्हेप्रमाणें सर्व आरत्यांची सूचि शेवटीं मुद्दाम दिली आहे.

आरत्यांतील अशुद्धें शक्य तितकी टाळण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आरत्यांत संतानीं ठेवलेलीं अशुद्धें तशीच ठेवणें बरें वाटल्यानें जशीच्या तशींच छापलीं आहेत. पुस्तक अत्यंत घाईत छापलें गेल्यामुळें कांहीं ठिकाणीं मुद्रण दोष राहून गेले असल्यास त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करावी.

या कामीं आमच्या अनेक मित्रांनीं आपुलकीनें बहुमोल मदत केली आहे. त्याबद्दल त्यांचे आभारी आहोंत.

इंदिरा प्रेसचे मालक श्री. शं. त्र्यं आवटे, तसेंच श्री. चंद्रकांत तुपे, श्री. बबनराव जोरी, श्री. किसनराव जोरी, श्री. रामभाऊ आवटे आणि व्यवस्थापक श्री. ज. शं. मेढेकर या उत्साही लोकांनीं अल्पावधींत पुस्तक छापून दिलें. त्याबद्दल त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

ऑगस्ट २५, १९५६ वि. ना. निंबकर

# अनुक्रमणिका


| | आरत्या | पान |
|---|---|---|
| १ | गणपतीच्या | १ ते १८ |
| २ | शंकराच्या | १० ते ३७ |
| ३ | देवीच्या | ३८ ते ७२ |
| ४ | विठ्ठलाच्या | ७३ ते ८२ |
| ५ | दशावताराच्या | ८२ ते ८३ |
| ६ | रामचंद्राच्या | ८४ ते ९७ |
| ७ | कृष्णाच्या | ९८ ते ११० |
| ८ | विष्णूच्या | १११ ते ११४ |
| ९ | मारुतीच्या | ११४ ते ११६ |
| १० | सूर्याच्या | ११७ ते १२० |
| ११ | दत्तात्रेयाच्या | १२० ते १३३ |
| १२ | नरसिंहाच्या | १३३ ते १३४ |
| १३ | परशुरामाच्या | १३५ ते १३६ |
| १४ | श्रीगुरुच्या | १३६ ते १४१ |
| १५ | सत्यनारायणाच्या | १४२ ते १४३ |
| १६ | खंडोबाच्या | १४३ ते १४५ |
| १७ | विश्वंभराच्या | १४५ |
| १८ | पंचायतनाच्या | १४६ ते १४७ |
| १९ | शनिदेवाच्या | १४७ ते १४८ |
| २० | व्यंकटेशाच्या | १४८ ते १४९ |

| | आरत्या | पानें |
|---|---|---|
| २१ | अनंताच्या | १४९ ते १५० |
| २२ | गरूडाची | १५१ |
| २३ | बहिरोबाची | १५१ ते १५२ |
| २४ | पाळिनाथाच्या | १५२ ते १५३ |
| २५ | हाटकेश्वराची | १५३ ते १५४ |
| २६ | केदाराच्या | १५४ |
| २७ | कृष्णेची | १५५ |
| २८ | चंद्राची | १५५ |
| २९ | गीतेची | १५६ |
| ३० | गंगेच्या | १५६ तै १५७ |
| ३१ | तुळशीच्या | १५७ ते १५८ |
| ३२ | वटसावित्रीच्या | १५९ |
| ३३ | रामलिंगाची | १५९ |
| ३४ | आदितिवामनाची | १६० |
| ३५ | अवधूताची | १६१ |
| ३६ | कोकिळेची | १६१ |
| ३७ | विश्वेश्वराची | १६१ |
| ३८ | बोडणाची | १६२ |
| ३९ | मनोबोधाची | १६२ |
| ४० | मंगळागौरीची | १६३ |

| आरत्या | पानें | आरत्या | पानें |
|---|---|---|---|
| ४१ ज्ञानेश्वराची | १६३ | ५३ यशवंतमहाराजांची | १७५ |
| ४२ दासबोधाची | १६४ | ५४ काकड आरत्या | १७६ |
| ४३ भागवताच्या | १६५ | ५५ धुपारती | १७८ |
| ४४ संताची | १६७ | ५६ दीपारती | १७८ |
| ४५ तुकारामाच्या | १६८ | ५७ नैवेद्यारती | १७८ |
| ४६ ज्ञानदेवाच्या | १६९ | ५८ महा आरती | १७९ |
| ४७ एकनाथाच्या | १७० | ५९ निरांजन आरती | १७९ |
| ४८ नामदेवाच्या | १७१ | ६० निरोपगीत | १८० |
| ४९ रामदासाच्या | १७२ | ६१ शेजारत्या | १८० |
| ५० साईनाथाच्या | १७२ | ६२ प्रार्थना | १८१ |
| ५१ सिद्धारूढस्वामीची | १७४ | ६३ मंत्रपुष्पांजली | १८२ |
| ५२ गोंदवलेकरांची | १७५ | ६४ सूचि | १८३ |





आरती सागर
हरिश्चंद्र लचके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्र. २०५८२ वि. ...

श्रीगणेशाय नमः

१३३८ नों. दि.

# सचित्र आरती–सागर.

## आरत्या गणपतीच्या



१ चाल—साधी

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची। सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची। कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रें मनकामना पुरती ॥ धृ० ॥ रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुंकुमकेशरा। हिरेजडित मुकुट शोभतो बरा। रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ जय० ॥ २ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना। दास रामाचा वाट पाहे सदना। संकटीं पावावें, निर्वाणीं रक्षावें, सुरवर वंदना॥जय० ॥३॥

२ चाल—साधी

नानापरिमळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें। लाडू मोदक अन्नें परिपूरित पात्रें। ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रें। अष्टहि सिद्धि नवनिधी देसी क्षणमात्रें ॥ १ ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ती। तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ॥ धृ० । तूझें ध्यान निरंतर जे कोणी

करिती । त्यांची सकलहि पापें विघ्नेंही हरती । वाजी वारण शिबिका सेवक सुत युवती । सर्वहि पावुनी अंतीं भवसागर तरती ॥ जय देव० ॥ २ ॥ शरणागत सर्वस्वें भजती तव चरणीं । कीर्ति तयांची राहे जोंवर शशितरणीं । त्रैलोक्यीं ते निजयीं अद्‌भुत हे करणी । गोंसावीनंदन रत नामस्मरणीं । जय देव जय देव० ॥ ३ ॥

३ चाल–साधी

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको । दोंदिल लाल विराजे सुत गौरीहरको । हाथ लियें गुडलड्डू साई सुरवरको । महिमा कहे न जाय लागत हुं पदको ॥ १ ॥ जय जयजी गनराज विद्यासुखदाता । धन्य तुमारा दर्शन मेरा मन रमता ॥धृ०॥ अष्टौ सिद्धी दासी संकटको वैरी । विघ्नविनाशन मंगलमूरत अधिकारी । कोटीसुरजप्रकाश ऐसी छबि तेरी । गंडस्थलमदमस्तक झुले शशिबहारी ॥ जय० ॥ २ ॥ भावभगतिसें कोई शरणागत आवे । संतति संपति सबही भरपूर पावे । ऐसे तुम महाराज मोंको अति भावें । गोसावीनंदन निशिदिन गुण गावे । जय० ॥ ३ ॥

४ चाल–साधी

स्थापित प्रथमारंभीं तुज मंगलमूर्ती । विघ्नें वारुनि करिसी दीनेच्छा पुरती । ब्रह्मा विष्णु महेश तीघे स्तुति करिती । सुरवर मुनिवर गाती तुझिया गुणकीर्ती ॥१॥ जय देव जय देव जय गणराजा । आरती ओवाळुं तुजला महाराजा ॥ धृ० ॥ एकदंता स्वामी हे वक्रतुंडा । सर्वांआधीं तूझा फडकतसे झेंडा । लप लप लप लप लप लप हालति गजशुंडा । गप गप मोदक भक्षिसि घेउनि करिं उंडा । जय० ॥२॥ शेंदुर अंगीं चर्चित शोभत वेदभुजा । कर्णीं कुंडल झळके दिनमणि उदय तुझा । परशांकुश करिं तळपे मूषक वहन दुजा । नाभीकमलावरती खेळत फणिराजा ॥ ३ ॥ भाळीं केशरि गंधावर कस्तूरिटिळा । हिरेजडित कंठीं मुक्ताफळमाळा । माणिकदास शरण तुज पार्वतिबाळा । प्रेमें आरति ओवाळिन वेळोवेळां ॥ जय० ॥ ४ ॥

५ चाल—साधी

उंदिरावरि बैसोनी दुडदुडां येसी। हातीं मोदक लाडू घेउनियां खासी। भक्तांचे संकटीं धांवुनि पावसी। दास विनावितो तुझिया चरणासी ॥ १ ॥ जय देव जय देव जय जय गणराजा। सकळदेवां आधीं तूं देव माझा ॥जय देव० ॥धृ०॥ भाद्रपदमासीं होसी तूं भोळा। आरक्त पुष्पांच्या घालुनियां माळा ॥ कपाळीं लावूनी कस्तुरी टीळा ॥ तेणें तूं दीससी सुंदर सांवळा ॥ जय० ॥ २ ॥ प्रदोषाचे दिवशीं चंद्र श्रापीला ॥ समयीं देवें मोठा आकांत केला ॥ इंदु येवोनी चरणीं लागला ॥ श्रीरामा बहुत श्राप दिधला ॥ जय० ॥ ३ ॥ पार्वतीच्या सूता तूं ये गणनाथा ॥ नेत्र शिणले तूझी वाट पाहतां ॥ किती अंत पाहसी बा विघ्नहर्ता ॥ मजला बुद्धी देई तूं गणनाथा ॥४॥

६. चाल—ओंवाळूं आरती मदन गोपाळा०

आरती करूं तुज मोरया ॥ मंगळ गुणानिधी राजया ॥ आरती ॥ ध्रु० ॥ सिद्धिबुद्धिपती संकटनाशा ॥ विघ्ननिवारण तूं जगदीशा ॥ आरती करूं० ॥ १ ॥ धुंडिविनायक तूं गजतुंडा ॥ सिंदुरचर्चित विलसित शुंडा ॥ आरती करूं० ॥२॥ गोसाविनंदन तन्मय झाला ॥ देवा देखोनियां तुज शरण आला ॥ आरती करूं तुज मोरया०॥३॥

७ चाल—साधी

जय देव जय देव जय वक्रतुंडा ॥ सिंदुरमंडित विशाळ सरळ भुजदंडा ॥जय०॥धृ०॥ प्रसन्नभाळा विमला करिं घेउनि कमळा ॥ उंदिरवाहन दोंदिल नाचसि बहुलीला ॥ रुणझुण रुणझुण करिती घागरिया घोळा ॥ सतार सुस्वर गायन शोभित अवलीला ॥ जय०॥ ॥ १ ॥ सारिगमपधनीसप्तस्वरभेदा ॥ धिमिकिट धिमिकिट मृदंग वाजति गतिछंदा ॥ तातक् तातक् थैय्या करिसी आनंदा ॥ ब्रह्मादिक अवलोकिति तव पादारविंदा ॥ जय० ॥ २ ॥ अभयवरदा सुखदा राजिवदलनयना ॥ परशांकुशलड्डूधर शोभित शुभरदना ॥ ऊर्ध्वदोंदिल उंदिर कार्तिकेश्वर रचना ॥ मुक्तेश्वर चरणांबुजिं अलिपरि करि भ्रमणा ॥ जय देव जय देव जय० ॥ ३ ॥

८. चाल—अवतार गोकुळीं हो०

आदि अवतार तूझा, अकळकळपठारीं ॥ ब्रह्मकमंडलु गंगा, रहिवास तये तीरीं ॥ स्नान पैं केलिया हो, पाप ताप निवारी ॥ मोरया दर्शनें हो, जन्ममरण दुरी ॥ १ ॥ जयदेवा मोरेश्वरा, जय मंगळमूर्ती ॥ आरती चरणकमळा, ओंवाळूं प्राणज्योती ॥ जय० ॥ धृ० ॥ सुंदरमस्तकीं हो, मुकुट दिसे साजीरा ॥ विशाळ कर्णद्वय, कुंडलें मनोहर ॥ त्रिपुंड्रटिळा भाळीं, अक्षता ते सोज्वळी ॥ प्रसन्न मुखकमळ, मस्तकीं दुर्वांकूर ॥ जय० ॥२॥ नयन निर्मळ हो, भुंवया अति सुरेख ॥ एक दंत शोभताहे, जडित स्वर्ण माणीक ॥ बरवी सोंड सरळ, दिसतसे अलौलिक ॥ तांबूल मुखीं शोभे, अधररंग सुरेख ॥ जय० ॥ ३ ॥ चतुर्भुजीं मंडित हो, शोभती आयुधें करीं ॥ परशुकमलअंकुश हो, मोदक पात्र भरी ॥ अमृतसम मधुर, सोंड शोभे तयावरी ॥ मूषक वाहन तुझें, लाडू भक्षण करी ॥ जय० ॥ ४ ॥ नवरत्नहार कंठीं, यज्ञोपवीत सोज्वळ ॥ ताईत मिरवीतसे, त्याचा ढाळ निर्मळ ॥ जाई जुई नागचांफे, पुष्पहार परिमळ ॥ चंदनी कस्तूरीचा, शोभे टिळक वर्तूळ ॥ जय० ॥ ५ ॥

९. चाल—साधी

वेदशास्त्रांमाजीं तूं मंगलमूर्ती ॥ अगणित महिमा तूझा कल्याण-स्फूर्ती ॥ भक्तांलागीं देसी विद्या अभिमत ती ॥ मोरेश्वर नाम तुझें प्रसिद्ध या जगतीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय मोरेश्वरा ॥ तूझा नकळे पार शेषा फणिवरा ॥ धृ० ॥ पुळयामध्यें नांदे महागणपती ॥ माघचतुर्थीला जन यात्रे येती ॥ जें जें इच्छिति तें तें सर्वहि पावती ॥ गणराजा मज बाळा द्यावी अभिमती ॥ जय० ॥ २ ॥ एकविस दुर्वां-कूरां नित्य नेमेंसी ॥ आणुनि जे अर्पीती गणराजयासी ॥ त्यांचें तूं भव-बंधन देवा चुकवीसी ॥ विठ्ठलसुत हा ध्यातो तुझिया चरणांसी ॥३॥

१०. चाल—साधी

एकदंता गुणवंता गौरी सुखसदना ॥ ऋद्धीसिद्धीदायक कलि-किल्मषदहना ॥ उन्नत गंड स्त्रवती डुलति नग नाना ॥ शुंडादंडें मंडित गंभिर गजवदना ॥१॥ जय देव जय देव जय शंकरकुमरा ॥ पंचप्राणें

आरति उजळूं तुज चतुरा ॥ जय० ॥ ध्रु० ॥ अंबुजनेत्रीं वुब्बुलभ्रमर भ्रमताती ॥ भारें सुरवर पूजा देवा तुझि करिती ॥ लाडूधर वरदकरा मुनिजन गुण गाती ॥ कर्णी कुंडलें देखुनि रविशशि लपताती ॥जय० ॥ २ ॥ चरणीं नूपुरांची रुणझुणध्वनि उठली ॥ एकविसस्वर्गी भेदून तद्रुपिं संचरली ॥ अनंत अंडें ज्यांच्या घोषें दुमदुमलीं॥ अद्भुत पंचभूतें तेथुनि उद्भवलीं ॥ जय० ॥ ३ ॥ ऐसें वैभव तूझें नाटक नृत्याचें ॥ देखुनियां लुब्धलें मन गंधर्वांचें ॥ ऐकुनि चिंतन करणें तुझिया चरणाचें ॥ चिंतन करितां नासे दुःख विश्वाचें ॥ जय० ॥ ४ ॥ कमलासन भयनाशन गिरिजानंदना ॥ कटिं सुंदर पीतांबर फणिवरभूषणा ॥ विद्याधर पदिं तोडर अमरारीमथना ॥ मनरंजन महिमंडण गणपति गुरु जाणा ॥ जय देव जय देव जय शंकर० ॥ ५ ॥

११. चाल—साधी

अनादि गणनायका चिंतामणि देवा ॥ विद्याधर तुज म्हणती करिती सुर सेवा ॥ नकळे ब्रह्मादिकां पार्वतिसुतठेवा ॥ भावें पाहावा गावा निजमानासिं ध्यावा ॥ १ ॥ जय देव जय देव जय गणपति स्वामी ॥ पंचप्राणीं आरति करितों तुजला मी ॥ जय० ॥ ध्रु० ॥ परशू अंकुश कमळां धरिलें अवलीळा ॥ सिंदुरचर्चित भाळा शोभसि रिपु काळा ॥ गंडकपालालंकृति पुष्पांच्या माळा ॥ रुणझुण चरणीं होती नूपुर अवलीळा ॥ जय० ॥ २ ॥ श्वेत छत्र चामरीं तुजला मिरवीती ॥ उंदीराचें वाहन तुजला गणपती ॥ खाज्यांचे लाडू शोभती हातीं ॥ मूर्ती अवलोकितां न ढळती पातीं ॥ जय० ॥ ३ ॥ राजस उंदिर ठमकत ठमकत मग चाले ॥ हालत हालत दोंदिल डोलत मग चाले ॥ ध्यानें ध्यातां गातां सर्वहि जन धाले ॥ हरिगुणमंडित वाणी जन पंडित बोले ॥ जय देव जय देव० ॥ ४ ॥

१२. चाल—साधी

हरिहरब्रह्मादीकीं तुजला पूजिलें ॥ म्हणोनि त्यांचें कार्य सिद्धी त्वां नेलें ॥ ऐसा तूं गणराज नवस योजीले ॥ वर्णावया नकळे तुझीं पाऊलें ॥ १ ॥ जय देव जय देव जय गजानना ॥ आरती ओंवाळूं तुज सुंदरवदना ॥ जय० ॥ ध्रु० ॥ तुज ऐसा सुंदर आणिक न दीसे॥

जिकडे पाहावें तिकडे गणराज भासे ॥ श्रवणीं कुंडलांची दीप्ती प्रकाशे ॥ चंद्र सूर्य दोन्ही हेलावति जैसे ॥जय० ॥ २ ॥ गंधपुष्पें दुर्वा तुजला जे वाहती ॥ ते नर भाग्यवंत लक्ष्मी पार्वती ॥ दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ती ॥ सहज नामा याणें गाइली आरती ॥ जयदेव०॥३॥

१३. चाल–साधी

गणपति नमिती स्तविती सुरपति तुज भजती ॥ सकलारंभीं स्मरती विघ्नें संहरती ॥ शुंडामंडितमूर्ति अतर्क्य तव कीर्ती ॥ आरति कवनालागीं देईं मज स्फूर्ती ॥ १ ॥ जय देवा जय देवा सुंदरगजवदना ॥ तव भजनासी प्रेमा देईं सुखसदना ॥ जय० ॥ धृ० ॥ जागृति स्वप्नीं माझ्या हृदयीं त्वां राहावें॥ दुस्तर भवपाशाच्या बंधा तोडावें॥ सिंदुरवदना सखया चरणा दावावें॥ अघोरदुर्गतिलागीं सत्वर चुकवावें ॥ जय० ॥ २ ॥ न कळे अगाध महिमा श्रीवक्रतुंडा॥ अतर्क्य लीला तूझी शोभे गजशुंडा॥ तुजविण न दिसे देवा शमविल मम पीडा ॥ भक्तसंकटीं येसी धांवत दुडदुडां ॥ जय० ॥ ३ ॥ नयनीं शिणलों देवा तव भेटीकारितां ॥ तापत्रय दीनाचें शमवीं समर्था ॥ अनाथ मी कल्पद्रुम तूंची शिवसुता ॥ विष्णूदासें चरणीं ठेवियला माथा ॥ जय देवा० ॥ ४ ॥

१४. चाल–ओंवाळूं आरती मदन गोपाळा०

वारो मैं आरती गनपतचरना॥ वरगजवदना गिरिजानंदना॥ वारो० ॥ धृ० ॥ कोमल पदपंकज सुकुमार ॥ झंझन नूपूर कर घनघोर ॥ वारो० ॥ १ ॥ पीतांबर कटि नाभि सुब्याल॥ लंबोधर गरे मोहनमाल वारो० ॥ २ ॥ रतनमुकुट सिस चंद सुमलिये ॥ श्रवनच्युवत मद कुंडल सोहे ॥ वारो० ॥ ३ ॥ अनुपम रूप तेरो कांहालो बखानू ॥ मंगिशसुत शरणागता ज्यानू ॥ वारो मैं० ॥ ४ ॥

१५. चाल–आवडी गंगाजळें देवा०

दीनदयाळा गणपति स्वामी द्यावी मज भेटी ॥ तव चरणांची सखया मजला आवडी मोठी ॥ धृ० ॥ कवण अपराध म्हणवुनि देवा केला रूसवा ॥ अहर्निशीं मी हृदयीं तूझा करितसें धांवा ॥ दीन० ॥ १ ॥ चिंताकूपीं पडलों कोण काढिल बाहेरी ॥ धांवें पावें

सखया करुणा करूनि उद्धरीं ॥ दीन० ॥ २ ॥ ऐसें होतें चित्तीं तरि कां प्रथमचि देवा ॥ अंगीकार करुनि केला कृपेचा ठेवा ॥ दीन०॥३॥ आतां करणें त्याग तरिही स्वामी अघटित ॥ शरण आलों माझा आतां चुकवी अनर्थ ॥ दीन०॥४॥ यादवसुत हा विनवी दोन्ही जोडुनियां कर ॥ तव चरणाचा सखया मजला आहे आधार ॥ दीन० ॥ ५ ॥

१६. चाल—आवडी गंगाजळें०

प्रेमगंगाजळें देवा न्हाणियेलें तुजला ॥ सुगंध द्रव्यें मर्दन करुनी हेतू पुरवीला ॥ गंगाजळें रौप्याचीं त्यांत किं भरिलें जळाला ॥ सुवर्णाचा कलश आणुनी हस्तीं तो दिधला ॥ अंग मर्दितां हस्तें मजला उल्हासचि झाला ॥ स्नान घालुनी वंदियलें मीं तुझिया चरणाला ॥ चरण क्षालुनि प्राशियलें म्यां त्याही तीर्थाला ॥ वाटे सात पिढ्यांचा मजला उद्धारचि झाला ॥ अंग स्वच्छ करुनी तुजला पीतांबर दिधला ॥ अति सन्मानें सिंहासनिं म्यां तुजला स्थापियला ॥ भक्त सदाशिवतनय सदा तो लागत तव चरणीं ॥ सर्वस्वहि त्यागुनी झाला निश्चळ तव भजनीं ॥

१७. चाल—साधी

जय जय विघ्नविनाशन जय ईश्वर वरदा ॥ सुरपति ब्रह्म परात्पर सच्चिद्घन सुखदा ॥ हरिहरविधिरूपातें धरुनीयां स्वमुदा ॥ जगदुद्भवस्थितिप्रलया करिसी तूं शुभदा ॥१॥ जय देव जय देव जय गणपति स्वामी, श्रीगणपति स्वामी ॥ एकारति निजभावें, पंचारति सद्भावें करितों बालक मी ॥ धृ० ॥ वियदादिक भूतात्मक देवात्मक तूंची ॥ दैत्यात्मक लोकात्मक सचराचर तूंची ॥ सकलहि जीवेश्वरादि गजवदना तूंची ॥ तवविण न दिसे कांहीं मति हे मम साची ॥जय०॥२॥ अगणित सुखसागर हे चिन्मया गणराया॥ बुद्बुदवत् जग तव पदिं विवर्त हे माया ॥ मृषाचि दिसतो भुजंग रज्जूवर वायां ॥ रजतभ्रम शुक्तीवर व्यर्थचि गुरुराया ॥ जय० ॥ ३ ॥ अन्नप्राण मनोमय मतिमय हृषिकेशा ॥ सुखमय पंचम पेशा सकलहि जडकोशां ॥ साक्षी सच्चित् सुख तूं असती जगदीशा ॥ साक्षी शब्दहि गाळुनि वससी अविनाशा ॥ ॥ जय० ॥४॥ मृगजलवत हे माया सर्वहि नसतांचि ॥ सर्वहि साक्षी

म्हणणें नसेचि मग तूंची ॥ उपाधिविरहित केवळ निर्गुणस्थिति साची ॥ तव पद वंदित मौनी दास अभेदेंची ॥ जय देव जय०॥५॥

१८. चाल—आरती आरती करूं गोपाळा०

आवडीगंगाजळें देवा न्हाणीलें ॥ भक्तीचें भूषण प्रेमसुगंध अर्पीलें ॥ अहं हा धूप जाळुं गणपतीपुढें ॥ माझ्या मोरयापुढें ॥ जंव जंव धूप जळे तंव तंव देवा आवडे ॥ १ ॥ पंचप्राणासहित धूपदीप जो केला ॥ नैवेद्याकारणें उत्तम प्रकार अर्पीला ॥ मध्वनाथस्वामी पंचोपचारिं पूजीला ॥ मग एकार्तीसी प्रेमें प्रारंभ केला ॥ २ ॥

१९. चाल—साधी

गजवदना मन रमलें पाहुनियां तुजला ॥ म्हणतां मंगलमूर्ती संताप हरला ॥ यास्तव निश्चय चरणीं भाव तो धरिला ॥ व्यापुनि अवघें विश्व म्हणतां तुज उरला ॥ १ ॥ जय देव जय देव जय संकटहर्ता ॥ तुजविण नाहीं कोणी संसारीं त्राता ॥ धृ० ॥ गिरिजांकीं बैसुनियां स्तनपान करिसी ॥ तो तूं राक्षस मोठमोठे निर्दाळिसी ॥ उचलुनि शुंडाग्रानें त्रैलोक्य धरिसी ॥ गिरिजारागें नित्य कांपे थरथरसी ॥ जय० ॥ २ ॥ दास विनायक मूर्ती पाहुनियां डोले ॥ मंगलमूर्ती हृदयीं राहो हें बोले ॥ प्राणी जे गुण गाती ते जाणा तरले ॥ आपण तरुनी अपुले पूर्वज उद्धरिले ॥ जयदेव जयदेव० ॥ ३ ॥

२०. चाल—अवतार गोकुळीं हो०

आरती गणपती ॥ पदपंकजिं प्रीती ॥ ओवाळूं भावें भक्ती ॥ सर्वारंभीं मंगळमूर्ती ॥धृ०॥ आधारें सृष्टि ज्याचे ॥ तो हरगौरीसुत ॥ स्मरतां नाम ज्याचें ॥ होय विघ्नांचा अंत ॥१॥ पाहतां रूप ज्याचें ॥ अद्भुतचि गजमूख ॥ शशांकसूर्य वन्ही ॥ त्रिनेत्र दंत एक ॥२॥ पन्नग विभूषणें ॥ कटितटीं मंडीत ॥ श्रवणीं कंठीं गळां ॥ वेष्टितसे उपवीत ॥३॥ सायुध कर चारी ॥ लंब उदर ज्याचें ॥ भरलें चौदाविधीं ॥ चौसष्टिकळीं साचें ॥ ४ ॥ सिद्धिऋद्धिबुद्धींचा ॥ भुक्तिमुक्तींचा दाता ॥ बिरूदाचे तोडर ॥ पायीं गर्जती रमतां ॥५॥ षडानन बंधूसंगें ॥ नाचसि डमरू नादें ॥ शिवशक्ति पाहोनीयां ॥ निर्भरीत आनंदें ॥ ६ ॥ वाजती पैंजण पायीं ॥ रत्नजडित मनोहर ॥ संगीत तानमान ॥ मूर्छना राग

चार ॥ ७ ॥ पाहोनियां ध्यान मनीं ॥ प्रेमभावें पूजीत ॥ श्रीदास तुजलागीं ॥ करीं तयासि मुक्त ॥ ८ ॥

२१. चाल—साधी

त्रिपुरासुर वधुं जातां शिव तुजला चिंती ॥ बळिबंधन कराया वामन करि विनती ॥ धाता सृष्टि सृजितां न चले मंदमती ॥ स्मरण करितां तूझें मग झाली स्फूर्ती ॥१॥ जय देव जय देव जयजी गणराया हरिहरब्रह्मादिक ते वंदिति तव पायां ॥ धृ० ॥ धरणी धरितां मस्तकिं शेषाला ओझें ॥ जाहालें तेव्हां स्मरण तो करि पैं तूझें ॥ हलूवट पुष्पप्राय केलें गणराजें ॥ सुकीर्तिमहिमाघोषें भुवनत्रय गाजे ॥ जय० ॥ २ ॥ महिषासुरासि वधितां पार्वतिही समरीं ॥ विजया देईं म्हणुनी प्रार्थी तुज गौरी ॥ गाती मुनिजन योगी सिद्धादिक सौरी ॥ तुझिया वरदें जिंकिति मन्मथ नरनारी ॥ जय० ॥ ३ ॥ पंडित रामात्मज हा कवि किंकर तूझा ॥ विनवी तुजला भावें पावें निजकाजा ॥ ऋद्धीसिद्धीदाता तो स्वामी माझा ॥ संकट हरुनी रक्षी भक्तांची लज्जा ॥ जय० ॥ ४ ॥

२२. चाल—साधी

कपोल झरती मदें शुंडा बहु साजे ॥ शेंदुर जो धवधवीत अद्‌भुत सुविराजे ॥ घागरियांचा घोळ पदिं घुळघुळ वाजे ॥ प्रसन्नवदना देवा ध्याना सुख माजे ॥ १ ॥ जय देव जय देव जय गजनरवेषा ॥ आरती ओंवाळूं तुजला विश्वेशा ॥ धृ० ॥ विशेष महिमा तूझा नकळे गणनाथा ॥ हरिसी संकट विघ्नें तापत्रयव्यथा ॥ अखंड आनंदें तूं डोलविसी माथा ॥ तांडव नृत्य करिती तातकू थिम ताथा ॥ जय० ॥२॥ विद्या धन संपदा कनकाच्या राशी ॥ नारी सुत मंदिरें सर्वहि तूं देशी ॥ निर्वाणीं पावसी वेगीं भक्तांसी ॥ गोसावीनंदन गातो कवितांसी ॥ जय० ॥ ३ ॥

२३. चाल—आवडी गंगाजळें०

ओंवाळूं आरती देवा श्रीमंगळमूर्ती ॥ देवा श्रीमंगळमूर्ती ॥ अघसंकट नासुनियां द्यावी चरणांसी मुक्ती ॥धृ०॥ जय देवा तूं आद्या सुरवरवंद्या गणराया ॥ तुझिया स्वरुपीं न सरी पावे दुसरी उपमाया

॥ १ ॥ शेंदुर अंगीं चर्चुन कंठीं मुक्तांची माळा ॥ लंबोदर उंदिरवर शोभे ललाटीं टीळा ॥ २ ॥ पीतांबर परिधान पायीं घुंगुरध्वनि गाजे ॥ दुर्वांकुर वाहिले आम्हीं भक्तीचे काजें ॥३॥ वार्षिक उत्साहाची सेवा यथाशक्ति केली ॥ न्यूनाधिक तें क्षमा करुनी रक्षीं माउली ॥ ४ ॥ महानैवेद्य घृत शर्करामिश्रित हे लाडू ॥ अर्पूं तुजला प्रसाद आपुल्या पात्रीं तो वाढूं ॥ ५ ॥ पिता तुझा तो सांब सदाशिव ध्यातो श्रीरामा ॥ हनुमंतानें त्याचे पायीं धरिला सुप्रेमा ॥ ६ ॥

२४. चाल–आवडी गंगाजळें०

ओंकारप्रणवाक्षरिं बीजापासुनि ध्वनि उठली ॥ ते हे माया त्रिगुणात्मकची सगुणत्वा आली ॥ १ ॥ जय जय आरति पार्वतिकुमरा गणपति ओंवाळूं ॥ पंचहि प्राणांच्या कर्पुरवर्ती ज्ञानाग्नें जाळूं ॥ धृ० ॥ पंचभूतात्मक व्यापक एकचि घटक तूं जैसा ॥ दृष्टीगोचर नव्हसी कोणा गुळगोडी तैसा ॥ जय० ॥२॥ निर्गुणा ज्योती सगुणा आली पुंडलिकासाठीं ॥ विटेवर शोभे कटिं कर उभा भीमेचे कांठीं ॥ जय० ॥ ३ ॥ ऐसी मूर्ति नित्यनिरंतर ध्यानीं जे धरिती ॥ संकट त्याचे दूर करीं तूं श्रीमंगळमूर्ती ॥ जय० ॥ ४ ॥ वायुसुतानें हृदयीं ध्यायिली जसि राघवमूर्ती ॥ तसि हनुमंता तुझिया पायीं देईं सद्भक्ती ॥ जय जय आरति पार्वतिकुमरा० ॥ ५ ॥

२५. चाल–साधी

दे मति निर्मळ तव गुण गाया ॥ अद्वय मज सुख द्याया ॥१॥ गणराया हे माझ्या हृदयालया ॥ ओवाळूं आरती तव पायां ॥ ध्रु० ॥ मज कल्पित विधिवदर्चननंदन ॥ मानूनि घे आजि सदया ॥ २ ॥ महामायात्मज विघ्न हराया ॥ शांता पदरजीं मन दे रहाया ॥ ३॥

२६. चाल–आरती भुवनसुंदराची०

आरती शंभुनंदनाची ॥ पदनतजनानंदनाची ॥ धृ० ॥ लंबोदरा दंतिवदना ॥ वरदाया मूर्ति कीर्तिसदना ॥ सिंदुरानुलेपना गहना ॥ सुविलसदुंदुराख्यवहना ॥ चाल ॥ शोभतो शूर्पकर्ण ज्याचे ॥ मस्तकीं अमंदवर मुखरसारसार्पितप्रचुरतरसुदूर्वांकुरोर्धरुचिर रुचि जयाची ॥ सुगेया रुचिर रुचि जयाची ॥ आरती० ॥ १ ॥

२०६८२ वि. ३१० ११ ७३३६ नोंदि

जयातें भालचंद्र म्हणती ॥ कविगण कीर्ति सतत गाती ॥ मुनिपदिं हृदंबुजें ध्याती ॥ अपरिचितहरिहरादि करिती ॥ चाल ॥ सुतधनधान्यकलत्रादी ॥ निस्थुलदयालसुतगललंबिरक्तसुममालसु-मदजलसंघमदलिकुल विमलचरितविभुची ॥ सुमंजुलविमलचरितवि-भुची ॥ आरती० ॥२॥ कटितटिं पीतांबरधारी ॥ सुरंजितचरण दिसति नुपुरीं ॥ मोदद मोदकासि धरि करीं ॥ सरिसृप बद्ध ज्याचे उदरीं ॥ ॥ चाल ॥ स्मरणें विघ्नवृंद वारी ॥ तारि दुरितसागरीं वसुदेवकरि परि-वितार्थ अतिभक्ति गणपतीची ॥ मंगला भक्ति गणपतीची ॥ आरती०३

२७. चाल—वरील प्रमाणें

पाश करिं उत्पल शंख गदा ॥ चक्रधान्याग्रकजासुखदा ॥ इक्षु धनु मातुलिंग सुसदा ॥ हरी निजदंत कृतांतमदा ॥चाल॥ विराजे रत्न-कलशशुंडा ॥ दंड अतिप्रचंड, मंडित उदंड, वरदित अखंड, किल ब्रह्मांड मंडनाची ॥ प्रभातशंड खंडनाची ॥१॥ आरती जगद्वंदनाची ॥ उमाशिवसांबनंदनाची ॥ ध्रु० ॥ स्वयें जी भूषविणार जगा ॥ वल्लभा दिव्यभव्यसुभगा ॥ स्वहस्तीं अमलकमल इभगा ॥ विहगगजवक्रहंस विहगा ॥ चाल ॥ भुजे परिरंभणानुसरली ॥ करुनि चपलता, परि न विकलता, तरुसि जशी लता वसंताची ॥ सता शीलता सुसंताची ॥ आर० ॥ २ ॥ प्रथम उत्पन्न विश्वकर्ता ॥ प्रकृति रक्षूनि प्रलयिं-हर्ता ॥ गुणगुण वेदशास्त्रपढता ॥ सकलसिद्ध्यर्थ स्वार्थभर्ता ॥चाल॥ असा विघ्नेश ईश ध्यावा ॥ अभय करणार, विभय भरणार, सुकवि तरणार, सदैवाची ॥ कुमति हरणार राघवाची ॥ आरती० ॥ ३ ॥

२८. चाल—अवतार गोकुळीं हो०

जय जय गणपती ॥ ओंवाळीत आरती ॥ साजिऱ्या सरळ भूजा ॥ परशु कमल शोभती ॥ ध्रु० ॥ अवतार नाम भेद ॥ गणा आदी अगाध ॥ जयासी पार नाहीं ॥ पुढें खुंटला वाद ॥ एकची दंत शोभे ॥ मुख विक्राळ दोंद ॥ ब्रह्मांडा माजि दावी ॥ ऐसे अनंत छंद ॥ जय० ॥ १ ॥ हे मही ठेंगणी हो ॥ तुज नृत्यनायका ॥ भोंवरीं फेरे देतां ॥ असुरा मर्दीले एका ॥ घातले तोडर हो ॥ भक्त जन पाळका ॥ जय० ॥ २ ॥ सुंदर शोभला हो ॥ रूपें लोपलीं तेज ॥ उपमा काय

देऊं ॥ नसे आणीक दुजें ॥ रवि शशि तारागणें ॥ जयामाजीं सहजें ॥ उदरीं सामावलीं ॥ जया ब्रह्मांडबीजें ॥जय०॥३॥ वर्णितां शेष लीला ॥ मुखें भागलीं त्याचीं ॥ पांगुळले वेद कैसे ॥ चारी राहिले मूके ॥ अवतार जन्मला हो ॥ लिंग नामिया मूखें ॥ अमूर्त मूर्तिमंत ॥ होय भक्तीच्या सूखें ॥ जय० ॥४॥ विश्व हें रूप तूझें ॥ हस्तपाद मूखडें ॥ ऐसाचि भाव देईं ॥ तया नाचतां पूढें ॥ धूप दीप पंचारति ॥ ओंवाळीन निवाडें ॥ राखें तूं शरणांगता ॥ तुका खेळतां लाडें ॥ जय० ॥५॥

२९. खेळुनिलतिकासंगें०

शंकरतनया भवभयहरणा पंचारति तुजला ॥ करितों भावें विघ्नहरा हे तारीं भक्तांला ॥धृ०॥ प्रेमानंदें सर्व लोक स्मरती पदकमला ॥ गिरिजांकीं तूं बसुनि नाना दाखविसी लीला ॥ अवतरलासी भक्तजनाला मुक्ती द्यायाला ॥ विठ्ठलसुत बलवत्कवि ध्यातो भवाब्धि तरण्याला ॥ १ ॥

३०. चाल—मजवरितरु कुसुमरेणु०

जयजयाजी विघ्नांतका हे गजानना ॥ पंचारति करितों तुज विश्वपालना ॥ धृ० ॥ कार्यारंभिं प्रेमभरें पुजिति जे तुला ॥ सकल अघा हरुनि सुखी करिसी त्यांजला ॥ निजपद त्यां देउनियां हरिसी भ्रांतिला ॥ देसि भक्तजनां हे दयाघना ॥ जय० ॥ १ ॥ दास विनवि निशिदिनिं तुज गौरिनंदना ॥ सुप्रसन्न होउनि दे भजनिं वासना ॥ सत्कीर्तिदायक ही बुद्धि या दिना ॥ विठ्ठलसुत मागतसे पुरविं कामना ॥ जय० ॥ २ ॥

३१. चाल—अंगिकार करुनि०

वक्रतुंड एकदंत गौरिनंदना ॥आरति मी करितों तुज हे गजानना ॥ धृ० ॥ पाशांकुश शोभे करीं दुःखभंजना ॥ रत्नजडित सिंहासन बुद्धिदीपना ॥ सुरनरमुनि स्मरति तुला येति दर्शना ॥१॥ ऋद्धिसिद्धि करिति सदा नृत्यगायना ॥ देसि मुक्ति भक्तजनां हे दयाघना ॥ विठ्ठलसुत लीन पदीं विघ्ननाशना ॥ वक्रतुंड एकदंत ॥ २ ॥

३२ चाल—सुंदर मुख तुंदिल०

विघ्नांतक विघ्नेशा हे गजानना ॥ आरति मी करितों तुज पुरवि कामना ॥ ध्रु० ॥ भाद्रपदीं शुद्ध चतुर्थीस तव बरी ॥ मूर्ति करुनि सर्व लोक पूजिती घरीं ॥ महिमा तव वर्णवे न पापगिरि हरीं ॥ येईं। धांई। पाहीं। करूनि त्वरा। विघ्नहरा। दे सुगिरा। हे कृपाघना॥ विघ्नां० ॥ १ ॥ संकटिं जे पडुनि प्रभो स्मरती तूजला ॥ मुक्त करिसि जगतीं या खचित त्यांजलां ॥ जाणुनि हे तव भजनीं ध्यास लागला ॥ गातों। ध्यातों। नमितों। तारिं आतां। या भक्ता। दयावंता। गौरिनंदना ॥ विघ्नां० ॥ २ ॥

३३. चाल—महाराज आज०

गणराज आज सुप्रसन्न होईं तूं मला ॥ करितों मी पंचारति मोरया तुला ॥ धृ० ॥ मुषकवहनिं बैसुनियां येईं धांवुनी ॥ मम मस्तकीं वरदहस्त तुवां ठेवुनी ॥ पूर्ण करीं मम हेतु दयार्द्र होउनी ॥ लावीं तव भजनिं आजि दास विठ्ठला ॥ १ ॥

३४. चाल—चंद्रकांत राजाची.०

श्रीगणराया पार्वतीतनया देईं मज भेटी ॥ तव चरणाची देवा मजला आवड बहु मोठी ॥ धृ० ॥ दीन जनांचा कैवारी तूं असशी गणराया ॥ कार्यारंभीं स्तवित तुजला विघ्नें वाराया ॥ भक्तांचा तूं ऐकुनि धांवा मुषकीं बैसुनियां ॥ त्वरितचि येसी सर्व संकटें निरसुनि ताराया ॥ हेंचि जाणुनी नारायणसुत शरण तुझ्या पायीं ॥ तरी दयाळा अजि मम करुणा येवो तव हृदयीं ॥ १ ॥

३५. चाल—शशिकुलभूषण०

जयजय गणपति अघशमना ॥ करितों आरति तव चरणा ॥ धृ० ॥ छळिती षड्रिपु बहु मजला ॥ यांतुनि तारीं जगपाला ॥ हरि या विविध तापाला ॥ दैन्यही नेईं विलयाला ॥ निशिदिनिं करिं मज साह्याला ॥ विनति ही तव पदकमला ॥ विठ्ठलसुत बहु प्रेमें विनवी तारीं या दीना ॥ दयाळा करिं मजवरि करुणा ॥ जय० ज० ॥ १ ॥

३६. चाल–पंचतुंड नर रुंड०

जग ताराया अवतरलासी भक्त पूजिती सद्भावें ॥ कनवाळू तूं मूषकवाहन भक्तसंकटीं तूं पावें ॥ बहु प्रेमानें ओंवाळिन तुज मन वांछी तव गुण गावे ॥ विघ्न हराया येईं झडकरी ऋद्धिसिद्धिसह तूं धांवें ॥ १ ॥ वक्रतुंड गुणवंत विघ्नहर गौरिनंदन गणपति जो ॥ आरति ओंवाळिन मी त्यासी विघ्नांतक जगतारक जो ॥ धृ० ॥ शुंडा शोभे सिंदुरचर्चित मस्तकिं मुकुट झळाळी ॥ मुक्तहार हे कंठीं रुळती कस्तुरितिलक हा तव भाळीं ॥ मोरेश्वरसुत वासुदेव तुज प्रार्थी दीनाप्रति पाळीं ॥ भक्तजनातें मंगळमूर्ती रक्षीं अति संकटकाळीं ॥ २ ॥ वक्रतुंड गुणवंत० ॥

३७. चाल–काय मला भूल पडली

आरति मी करिन तुला श्रीगजानना ॥ वक्रतुंड एकदंत मुषकवाहना ॥ धृ० ॥ त्रिविधताप दूर करीं गौरीनंदना ॥ दैन्य हरुनि तारिं मला विघ्ननाशना ॥ भक्तसखा तूंचि एक सिंदुरानना ॥ निशिदिनिं मी ध्यातों तुला दुष्टभंजना ॥ १॥ पंचारति ओंवाळिन पुरविं कामना ॥ साह्य करीं निशिदिनिं मज भक्ततारणा ॥ भाविक जन पुजिति तुला स्वहितसाधना ॥ वासुदेव लीन पदीं धरुनि धारणा ॥ २ ॥

३८. चाल–सुंदर मुख०

जय जय जी विघ्नहरा आरती तुला ॥ ओंवाळिन प्रेमरसीं तारीं तूं मला ॥ धृ० ॥ रत्नजडित हेममुकुट मस्तकावरी ॥ शोभतसे पाशांकुश तूझिया करीं ॥ वारुनियां विघ्नसमुह धांव झडकरीं ॥ राहीं । पाहीं । येईं । मम सदना । गजवदना । अघदमना । शरण मी तुला ॥ १ ॥ आरति ही धरुनि करीं रूप पाहती ॥ गजमुख हें अति सुंदर शोभतें किती । गातो गुण वासुदेवा वंदि गणपती ॥ धावें । पावें । यावें । विघ्नहरा । भक्तवरा । वंद्यसुरां । सुखविं तूं मला ॥ २ ॥

### ३९. चाल—खचित बाई०

गणराया आरती ही तुजला ॥ धृ० ॥ रुणझुण पायीं वाजति घुंगुर ॥ गगनीं ध्वनि भरला ॥ १ ॥ भाद्रपद मासीं शुक्लचतुर्थीसी ॥ पुजिती जन तुजला ॥ २ ॥ गंध पुष्प धुप दीप समर्पुनी ॥ अर्पिति पुष्पांला ॥ ३ ॥ भक्त हरी हा आठवितो रूप ॥ गातो तव लीला ॥ ४ ॥

### ४०. चाल—साधी

शिवतनया वक्रतुंडा गौरीच्या बालका ॥ ओंवाळूं तुजलागी विश्वाच्या पालका ॥ धृ० ॥ उंदीर वाहन तूझें वामांगी शारदा ॥ भक्तांतें रक्षितोसी वारुनियां आपदा ॥ स्तवितों मी दीन तुजला सद्‍बुद्धी द्या सदा ॥ गणराया वर देई उद्धरिं तूं भाविकां ॥ १ ॥ गिरिजांकीं बैसुनियां प्रेमानें खेळसी ॥ वधुनीयां राक्षसाला लीलेतें दाविसी ॥ निशिदिनिं जे ध्याति तुजला सत्वर त्यां पावसी ॥ प्रार्थितसे वासुदेव तारीं या सेवका ॥ २ ॥ शितनव० ॥

### ४१. चाल—आवडी गंगाजळ

जय जय आरति पार्वति कुमरा गणपति ओंवाळूं ॥ पंचहि प्राणांच्या कर्पुरवर्ती ज्ञानाग्नें जाळूं ॥ धृ० ॥ ओंकारप्रणवाक्षरीं बीजापासुनि ध्वनि उठली ॥ ते हे माया त्रिगुणात्मकचि सगुणत्वा आली ॥ जय० ॥ १ ॥ पंचभूतात्मक व्यापक एकचि घटक तूं जैसा ॥ दृष्टीगोचर नव्हसी कोणा गूळ गोडी तैसा ॥ जय० ॥ २ ॥ निर्गुण ज्योती सगुणा आली पुंडलिकासाठीं ॥ विटेवर शोभे कटिकर उभा भीमेचे कांठीं ॥ जय० ॥ ३ ॥ ऐसी मूर्ति नित्यनिरंतर ध्यानीं जे धरिती ॥ संकट त्यांचे दूर करीं तूं श्रीमंगळमूर्ती ॥ जय० ॥ ४ ॥ वायुसुतानें हृदयिं ध्यायिली जासि राघवमूर्ती ॥ तासि हनुमंता तुझिया पायीं देई सद्‍भक्ती ॥ जय जय आरति पार्वतिकुमरा० ॥ ५ ॥

४२. चाल—आरती सप्रेम जयजय विठ्ठल परब्रह्म

जय जय सिद्धिविनायक गणपत सुंदर सुखकारी ॥ वारों पंचारती बलि ज्याऊं मोहन दुखहारी ॥ धृ० ॥ चंदसुरजपरकास अनेक छबि लोभानी ॥ नित है बाला भैरव गजमुख मूरत सो मानी ॥ कुंडल किरीट कलासासिभाल त्रिलोचन सुखदानी ॥ एकदंत लंबोदर बिषधर कटसों लपटानीं ॥ जय जय सिद्ध० ॥ १ ॥ भुजचारो आभुखन लाजत तैसेहि आयुधजोर ॥ कर हल्ला असुरनपर विजई आद पूजे च्यहुंओर ॥ कोमल अरुनचरन कल्हाररवी क्यां कहूं महिमाज्योर । सुर नर मुनी गुनी ध्यानसो मानत गोपदज्यल ॥ जय० ॥ २ ॥ लाडीले जो आपहि तैसे बाहन मुषकसान ॥ नृत्य करत तापर तबमोहे हरगौरीबेभान ॥ विद्या सकलकलाके स्मामी लेत बिबिधघनतान ॥ छत्तीस वाजे लागरहे गन लेतहे गत परमान ॥ जय० ॥३॥ काहांलो बखानु अपरंपार ज्यो गुण हे निगम अगाद ॥ सत कहुं हितभावभगत तव ज्यो किरपालेसाद ॥ पावेंगो सुख भुगत मुगतको और नहीं लागेगो बाद ॥ मंगिशसुत हे दास तुमारो धरको ज्यानहर आद ॥ जय० ॥ ४ ॥

४३. चाल—ओवाळू आरती मदन गोपाळा

गणराया हे माझ्या हृदयालया ॥ ओवाळूं आरती तव पायां ॥धृ०॥ दे मति निर्मळ तव गुण गाया ॥ अद्वय मजसुख द्याया ॥ १ ॥ मज कल्पित विधिवदर्चनवंदन ॥ मानूनि घे आजि सदया ॥ २ ॥ महामायात्मज विघ्न हराया ॥ शांता पदरजीं मन दे रहाया ॥ ३ ॥

४४. चाल—पांडुकुमारा पार्थ नरवरा

आरति करितों गणपति देवा, दे मज मति आतां ॥ सर्व संकटें हरिसी सत्वर, गुण तुझे गातां ॥ धृ० ॥ पार्वतितनया विघ्ननाशका, तारिसी तूं भक्तां ॥ उद्धरले जड मूढ सर्वही, नाम तुझें गातां ॥ १ ॥ नित्य निरंतर भजतां येईल, निजपद तें हातां ॥ म्हणुनी चरणीं लीन सदा हरि, तल्लिन तुज पाहतां ॥ २ ॥



४५. चाल– भुवनसुंदराची.

आरती गौरिनंदनाची । गणाधिप विघ्ननाशनाची ॥ धृ० ॥ कमलसम अमरद्विरदवक्त्रा । पकरद मोदकर चरित्रा । तुंदउदरांक लघुविचित्रा । दिव्य कमनीय पूतगात्रा ॥ चाल ॥ पूर्ण राकेशतिलकभाला ॥ शिरसिधृतगरप, माथितविधिवरप, चकितहरसुरप, अमितकृतवृद्धि मंगलाची ॥ श्रीवृद्धि सत्सुमंगलाची ॥ आ० ॥ १ ॥ तडित्सम हाटकपीत पट तें ॥ सुवेष्टित मेखलादिकटितें ॥ मूषकारूढ सदृढघटितें ॥ भयद तनु धरुनि अर्धत्रुटितें ॥ चाल ॥ अटुनि अरिभृंग पाणिकमळीं ॥ सकलामरदंग, पिटिति करिं मृदंग. समरातिसुरंग, भंगुनि सिंदुराची ॥ सुरंग भंगुनि सिंदुराची ॥ आरती० ॥ २ ॥ हिमालयतन्विहृदयतोषा ॥ सुखालय सदय सुजनपोषा ॥ दैन्यविपदुपाधपूर्णशोषा ॥ सदाशिवपद दुरितमोषा ॥ चाल ॥ समरसुरुसाह्यकरण मान्या ॥ अमितखलकदन, करित यमसदन, भरितनिजपदन, तोद्धवरवदन जयरवाची ॥ करुनि ध्वनि गाति कीर्ति ज्याची ॥ आरती० ॥ ३ ॥ मदनसौंदर्यचरणापाणीं ॥ ब्रह्मविद्यार्थसिद्धखाणी ॥ शिवप्रिय स्तविती विबुधश्रेणी ॥ करित रविदास ललित वाणी ॥चाल॥ वरद्मतिमधुरवाग्र थाया ॥ कीर्ति गुणि अगुण, वर्ति परि सगुण, मूर्ति जन चरण. वर्ति भवअर्तितमहराची ॥ जगद्गुरु जननि हरिहरांची ॥ आरती०॥ ४ ॥

...२

४६. चाल—खचित बाई व्यर्थ आम्ही,

शिवतनया, अजि दे मतिला ॥ धृ० ॥ आरति तुजला करित मी भावें ॥ वर दे तूं मजला ॥ १ ॥ संकटनाशक बुद्धिप्रकाशक ॥ नमितों मी तुजला ॥ २ ॥ सिंदुरचर्चित शुंड विराजित ॥ मुषकावरि बसला ॥ ३ ॥ मंगलदायक नाम तुझें मुखीं ॥ जपतां हरि तरला ॥ ४ ॥

४७. चाल काय मला भूल पडली,

गजवदना पुजुनि तुला करिन आरती ॥ तारिं मला षड्रिपु हे नित्य पीडिती ॥ धृ० ॥ अति सुंदर रत्नमाळ कंठिं शोभती ॥ ऋद्धिसिद्धि नायिकादि चमर वारिती ॥ इंद्रादिक सुरवरनर नित्य पूजिती ॥ निशिदिनिं मी ध्यातों तुला तारिं गणपती ॥ १ ॥ भक्त-कामकल्पद्रुम शारदापती ॥ वर्णिति हे वेद चारि आणखी स्मृती ॥ निशिदिनिं जे भजति तुला तारिं त्यांप्रती ॥ वासुदेव लीन पदीं देविभो मती ॥ २ ॥

४८. चाल—काय मला भूल पडली.

जय जय जी शिवकुमरा प्रणतवत्सला ॥ ओंवाळिन पंचारति देईं सुमतिला ॥ धृ० ॥ लंबोदर वक्रतुंड शोभतें किती ॥ मोरमुकुट वैजयंति कंठीं झळकती ॥ कनकवलय तोडर ते बहुत विलसती ॥ होतो बहु तोष मनीं पाहुनीं तुला ॥ १ ॥ त्वत्स्वरूप त्वद्गुण हे स्वांति आणुनी ॥ ओंवाळिन पंचारती लुब्ध होउनी ॥ विनवितसे दत्तात्रय लीन भाषणीं ॥ भवतरणा अघ वारुनि उद्धरीं मला ॥ २ ॥

# आरत्या शंकराच्या



४९. चाल–अवतार गोकुळी हो०

मंगेश महारुद्रा ॥ जय पार्वतीवरा ॥ आरती ओवाळीन ॥ शिवा भोळ्या शंकरा ॥ धृ० ॥ आपुलें म्हणविसी ॥ देशील आणिकां हातीं ॥ हांसतील संत जन ॥ कृपासागरमूर्ती ॥ मंगेश० ॥१॥ सर्वत्र व्यापलासी ॥ जळीं स्थळीं पाषाणीं ॥ कृपेचा सागर हो ॥ आम्हां पावें निर्वाणीं ॥ मंगेश० ॥ २ ॥ विभूति व्याघ्रांबर ॥ गजचर्म परिधान ॥ वासुकी हार शोभे ॥ आला कृष्ण शरण ॥ मंगेश० ॥ ३ ॥

५०. चाल–साधी.

जय देव जय देव जय आदि पुरुषा ॥ त्रिभुवनपालक भक्तां देसी तूं हर्षा ॥ धृ० ॥ अर्धांगीं हे तुझे पार्वती अबला ॥ त्रिशूळ डमरू शोभे भस्माचा उधळा ॥ कपाल हस्तीं गळां रुंडांच्या माळा ॥ भुजंग भूषण शोभे त्रीनेत्रीं ज्वाळा ॥१॥ गजचर्मांबर शोभे तुजला परिधान ॥ ढवळा नंदी आहे तुझें पैं वहन ॥ विशाळकाळकूट कंठीं धारण ॥ त्रिताप हरुनि भक्तां चुकवीसी विघ्न ॥ जय० ॥ २ ॥ दिगंबर रूप तुझें लावुनियां मुद्रा ॥ जटाभार शोभे ज्ञानसमुद्रा ॥ परशुराम पाळक एकादशरुद्रा ॥ निरसीं हे भवरजनी चकोर स्वानंदा ॥ ३ ॥

५१. चाल-अवतार गोकुळीं हो०

जय देवा नीलकंठा ॥ सकल देवा आदि श्रेष्ठा ॥ रंक मी शरण आलों ॥ निवारीं भवकष्टा ॥ धृ० ॥ निर्गुण निर्विकारा ॥ शिवा कर्पूरगौरा ॥ व्यापुनी चराचरीं ॥ होसी प्रकृतीपरा ॥ अगणित कोटि लिंगें ॥ पुराणप्रसिद्ध बारा ॥ एक तरी दृष्टि पाहें ॥ अन्यथा भूमीभारा ॥१॥ सोरटी सोमनाथ ॥ जगीं एक विख्यात ॥ तयाच्या दर्शनें हो ॥ चुके संसारपंथ ॥ हिमवंत पृष्ठभागीं ॥ लिंगें केदार मुक्त ॥ साधुसंत सेवितातीं ॥ धरुनि कैवल्य हेत ॥ जय०॥ २ ॥ उज्जयिनि नाम पूरीं ॥ पवित्र सचराचरीं ॥ महाकाळ लिंग जेथें ॥ धन्य जो पूजा करी ॥ ॐकारमहाबळेश्वर ॥ ज्योतिर्लिंग निर्धारीं ॥ तयाच्या दर्शनें हो ॥ जन्ममरण निवारी ॥ जय० ॥ ३ ॥ पश्चिमे लिंग एक ॥ जया नाम त्र्यंबक ॥ गौतमी उगम जेथें ॥ वाहे मंगलदायक ॥ दर्शनें स्नानमात्रें ॥ पुण्यपावन लोक ॥ तैसाच घृष्णेश्वर ॥ सेवाळे रमणीक ॥ जय० ॥ ४ ॥ भीमेचा उगम जेथें ॥ भीमाशंकर तेथें ॥ डाकिनी स्नानकरिती ॥ लिंग म्हणती तयातें ॥ अगणित पुण्य जोडे ॥ चालतांची तेणें पंथे ॥ दक्षिणे रामेश्वर ॥ ज्योतिर्लिंग म्हणती त्यातें ॥ जय० ॥ ५ ॥ आवंढ्यानागनाथ ॥ देव आपण नांदत ॥ भक्तजनकुटुंबीया ॥ भुक्तिमुक्तिदायक ॥ प्रत्यक्ष लिंग जेथें ॥ परळीवैजनाथ ॥ हरिहरतीर्थीं तेथें ॥ जन होय कृतार्थ ॥ जय० ॥ ६ ॥ श्रीशैल तो पर्वत ॥ लिंगरूप समस्त ॥ सभोंवती नळिगंगा ॥ माजी श्रीमल्लिनाथ ॥ भूमिकैलास दूजा ॥ जन साक्ष दावीत ॥ साठीवरुषें वाट पाहे ॥ कृपाळु तो उमाकांत ॥ जय० ॥ ७ ॥ धन्य हो काशिपूरी ॥ मणिकर्णिकातीरीं ॥ विश्वेश्वर लिंग जेथें ॥ जीवमात्रा उद्धरी ॥ तारक ब्रह्ममंत्र ॥ जपे कर्णाविवरीं ॥ तेणेंची मोक्षपद ॥ प्राप्त होय निर्धारीं ॥ जय० ॥ ८ ॥ येउनीयां संसारा ॥ माजी ज्योतिर्लिंगें बारा ॥ एकतरी दृष्टि पाहें ॥ अन्यथा भूमिभारा ॥ विश्वेश्वर विश्वनाथ ॥ भावभक्ति निर्धारा ॥ नामया श्रीशीवदास ॥ ध्याय परात्परा ॥ जय देवा नीलकंठा ॥ ९ ॥

### ५२. चाल साधी.

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा ॥ वीषें कंठ काळा त्रीनेत्रीं ज्वाळा ॥ लावण्य सुंदर मस्तकीं बाळा ॥ तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥ आरती ओंवाळूं तुज कर्पुरगौरा ॥ धृ० ॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं वीशाळा॥ अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥ विभुतीचें उधळण शिवकंठ नीळा ॥ ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय देव० ॥ २ ॥ देवी दैत्यीं सागर मंथन पैं केलें ॥ त्यामाजीं अवचीत हळाहळ सांपडलें ॥ तें त्वां असुरपणें प्राशन केलें ॥ नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥ जय० ॥ ३ ॥ व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ॥ पंचानन मन मोहन मुनिजन सुखकारी ॥ शतकोटींचें बीज वाचे उच्चारीं ॥ रघुकुळटीळक रामदासा अंतरीं ॥ जय देव जय देव० ॥ ४ ॥

### ५३. चाल—साधी.

उपमा नाहीं रूपीं निर्गुणगुणरहिता ॥ कैलासाहुनि मानस धरिला भजकार्था ॥ काशी आदि करूनी गणनाच्या तीर्था ॥ लिंग देहें वससी भक्ती भावार्था ॥ १ ॥ जय देव जय देव अजिनांबर-धारीं ॥ आरति तुज मंगेशा निर्गुण उपचारीं ॥ धृ० ॥ गजचर्म परिधान शशि धरिला शीरीं ॥ भूधर जिंकुनि कंठीं केली उत्तरी ॥ जटाजूटीं वसे गंगा सुंदरी ॥ वाहन नंदी तुझें अर्धांगी गौरी ॥ २॥ मंगलदायक तूझें शिवनाम घेतां ॥ तत्क्षण भस्म होती तापत्रयव्यथा॥ अभिन्नाभिन्न भाव दासाच्या चित्ता ॥ चरणाविरहित न करीं मज गौरीकांता ॥ ३ ॥

### ५४. चाल—साधी.

जय देव जय देव जय श्रीमंगेशा ॥ पंचारति ओंवाळूं सदया सर्वेशा ॥ धृ ॥ सदया सगुणा शंभो अजिनांबरधारी ॥ गौरीरमणा आद्या मदनांतकारी ॥ त्रिपुरारी अघहारी शिवमस्तकधारी ॥ विश्वं-भर विरुदे हें मम संकट वारीं ॥ १ ॥ भयकृत् भयनाशन हीं नामें तुज

देवा ॥ विबुधादिक कमळासन वांछिति तव सेवा ॥ तुझे गुण वर्णाया वाटतसे हेवा ॥ अभिनव कृपाकटाक्षें मतिउत्सव द्यावा ॥ जय० ॥ २ ॥ शिव शिव जपतां शिव तूं करिसी निजदासा ॥ संकट वारी मम तूं करिं शत्रुविनाशा ॥ कुळवृद्धींत पावावि हीच असे आशा ॥ अनंतसुत वांछितसे चरणांबुजलेशा ॥ जय देव जय देव० ॥ ३ ॥

५५. चाल—अवतार गोकुळीं हो०

जय देवा धूतपापा ॥ आतां संकल्प खेपा ॥ या क्षेत्रीं जन्मा आलों ॥ कृतकृत्य मी झालों ॥ धृ० ॥ रचना कैलासाची ॥ शीतळाई गंगेची ॥ विशाळ पर्वतांगें ॥ दोहीं भागीं गिरिशृंगें ॥ मस्तकीं मध्यभागीं ॥ दास करिसी सभागी ॥ दीन जन उद्धराया ॥ पावन करिसी काया ॥ जय० ॥ १ ॥ कल्पतरू द्वारापुढें ॥ ठायीं ठायीं फुलझाडें ॥ भंवतालीं बागशाई ॥ सुगंधिनी जुई जाई ॥ फुलती बारामास ॥ दाट देऊळीं सुवास ॥ हें स्थान अनुपम्य ॥ कैलासाहूनि रम्य ॥ जय० ॥ २ ॥ उत्साह प्रतिदिवशीं ॥ न वर्णवे आनंदासी ॥ सर्वदा सद्‌गुण गाती ॥ मंगलवाद्यें वाजवीती ॥ सप्रेमें नाचताती ॥ रंगीं तल्लीन होती ॥ या सौख्या पार नाहीं ॥ क्षेत्र पाहतां दुःख जाई ॥ जय० ॥ ३ ॥ जगदीशा जगदुद्धारा ॥ सोडवीं या संसारा ॥ चित्तवृत्ती शांत व्हावी ॥ अवघी मायाकृति जाणावी ॥ नाचावें ब्रह्मानंदें ॥ जगतारकनामछंदें ॥ करुनि कृपा वर देई ॥ म्हणोनि विष्णु लोळे पायीं ॥ जय देव० ॥ ४ ॥

५६. चाल—साधी.

मस्तकिं जान्हूतनया विमळार्जुन तारी ॥ भाळीं रजनीनायक वामांगीं गौरी ॥ नयनीं पावक श्रवणीं विनतसुतागौरी ॥ कंठीं विषमळ तुंबळ व्याघ्रांबरधारी ॥ १ ॥ हर हर हर महादेव हर शिव भूतेशा, शिव हर नागेशा ॥ उजळितों उत्तमदीपा, लावितों कर्पूरदीपा दूर करिं भवपाशा ॥ धृ० ॥ विश्वंभरा जटिला शिव कर्पुरगौरा ॥ रतिपति जाळुनि क्रोधें त्वां वधिलें त्रिपुरा ॥ शिव शिव नाम जपतां वाचे रघुवीरा ॥ नकळे महिमा तूझा निर्गुण ॐकारा ॥ हर० ॥ २ ॥ दश-

भुज पंचानन तूं वससी स्मशानीं ॥ भस्मधूळण आंगीं कंथा परिध्यानीं ॥ पन्नग रुळती गळां सुर भजती वाणीं ॥ वृषारूढ तूं योगी शिव शूळपाणी ॥ हर० ॥ ३ ॥ जपतपसाधन तेथें साक्षी कर्माचा ॥ तत्पर नामा योगी आश्रम धर्माचा ॥ सादर परमार्थी तूं भक्तां चौं साचा ॥ गावा स्वानंदाचा अंतक सर्वांचा ॥ हर० ॥ ४ ॥ सर्वहि सर्वेशा तूं सद्गतिचा दाता ॥ मायेचें निर्मूळ शंकर तूं कर्ता ॥ एकविस स्वर्गें उंची त्याहुनि तूं वर्ता ॥ वदनीं तानाजीच्या शिव शिव हे वार्ता ॥ हर हर हर महादेव० ॥ ५ ॥

५७. चाल—साधी.

आरती चंद्रशेखराची ॥ अंबिकेश्वरा शंकराची ॥ धृ० ॥ कमलासना नंदिवहना ॥ रजताचलीं रचित भवना ॥ त्रिनयना मूर्ति पंचवदना ॥ गिरिजा वामांगीं ललना ॥ चाल ॥ मस्तकीं गंगा भंगसंगा ॥ अंगाभरण भूति नुति, करिति सुर नति, प्रेमभक्ति यति, वरिति नित्य ज्याची ॥ दुर्लभा वरिति नित्य ज्याची ॥ आर० ॥ १ ॥ कविगण ध्याति पदारविंदा ॥ प्रभुच्या गाति सुगुणवृंदा ॥ यद्यशस्तुल्य इंदुकुंदा ॥ भजतां तारितसे मंदा ॥ चाल ॥ यद्गति निखिलसौख्यजननी ॥ होंउनि अमित, चरित बहु निरत, सतत जन मुक्ति, निजसुखें भरित होति साची ॥ सर्वदा भरित होति साची ॥ आरती० ॥ २ ॥ वाणीदेवी धरि वीणा ॥ विधि करि करताल निपुणा ॥ इंदिरा गानरचन पूर्णा ॥ इंद्र पटु वेणुनादकर्णा ॥ चाल ॥ धिमिधिमि थोंग मृदुंगांचा॥निशामुखिं नाद सांद्र, पटु मंद्र हरि करिंद्र सुंदरस्य नाकेंद्र, सर्व लक्षुनी सेविती विधृति तांडवाची ॥ शंभुला विधृति तांडवाची ॥ आर० ॥ ३ ॥ निरुपमालिला नीलकंठा ॥ वर्णितां श्रुतिहि होति कुंठा ॥ त्रिकाळीं धरुनि अक्षकंठा ॥ बुधसभा पूजि विरोत्कंठा ॥ चाल ॥ करिती नृत्य थैयथैया ॥ अप्सरा धरा, धारकोगेंद्रावरा, हरा रंजविति परा, प्रीति ज्या गानसेवनाची ॥ प्रभूला गानसेवनाची ॥ आर० ॥ ४ ॥ यत्स्मृति पापसिंधुतरणी ॥ विधिहरी तेही रत स्मरणीं ॥ गहना प्रभुवराचि करणी ॥ नयनयुग इंदु आणि

तरणी ॥ चाल ॥ निशिदिनिं वासुदेव पाळी ॥ विशाळि भाळिं, शोभलि श्रीदलालि, रुद्राक्षमाली, काकालेत लळित अतिकांति धवलि विभुची ॥ रंजनी कांति धवलि विभुची ॥ आरती० ॥ ५ ॥

५८. चाल—साधी.

जय देव जय देव वंदे तं गिरिशं ॥ विधिहर वासववंदित चरणां बुजमनिशं ॥ धृ० ॥ रजनीकरयुतभालं भुवनत्रयपालं ॥ करतलधृत-करवालं दानवकुलकालं ॥ कंठे धृतविषजालं नरमस्तकमालं ॥ विग्रहधृतसुव्यालं वारितभवजालं ॥ १ ॥ निगमागश्रुतिसारं भुज-गाधिपहारं ॥ करुणापारावारं भस्मीकृतमारं ॥ भैरवगणपतिवारं गिरितनयाधारं ॥ शुद्धं जगदुद्धारं संश्रितभुजसारं ॥ जग० ॥ २ ॥ फणिवर कुंडलमंडितगंडस्थलयुगुलं ॥ मूर्ध्नाधृतकलिनाशकगंगाशु-भसलिलं ॥ त्रिभुवनपावनकृपया पीताखिलगरलं ॥ स्वेच्छाहृतकम-लासनपंचकमुखकमलं ॥ जय० ॥ ३ ॥ कटितटविलसद्वारणचर्मा-बरगमलं ॥ भार्गवमशिवापहवरमंडितकरकमलं ॥ स्कंदं मृगकराहिम-करदुग्धार्णवधवलं ॥ विजितारातिसुशोभितपंचाननकमलं ॥ जय० ॥ ॥ ४ ॥ पंचास्यं गंगायुतभाले धृतनयनं ॥ जनसर्गस्थितियोजितप-द्मजजलशयनं ॥ ध्वंसितदक्षाध्वहरमदकंदलनयनं. ॥ निजपदपद्म-जसंगतनारायणशरणं ॥ जय० ॥ ५ ॥

५९. चाल—साधी

शुक्रेश्वर सिद्धेश्वर शंभो महादेवा ॥ विश्वेश्वर त्रिगुणालय दिन-रजनीं ध्यावा ॥ मुकुटीं गंगा भाळीं शशि नील ग्रीवा ॥ सुंदर ध्यान दिगंबर जगदात्मा गावा ॥ १ ॥ जय देव जय देव जय गिरिजा-रमणा ॥ त्रिपुरांतक हर रुद्रा नमितों तव चरणा ॥ धृ० ॥ नमिती सुरमुनि पेसा तूं शंकर भोळा ॥ होउनि याचक येउनि चिलया उद्धरिला ॥ मार्कंडेयालागीं मृत्यू चुकवीला ॥ मत्करुणा कां न ये जिव उरला डोळां ॥ जय० ॥ २ ॥ जन्मार्जित दोषानें चौऱ्यांशीं फिरलों ॥ कवण्या योगें न कळे नरजन्मा आलों ॥ विसरुनि हितमतिगातिला

भवडोहीं फसलों ॥ तापत्रयसंतापें जर्जर बहु झालों ॥ जय० ॥ ३ ॥ मृगजलतृष्णा लटकी हें मजला कळलें ॥ मायेच्या अनुसंगें कवटाळुनि धरिलें ॥ कामक्रोधादिक हे रिपु जागे केले ॥ विषयांच्या लोभानें स्वहित बुडवीलें ॥ जय० ॥ ४ ॥ ऐशीं दुःखें वदतां थकलों मी ताता ॥ आतां अंत न पाहें होईं मज दाता ॥ विष्णूचा कैवारी सांब प्रिय असतां ॥ मग कां करणें लागे भवसागरचिंता ॥ जय०॥५॥

६०. चाल–साधी

जय जय त्र्यंबकराज गिरिजानाथा गंगाधरा हो ॥ त्रिशूल पाणी शंभो नीलग्रीवा शशिशेखरा हो ॥ वृषभारूढ फणिभूषण दशभुज पंचानन शंकरा हो ॥ विभूतिमाळाजटा सुंदर गजचर्मांबरधरा हो ॥ धृ० ॥ पडलें गोहत्येचें पातक गौतमऋषिच्या शिरीं हो ॥ त्यानें तप मांडिलें ध्याना आणुनि तुज अंतरीं हो ॥ प्रसन्न होउनि त्यातें स्नाना दिधली गोदावरी हो ॥ औदुंबरमुळिं प्रगटे पावन त्रैलोक्यातें करी हो ॥ जय० ॥१॥ धन्य कुशावर्ताचा महिमा वाचे वर्णूं किती हो ॥ आणिकही बहु तीर्थें गंगाद्वारादिक पर्वती हो ॥ वंदन मार्जन करिती त्यांचे महा दोष नासती हो ॥ तुझिया दर्शनमात्रें प्राणी मुक्तीतें पावती हो ॥ जय० ॥ २ ॥ ब्रह्मगिरीची भावें ज्याला प्रदक्षिणा जरि घडे हो ॥ तें तें काया कष्टे जंव जंव चरणीं रुपती खडे हो ॥ तंव तंव पुण्य विशेष किल्मिष अवघें त्याचें झडे हो ॥ केवळ तो शिवरूपी काळ त्याच्या पायां पडे हो ॥ जय० ॥ ३ ॥ लावुनियां निजभजनीं सकळहि पुरविसि मनकामना हो ॥ संतति संपति देसी अंतीं चुकविसि यमयातना हो ॥ शिव शिव नाम जपतां वाटे आनंद माझ्या मना हो ॥ गोसावीनंदन विसरे संसारयातना हो ॥ ४ ॥

६१. चाल–साधी

शिव सांब शिव सांब शिव धूतपापा ॥ त्वत्सेवकदासांच्या हरिसी भवतापा ॥ धृ० ॥ त्वन्मूर्तीध्यानचि बहु प्रेमळ आवडतें ॥ पाहतां चंद्र ललाटीं मन तल्लिन होतें ॥ पिंगट जटांत गंगाजळ शिरिं डळमळतें ॥ निर्मळ पाणी शीतळ सर्वांगीं स्रवतें ॥ शिव० ॥ १ ॥ परि-

धान व्याघ्रांबर रुंडांच्या माळा ॥ भासे शुद्ध मयूरापरि कंठ हि काळा ॥ तृतीय नेत्रीं निघती दीप्ताग्नि ज्वाळा ॥ अंगावर धुंदकारे नागांचा मेळा ॥ शिव० ॥ २ ॥ जगदीशा मज दे पादांबुज सेवा ॥ आसक्त भ्रमरापरि होउनि रस घ्यावा ॥ माया ही जग अवघें उपदेश व्हावा ॥ विष्णूनें ज्ञानाचा सुदीप लावावा ॥ शिव० ॥ ३ ॥

६२. चाल—साधी

वृषवाहन वृंदारक वृंदकवर शंभो ॥ वारणसदजिनवासो वारिद-गलशंभो ॥ वासववंदितअंभोविकसितपदशंभो ॥ वाक्पतिवर्णितवैभव विश्वेश्वर शंभो ॥१॥ जय देव जय देव शिवशंकर शंभो ॥ श्यामल शरण परात्पर शशिशेखर शंभो ॥ ध्रु० ॥ भोगि विभूषण भासुर भावनभुज शंभो ॥ भूसुर भूरिभयापह भगवन् भव शंभो ॥ भैरव भावित कुंभोदर गणभर शंभो ॥ भासित भूत भयंकर भिक्षाटण शंभो ॥ जय० ॥ २ ॥ गंगाधर गिरिजावर गुह्यकगुण शंभो ॥ गाढ-करासितगुणाजितगायनगल शंभो ॥ गीतागोरसभुग् भो गणपतिगुरु शंभो ॥ गभीर गोपतिगर्जन गोपालक शंभो ॥ जय० ॥ ३ ॥

६३. चाल—साधी.

जय देव जय देव जय जी मंगेशा ॥ आरती ओंवाळूं तुजला सर्वेशा ॥ ध्रु० ॥ महास्थान तूझें गोमांतक प्रांतीं ॥ भावेंकरुनी करितीं तुजला आरती ॥ महाभक्त तूझे निशिदिनिं गुण गाती ॥ मी तो दास तूझ्या चरणांची माती ॥ जय० ॥१॥ धरिलासी अवतार दुष्टां माराया ॥ साधूसंत जन पृथ्वी ताराया ॥ भक्तांचा तारक तूं मंगेशराया ॥ सर्प अक्षय करितो तुजवरती छाया ॥ जय० ॥ २ ॥ दुःखदरिद्रादिक हीं विघ्नें नीवारीं ॥ संकष्टापासूनी मजलागीं तारीं ॥ शक्ती घेऊनि करीं दुष्टां संहारीं ॥ जैसा धेनू रक्षी कृष्ण नरकारी ॥ जय० ॥ ३ ॥ तत्व गुणवर्णन करितां पुण्या ये चेव ॥ तुझिया चरणीं आहे माझा दृढ भाव ॥ तूझे देवालयीं बहुताचि उत्साह ॥ मोरेश्वर तुज नामतो चरणी दे ठाव ॥ जय० ॥ ४ ॥

६४. चाल—साधी.

जय देव जय देव जय शंकर सांबा ॥ ओंवाळित निजभावें, नमितों मी सद्भावें वर सहजगदंबा ॥ ध्रु० ॥ जय जय शिव हर शंकर जय गिरिजारमणा ॥ पंचवदन जय त्र्यंबक त्रिपुरासुरदहना ॥ भव दव भंजन सुंदर स्मर हर सुखसदना ॥ अविकल ब्रह्म निरामय जय जगदुद्धरणा ॥ जय० ॥ १ ॥ जगदंकुरवरबीजा सन्मय सुख नीजा ॥ सर्व चराचर व्यापक जगजीवन राजा ॥ प्रार्थित करुणावचनें जय वृषभध्वजा ॥ हर हर सर्वहि माया नमितों पदकंजा ॥ जय० ॥ २ ॥ गंगाधर गौरीवर जय गणपतिजनका ॥ भक्तजन प्रिय शंभो वंद्य तुं मुनिसनकां ॥ करुणाकर सुखसागर जननगिंच्या कनका ॥ तव पद वंदित मौनी भवभ्रांतिहरका ॥ जय० ॥ ३ ॥

६५. चाल—साधी.

जय देव जय देव जय गिरिजारमणा ॥ पंचप्राणें आरति स्वामीच्या चरणा ॥ ध्रु० ॥ अभिनव सुंदर गंगाकाशीपुरवासी ॥ विश्वेश्वर येउनियां तारक उपदेशी ॥ जातां उत्तर पंथे हिमागिरिगगनासी ॥ भजतां केदारासी कलिकिल्मिष नाशी ॥ जय० ॥ १ ॥ स्मरतां महाकाळ नगरीं उज्जयिनीं ॥ प्रदोषकाळीं पूजा पाहावी नयनीं ॥ सोरटि सोमेश्वर नांदे त्रिभुवनीं ॥ चित्तीं चिंतन केल्या राहे निज सदनीं ॥ जय० ॥ २ ॥ औंढकपुरिचें वन हें दारुण वृक्षांचा ॥ भूषण नागेशाचा मणिमयमुक्तांचा ॥ परळीवैजेश्वर हरिहरतीर्थांचा ॥ ऐसा शंकर शोभे बिल्वपत्राचा ॥ जय० ॥ ३ ॥ ॐकारममलेश्वर रेवापुर-पटणीं हरिहरयुद्धें झालीं बाणांच्या खाणी ॥ शेवाळी घृष्णेश्वर वदतो कपि वाणी ॥ वेरुळीची महिमा ऐकावी श्रवणीं ॥ जय० ॥४॥ गौतमऋषिच्या तपें गोदा आली हे ॥ त्र्यंबकराजा नमितां भवभय जाता हे ॥ शाकिनि डाकिनि काळा ज्या क्षेत्रीं राहे ॥ भीमाशंकर सुंदर तेथुनि दिसताहे ॥ जय ॥ ५ ॥ दक्षिण यात्रा करितां जातां ते मार्गीं ॥ शिवरात्री जागरण मल्लिकार्जुनालिंगीं ॥ रामेश्वर रत्नाकर मौक्तिकिच्या संगी ॥ द्वादश लिंगें कथिलीं कृष्णानें अंगीं ॥ जय० ॥६॥

## ६६. चाल-साधी.

जय जय जय शिव शंभो गंगाधर गिरिश ॥ पंचारतिमंगीकुरु स्वामिन् विश्वेश ॥ धृ० ॥ चंद्रोद्भासितमौल कंठे धृतगरलं ॥ त्रिभुवनदाहकपावकचक्षुःस्थितभालं ॥ प्रियभूषणकृतव्यालं वरवाहनविमलं ॥ उज्ज्वलसुंदरहृदयं नरशिरकृतमालं ॥ जय० ॥ १ ॥ राजितकरतलचतुरं खड्गैः खट्वांगं ॥ पिनाकडमरूमंडितत्रिशूलधर भुजगं ॥ रजताचलसमवर्णं सुंदरसर्वांगं ॥ दिग्वसनं शिरजटिलं स्वीकृतकुशलांगं ॥ जय० ॥ २ ॥ वरदाभयदा ईशा दुरितक्षयकर्ता ॥ सुरनरभजनें स्तवनें वांछितफलदाता ॥ त्रिपुरांतक सुखदायक विषतासंहरता ॥ शरणागतरक्षक मम करुणाकर त्राता ॥ जय० ॥ ३ ॥ गौरीरमणा गहना श्रेष्ठा स्मरदहना ॥ भस्मोध्दूलितसदना जनतामनहरणा ॥ तापत्रयअघशमना करुणाकरगमना ॥ विघ्नेशा गणनायक त्राता परिपूर्णा ॥ जय० ॥ ४ ॥ पशुपति स्मशानवासि परिवेष्ठित भूतैः ॥ अनुचरमंगिशसुत वर्णित प्रणिपातैः ॥ दीनोद्धर पतितोऽहं तारय तपभूतैः ॥ जय जय शंकर अभीष्टवांछित इत्येतैः ॥ जय० ॥ ५ ॥

## ६७. चाल-साधी.

कुलदैवत तूं मेरो सेवक मैं तेरो ॥ सुरनर सेवा करले पायो सुख सारो ॥ पूज्यों पाव तुमारो तनमनधन वारो ॥ तुम बिन जाणु न दुज्यो मोकूं तुम प्यारो ॥ १ ॥ जयजयाजी महादेव प्रभुजी देवनको ॥ पंचारति करहों मैं दास पदरजको ॥ धृ० ॥ उदधिमथनाबिखे जब बिख जालन लागो ॥ सुरनर ब्रह्मा विष्णू तब सब ले भागो ॥ शरणगतहो तुमपे रच बोलन लागो ॥ तवकृपासे गलबिख दूरदे ससि भागो ॥ जय० ॥ २ ॥ त्रिपारासुर मारनथे रथ धरती किन्हो ॥ शशिसूरज दोचक्कर घोडे बेद बनो ॥ ब्रह्मा सारथि विष्णु अच्छो शरमान्यो ॥ विधिजाल त्रिपुरन सो कीरत सब जानो ॥ जय० ॥ ३ ॥ सुख पाई सबसृष्टी आई पूजनकूं धुप दिप भोग लगाये ठाडे आरातिकूं ॥ बेल फुल कमल चढाये रिझाये हर तुमकूं ॥ मनवांछा सुख पायके आये निजपदकूं

॥ जय० ॥ ४ ॥ ऐसे तुम महाराज दयाल दीननके ॥ पांचो प्राण निराजन वारों देहनके ॥ बलजाऊं चरनोपर कंथज गिरिजाके ॥ दास सदाशिव निश्चळ नाथ रहो तुम वाके ॥ जय० ॥ ५ ॥

६८. चाल—साधी.

जय जय नाथ निरामय शिव शिव अविनासी ॥ प्राणनकी पंचारति वारो मैं खासी ॥धृ०॥ अलखलखके कारन धर गुणकी देही ॥ गुणमायाके संगत त्रिभुवन रचवाई ॥ हरिहर ब्रह्मा आपहि बन इह रखवाई ॥ सब घट पूरन न्यारे राजत सुखसांई ॥ जय० ॥ १ ॥ कब हूं मन दीपनमों मंदर गिरि कब हूं ॥ कैलासाचल कब हूं भक्तन मन कब हूं ॥ नंदन बन दंडक बन जल थल कछू कोहूं ॥ जित देखूं उत तूहूं तुम बिन नहि कोहूं ॥ जय० ॥ २ ॥ तूं मायासो प्राणी भूल रहे तोहे ॥ तुं बजानेसो तूं ही बन गुनगन खोये ॥ अनन चरणशरणागत तुमपे जो आये ॥ माया तर मंगिशसुत इहपर सुख पाये ॥ जय० ॥ ३ ॥

६९. चाल—साधी.

जय जय जय मृड शंभो सततं कुरु शंभो । स्मरहर मयि विस्तारय करुणामनिशं भो ॥ परिहर कल्मषमखिलं विद्यामृतसिंधो ॥ प्रविलोकय नीराजनमगतिकानिजबंधो ॥ धृ० ॥ दुस्तरमायाजाले पतिताखिलजंतून् ॥ गार्भिकपीडानुभवैः स्मरतो निजमंतून् ॥ प्रसवजदुःखं तेषां कः प्रभवति वक्तुम् ॥ विधूतपापादितरो न हि शक्तस्त्रातुम् ॥ जय० ॥ १ ॥ बहुविधपीडासंकुलशैशवमनुभवताम् ॥ मत्कुणमुखक्रमिदंशैरुच्चैः संरटताम् ॥ पर्यंकादौ शयने तनुभिः परिलुटताम् ॥ विधूतपाप त्वदृते कस्तानुद्धरताम् ॥ जय० ॥ २ ॥ पतितं यौवनगहने व्यथितं गजकामैः ॥ लोभाजगरैर्गिलितं दीर्णं मदकोलैः ॥ विषधरविषयैर्दष्टं क्लिष्टं भयजालैः ॥ करुणापांगैर्विश्वं शिव पाहि सलिलैः ॥ जय० ॥ ३ ॥ वार्धकतावज्ज्ञातं गलितेंद्रियशक्तिम् ॥ यातायातश्रांतं व्याधिभिराभिभूतम् ॥ दुरंताचिंताकुलितं

निजजनपरिभूतम् ॥ जनमवतादघभयहर विश्वेश्वर सततम् ॥ जय०॥४॥ संकटपारावारे पतितं भृशभीतम् ॥ नित्यं दुःस्थितचित्तं तापत्रयततम् ॥ जगदखिलं गंगाधर कुरु करुणासक्तम् ॥ काशीविप्रं मोचय भवसर्पग्रस्तम् ॥ जय० ॥ ५ ॥

७०. चाल–साधी.

जय देव जय देव जय रतिपतिदहना ॥ मंगल आरति करितों छेदी अघविपिना ॥ धृ० ॥ गौरीवर गंगाधर तनु कर्पुरपेशी ॥ गज-व्याघ्राचीं चर्में प्रेमें पांघुरसी ॥ कंठीं कपाळमाळा भाळीं दिव्य शशी ॥ अनिलाशन भूषण हर शोभत कैलासीं ॥ जय० ॥ १ ॥ त्रिपुरासुर अतिदुस्तर प्रबल तो झाला ॥ तृणवत् मानित वासव विधी आणी हरिला ॥ तेव्हां निर्जर भावें स्मरताती तुजला ॥ होउनि सकृप त्यांवरि मारीसि त्रिपुराला ॥ जय० ॥ २ ॥ जे तव भक्तिपुरस्सर जप तप स्तव करिती ॥ त्यांतें अष्टहि सिद्धी स्वबलानें वरती ॥ शिव शिव या उच्चारें जे प्राणी मरती ॥ चारी मुक्ती येउनि त्यांचा कर धरिती ॥ जय० ॥ ३ ॥ वृषभारूढा मूढां लावीं तव भजना ॥ भवसिंधू दुस्तर तो करिं गा सुलभ जना ॥ होवो सुलभ मला तव मायेची रचना ॥ दास म्हणे ताराया दे सकृप वचना ॥ जय ० ॥ ४ ॥

७१. चाल–साधी

आरती परमईश्वराची ॥ दिगंबर गौरिसह हराची ॥ धृ० ॥ भस्मप्रियकश्मलांगभंगा ॥ शिरावरि दुरितहरतिगंगा ॥ त्रिलोचन भस्मिकृतअनंगा ॥ सतत विज्ञानपतितदंगा ॥ चाल ॥ भूतपति पूतचरित शंभो ॥ समरिं अरिदमित, अमरवरनमित, कुमरगणदुमित, उमेसह अमित केलि ज्याची ॥ वल्लरी प्रणवसिद्धि ज्याची ॥ १ ॥ अमल शिव जटिल नागभूषा ॥ नीलग्रीव कालकूट शोषा ॥ सामप्रिय अर्चित प्रदोषा ॥ स्वपदनतभक्तवृंदतोषा ॥चाल॥ नृकपालमालकंठधारा ॥ सुपट गजअजिन, धुपट भववृजिन निपट दशभुजिन, निधूत सजिव विग्रहाची ॥ कांतिअति मारनिग्रहाची ॥ २ ॥ श्वेतसितकर्पुरांगभासा ॥

पितृसुखकेलिदावभासा ॥ निगमकैलासगिरिनिवासा ॥ सुखप्रदव्याघ्रचर्मवासा ॥ चाल ॥ सांब हर मंगलांग योगी ॥ मुसलपट्टत्रिशुल, खड्गधर सुशिल, करित जनकुशल, स्मरांतक कुशल बुद्धि ज्याची ॥ वानिती शैव कीर्ति ज्याची ॥ आरती० ॥ ३ ॥ शैलजा आननकंजभृंगा ॥ योगि हृत्तिमिरहरपतंगा ॥ ब्रह्मविज्ञानजलतरंगा ॥ विमलवैराग्यदुर्गशृंगा ॥ चाल ॥ प्रणतरविदासचरणयुगुलीं ॥ दुरितभयमरण, विमुखकृत शरण, भवाब्धीतरण, भवार्पणमालरवकुलांची ॥ करित हरकरिग्राहसाची ॥ आरती० ॥ ४ ॥

७२. चाल—साधी.

सद्यो जातं प्रपद्यामितिस्मरणे श्रुतिमंत्रं ॥ सांबं पंचवक्त्रं चेतो मम देवं ॥ सहजं सहजानंदं सकलं परिपूर्णं ॥ सर्वं ब्रह्मातीतं श्रुतिभिः प्रतिपाद्यं ॥ १ ॥ जय देव जय देव जयत्र्यंबकराजन् ॥ गंगाधर गौरीवर शंकर शुलपाणी ॥ ध्रु० ॥ भवेभवेनाति भवे भजने त्रीनेत्रं ॥ भवस्वतेजोबुद्धिर्महताजगदीशं ॥ अनाथनाथं वंदे आत्माविश्वेशं ॥ मृगधरपरशुहस्तं शिवचंद्रमौलिं ॥ जय० ॥ २ ॥ वामदेवं वंदे विदेहकैवल्यं ॥ सद्योजातं सिद्धिं ज्येष्ठं श्रेष्ठत्वं ॥ विभूतिसुंदरचर्चितशंभोसर्वांगं ॥ नमामि रुद्रं कालं तारकजगदीशं ॥ जय० ॥ ३ ॥ अघोरघोरेघोरं भयरुद्रोभीमं ॥ भूतं भूतनाथं भुजंगमणिभूषं ॥ कपर्दीकामारीभयकृद्भयनाशं ॥ सर्वं सर्वाध्यक्षं भक्तानुग्रहदं ॥ जय० ॥ ४ ॥ तत्पुरुषायविद्महे चिन्मय आकाशं ॥ महादेवो बुद्धिव्यापक सर्वज्ञं ॥ त्रिगुणं त्रिगुणातीतं तत्परपरमेशं शंभोनादं मोदं प्रणवं ॐकारं ॥ ५ ॥ ईशानः सर्वभूते भजते विद्युत्त्वं ॥ ब्रह्माधीपत्यत्वं ब्रह्मापरमेशं ॥ सत्यं सत्यानंदं चिन्मय आकाशं चिदानंदोहेतुः शिवाशिवॐकारं ॥ जय० ॥६॥ गुह्यकअप्सरकिन्नर गायति संगीतं ॥ नंदीभृंगीचंडीगणपतिनित्यत्वं ॥ ताडवनिपुणं सांबं अद्भुतआनंदं ॥ हरिहरब्रह्माध्यक्षं त्र्यंबकप्रभुराजं ॥ जय० ॥ ७ ॥ अनंतशेषा हरिहरब्रह्मा मध्यस्थं ॥ नारदतुंबरगीतं सन्मुखहनुमंतं ॥ अगणितमहिमाध्यक्षं अभयंवरदानं ॥ गंगाधरदीक्षितकृतमुक्तीसायुज्यं ॥ ८ ॥

७३. चाल–अवतार गोकुळीं हो०

महाजी महादेवा ॥ महाकाळमर्दना ॥ मांडिलें उग्र तप महादित्यदारुणा ॥ परिधान व्याघ्रांबर ॥ चिताभस्मलेपना ॥ स्मशान क्रीडास्थळ ॥ तुम्हांसी त्रिनयना ॥ १ ॥ जय देवा हरेश्वरा ॥ जय पार्वतीवरा ॥ आरती ओंवाळीन ॥ तुज कैवल्यदातारा ॥ ध्रु० ॥ रुद्र हें नाम तुझें ॥ उग्र संहारराशी ॥ शंकर शंभुभोळा ॥ उदार तूं सर्वस्वीं ॥ उदक बेलपत्र ॥ तूज वाहिल्या देशी ॥ आपुले पदीं दासां ॥ ठाव शुद्ध कैलासीं ॥ जय० ॥ २ ॥ त्रैलोक्यव्यापका हो ॥ जन वन कीं विजन ॥ विराट स्वरूप हें ॥ तूझें साजिरें ध्यान ॥ करिती वेद स्तूती ॥ कीर्ति मुखें आपण ॥ जाणतां नेणवे हो ॥ तुमचें हें महिमान ॥ जय० ॥ ३ ॥ बोलतां नाममहिमा ॥ होय आश्चर्य जगीं ॥ उपदेश केल्यावरी ॥ पापें पळती वेगीं ॥ हरहर वाणी गर्जे ॥ प्रेम संचारे अंगीं ॥ राहिली दृष्टि चरणीं ॥ रंग मीनला रंगीं ॥ जय० ॥ ४ ॥ पूजिलें लिंग ऊभा ॥ तुका जोडोनी हात ॥ करितो विज्ञानपना ॥ परिसावी ही मात ॥ अखंड राहों द्यावें ॥ माझें चरणीं चित्त ॥ साष्टांग घातले मीं ॥ ठेवा मस्तकीं हात ॥ जय० ॥ ५ ॥

७४. चाल–रुचती कां तीर्थयात्रा०

महारुद्रा जगन्नाथा शिवभोळ्या शंकरा ॥ अति प्रेमें आरती ही करितों मीं तूजला ॥ ध्रु० ॥ भयकन्द्रयभंजनादी हीं नामें तुजप्रती ॥ विबुधादी सर्व प्रेमें तव सेवा वांछिती ॥ तव लीला वर्णनाची प्रीति असे मज अती ॥ भो ईशा सुप्रसादें दे दासा सद्गिरा ॥ महा० ॥१॥ तव पादांबुज सेवा मम हातीं देउनी ॥ आसक्त भ्रमरप्राय रस द्यावा या जनीं ॥ उपदेशीं बोधुनीयां करिं ऐसें मन्मनीं ॥ ज्ञानामृता पाजिं प्रेमें विठ्ठलात्मज किंकरा ॥ महा० ॥ २ ॥



७५. चाल—नृपालकोप०

भस्मप्रिया भूतपते सदय शंकरा ॥ पंचारति करितों तुज हे महेश्वरा ॥ त्रिविधताप दूर करीं तारिं किंकरा ॥ कृपार्णवा, सदाशिवा ॥ त्रिविधताप दूर करीं तारिं किंकरा ॥ कृपार्णवा, सदाशिवा ॥ विठ्ठलात्मजासिं पदीं देइ आसरा ॥ १ ॥

७६. चाल—अंगिकार करुनी

जयजयजी मदनांतक गौरिशंकरा ॥ पंचारति करितों तुज हे महेश्वरा ॥ ध्रु० ॥ व्याघ्रांबर अंगीं तूं नित्य सेविसी ॥ रुंडमाळ कंठिं असे मस्तकीं शशी ॥ गिरिजा तव वामांकीं शोभते तशी ॥ भस्मप्रिया भूतपते इंदुशेखरा ॥ जय ॥ ॥ १ ॥ बहु दुर्जन त्रिपुर दैत्य प्रबल जाहला ॥ हरिविधिसह विबुध पिडुनि त्रास दीधला ॥ तेव्हां ते अति भावें स्तविति मग तुला ॥ त्रिपुरासुर वधुनि सुखी करिसी सुरवरां ॥ जय० ॥ ॥ २ ॥ एकवीस स्वर्गीहुनि उंचि तव अती ॥ सर्वेशा दाता तूं सद्भतीप्रती ॥ तव लीलावर्णनासि अल्प मम मती ॥ विठ्ठलसुत विनवितसे रक्षिं किंकरा ॥ जय० ॥ ३ ॥

७७. चाल—अष्टमूर्ति परमेश सदाशिव०

कर्पूरगौरा गौरिशंकरा आरति करुं तुजला ॥ नाम स्मरतां प्रसन्न होउनि पावसि भक्तांला ॥ध्रु०॥ त्रिशूळ डमरू शोभत हस्तीं कंठि रुंडमाळा ॥ उग्रविषातें पिउनि रक्षिसी देवां दिक्पाळां ॥ तृतीय नेत्रीं निघती क्रोधें प्रळयाग्नी ज्वाळा ॥ नमिती सुरमुनि तुजला ऐसा तूं

...२

शंकर भोळा ॥ १ ॥ ढवळा नंदी वाहन शोभे अर्धांगीं गौरी ॥ जटा मुकुटीं वास करितसे गंगासुंदरी ॥ सदया सगुणा गौरीरमणा मम संकट वारीं ॥ मोरेश्वरसुत वासुदेव तुज स्मरतो अंतरीं ॥ २ ॥

७८. चाल—ओवाळूं आरती मदन गोपाळा,

जय जय आरती पार्वतीरमणा ॥ भवभयनाशना दुष्टनिकंदना ॥ धृ० ॥ पंचवदन दशभूज विराजे ॥ जटाजुटीं गंगा सुंदर साजे ॥ १ ॥ कंठीं रुंडमाळा हस्तिकपाल ॥ वाहन नंदी शोभे भूषण व्याल ॥ २ ॥ गजचर्मांबर तव परिधान ॥ त्रिशूलधारण भस्मविलेपन ॥ ३ ॥ दिगंबररूपा शिव महारुद्रा ॥ वासुदेव प्रार्थी ज्ञानसमुद्रा ॥ ४ ॥

७९. चाल—साधी.

अर्धांगी हे तूझे पार्वती अबला ॥ त्रिशूळा डमरू शोभे भस्माचा उधळा ॥ कपाल हस्तीं गळां रुंडांच्या माळा ॥ भुजंग भूषण शोभे त्रीनेत्रीं ज्वाळा ॥ १ ॥ जय देव जय देव जय आदीपुरुषा ॥ त्रिभुवनपालक भक्तां देसी तूं हर्षा ॥ धृ० ॥ गजचर्मांबर शोभे तुजला परिधान ॥ ढवळा नंदी आहे तूझें वाहन ॥ विशाळकाळकूट कंठीं धारण ॥ त्रिताप हरुनी भक्तां चुकवीसी विघ्न ॥ जय० ॥ २ ॥ दिगंबर रूप तुझें लावुनियां मुद्रा ॥ जटाभार शोभे ज्ञानमुद्रा ॥ परशुरामपाळक एकादशरुद्रा ॥ निरसीं हे भवरजनी चकोरस्वानंदा ॥ ३ ॥

८०. चाल—अवतार गोकुळीं हो.

निर्गुणा निर्विकारा ॥ शिवा कर्पूरगौर. ॥ व्यापुनी चराचरीं ॥ होसी प्रकृतीपरा ॥ अगणितकोटिलिंगें ॥ पुराणप्रसिद्ध बारा ॥ एकतरी दृष्टिं पाहें ॥ अन्यथा भूमीभारा ॥ १ ॥ जयदेवा नीलकंठा ॥ सकलदेवांआदि श्रेष्ठा ॥ रंक मी शरण आलों ॥ निवारीं भवकष्टा ॥ धृ० ॥ सोरटीसोमनाथ ॥ जगीं एक विख्यात ॥ तयाच्या दर्शनें

हो ॥ चुके संसारपंथ ॥ हिमवंतपृष्ठभागीं ॥ लिंगकेदार मुक्त ॥ साधुसंत सेविताती ॥ धरू नि कैवल्यहेत ॥ जय० ॥ २ ॥ उज्जयिनी नामपूरीं ॥ पवित्र सचराचरीं ॥ महांकाळ लिंग जेथें ॥ धन्य जो पूजा करी ॥ ओंकारमहाबळेश्वर ॥ ज्योतीलिंग निर्धारि ॥ तयाच्या दर्शनें हो जन्ममरण निवारी ॥ जय० ॥ पश्चिमे लिंग एक ॥ जया नाम त्र्यंबक ॥ गौतमीउगम जेथें ॥ वाहे मंगलदायक ॥ दर्शनें स्नानमात्रें ॥ पुण्यपावन लोक ॥ तैसाच घृष्णेश्वर ॥ सेवाळें रमणीक ॥ जय० ॥ ४ ॥ भीमेचा उगम जेथें ॥ भमाशंकर तेथें ॥ डांकिनीं स्नान करिती ॥ लिंग म्हणती तयातें ॥ अगणित पुण्य जोडे ॥ चालतांची तेणें पंथें ॥ दक्षिणे रामेश्वर ॥ ज्योतिर्लिंग म्हणती त्यातें ॥ जय० ॥ ५ ॥ आवंढ्यानागनाथ ॥ देव आपण नांदत ॥ भक्तजनकुटुंबीया भुक्तिमुक्तिदायक ॥ प्रत्यक्ष लिंग जेथें ॥ परळीवैजनाथ ॥ हरिहर तीर्थें ॥ जन होत कृतार्थ ॥ जय० ॥ ६ ॥ श्रीशैल तो पर्वत ॥ लिंगरूप समस्त ॥ सभोंवती नीळ-गंगा ॥ माजी श्रीमल्लिनाथ ॥ भूमिकैलास दूजा ॥ जन साक्ष दावीत ॥ साठिवरुषें वाट पाहे ॥ कृपाळु तो उमाकांत ॥ जय० ॥ ७ ॥ धन्य हो काशिपुरी मणिकर्णिकातीरीं ॥ विश्वेश्वरालिंग जेथें ॥ जीवमात्रा उद्धरी ॥ तारक ब्रह्ममंत्र ॥ जपे कर्णविवरीं ॥ तेणेंची मोक्षपद ॥ प्राप्त होय निर्धारीं ॥ जय० ॥ ८ ॥ येऊनिया संसारा ॥ माजीं ज्योतिर्लिंगें बारा ॥ एकतरी दृष्टि पाहें ॥ अन्यथा भूमिभारा ॥ विश्वेश्वर विश्वनाथ ॥ भावभक्ति निर्धारा ॥ नामया श्रीशीवदास ॥ ध्याय परात्परा ॥ जयदेवा नीलकंठा ॥ ९ ॥

८१. चाल—साधी

जय जय शिव हर शंकर जय गिरिजारमणा ॥ पंचवदन जय त्र्यंबक त्रिपुरासुरदहना ॥ भवदवभंजन सुंदर स्मरहर सुखसदना ॥ अविकल ब्रह्म निरामय जय जगदुद्धरणा ॥ १ ॥ जय देव जय देव जय शंकर सांबा ॥ ओंवाळित निजभावें, नमितों मी सद्भावें वर सहजगदंबा ॥ धृ० ॥ जगदंकुरवरबीजा सन्मय सुख नीजा ॥ सर्व-

चराचर व्यापक जगजीवनराजा ॥ प्रार्थित करुणावचनें जम वृष-भध्वजा ॥ हर हर सर्वहि माया नमितों पदकंजा ॥ जय देव० ॥ २ ॥ गंगाधर गौरीवर जय गणपतिजनका ॥ भक्तजनप्रिय शंभो वंद्य तुं मुनिसनकां ॥ करुणाकर सुखसागर जननगिच्या कनका ॥ तव पद वंदित मौनी भवभ्रांतीहरका ॥ जय० ॥ ३ ॥

८२. चाल-साधी.

महास्थान तूझें गोमांतकप्रांतीं ॥ भावेंकरुनी करितों तुजला आरती ॥ महाभक्त तूझे निशिदिनिं गुण गाती ॥ मी तो दास तूझ्या चरणांची माती ॥ १ ॥ जय देव जय देव जयजी मंगेशा ॥ आरती ओंवाळूं तुजला सर्वेशा ॥ धृ० ॥ धरिलासी अवतार दुष्टां माराया ॥ साधूसंतजनपृथ्वीताराया ॥ भक्तांचा तारक तूं मंगेश-राया ॥ सर्प अक्षय करितो तुजवरुती छाया ॥ जय० ॥ २ ॥ दुःख दरिद्रादिक हीं विघ्नें नीवारीं ॥ संकष्टा पासूनी मजलागीं तारीं ॥ शक्ती घेउनि करीं दुष्टां संहारीं ॥ जैसा धेनू रक्षी कृष्ण नरकारी ॥ जय० ॥ ३ ॥ तव गुण वर्णन करितां पुण्या ये चेव ॥ तुझिया चरणीं आहे माझा दृढ भाव ॥ तूझे देवालयीं बहुताचि उत्साह ॥ मोरेश्वर तुज नमितों चरणीं दे ठाव ॥ जय देव जय देव जय० ॥४॥

८३. चाल-साधी.


अभिनव सुंदर गंगाकाशीपुरवासी ॥ विश्वेश्वर येउनियां तारक उपदेशी ॥ जातां उत्तर पंथा हिमगिरिगगनासी ॥ भजतां केदारासी कलिकलमष नाशी ॥ १ ॥ जय देव जय देव जय गिरिजा रमणा ॥ पंचप्राणें आरति स्वामीच्या चरणां ॥ धृ० ॥ स्मरतां महाकाळा नगरीं उज्जयिनी ॥ प्रदोषकाळीं पूजा पाहावी नयनीं ॥ सोरटी सोमेश्वर नांदे त्रिभुवनीं ॥ चित्तीं चिंतन केल्या राहे निज सदनीं ॥ ॥ जय० ॥ २ ॥ औढंकपुरी चें वन हें दारुणवृक्षांचा ॥ भूषण नागेशाचा मणिमयमुक्तांचा ॥ परळीवैजेश्वर हरिहरतीर्थांचा ॥ ऐसा शंकर शोभे बिल्वपत्राचा ॥ ज० ॥ ३ ॥ ॐकारममलेश्वर रेवा-

पुरपटणीं ॥ हरिहर, युद्धें झालीं बाणांच्या खाणी ॥ शेवाळी घृष्णेश्वर वदतो कपि वाणी ॥ वेरूळींची महिमा ऐकावी श्रवणीं ॥ जय० ॥ ४ ॥ गौतमऋषिच्या तपें गोदा आली हे ॥ त्र्यंबकराजा नमितां भवभय जाताहे ॥ शाकिनि डाकिनि काळा ज्या क्षेत्रीं राहे ॥ भीमाशंकर सुंदर तेथुनि दिसताहे ॥ जय० ॥ ५ ॥ दक्षिणयात्रा करितां जातां ते मार्गीं ॥ शिवरात्रीजागरण मल्लिकार्जुनलिंगीं ॥ रामेश्वर रत्नाकरमौक्तिकिच्या संगीं ॥ द्वादश लिंगें कथिलीं कृष्णानें अंगीं ॥ जय देव जय देव जय गिरिजारमणा ॥ पंचप्राणें आरति स्वामींच्या चरणां ॥ ६ ॥

८४. चाल—साधी.

गौरीवर गंगाधर तनु कर्पूरवेशी ॥ गजव्याघ्रांचीं चर्में प्रेमें पांघुरसी ॥ कंठीं कपाळमाळा भाळीं दिव्य शशी ॥ अनिलाशनभूषण हर शोभत कैलासीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय रतिपतिदहना ॥ मंगळआरति करितों छेदीं अघविपिना ॥धृ०॥ त्रिपुरासुर अतिदुस्तर प्रबल तो झाला ॥ तृणवत् मानितवासव विधि आणी हरिला ॥ तेव्हां निर्जर भावें स्मरताती तुजला ॥ होउनि सकृप त्यांवरि मारिसि त्रिपुराला ॥ जय० ॥ २ ॥ जे तव भक्ति पुरस्सर जप तप स्तव करिती ॥ त्यांतें अष्टहि सिद्धी स्वबलानें वरिती ॥ शिव शिव या उच्चारें जे प्राणी मरती ॥ चारी मुक्ती येऊनि त्यांचा कर धरिती ॥ जय० ॥ ३ ॥ वृषभारूढा मूढां लावीं तवभजना ॥ भवसिंधू दुस्तर तो करिं गा सुलभ जना ॥ होवो सुलभ मला तव मायेची रचना ॥ दास म्हणे ताराया दे सकृपवचना ॥ जय० ॥ ४ ॥

# आरत्या देवीच्या



८५. चाल—साधी.

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ॥ अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं ॥ वारीं वारीं जन्ममरणातें वारीं ॥ हारीं पडलों आतां संकट नीवारीं ॥१॥ जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ॥ सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ॥ धृ० ॥ त्रिभुवन भुवनीं पाहातां तुज ऐसी नाहीं ॥ चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं ॥ साही विवाद करितां पडिले प्रवाहीं ॥ ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाहीं ॥ २ ॥ प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासां ॥ क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा ॥ अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ॥ नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

८६. ( नवरात्राची. ) चाल—जयजय—त्र्यंबक राज०

आश्विनशुद्धपक्षीं अंबा बैसलि सिंहासनीं हो ॥ प्रतिपदेपासून घटस्थापना ती करुनी हो ॥ मूलमंत्रजप करुनी भोंवते रक्षक ठेउनी हो ॥ ब्रह्माविष्णुरुद्र आईचें पूजन करिती हो ॥ १ ॥ उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ॥ उदोकारें गर्जती काय महिमा वर्णूं तिचा हो ॥ धृ० ॥ द्वितीयेचे दिवशीं मिळती चौसष्ट योगिनी हो ॥ सकळांमध्यें श्रेष्ठ परशुरामाची जननी हो ॥ कस्तुरीमळवट भांगीं शेंदूर भरुनी हो ॥ उदोकारें गर्जती सकल चामुंडा मिळुनी हो ॥ उदो० ॥

॥ २ ॥ तृतीयेचे दिवशीं अंबे शृंगार मांडिला हो ॥ मळवट पातळ चोळी कंठीं हार मुक्ताफळां हो ॥ कंठींचीं पदकें कांसे पीतांबर पिवळा हो ॥ अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो ॥ उदो० ॥ ३ ॥ चतुर्थीचे दिवशीं विश्वव्यापक जननी हो ॥ उपासकां पाहसी अंबे प्रसन्न अंतःकरणीं हो ॥ पूर्णकृपें पाहसी जगन्माते मनमोहिनी हो ॥ भक्तांच्या माउली सुर ते येती लोटांगणीं हो॥ उदो०॥ ॥ ४ ॥ पंचमीचे दिवशीं व्रत तें उपांगललिता हो ॥ अर्घ्यपाद्यपूजनें तुजला भवानी स्तविती हो ॥ रात्रीचे समयीं करिती जागरण हरिकथा हो ॥ आनंदें प्रेम तें आलें सद्भावें क्रीडतां हो ॥ उदो० ॥ ५ ॥ षष्ठीचे दिवशीं भक्तां आनंद वर्तला हो ॥ घेउनि दिवट्या हस्तीं हर्षें गोंधळ घातला हो ॥ कवडि एक अर्पितां देसी हार मुक्ताफलां हो ॥ जोगवा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो ॥ उदो० ॥ ६ ॥ सप्तमीचे दिवशीं सप्तशृंगगडावरी हो ॥ तेथें तूं नांदसी भोंवतीं पुष्पें नानापरी हो ॥ जाइजुईशेवंती पूजा रेखियली बरवी हो ॥ भक्त संकटीं पडतां झेलुनि घेसी वरचेवरी हो ॥ उदो० ॥ ७॥ अष्टमीचे दिवशीं अष्टभुजा नारायणी हो ॥ सह्याद्रीपर्वतीं पाहिली उभी जगज्जननी हो ॥ मन माझें मोहिलें शरण आलों तुजलागुनी हो ॥ स्तनपान देउनी सुखी केलें अंतःकरणीं हो ॥ उदो० ॥ ८ ॥ नवमीचे दिवशीं नवदिवसांचें पारणें हो ॥ सप्तशतीजप होमहवनें सद्भक्ती करुनी हो ॥ षड्रस अन्नें नैवेद्यासी अर्पियलीं भोजनीं हो ॥ आचार्यब्राह्मणां तृप्त केलें कृपेंकरुनी हो ॥ उदो० ॥ ९ ॥ दशमीच्या दिवशीं अंबा निघे सीमोल्लंघनी हो ॥ सिंहारूढे दारुण शस्त्रें अंबे त्वां घेउनी हो ॥ शुंभनिशुंभादिक राक्षसां किती मारिसी रणीं हो ॥ विप्रा रामदासा आश्रय दिधला तो चरणीं हो ॥ उदो० ॥ १० ॥

८७. चाल—साधी.

अंबे प्रार्थितसें तुजला मी भावें ॥ या समयीं पावें ॥ मज संकट जननी त्वां निरसावें ॥ वरदान द्यावें ॥ धृ० ॥ कां म्यां आणावें हरिसी सदना ॥ आहा रे मदना ॥ छळिलें मजला काय दावूं वदना ॥ नच

कां ये करुणा ॥ अंबे० ॥ १ ॥ माझा मज कांत कृतांत वाटे ॥ निज-कंदर दाटे ॥ जेणें हा भवसिंधू अतिशय वाटे ॥ गतिस्तार न दाटे ॥ अंबे० ॥ २ ॥ अंबे आजुनी कां न होसि तूं जागी ॥ निष्ठुरता त्यागीं ॥ श्रमलें यास्तव प्रार्थितसें मी तुजलागीं ॥ या धेनुरागीं ॥ अंबे० ॥ ३ ॥ म्हणसी धात्यानें जें लिहिलें भाळीं ॥ तें कोण टाळी ॥ जें जें भवीतव्य ज्या ज्या काळीं ॥ तें सुरवर पाळी ॥ अंबे० ॥ ४ ॥ तुझिया बिरुदाचा घडतो पाय ॥ करिसील उपाया ॥ दावीं निजजन दुष्ट मी कवणे पायां ॥ उठि ब्रह्मादिपा या ॥ अंबे० ॥ ५ ॥ राधा ये रितिनें करुणा भावी ॥ ते काय वदावी ॥ भास्करसुतस्वामी सिद्धऋषि सुदावी ॥ ते मूर्ति जपावी ॥ अंबे० ॥ ६ ॥

८८. चाल–साधी.

करवीरपुरवासिनि सुरवरमुनिमाता ॥ पुरहरवरदायीनी मुरहरप्रिय-कांता ॥ कमलाकारें जठरीं जन्मविला धाता ॥ सहस्रवदनीं भूधर न पुरे गुण गातां ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ॥ वससी व्यापकरूपें तूं स्थूलसूक्ष्मीं ॥ धृ० ॥ मातुलिंग गदायुत खेटक रविकरणी ॥ झळके हाटकवाटी पीयुषरसपाणी ॥ माणिकदशना सुरंगवसना मृगनयनी ॥ शशिधरवदना, राजस मदनाची जननी ॥ २ ॥ तारा शक्ति अगम्या शिव भजकां गौरी ॥ सांख्य म्हणती प्रकृती निर्गुण निर्धारीं । गायत्री निजबीजा निगमागम सारी ॥ प्रगटे पद्मावती निजधर्माचारी ॥ ३ ॥ अमृतभरिते सरिते अघदुरितें वारीं ॥ मारीं दुर्घट असुरां भव दुस्तर तारीं ॥ वारीं मायापटल प्रणमत परिवारीं हें रुप चिद्रूप तद्रूप दावीं निर्धारीं ॥ ४ ॥ चतुराननें कुश्चितकर्मांच्या ओळी ॥ लिहिल्या असतिल माते माझे निजभाळीं ॥ पुसोनि चरणातळीं पदसुमनें क्षाळीं ॥ मुक्तेश्वर नागर क्षीरसागरवाळी ॥ २ ॥

८९. चाल–अवतरला रघुपती

जय देवी जगदंबे ॥ संकट देवा पडलें ॥ इंद्रादि निर्जर जय जय वाणी ॥ तुज स्तविती वज्रपाणी ॥ धृ० ॥ शुंभुनिशुंभासाठीं ॥ सुर रिघती तव पाठीं ॥ प्रकट हिमाचळि होऊनि बाळा ॥ दैत्यदुष्टां

मोहुनी सकळां ॥ जय० ॥ १ ॥ पहातसे दैत्यराणा ॥ स्वरुपाची करी तुळणा ॥ मोहित झाला खळ तव काये ॥ नच जाणोनि आदि-माये ॥ जय० ॥ २ ॥ दैत्यांचें सैन्य सारे ॥ जाळुनियां हुंकारें ॥ वीरां करुनी खंडविखंड ॥ प्रथम वधिले चंडमुंड ॥ जय० ॥ ३ ॥ जन असुरीं बहु पिडिलें ॥ रूप भयंकर धरिलें ॥ मग बळि महिषासुर खल वधिला ॥ तिन्ही लोकीं हर्ष झाला ॥ जय० ॥ ४ ॥ दैत्यवरें मत्त झाले ॥ सुरशत्रू निर्दाळिले ॥ ज्यांची त्याला स्थानें दिधलीं ॥ निर्दैत्य भूमि केली ॥ जय० ॥ ५ ॥

१०. चाल—साधी.

आद्यस्थान तूझें करविरपुर माते ॥ प्रसन्नवदनें वससी माये मन रमतें ॥ सुरवर किन्नर पूजिति ध्याती स्थिर चित्तें ॥ महिमा न कळे तुझा गाती भावार्थें ॥१॥ जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ॥ आरती करितां तूं हरिसी अवलक्ष्मी ॥ धृ० ॥ दक्षिणभागीं तूझ्या कालीचें स्थान ॥ सरस्वतीचें सव्यभागीं तें ठाण ॥ तूझ्या सन्मुख माते शोभे गजवदन ॥ काशीतुल्य महिमा गाती मुनिजन ॥ जय० ॥ २ ॥ महि-षासुरनिर्दळण प्रथम केलेंसी ॥ शुंभरक्तबीज तेही वधिलेसी ॥ सर्वहि असुरां मर्दुनि स्वस्थ जाहलीसी ॥ सुराधिकारी इंद्रा त्वां स्थापिय-लेंसी ॥ जय०॥ ३ ॥ भजन करितां तूझें मुक्ती पैं देसी ॥ इहलोकीं सुखभोग भक्तां ओपीसी ॥ जनार्दन वदला परम भावेंसीं ॥ वरदहस्त माथां ठेवीं भक्तासी ॥ जय देवी जय देवी० ॥ ४ ॥

११. चाल—गोंधळाची.

आनंदें उदो बोलणें भवानीचा ॥ धृ० ॥ नवरात्री घट मांडूं ॥ दिवे ओंवाळुनी सांडूं ॥ कळिकाळा संगें भांडूं ॥ वर देई वंशाचा ॥ १ ॥ नाचूं अंबेचे अंगणीं ॥ गोंधळ घालूं वो साजणी ॥ शरण येऊं लोटांगणीं ॥ कायावाचामनें साचा ॥ २ ॥ अंबा नांदे सर्वांठायीं ॥ अशी सर्वत्राची धाई ॥ मध्वनाथ म्हणे आई ॥ वर देई वंशाचा ॥ ३ ॥

९२. चाल–साधी.

मी तूं विरहित हें तूं तें तूं तूकाई ॥ मीपण सरतां सरलों तूंपण तें काई ॥ मी तूं विसरे तिसरे साक्षीपण सोयी ॥ तें सुख अनुभवसिद्धां प्रगटे तव पायीं ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय करुणासरिते ॥ रघुवरवरदायके वारिसि भवदुरितें ॥ मानस तुळजापूरीं नांदसि गुणभरिते ॥ सरिते करिं अज्ञान दे ज्ञान पुरतें ॥ धृ० ॥ महेशि अखिले निखिले निगमागमसारे ॥ विबुधां सुबुधां बुद्धां साधनसुविचारे ॥ अटतां पठतां कथितां मथितां तनु सारे ॥ हेमांगी तव महिमा न कळे निरधारें ॥ जय० ॥ २ ॥ सुर मुनि कनकाभरणें सांडुनियां परतीं ॥ रंकें वैराटकें धरिसी त्यांवरती ॥ अनाथनाथे अंबे न कळे हे युक्ती ॥ जाणे तो जोगवा मागे गुरुभक्ती ॥ जय० ॥ ३ ॥ स्तवनाचें चौंडकें श्रद्धागुणवंती ॥ गाती गोंधळ दिवट्या साधन व्रत पंथीं ॥ उदो आनंदीं चालुनि लागो पदिं भक्ती ॥ मुक्तेश्वरासि त्रिपुरे दे भुक्ती मुक्ती ॥ जय० ॥ ४ ॥

९३. चाल–आरती ज्ञानराजा०

मर्दिला कोल्हासूर ॥ ख्याती केली कीं थोर ॥ श्रीलक्ष्मी नाम तूझें ॥ दैत्य कांपती फार ॥ १ ॥ जय देवी विष्णुकांते ॥ महालक्ष्मी ग माते ॥ आरती ओंवाळीन ॥ तूज विज्ञानसरीते ॥ धृ० ॥ धन्य तें कोलापूर ॥ धन्य तेथींचे नर ॥ सकळही मुक्त होती ॥ तुजला पाहतां सत्वर ॥ जय० ॥ २ ॥ रहिवास कोलापूरीं ॥ पंचगंगेच्या तीरीं ॥ सुविशाल सिंहासन ॥ विराजसी तयावरीं ॥ जय० ॥ ३ ॥ मागणें हेंचि माये ॥ आतां दाखवीं पाय ॥ उशीर नको लावूं ॥ दास तूझा वाट पाहे ॥ जय० ॥ ४ ॥

९४. चाल–साधी

जय जय निजादिमाता श्रीलक्ष्मी जनने ॥ जगदुद्भवस्थिति प्रलयां करिसी सुखसदने ॥ उपनिषदात्मकसागरसारामृतमथने ॥ नवनितविघ्ननिज तूं निजजनसुखकरणे ॥ १ ॥ जय देवी जय देवी

जय लक्ष्मी वरदे, श्रीलक्ष्मीवरदे ॥ भक्तानुग्रहकारिणि, दासानुग्रह-कारिणि सच्चिद्घनसुखदे ॥ ध्रृ० ॥ स्थानत्रय देहत्रय तापत्रय परते ॥ भोगत्रयाद्यवस्था दिक्सर्गारहिते ॥ साक्षी प्रत्यक्सुख तूं निजतुर्य-वरते ॥ चिन्मय स्वप्रभ सर्वहि दृश्याव्यतिरिक्ते ॥ जय० ॥२॥ देवात्मक भूतात्मक दैत्यात्मक कमले ॥ वेदात्मक लोकात्मक जगतात्मक विमले ॥ स्थावरजंगमव्यापक सर्वात्मक भरलें ॥ तवविण विरहित न दिसे अणुभरि जगिं उरलें ॥ जय०॥३॥ कल्पांबूसम तव पदिं शोभत जग कैसें ॥ अनिलोद्गमबुद्बुदवत माते भासतसे ॥ रज्जुस्थानिं अरोपावृत्त भ्रम दीसतसे ॥ भुजंग शुक्त्यादिकिं हे रजता भासतसे ॥ जय० ॥ ४ ॥ विवर्त चित्सागरिं हे जग भासक बुंदे ॥ निशिदिनिं सर्गाण्य पदिं खेळासि निज छंदें ॥ स्वानंदामृत सुखदे सुरनरजगवन्दे ॥ मौनी नमित पदांबुज जय परमानंदे ॥ जय० ॥ ५ ॥

### ९५. चाल—साधी

आजुनी अंत माते किती पाहासी ॥ जागृत कां गे अजूनी होई-नासी ॥ घृ० ॥ आदिमाया मूळ तूं कुळदैवत ॥ भक्तांलागीं धरीसी सगुणत्व ॥ दैत्य वधूनी जाहालिस प्रतापवंत ॥ लक्ष्मीनाम म्हणती त्रिजगतांत ॥ आजु० ॥१॥ करवीर क्षेत्रीं वास करुनी मान्यें ॥ जगत्रयीं होऊनी धन्य धन्य ॥ तुजला ध्याती करिती नामसरण ॥ त्यांला कैंचें मग भवबंधन ॥ आजु० ॥ २ ॥ म्हणवूनीं शरण आलों तव पाईं ॥ ब्रीदावळी जागवि आपुलें हृदयीं ॥ करुणा करीं माऊली लवलाहीं ॥ रामचंद्रा रक्षावें अंबाबाई ॥ आजुनी० ॥ ३ ॥

### ९६. चाल—साधी

चित्कळा चिद्रुपा चिच्छक्ती बाळा ॥ संचित ब्रह्मानंदें आनंद-कळा ॥ व्यक्त नाव्यक्त साकार लीळा ॥ हरिहरब्रह्मादीकां उपज-विसी बाळां ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय जी श्रीअंबे ॥ व्यक्ते व्यापकरूपें प्रगटे सोयंबे ॥धृ०॥ सुरवरवरदे वंदे आनंदकंदे ॥ अरूप-रूपे स्वरुपे सच्चित्आनंदे ॥ कार्याकारण ब्रह्मा बीजें उद्भाविजे ॥

भगवति भवमुळहरणे निर्मळ मुखकंजे ॥ जय०॥२॥ भक्तां अभयंकर सौंदर्यालहरी ॥ कोटीकंदर्पाहुनि शोभा साजीरी ॥ भवकष्टादिक नासुनि दुष्टां संहारीं ॥ शिव शरण तुज माते मजला तूं तारी ॥जय०॥३॥

९७. चाल—अवतार गोकुळीं हो०

मूळपीठ यमुनागारीं ॥ माता आदीकुमारी ॥ नेसली पीतांबर ॥ उभी राहे शिखरीं ॥ भक्तांची वाट पाहे ॥ कर निढळावरी ॥ १ ॥ जय देवी आदिमाते ॥ जय हो कृपावंते ॥ आरती ओंवाळीन ॥ एक मनोभावें चित्तें ॥ ध्रु० ॥ मळवट कस्तुरीचा ॥ गळां हार रत्नांचा ॥ त्रिशूळ डमरु हातीं ॥ गर्व हरिला दैत्यांचा ॥ वधिला महिषासूर ॥ थोर प्रताप भूजांचा ॥ जय० ॥ २ ॥ शृंगार जडित लेणें ॥ कवडियांचीं भूषणें ॥ अंदुवा झणत्कार ॥ ढाळ देती रत्नांचा ॥ पाईचे पोल्हार ॥ वाजती रुणझुण ॥ जय० ॥ ३ ॥ वळली हे कामधेनू ॥ पय दाटलें स्तनीं ॥ अगम्य महिमा तूझा ॥ वर्णिती वेदपुराणीं ॥ यालागीं माते चरणीं ॥ शरण आलों लोटांगणीं ॥ जय० ॥ ४ ॥ तव रूप वर्णुं अंबा ॥ माझा केवढा केवा ॥ वर्णितां मोक्ष होय ॥ भक्त चरणीं राखावा ॥ वेडा हा विप्रदास ॥ तूझे चरणीं असावा ॥ जय० ॥ ५ ॥

९८. चाल—अवतार गोकुळीं हो०

ॐनमो आद्यरूपे ॥ देवी भगवती माते ॥ कालिका कामरूप ॥ शक्ति तूं जगन्माते ॥ वैष्णवी भूतमाया ॥ मूळपीठ देवते ॥ झालिया भेटि तुझी ॥ नीवारिसी पापांतें ॥१॥ जय श्रीकुळदेवते ॥ महालक्ष्मी ग माते ॥ आरती घेउनीयां ॥ ओंवाळीन मी तूतें ॥ध्रु०॥ अंबिका भद्रकाली ॥ देवी आद्या कुमारी ॥ मारिले चंडमुंड ॥ महिषासुर हे वैरी ॥ हर्षले देवद्वीज ॥ गाती जयजयकारीं ॥ उजळूनी दीपमाळा ॥ ओंवाळीती नरनारी ॥जय० ॥ २ ॥ परिधान हेमवर्ण ॥ कंठीं नवरत्नें हार ॥ करतळें रातोत्फळें ॥ अद्‌भुत जयजयकार ॥ अवतार कोलापुरीं ॥ केला प्रताप थोर ॥ मारिले दैत्य बिकट ॥ अघट कोल्हासूर

॥ जय० ॥ ३ ॥ नासिकीं मुक्ताफळ ॥ रत्नकुंडलें श्रवणीं ॥ घवघवीत नूपुरें हो ॥ अंदु वाजती चरणीं ॥ मस्तकीं पुष्पहार ॥ दिसे भासे वदनीं ॥ पौर्णिमाचंद्रबिंब ॥ पृष्ठीवरी रुळे वेणी ॥ जय० ॥ ४ ॥ नवकोटी कात्यायनी ॥ चतुःषष्ठी योगीनी ॥ भूचरां जळचरां ॥ आई तूजपासूनी ॥ ऐसी तूं महालक्ष्मी ॥ जगत्राची जननी ॥ नामया विष्णुदासा ॥ तूझें चिंतन ध्यानीं ॥ जय० ॥ ५ ॥

९९. चाल—साधी.

भूकैलासा ऐसी हे कवलानगरी ॥ शांतादुर्गा तेथें भक्तां भवहारी ॥ असुरातें मर्दुनियां सुरवरकैवारी ॥ स्मरती विधि हरि शंकर सुरगण अंतरीं ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय शांते जननी ॥ दुर्गे बहुदुःखदमन रतलों तव भजनीं ॥ धृ० ॥ प्रबोध तूझा नव्हे विश्वाभीतरीं ॥ नेती नेती शब्दें गर्जति पैं चारी ॥ साही शास्त्रें मथितां न कळसि निर्धारीं ॥ अष्टादश गर्जति परि नेणति तव थोरी ॥ जय० ॥ २ ॥ कोटीमदनरूपा ऐसी मुखशोभा ॥ सर्वांगीं भूषणें जांबूनदगाभा ॥ नासाग्रीं मुक्ताफळ दिनमणिची प्रभा ॥ भक्तजनांतें अभया देसी तूं अंबा ॥ जय० ॥३॥ अंबे भक्तांसाठीं होसी साकार ॥ ना तरिं जगजीवन तूं नव्हसी गोचर ॥ विराटरूपा धरूनी करिसी व्यापार ॥ त्रिगुणाविरहित सहित तुज, कैंचा पार ॥ जय० ॥ ४ ॥ त्रितापतापें श्रमलों निजवीं निजसदनीं ॥ अंबे सकळारंभे राका शशिवदनी ॥ अगमे निगमे दुर्गे भक्तांचे जननी ॥ पद्माजी बाबाजी रमला तव भजनी ॥ जय० ॥ ५ ॥

१००. चाल—आरती ज्ञानराजा.

अई सगुण हेंची ब्रह्म ॥ सदा आनंदपूर्ण ॥ विश्व हें व्यापियेलें ॥ मायारूप धरियेलें ॥ १ ॥ जय देवी आदिशक्ती ॥ सुंदरसगुणा मूर्ती ॥ आरति ओंवाळीतां ॥ मनउत्साहप्राप्ती ॥ धृ० ॥ अई देवही सकळ ध्यानी ॥ तूझे पाय वंदीती ॥ अभयासि पूर्ण घेती ॥ वेद स्तुती जे करिती ॥ जय० ॥ २ ॥ अई कीर्तीचे घोष गातां ॥ सदय होई तूं आतां ॥ मागणें हेंची आहे ॥ परशुरामासी पाहें ॥ जय देवी० ॥ ३ ॥

१०१. चाल-संत सनकादिक भक्त०

सौम्यशब्दें उद्गोकार वाचे उच्चारा ॥ भावें भक्त विनवी शांते चाल मंदिरा ॥ धृ० ॥ नवखणांचा पलंग शांते शोभतो बरा ॥ सुमनांचे परिवारीं शांते शयन करा ॥ १ ॥ अष्टहि भोग भोगुनि शांता पहुडली शेजे ॥ भक्तजनांची आज्ञा जाहली चलावें सहजें ॥ २ ॥ मानस सुखी दशमस्थानें निद्रा हो केली ॥ रामदास म्हणे शांता ध्यानीं राहिली ॥ ३ ॥

१०२. चाल-साधी.

सुखसदने शशिवदने अंबे मृगनयने ॥ गजगमने सुर नमने कोल्हासुरमथने ॥ सुरवर वर्षति सुमनें करुनीयां नमनें ॥ भयहरणे सुखकरणे सुंदरि शिवरमणे ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय वो जय अंबे ॥ कोल्हापुराधिस्वामिणि तुज वो जगदंबे ॥ धृ० ॥ मृगमद मिश्रित केशर शोभत तें भाळीं ॥ कुंचित केश विराजित मुगुटांतुन भाळीं ॥ रत्नजडीत सुंदर अंगीं कांचोळी ॥ विद्रुगनाचा गाभा अंबा वेल्हाळी ॥ जय० ॥ २ ॥ कंठीं विलसत सगुण मुक्ता सुविशेषें ॥ पीतांबर सुंदर कासियेला कांसे ॥ कटितटिं कांची किंकिणिध्वनि मंजुळ भासे ॥ पदकमळलावण्यें अंबा शोभतसे ॥ ॥ जय० ॥ ३ ॥ झळझळझळझळ झळकति तानवडें कर्णीं ॥ तेजा लोपुनि गेले रविशशि निज करणीं ॥ ब्रह्म हरि हर सकळिक नेणति तव करणी ॥ अद्‌भुत लीला लिहितां न पुरे ही धरणी ॥ जय० ॥ ४ ॥ अष्टहि भूजा सुंदर भासतसे शोभा ॥ झगझगझगझगझगीत लावण्यगाभा ॥ ल्हगल्हगल्हगल्हगल्हगीत सुमनांची शोभा ॥ त्र्यंबक मधुकर होउनि वर्णितसे अंबा ॥ ५ ॥

१०३. चाल-साधी.

अर्णवसमिप दक्षिणे भार्गवकृत धरणी ॥ असे देवीग्रामीं स्थिति अद्‌भुत करणी ॥ मार्गेश्वर बहुळीं यात्रा तव जननी ॥ जन पूजिति सद्‌भावें कुलदैवत म्हणुनी ॥ १ ॥ जय देवी जय देवी सुरवरमुनि-पुजिते ॥ जय श्रीआर्यादुर्गे संकटभय हरिते ॥धृ०॥ स्थित्युद्‌भवलय-

कारिणी विधिहरिहरजनिते ॥ करुणालयसुरपालिनि भवभय संहरिते ॥ त्रिभुवनमंडणखंडणकरदुस्तरसंहरिते ॥ उपमा न दिसे कोठें अद्वयगुणभरिते ॥ २ ॥ विषयविरक्त मानुनि रतलों सुखसदना ॥ त्याजिलें खळमति धरुनी तव नामस्मरणा ॥ कवि किंकर गोपाल माते तव चरणा ॥ शरण येउनि मागे अभयंकर वचना ॥३॥

१०४. चाल—साधी.

हंसाग्निश्रीचंद्रे रंभाविभूते ॥ श्रीविद्याकूटत्रयचर मितकृतवसते ॥ उद्यद्दिनकरदीप्ते नेत्रत्रययुक्ते ॥ मंदास्मितमुखि मुकुटे चंद्रकला कृत्ये ॥ १ ॥ जय देवी जय देवी हिमवद्गिरिकन्ये ॥ भुवनेश्वरि नीराजितमंगीकुरु धन्ये ॥ धृ० ॥ कृष्णातट कृतवासे तिलसुमसमनासे ॥ कैलासांगणमंडपकामेश्वरिरासे ॥ उन्नतकुचकलशामृत जीवितनिजदासे ॥ विबाधरमुख्यजपाजपरूपश्वासे ॥ जय० ॥२॥ सुवराभयपाशांकुशमंडित करकमले ॥ नवमणिमय भूषणगणदेह श्रीविमले ॥ पृथुतरवरकटितटधृतलोहितकरकमले ॥ नवमणिचोले कलितामलमुक्ताजाले ॥ जय० ॥ ३ ॥ शूलं शक्ति डमरुं हस्ते बिभ्राणे ॥ महिषासुरकचकलयिनिहतधूम्रप्राणे॥ रक्तोद्भवचंडासुरमुंडश्रीहरणे॥ निशुंभशुंभौ हत्वा सकलामरशरणे ॥जय० ॥४॥ सृष्टिस्थितिलयकार्यें देवत्रयरूपे ॥ वेदत्रयमयकर्माणि तावच्चिद्रूपे ॥ आगमशास्त्रेष्वाधुंनि प्राकृतश्रीरूपे ॥ भट्टजिसुतमव सततं विरतं चिद्रूपे ॥ जय० ॥ ५ ॥

१०५. चाल—ओवाळूं आरती मदन गोपाळा०

आवाहन ध्यान निवेदुनि आसन ॥ अर्घ्य पाद्यपूजा अर्चन वंदन ॥ १ ॥ जय जय आरती त्रिभुवनमाते ॥ तन मन कुर्वंडीं तव पदीं शांते ॥ धृ० ॥ आभरणादी चिरे सुमनघन ॥ धूप दीप फल तांबूल अर्पण ॥ जय० ॥ २ ॥ वीणा टाळ मृदंग सुशोभित ॥ उजळुनि आरति गाइन नाचत ॥ जय० ॥ ३ ॥ मंत्रपुष्पें बहू आणि प्रदक्षिणा ॥ दीर्घ दंडवत आत्मनिवेदन ॥ जय० ॥ ४ ॥ शंकरसरस्वती वरदप्रसंगें ॥ मोरेश्वर नामीं तन्मय रंगे ॥ जय जय आरती० ॥ ४ ॥

१०६. चाल-साधी.

शिवमनभ्रमरकमालिनी जय आदीशक्ती ॥ षण्मुखगजमुखजननी जय जय अव्यक्ती ॥ भवगदभेषजलातिके दासप्रियभक्ती ॥ रजतमसत्वां न कळे अगम्य तव शक्ती ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय जय श्रीअंबे ॥ ओंवाळूं आरति तुज भावें जगदंबे ॥ धृ० ॥ मोठा दुष्ट महीतळिं माहिषासुर झाला ॥ फोडुनि निर्जरप्रतिमा त्रासवि विप्रांला ॥ भोगित सुंदर स्वबळें नृपतींच्या बाळा ॥ हरिहरब्रह्मा पाहुनि पळताती ज्याला ॥ जय० ॥ २ ॥ त्रासविले गोब्राह्मण हें तुजला कळलें ॥ तत्क्षणिं भक्तहितास्तव प्रेमळ मन वळलें ॥ अरिचमुमंडळ भड भड तवक्रोधें जळलें ॥ चरणतळें माहिषासुर घुंगुरडें माळिलें ॥ जय० ॥ ३ ॥ होउनि विजयी निर्जर स्थापियले स्वपदा ॥ ऐसी तूं निजदासां नेसी दिव्य पदा ॥ अनन्य चिंतुनि तुजला गाती नित्य पदा ॥ दास म्हणे त्यां विपत्ति बाधेनाच कदा ॥० ॥ ४ ॥

१०७. चाल-साधी.

भक्तित प्रेमें करुनी आरति ओंवाळीं ॥ शक्ती दासालागीं तारक सांभाळीं ॥ करवीरीं वास तुझा देवि महाकाळी ॥ दत्तात्रेयस्वामी असती तुजजवळीं ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय जय महाशक्ती ॥ आरति करितां अखिलहि पापें संहरती ॥ धृ० ॥ शक्ती तूझी आहे भक्तां आधार ॥ यांतुनि गोडी काढुनि देईं हो सार ॥ धांवें धांवें पावें भक्तां सत्वर ॥ देईं स्वकीय भक्तांलागीं तूं वर ॥ जय०॥२॥ तारीं तारीं अंबे भवभय नीवारीं ॥ शरणागत मी आहे तव चरणावरी ॥ सुकुमारी दास तुझा घरिं मजला करीं ॥ संकटिं भक्तां तारी जैसा श्रीहरी ॥ जय० ॥ ३ ॥ शक्तीचा उत्साह भक्त जे करिती ॥ धूप दीप नैवेद्य तुजला अर्पीति ॥ त्यांचीं विघ्नें पळती भवताप हरती ॥ तव गुण गाया मोरेश्वर मागे सुमती ॥ जय० ॥ ४ ॥

१०८. चाल—जयजय त्र्यंबकराज०

मारुनि कोल्हासूर दैत्य दत्तात्रयगुरु मा ॥ माया लावुनिविश्व भोंदी भजना लावी मा ॥ मान भक्तांजवळुन घेई गोंधळ घाली मा॥ माया स्त्रियांवर आहे अविनाशप्रतिमा ॥ १ ॥ महालक्ष्मी करविर क्षेत्रीं ज्योतिरूप आहे ॥ जवाउणें काशी प्रयागवटिं गंगा आहे ॥ ॥ ध्रु० ॥ हारुनि दुःख पाप अवघें पुण्यवंत जिव हा ॥ हा नायक विश्वरूपी कीर्तन गाती हा ॥ हा दीनाचा अन्नदाता अंतरसाक्षी हा ॥ हा येउनि भेट देई शांत करी हा ॥ २ ॥ ललित अलंकार पुतळ्या कानीं तोंगल ॥ ललित माजि राखडी माथां घालुनि मूदल ॥ लहान थोर तुजला ध्याती स्मरणें करितील॥ लमाजी बहु सुंदर दाब चरणिं सांखळ्याल ॥३॥ क्षुद्र न भूतें जवळुन येती भयें पळती क्षू॥ क्षु आदिशक्तीच्या क्रोधें काळजळे क्षू॥ क्षू रंकाळ्यामध्यें देउळ रत्नखचीत क्षू ॥ क्षु पाण्याचा अंत न लागे कमळें फुलती क्षू ॥ ४ ॥ मी अंबिका देवा वडिल चंडमुंड मारी मी ॥ मी वेदांची माता म्हणवुनि शास्त्रपुराणीं मी ॥ मी जन्ममरण चुकवीं योगियांचे ध्यानीं मी ॥ मी परशुरामाची स्वामिण अजरामर करिं मी ॥ ५ ॥

१०९. चाल—साधी.

तूझें स्वरूप पाहतां मन माझें रमलें॥ मीतूंपण हें अवघें निरसुनियां गेलें ॥ जितुकें दीसे तितुकें त्वद्रूप झालें ॥ तुझिया प्रसादें मम अज्ञान हरलें ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय श्रीजगदंबे ॥ आरति ओंवाळीतों आनंदकंदंबे ॥ ध्रु० ॥ देहाहंभाव मम अवघा मावळला ॥ तुझिया स्वरूपाचा अनुभव हा कळला ॥ अद्वैत सौख्याचा वांटा मिळाला ॥ कामक्रोधाद्यरिंचा नाश पैं झाला ॥ जय० ॥ २ ॥ जिकडे पाहें तिकडे अंबा मज भासे ॥ स्मरण करिती त्यांचें भवदुःख नासे ॥ ज्ञानाचा तो ठसा हृदयीं प्रकाशे ॥ हरि बहु प्रेमानंदें रंगुनि गेलासे ॥ जय० ॥ ३ ॥

११०. चाल–साधी.

श्वासोच्छ्वास अवघा तुझिये स्वाधीन ॥ ज्ञानेंद्रियीं तेव्हां तुजलाची ज्ञान ॥ कर्मेंद्रियीं अवघें तव कर्माचरण ॥ अंतर्मनें करिसी तूंची जगरचन ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय माहेश्वरी ॥ आरती ओंवाळूं तुज योगेश्वरी ॥ धृ० ॥ तुझिया ज्ञाना अंगें मी तो सज्ञान ॥ तुझिया अज्ञानांगें मी तो अज्ञान ॥ कर्मोपासक ज्ञान तव नाटक पूर्ण ॥ व्यर्थचि मीपण माझा देहाभिमान ॥ जय० देवी ॥ २ ॥ अनंत ब्रह्मांडें तीं तूंची होसी ॥ अंतःकरणद्वारें तूंची हो स्फुरसी जन्ममृत्युसंसृति तूंचि हो वहासी ॥ बाला व्यर्थचि मीपण माझी आसोशी ॥ जय० ॥ ३ ॥

१११. चाल–साधी.

स्वेच्छें ब्रह्म तुं कौतुकनट क्रीडनकामें ॥ धरुनी सगुणरूपा रचिलीं त्रयधामें ॥ विविधात्मे विरचुनि त्वां भोगवि कृतकर्में ॥ निजरुपकरिसी दावुनि पुनरपि निजवर्में ॥ जय० ॥ १ ॥ जय जय परमानंदे महामाये शांते ॥ पंचारति ओंवाळूं तव पदिं कुळनाथे ॥ धृ० ॥ त्या तव निजरूपातें शोधित घटमठ हा ॥ चारि सहा दश द्वादश षोडश द्विदलां हा ॥ पाहतां सदयें गुरुरुपभासाविलें जेव्हां ॥ निजरुपपंथ केला सुगमागम तेव्हां ॥ जय० ॥ २ ॥ तो तूं भार्गवराम द्विजकुळगुरु त्राता ॥ दशशतदळ केळोसी सुखधामीं नेता ॥ तेथें शांतादुर्गा अद्वय हे माता ॥ पाहूनि तन्मय तल्लिन हरली भवचिंता ॥ जय० ॥ ३ ॥ तापत्रयजाचणिनें तापलि तनु पूर्ती ॥ तेव्हां स्वियकरुणें मनिं प्रगटलि हे मूर्ती ॥ कुरवाळुनि आश्वासीं दानीं मनतृप्ति ॥ मंगेशात्मज तल्लिन तत्पदिं समचित्तीं ॥ जय० ॥ ४ ॥

११२. चाल–साधी.

स्वेच्छें ब्रह्म तुं स्फुरणिं प्रगटासि मुळमाये ॥ विधिहरिहर हीं बाळें निर्मुनि भुवनाये ॥ उत्पत्तिरक्षणप्रळयां निरवुनि सम पाये ॥ प्रकृतिपुरुषात्मक तूं वर्तसि इह न्यायें ॥ १ ॥ जय जय दुर्गे माते शांते

चिच्छक्ते ॥ पंचारति ओंवाळूं तव पदिं कुळनाथे ॥ धृ ॥ ब्रह्मभुवन निजवासा भक्तांस्तव त्युजुनी ॥ निशुंभशुंभादिक हे दानव सहरुनी ॥ क्रीडसि सर्वाभ्यंतरिं तुरिये उन्मनीं ॥ अपार तव गुण किती हे वर्णूं लघुवदनीं ॥ जय ॥२॥ देवी शांतादुर्गा ऐशा अभिमानीं ॥ केळोसी-पुर येथें प्रसन्न राहोनी ॥ निजाद्विजभजकां स्मरणीं रक्षिसि धांवोनी ॥ अनुचर मंगीशात्मज अनन्य तवचरणीं ॥ जय० ॥ ३ ॥

११३. चाल—आवडी गंगाजळें

सद्गुरु सदय द्विदळीं वसतो स्वयंज्योतिरूपा ॥ दर्शन घेतां जीव शिव ऐक्यरूपीं पाहा ॥ १ ॥ जय जगदंबे सुखकर अंबे आरति करितों हे ॥ प्रणवापासुनी द्वीदलकमळीं ओंवाळिन पाहे ॥ धृ० ॥ पंचप्राणा पंचभूतात्मीं पांचा पंचविस तो ॥ सर्वत्रीं तो अधिकारी झाला सहजचि तो ॥ जय० ॥ २ ॥ मणिपुरद्वीपीं सहस्रदळीं जे श्री महामाया तूं ॥ चैतन्यरूपीं कर्ता कारण प्रकृतिपुरुष तूं ॥ जय० ॥ ३ ॥ सदाशिवजिवरूपी आत्मा समदृष्टी पाहासी ॥ आनंद असती गुणप्रतापी परमानंदें वससी ॥ जय० ॥ ४ ॥

११४. चाल—आवडी गंगाजळे.

कामक्रोधादिक वैरी धूप जाळीतों ॥ जंव जंव धूप जळे तंव तंव सुवास निघतो ॥ १ ॥ अनादि आदी माया ब्रह्मणि पंचारति करितों ॥ पंचप्राण पंचक तत्वें पंचदेहसह तो ॥ धृ० ॥ त्रिविधताप त्रिकाळदीप सन्मुख लावीतों ॥ शोक भय चिंता दैन्य स्वरुपी मावळतो ॥ अनादि० ॥ २ ॥ उपहारातें भक्ती भावादिकांसि ठेवीतों ॥ दया क्षमा शांति नमुनी नैवेद्य देतों ॥ अनादि० ॥ ३ ॥ अमृतपान सत्रावी आणि प्रेम अर्पीतों ॥ अष्टांगें नमुनि मानस पूजा उल्हासें करितों ॥ अनादि० ॥ ४ ॥ आनंदानें सच्चिदानंदपरब्रह्म पाहातों ॥ सगुणस्वरूपीं शांतादुर्गा कुळदैवत ध्यातों ॥ अनादि० ॥ ५ ॥

११५. चाल-साधी.

जयजयभगवति रुक्मिणि तव बलये कलये ॥ नीरांजनरंजनामीह भयदा भयकलये ॥ क्षीरधितनयेसुनयेऽपनयेतीःकलये ॥ शादिकनिलयेभास्यलयेकृत शोकलये ॥ धृ० ॥ श्रीविठ्ठलस्यकांतेकांतेऽनंतसमे ॥ क्षमया कुसुमे कुसुमेषुसुतेनंतसमे ॥ महदालोकेलोकेश्वरपरितो वसमे ॥ गेहहृदयेसदयेनिजभुजजितविसमे ॥ जय० ॥ १ ॥ भगवतिभगवतिमुरजितिपुरजिति हृत्कमले ॥ यमिनां राजसि वंदे त्वां हत भजकमले ॥ सुरनरचंचलचेतः संप्रापितकमले ॥ ऽनंतोपाध्यायसुतं विठ्ठलमवकलये ॥ जय जय० ॥ २ ॥

११६. चाल-वरदे रुचिराधरबिंबे०

उदधीलहरीसि तरंगे ॥ दिससी जगभासतरंगे ॥ स्वरुपीं तूंचि अहंकृतसंगे जय जय भवभंगे दुर्गे ॥ १ ॥ दुर्गे अघसंकट दुर्गे ॥ हरिगे कुळस्वामिणि दुर्गे ॥ कधिं मज पावसि मानसरंगे जय जय भवभंगे दुर्गे ॥ धृ० ॥ रचिसी ब्रह्मांड निःसंगे ॥ करुणा न करिसि तूं अंगे ॥ त्रिगुणीं गुणसाम्यलिलारस अंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ दुर्गे० ॥ २ ॥ करिसी उत्पत्तिस्थितिभंगे ॥ दुर्गे लय हा सत्य विसंगे ॥ तुझिया आनंदपदाब्जसुरंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥० ॥ ३ ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण पिंगे ॥ फुगडी घालिसि सत्संगें ॥ वंदी हनुमंत पदाब्जसुरंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ दुर्गे० ॥ ४ ॥

११७. चाल-जय जय त्र्यंबकराज०

निर्गुणधामीं निर्विकल्पीं निरालंबीं हीं ॥ अद्वयरूपा सद्वयमिळणी मग्न निरामयीं ॥ भागलां देवा अनंत प्रपंच्याठायीं ॥ श्रमपरिहरणीं ध्यावी आतां विश्रांती शुभ हीं ॥ १ ॥ शेजारति ओंवाळूं उन्मनी ध्यानें महामाया ॥ निरंजन मंदिरीं पहुडे रचिली सुखशय्या ॥ धृ० ॥ असतां उगाचि नसतां कारण द्वैता पावूनियां ॥ होउनि अतिकारण ती विश्वे बहु घडमोडुनियां ॥ एक तूं अनेक झाला असतां परता राहुनियां ॥ भोगविसी कृतकर्मे वर्मे जीव

मानवुनियां ॥ शेजारति० ॥ २ ॥ ऐसी तूं महामाया वेषाजन मोहुनियां ॥ सुखदुःखादिक हर्षविषादाखेदा लावुनियां ॥ होसी पाहसी कौतुक दाविसी पुंली भावुनियां ॥ काय ही लीला परतंत्र जन कष्टा घालुनियां ॥ शेजा० ॥ ३ ॥ पुरे आतां तव आवरुनि माया ज्ञाना देउनियां ॥ पुरविं मनोरथ देवा आपुल्या विरुदा राखुनियां ॥ सेव्यसेवक भाव रितीनें वांच्छित देवुनियां ॥ चालवीं दास अविघ्नें जातरि देवा देई लया शे० ॥ ४ ॥ अनंत ब्रह्मांडें तव शय्यें-ठायिं बीजरूपीं ॥ होती लीन न उरतां कांहीं सर्वहि तव रूपीं ॥ रूपा रूप मिळोनि अरूपीं निजसी स्वरूपीं ॥ मंगीशात्मज विनवी विठ्ठल काळीं साक्षेपी ॥ शेजा० ॥ ५ ॥

११८. चाल—साधी.

चतुराननभयहारिणि भो दुर्गे वरदे ॥ दुर्धरदुर्गतिदारिणि बोधितगोविंदे ॥ तव पदकमलं वंदे श्रितनित्यानंदे ॥ नंदित मुनिवरवृंदे श्रेयोमकरंदे ॥ १ ॥ जय देवी जय देवी मधुकैटभमथने ॥ जगदुदयस्थितिसंहृतिसंसृतिभीशमने ॥ ध्रु० ॥ हरिमुखसुरतेजोभिः प्रकटितनिजदेहे ॥ समरोचितशुभलक्षणसुषमासंदोहे ॥ नानायुधविलसत्करदलितासुरनिवहे ॥ स्वीयप्रेक्षणजनितद्योसाद्रिपुमाहे ॥ जय० ॥ ॥ २ ॥ चामरमुखदैत्यवरप्रविनाशिनि मरुतां ॥ संस्तवतुष्टे भगवति शुभकारिणि जगतां ॥ शुभादिप्रतिभट वित्रांसिनि भो नमतां ॥ त्वदंघ्रिकमले चेतो भृंगोऽयं रमतां ॥ जय०॥३॥ सिंहासनसंशोभिनि विधुशेखरकांते ॥ कांचीकंकणनूपुरमणिभूषणललिते ॥ मयि कुरु करुणामनिशं त्रिजगत्कल्पलते ॥ नीराजनमवलोकय काशीविप्रनुते ॥ ४ ॥

११९. चाल—साधी.

दशनखचंद्रालंकृतकोमलपदकमले ॥ जितैकविधिविष्णुपदे दग्धानेकमले ॥ मणिमयकांचीमंडितमुदिरच्छविवसने ॥ शक्रधनुःपरिवेषितशशधरपर्यसने ॥१॥ जय देवी जय देवी भो रुक्मिणि ललिते ॥ चरणप्रणतं माऽमलकरुणा भवकलिते ॥ ध्रु ॥ रुचिरामृतनिर्झरित-

स्तनकांचनशैलौ ॥ वक्षे मुक्ताराजितरक्तप्रभचैलौ ॥ पारोऽधिगतो-ऽयमेवास्तोदयकुधरौ ॥ तारामंडितलोहितध्वंसयांचितशिखरौ ॥ जय० ॥ २ ॥ हत्वा दितिजानिंद्रं सम्राजं कृत्वा ॥ कृतकृत्यासाजकरं कटि-देशे धृत्वा ॥ दक्षिणपाणिं केवलमधुना धारयसे ॥ तन्मन्ये भवभग्नो-द्धरणे योजयसे ॥ जय ॥ ३ ॥ गौरसितरक्ताधर सांजननयनरुचां ॥ संपर्कस्तव गंगारवितनयावाचां ॥ प्रयाग इव नीराजितमुखबिंबेहरतां ॥ दुरितं जनतां कुरुतां निजशोभानिरतां ॥ जय० ॥ ४॥ मुकुट विभू-षित कबरीभारे मणिहारे ॥ संसृतिसारे ॥ जगदाधारे सुविहारे ॥ स्वलके कुंकुमतिलके मृदुलपिते कमले ॥ ऽ नंतोपाध्यायात्मजमव विठ्ठलममले ॥ जय० ॥ ५ ॥

१२०. चाल—साधी.

मुळमायारूप तुझें नकळे कवणासी ॥ ब्रह्मादिक सुरवर ध्याती मानसीं ॥ व्यापुनियां जग सर्व खेळां खेळसी ॥ वधुनी शुंभनिशुंभां देवां वर देसी ॥१॥ जय देवी जय देवी जय आदीशक्ती ॥ ओवाळूं आरती तुज हो भगवती ॥ध्रु०॥ दृष्टीं व्यकट पाहतां कांपे त्रिभुवन॥ मुख पसरुनियां ग्रासिसी दैत्यांलागून ॥ दशभुजाआयुधें लखलखती जाण ॥ मर्दियेला महिषासुर चरणीं घालून ॥ जय० ॥ २ ॥ पवाडे वर्णितां खुंटली मम वाणी ॥ विश्व त्वां मोहियलें लावीलें ध्यानीं ॥ माया तूं माउली जगताची जननी ॥ विनवुनियां गोविंद ध्यात असे मनीं ॥ जय० ॥ ३ ॥

१२१. चाल—साधी.

यर्हि न सन्नासदपि स्वभावगुणजातं ॥ नाहं मृत्युर्नवयो महदा-दिकभूतं ॥ न दिवा नक्तं विगमो न हि शास्ता शास्यं ॥ त्वमेव तर्हि-कक्षैराभिभूयध्वांतं ॥ १ ॥ जय देवी जय देवी वेदत्रयगीते ॥ स्वभाव-सुभगे लक्ष्मिश्रितजनकल्पलते ॥ मयि कुरु करुणामनिशं विधि हरशक्रनुते ॥ नीराजनमुररीकुरु पुरुषोत्तमकांते ॥ ध्रु० ॥ यर्हि सिसृक्षावशगं तव मानसकमलं ॥ महदहमाकाशादित्वतोऽभवद-

२०६८२ वि. ३१०५ ५५ ९३३६ नों: दि:



खिलं ॥ श्रीगीः कालीहरिविधिशिवकारकजालं ॥ तत एवांडं भगवति निर्मितमिदममलं ॥ जय० ॥ २ ॥ तत्र जगद्विश्वसृजा जनयस्यपरखेदं ॥ ह्युद्भिज्जांडजजारजधर्मजाविति भेदं ॥ लुंपसि रक्षांसि नित्यं हरेण हरिणेदं ॥ दुर्गादिक निजरूपैः शमयसि जनतोदं ॥ जय० ॥ ३ ॥ करवीरादिक नगरीरधिष्ठसि शांते ॥ श्रितजनभोगश्रेयो वितरसि सिंधुसुते ॥ ददासि निजपदभाक्त तव नामस्मरते ॥ लीलाविधूतमहिषादिकदनुजध्वांते ॥ जय० ॥ ४ ॥ नितंबगौरवविलसितमंथरतर गमने ॥ विचित्रकांचीकंकणहारावलिवसने ॥ मुखलावण्याद्धरितपूर्णामृतसदने ॥ ह्यनुकंपायितलोचनसहजस्मितवदने ॥ जय० ॥ ५ ॥ ताटंकद्वयमंडितगंडितगंडस्थलललिते ॥ निजौष्ठभासा गुंजायितनासामुक्ते ॥ अर्धाब्जालिकसिंदुरारुणसीमंते ॥ कुलदेवि त्वं सदया भव काशीनाथे ॥ जय देवी० ॥ ६ ॥

### १२२. चाल—आवडी गंगाजळें.

कवणअपराधास्तव जननी केला तूं रुसवा ॥ मी तों ध्यातों हृदयीं तुजला अहर्निशीं भावा ॥ १ ॥ जय जय दीनदयाळे शांते देईं मज भेटी ॥ तव चरणाची स्वामिणि मजला आवडी मोठी ॥ धृ० ॥ चिंताकूपीं पडलों कोण काढिल बाहेरी ॥ धांवें पावें झडकरि अंबे करुणा तूं करीं ॥ जय० ॥ २ ॥ माता पिता गुरु दैवत सर्वही तूंची ॥ तुझ्यावांचूनि देवी मजला कोणी नलगेची ॥ जय० ॥ ३ ॥ काय असें पाहूनी अंगीकार त्वां केला ॥ आतां करणें त्याग तरि हें अघटित ब्रीदाला ॥ जय० ॥ ४ ॥ वेद शास्त्रें आणि पुराणें गर्जति अपार ॥ नाम घेतां हरती किल्मिष पुर्वी अंतर ॥ जय० ॥ ५ ॥ दास शरण हा अनन्यभावें करितो विनंती ॥ तुजवांचोनी मजला न गमे निश्चय दे सुमती ॥ जय० ॥ ६ ॥

### १२३. चाल—गोंधळाची.

वरदे रुचिराधरबिंबे ॥ शरदिंदुशुभाननबिंबे ॥ १ ॥ पावें मज आजि शिवप्रतिबिंबे ॥ जय जय जगदंबे ॥ हो हो जय जय जगदंबे

पावें ॥ पावें जय जय जगदंबे ॥ धृ० ॥ परिपालित भक्तकदंबे ॥ परमेश्वरि रक्षितविश्वकदंबे ॥ पावें० ॥ २ ॥ तडिये मज पावविं अंबे ॥ घडि ही आनंद तनय न विलंबे ॥ पावें मज आजि० ॥ ३ ॥

१२४, चाल–आरती भुवनसुंदराची०

आरती त्रिजगदंबिकेची ॥ निरुपमानंददांबिकेची ॥ धृ०॥ दिव्यांबरा इंदुवदना ॥ सुंदरकुंदरुचिररदना ॥ विद्युदंभभासमाना ॥ त्रिनयना मूर्ति सुप्रसन्ना ॥चाल ॥ मौक्तिकचंद्रकुंदधवला ॥ कुंकुमतिलकलसदलकमुदललंबि नक्षत्रमाल्यमुक्ताफलभृदतुलनासिका जईची ॥ शोभना नासिका जईची ॥ आरती० ॥ १ ॥ चूडामणिद्युमाणदीप्ती ॥ करगतरत्नवलयपंक्ती ॥ सांगदभुजांचियाकांती ॥ वर्णितां चकित कविहि होती ॥ चाल ॥ विलसे नीलकुंतलाली ॥ श्रुतिपुटीं ललित कुंडलें कांचि कटितटीं वींटिकाढ्यमुखपुटी कुचतटी सुरुचि ईश्वरीची ॥ सुकंचुकी सुरुची ईश्वराची ॥ आरती० ॥ २ ॥ मणिमयमंजीराभरणी ॥ नखमणिचंद्रिकासुरमणी ॥ शिवेच्या अंबुजाभरणी ॥ नतिरति धरिति सुरासुरमुनी ॥ चाल ॥ विधिहरिहरप्रभृति गाती ॥ सर्व सुर स्तविती जपाति मनु ध्याति भक्ति अतिसुमति सुकृत कवि वासुदेव करि सर्वमंगलेची ॥ सर्वदा सर्वमंगलेची ॥ आर०॥३॥

१२५. चाल–भजनी.

ओंवाळूं आरती ॥ महामायापायीं प्रीति ॥ मनोभावें पूजा भक्ती ॥ अर्पूनियां हो ॥ धृ० ॥ सहस्रारी नानापरी ॥ विचित्र कल्पोनि देव्हारीं ॥ विविधमनोपचारें वरी ॥ पूजा द्रव्यानें हो ॥ १ ॥ पुष्पांजळी प्राणमेळीं ॥ जिवाशिवासहमेळीं ॥ सूक्ष्म काया पायाकमळीं ॥ वाहोनियां हो ॥ २ ॥ कांहीं घडो काया पडो ॥ परि हें ध्यान न विसंडो ॥ तारो मारो अथवा बुडो ॥ दास हा अनन्य न्यायी ॥ ३ ॥

१२६. चाल–साधी.

श्रीपति तुझिया योगें श्रीहरिला नाम ॥ ब्रह्मादिकही ध्याती पुरविसि तत्काम ॥ निष्कामें जे भजती पावति निजधाम ॥ योगी

ध्यानें पावति पद आत्माराम ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय महा-लक्ष्मी ॥ वससी करवीरीं तूं विश्वाच्या पद्मीं ॥ जय० ॥ धृ० ॥ जपतपसिद्धी तुजविण कांहीं साधेना ॥ प्रसन्न होतां भक्तां भवभय बाधेना ॥ तुजवांचुनियां अंबे शांती लाधेना ॥ वेदांतींचें सार हि शिष्या बोधेना ॥ जय०॥२॥ गर्जति निगमागम परि वार्णाला गोप्य ॥ जें जें वर्णिति तें तें माये तव रूप ॥ कोण करी मग तूझ्या सगुणत्वा माप ॥ स्तवितां सहस्रवदनीं श्रमला कीं साप ॥ जय० ॥ ३ ॥ दंभें दर्पें मानें क्रोधें जे रहित ॥ भजती तव चरणां त्यां साधे आत्महित ॥ उद्धरती ते प्राणी परिवारांसहित ॥ देवी त्यांला करिसी श्रीपति-सन्निहित ॥ जय० ॥ ४ ॥ बाधा भवभीतींची तव दासां नाहीं ॥ माये न करिसि मोहा चंचळ तें कांहीं ॥ हृदयीं अखंड माझ्या तूं सदये राहीं ॥ गोविंदात्मज विप्रा स्वकदासीं पाहीं ॥ जय० ॥ ५ ॥

१२७. चाल—जयजय त्र्यंबकराज०

दक्षिणदेशामाजि एक स्थां तुळजापुर पाहिलें हो ॥ राज्य करी तुळजा साधुसंतांचें माहेर हो ॥ दर्शनास येती ब्रह्माविष्णु देव शंकर हो ॥ दैत्यवर मोहिले हांकारीले दळभार हो ॥ १ ॥ जय जय अष्ट-भुजे अष्टायुध तुज शोभती हो ॥ कर्णकुमारी माता तुळजापुरीं ठाण तुझें हो ॥ धृ० ॥ घाव घातला निशाणि घो घो नगार वाजती हो ॥ नवकोटि कात्यायनि छप्पन्नकोटि चामुंडाहि हो ॥ औटकोटि भुतावळ आईचे संगें वर्णूं किती हो ॥ रण फार दाटलें रणीं रणशिंगें वाजती हो ॥ जय० ॥ २ ॥ शिवगण लष्कर लढती अष्टभैरव क्षेत्रपाळ हो ॥ चौसष्ट योगिनी महा प्रचंड विशाळ हो ॥ व्याघ्रावरि बैसलीस माता तुळजा तूं वेल्हाळ हो ॥ उदोकारें गर्जती समस्त चामुंडा मिळोनि हो ॥ जय० ॥३॥ यमुनागिरिपर्वतीं दैत्य महिषासुर मातला हो ॥ अंबेच्या लष्करीं तयाचा गणकोट वेढिला हो ॥ मारिला महिषासूर अंबा जाहाली जयवंती हो ॥ बोले त्र्यंबकराज अंबा माझी यशवंती हो ॥ जय० ॥ ४ ॥

## १२८. चाल–साधी.

जगतारिणि दुःखहारिणि कुळस्वामिणि माते ॥ नाना विघ्नें वेष्टुनि कष्टविती मातें ॥ करुणा करिं शांकरि तूं अनाथ जननाथे ॥ भवभय सर्वहि हरिसी हें तों तव नातें ॥ १ ॥ जय अंबे जगदंबे जय जय महाकाली ॥ आरती ओंवाळूं पंचारति ओवाळूं वंदूं पद भाळीं ॥ ध्रु० ॥ बौद्धरूप दैवत या कलिमाजीं आलें ॥ न मिळे फल मनवांच्छित शंकित मन झालें ॥ तूं एक जागृत ऐकुनि मन माझें घालें ॥ जडलें दृढ मम मानस निश्चळ नाहालें ॥ जय० ॥ २ ॥ तव गुणप्रताप अद्‌भुत ऐकुनियां कानीं ॥ ध्यानीं मनिं दिनरजनीं स्तवितो निर्वाणीं ॥ लज्जा राखीं माते हे शुभकल्याणी ॥ कृपाकटाक्षें लक्षीं रक्षीं तव चरणीं ॥ जय० ॥ ३ ॥ निर्जर मुनिवर सर्वहि तुजलागीं ध्याती ॥ केली त्यां कवारें दैत्यावर ख्याती ॥ मर्दुनि शुंभनिशुंभां महिषासुरजाती ॥ सप्तशतीचा महिमा मृकंडुसुत गाती ॥ जय० ॥ ४ ॥ जिवजंतूमनकिंतू जाणसि सर्वांचा ॥ अंतरसाक्षी हेतू कां न कळे आमुचा ॥ संचितक्रियमाणा जरि मानूं मुळसंचा ॥ तरि मग काय पराक्रम वद्‌ला मुनि त्याचा ॥ जय० ॥ ५ ॥ विज्ञप्ती श्रुत व्हावी सादर सुख शाली ॥ बद्धांजुळिविनवीतों विनतीच्या चालीं ॥ सुंदरपद्‌पंकरजींरखमा मिठि घाली ॥ षट्‌पदवत गुंजारव करितो भाताली ॥ जय० ॥ ६ ॥

## १२९. चाल–अष्टपदी.

जयति जयति जगदंब महामाये सदये ॥ ओवाळूं आरती पंचप्राण हे ॥ ध्रु० ॥ अमृतउदधीमध्यें द्वीप नवरत्न तें ॥ दिव्य द्रमपुष्पफाळिं नित्यभरितें ॥ त्यांत चिंतामणिगृह शिवा मंचकीं ॥ शिवमयी नतब्रह्मांडश्रिजितें ॥ जय० ॥ १ ॥ विधिहरिहरनिगम पाहातां हें परम ॥ रूपतेजाळ लखलाखित आहे ॥ स्वीयप्रकाशें अखिल सहस्रशीर्षादि किल ॥ तेथुनी नेति नेतीति वद्‌ले ॥ जय० ॥२॥ ब्रह्म हें एक अद्वय साकारमय ॥ असुनि निर्गुण तें सगुण आहे ॥ तें कसें सगुण डोळां दिसुनि सांगवे ॥ म्हणुन हें नामरूपात्म पाहे ॥

जय० ॥ ३ ॥ सहस्रदलमंदिरीं पूजुं नानापरी ॥ मानसीं द्रव्यसह विविधकुसुमें ॥ विचित्रपरिधान चिंतामणी जडित ॥ नवरत्नभुषणामयि तेज उदये ॥ जय० ॥ ४ ॥ स्थूलसूक्ष्मादिविश्वाभिमानीप्रमुख ॥ सत्व रज ज्ञानक्रियादिसह ते एकवटुनि पंचारतिज्योति गुरु उजळुनी ॥ पाहुनी ये मनीं रूप शिव तें ॥ जय० ॥ ५ ॥ न पुंस ना स्त्री न पुरुषाकृति असोनियां ॥ दावी शक्तिस्वरुप सर्व कृत जें ॥ मंगिशात्मज सदा दास शांतापदीं ॥ लावितां लक्ष लय दावि रूप जें ॥ ६ ॥

१३०. चाल—साधी.

नसतां मारुत पावक जल अंबर भरणी ॥ नसतां धाता सुरपति तारापति तरणी ॥ नसतां ग्रहगण भूतें होसी तूं तरणी ॥ प्रलयसमुद्रीं सर्वहि जग तूझी करणी ॥ १ ॥ जय देवी जय देवी सकलागमसारे ॥ नरावलंबे अंबे सर्वजगोद्धारे ॥ पावे सत्वर वरदे चतुरे सुविचारे ॥ अजरे अमरे संततिदात्रि अविकारे ॥ धृ० ॥ जग निर्मुनि पाळिसी अंतीं तुजमाजी ॥ अलक्ष्यलक्षवेना हें वैभव आजी ॥ वारीं वारीं जननें करुणाकर माझीं ॥ तेणें घडेल निरुती दयालुता साजी ॥ जय० ॥ २ ॥ प्रगटें विलंब न करीं संतांचे सुमनीं ॥ जननी हे गुण तूझे राज्यीं त्रिभुवनीं ॥ सुरवरपन्नग ध्यावी सत्वर तुज जननी ॥ उदार दृष्टी धरिसी नरहरसंजिवनी ॥ जय० ॥ ३ ॥

१३१. मंगळागौरीची——चाल—स्त्रियांचे चालीवर.

जयदेवी मंगळागौरी ॥ ओंवाळीन सोनियांताटीं ॥ रत्नाचे दिवे माणिकाच्या वाती ॥ हिरेया ज्योती ॥ धृ० ॥ मंगळमूर्ती उपजली काया ॥ प्रसन्न झाली अलपायुषीराया ॥ तिष्ठली राज्यबाळी ॥ अयोपण द्यावया ॥ जय० ॥ १ ॥ पूजेला ग आणिती जाइच्या कळ्या ॥ सोळा तिकटीं सोळा दूर्वा ॥ सोळा परीची पत्री ॥ जाई जुई आबुल्या ॥ शेवंती नागचांफे ॥ पारिजातकें मनोहरें ॥ गोकर्ण महाफूलें ॥ नंदेटें तगरें ॥ पूजेला ग आणिलीं ॥ जय० ॥ २ ॥ साळीचे तांदूळ मुगाची डाळ ॥ अळणी खिचडी रांधिती नार ॥ आपल्या

पतीलागीं ॥ सेवा करिती फार ॥ जय० ॥ ३ ॥ डुमडुम डुमडुम वाजंत्रें वाजती ॥ कळावीं कांकणें हातीं शोभती ॥ शोभती बाजुबंद ॥ कानीं कांपाचे गवे ॥ ल्यायिली अंबाबाई शोभे ॥ जय० ॥ ४ ॥ न्हाउनी माखुनि मौनी बैसली ॥ पाटावाची चोळी क्षीरोदक नेसली ॥ स्वच्छ बहुत होऊनी ॥ अंबा पूजूं बैसली ॥ जय० ॥ ५ ॥ सोनियाचे ताटीं घातिल्या पंचारती ॥ मध्यें उजळती कापुराच्या वाती ॥ करा धूप दीप ॥ आतां नैवेद्य षड्रस पकान्नें ॥ ताटीं भरा बोनें ॥ जय० ॥ ६ ॥ लवलाहें तीर्थें काशी निघालीं ॥ माउली मंगळागौर भिजवूं विसरली ॥ भागुती परतुनीयां आली ॥ अंबा स्वयंभू देखिली ॥ देऊळ सोनियाचें ॥ खांब हिरे यांचे ॥ वरती कळस मोतियांचा ॥ ७ ॥

१३२. मंगळागौरीची चाल—स्त्रियांचे चालीवर.

मंगलागौरी नाम तूझें ॥ तुला नमन असो माझें ॥ भवदुःखाचें हें ओझें ॥ देवी उतरावें सहजें ॥ १ ॥ जय० माये मंगलागौरी ॥ तुजला पुजूं अंतरीं ॥ नानाविधिउपचारीं ॥ दीप ओवाळूं सुंदरी ॥ ॥ ध्रु० ॥ गजाननाची तूं माता ॥ शंकराची प्रिय कान्ता ॥ हिमाचलाची तूं दुहिता ॥ मज तारिं तारिं आतां ॥ जय० ॥ २ ॥ लागे तुझ्या चरणाशीं ॥ जाळीं पापांचिया राशी ॥ भक्ति ठसावी मानसीं ॥ अंबे न्यावे पायांपाशीं ॥ जय० ॥ ३ ॥ गौरी ओवाळित्यें दीप ॥ नेणें तूझें नामरूप ॥ वाढवावें सौभाग्य अमूप ॥ विश्वाची तूं मायबाप ॥ जय माये० ॥ ४ ॥ रिकामी ही खटपट ॥ शुद्धमार्गी लावीं नीट ॥ परब्रह्म घनदाट ॥ द्यावी नारायणी भेट ॥ जय० ॥ ५ ॥

१३३. हारितालिकेची—चाल—स्त्रियांचे चालीवर.

हरअर्धांगी वससी ॥ जाशी यज्ञा माहेरासी ॥ तेथें अपमान पावसी ॥ यज्ञकुंडीं गुप्त होसी ॥ १ ॥ जय देवी हारतालिके ॥ सखि पार्वति अंबीके ॥ आरती ओवाळीत्यें ॥ ज्ञानदीपकळीके ॥ ॥ ध्रु० ॥ रिघसी हिमाद्रीच्या पोटीं ॥ कन्या होसी तूं गोमटी ॥ उग्रतपश्चर्या मोठी ॥ आचरसी उठाउठी ॥ जय० ॥ २ ॥ तापपं-

चाग्नीसाधनें ॥ धूम्रपानें अधोवदनें ॥ केली बहु उपोषणें ॥ शंभु-भ्रताराकारणें ॥जय० ॥३॥ लीला दाखविसी दृष्टीं ॥ हें व्रत करिसी लोकींसाठीं ॥ पुन्हां वरिसी धूर्जटी ॥ मज रक्षावें संकटीं ॥ जय० ॥ ४ ॥ काय वर्णूं तव गुण ॥ अल्पमति नारायण ॥ मातें दाखवी चरण ॥ चुकवावें जन्ममरण ॥ जय देवी० ॥ ५ ॥

१३४. चाल—साधी.

कोल्हापुरि देवी तूं राहिवास केला ॥ मारुनि दैत्यदानव धर्म स्थापीला ॥ देवां सुरवरां आनंद जाहला ॥ सकळहि मिळुनी येती तूझ्या भेटीला ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ॥ आरती ओवाळूं शरण आहें मी ॥ धृ० ॥ चौसष्ट योगिनी रात्रीं सेवेसी ॥ अडसष्ट तीर्थें तीं आलीं महिमेसीं ॥ मानव सकळिक येती तेथें स्नानासीं ॥ त्यांचीं सकळहि पापें जाती भंगासी ॥ जय देवी० ॥ २ ॥ अवतार पूर्ण तो धरिला देवीनें ॥ त्रिकाळ पूजा अर्चन होत सन्मानें ॥ पृथ्वीवरी वार्ता गेली महिमेनें ॥ कृष्णसुत चरण धरितो भावाने ॥ जय० ॥ ३ ॥

१३५. चाल—आरती भुवनसुंदराची०

आरती जगन्मोहिनीची ॥ सगुणनिष्कामदोहिनीची ॥ धृ० ॥ उदितमार्तंड सहस्र जैसे ॥ भव्यतमुदिव्यदीप्ति विकसे ॥ शुद्ध जांबूनदकनकअसें ॥ अत्यलंकृतमंडित विलसे ॥ चाल ॥ कंकणहारनूपुरादी ॥ हालितपदिं खनन, चालित सुरमनन, गलित रिपुजनन, ललित मैतननकीर्तनाची ॥ गत्यनिर्वाच्य नर्तनाची ॥ आरती० ॥ १ ॥ ब्रह्मा यम इंद्र चंद्र तरणी ॥ प्रभंजन अग्नि वरुण धरणी ॥ ईश नैर्ऋत्य शुभस्मरणीं ॥ उदित नीरांजनप्रकर्णी ॥ चाल ॥ मुकुटनिजरत्नदीपनमनीं ॥ प्रगटसमभवन, झगटतमयवन, सगटकृतिहवन. लगटगतिजवन सत्पदाची ॥ करिति कुर्वंडि श्रीपदाची ॥ आरती० ॥ २ ॥ प्रथम शुभवरदकार कर तो ॥ द्वितीय भक्तांसि अभय कारितो ॥ तृतिय कर खड्ग तीव्र धरितो ॥ वधुनि खल संतजनोद्धारितो ॥चाल॥

अग्रपुटिं उग्रदैत्यशिर तें ॥ त्रिविन्नगुण करत, त्रिमूर्तिक वरत, त्रिपुर-करधरत, त्रितापअघहरत त्रिशूलांची ॥ त्रिगति सुखकरत त्रिमूलांची ॥ आरती० ॥ ३ ॥ सुरासुर दुग्ध अब्धिमथनीं ॥ शेष गुण मंद्रअचल मथनी ॥ श्रीसुराऽमृत गजाश्व रमणी ॥ वैद्य धनु विष तरु चंद्र मणी ॥ चाल ॥ शंख गोरत्नभाग समयीं ॥ राहु सुरपटित, सुधा घटघटित. बघुनियां झटित, करित तैं शिरच्छेदनाची ॥ चपलता राघवक्षणाची ॥ आरती० ॥ ४ ॥

### १३६. चाल—विडा घ्याहो नारायणा०

विडा घ्याहो अंबाबाई ॥ जगज्जननी माझे आई ॥ विनवितो दास प्रेमें ॥ हस्त जोडुनी आई ॥ धृ० ॥ त्रिगुणपूगीफळ ॥ चुर्ण केलें निर्मळ ॥ निर्गुण केशरानें ॥ रंगविलें सोज्वळ ॥ विडा० ॥ १ ॥ प्रपंच पक्व पानें ॥ हातीं घेउनि विवेकानें ॥ द्वैतभाव जाळूनियां ॥ वरी लाविला चूना ॥ विडा० ॥ २ ॥ भावार्थ शुभ्रकात ॥ प्रेमलवंग त्यांत ॥ सुवासिक सर्व द्रव्यें ॥ मेळविलीं समस्त ॥ विडा० ॥ ३ ॥ जय जय कुळ देवते ॥ आदिशक्ती मूळमाते ॥ घेउनी विडा हातीं ॥ हरी तुज विनवीत ॥ विडा घ्याहो० ॥ ४ ॥

### १३७. चाल—साधी.

करवीरालयवासिनि मंगलगुणशाले ॥ कोल्हासुरपरिमर्दिनि सुपयोनिधि बाले ॥ कटितटचुंबितजांबूनदचारुदुकूले ॥ मुकुटोत्कटकरनीलालंकृतनिजभाले ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय सुंदरि कमले ॥ कमलासनकमलाधवपूजितपदकमले ॥ धृ० ॥ चामीकरकृतकंकणमंडितकरजाले ॥ कांचनमणिमयकांचीकिंकिणिवरहेले ॥ हृदयस्थलपरिरंजितमुक्ताफलमाले ॥ राकाहिमकरवदनस्मितचारुकपोले ॥ जय० ॥ २ ॥ इंदीवरदलनयने नंदितशुभशीले ॥ बिंबाधररुचिराजितरदनावलिलीले ॥ पार्श्वद्वयधृतवाणीकालीप्सितमौले ॥ वरदे शिवरतिसुखदे फलदे हरमहिले ॥ जय देवी० ॥ ३ ॥

१३८. चाल—साधी.

निर्गुण जें होतें तें सगुण त्वां केलें ॥ चराचर हें अवघें तुजपासुनि झालें ॥ मायावेष्टित जन हें ऐसें त्वां केलें ॥ त्रैलोक्यहि आपुल्या ऐसें त्वां केलें ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय आदीशक्ती ॥ आरति ओंवाळूं तुज एकाग्रभक्ती ॥ धृ० ॥ ऐसी सगुणें तुजला लेणीं जडितांचीं ॥ अनेक वस्त्रें शोभति कांचनवर्णांचीं ॥ बैसुनि सिंहासनीं नृत्यें गणिकांचीं ॥ पाहसी तूं नयनीं जननी जनकाची ॥ ॥ जय० ॥ २ ॥ हरिहरब्रह्मादिकही येती नवसांसी ॥ जे जे वर मागति ते ते तूं देसी ॥ कृपाळु अंबे माते पावसि भक्तांसी ॥ परशुराम दीना करुणाकर होसी ॥ जय० ॥ ३ ॥

१३९. चाल—साधी.

सुरवरवरदायिनी मुरहरसुखसदना ॥ परतः परवासिनी अरिविरकुलकदना ॥ व्यापक सर्वांघटीं जननी हे मदना ॥ करुणासागररूपें नांदे शशिवदना ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय विश्वंभरिते ॥ आरति ही ओंवाळूं तुज कृपावंते ॥ धृ० ॥ मुनिजनमनमोहिनी सकळांची जननी ॥ जनमनमज्जनसज्जनविज्जनतमशमनी ॥ दासां अभ्यंतरीं मानसमृदुशयनी ॥ राघववरदा सुंदरलाघव मृगनयनी ॥२॥

१४०. चाल—भजनाची.

ओंवाळिन वोजा ॥ शिवसहजा, आदिभवानी गिरिजा, कल्लोलस्तरजा ॥ चारुभुजा, आइ तुकाई तुळजा, शाकंभरिभर्गा ॥ नवदुर्गा, हिंगुळागिरिहिंगुळजा, निवासपुर लक्ष्मी ॥ महलक्ष्मी, कोल्हापुरपट्टणजा ॥ ओंवा० ॥ १ ॥ मूका मीनाक्षी, ॥ कामाक्षी, सर्वहि कर्नाटकजा, व्याघ्रालयपुरजा ॥ गुग्गुलजा. भिल्लीरंजितपुंजा, पट्टणपुरचंडी ॥ श्रीचंडी, निरहस्तेजःपुंजा, कोटीमुखज्वाला ॥ श्रीबाला, विमला मंगलगिरिजा ॥ ओंवा० ॥ २ ॥ देई या भक्ती श्रीललिता, पूजिन मी सुखसरिता, अंबा डंबरजा ॥ तळवटजा, गुहामंडपमहजा. विंध्याचलसदन ॥ ददिसदन, देवी यशोदातनुजा, तारा भुवनेशी ॥ पंचदशी, ब्रह्मानंदोदरिजा ॥ ओंवा० ॥ ३ ॥ दर्याइंद्राक्षी ॥ पिंगाक्षी,

लंकांकित ऋषिवाटिजा तैलंकोंकणजा ॥ पंकजजा, लवणासुरमर्दने, अनेकपुरवणजा ॥ अमितभुजा, कारणरूपा विरजा, कालेश्रीधीषण ॥ त्रिविधगुण, सत्यद्रुमजा द्रुमजा, योगैः श्रीविद्या ॥ श्रीविद्या, खिरडामाणिक गिरिजा ॥ ओंवाळिन० ॥ ४ ॥

१४१. चाल—काय मला भूल पडली०

जय देवी आद्यरूपे भुवनसुंदरी ॥ पंचारति करितों तुज हे महेश्वरी ॥ धृ० ॥ निर्गुणाशि सगुणत्व तूंचि आणिलें ॥ अवघें हें विश्व तुझें रूप शोभलें ॥ नपुंसक ना स्त्री न पुरुष तूंचि मोहिलें ॥ मीतुंपणा हरुनि ज्ञानदीप दे करीं ॥ जय देवी० ॥ १ ॥ सर्व जगीं व्यापुनियां खेळ खेळसी ॥ ब्रह्मादिक सुर नर तुज ध्याति मानसीं ॥ शुंभनिशुंभादि वधुनि देव रक्षिसी ॥ नकळे तव पार कदा पापगिरि हरी ॥ जय देवी० ॥ २ ॥ हरि हर विधि करिति नवस जननि तुजप्रति ॥ जे जे वर मागति ते देसि त्यांप्रती ॥ विठ्ठलसुत बलवत्कवि शरण तुज अती ॥ मागतसे अभयवरा देई झडकरी ॥ ३ ॥

१४२. चाल—सुवर्णकेतकी परि जो०

जयदेवी जयदुर्गे माते आदिभवानि चिच्छक्ते ॥ पंचारति तुज प्रेमें करितों तन मन अर्पुनि कुळनाथे ॥ धृ० ॥ तव कृपेविण जपतपादी कांहीं न पावति सिद्धीतें ॥ प्रसन्न होतां भवभयबाधा कधिंहि न बाधे भक्तातें ॥ तव इच्छेविण बोधेना कधीं वेदसारही शेषातें ॥ जाणुनि हें तव चरणिं शरण बहु षड्रिपु वारी मम माते ॥ विठ्ठलसुत बलवत्कवि विनवी मान्य करीं मम वचनातें ॥ इष्ट हेतु मम पुरवुनि अंतीं मिळवीं तव निजतत्वातें ॥ १ ॥

१४३. चाल—सुंदर मुख तुंदिल तनु.

महिषासुरमथिनि देवि त्रिपुरसुंदरी ॥ ओंवाळिन पंचारति घेउनी करीं ॥धृ०॥ रत्नजडित सिंहासनिं नित्य बैससी ॥ दीप्तीनें लाजविले भास्कर शशी ॥ अष्टभुजा देवी तुज पूजुं भक्तिसीं ॥ देई । येई । पाहीं । सुखसदने । मृगनयने शशिवदने । पाव झडकरी ॥ १ ॥

मारुनियां चंडमुंड देव रक्षिसी ॥ अवतरुनी भूमिवरी भक्त तारिसी ॥ ओंवाळित वासुदेव प्रार्थितो तुसी ॥ शक्ते । माते । ललिते । भयहरणे । सुखकरणे । शिवरमणे । मुक्त मज करीं ॥२॥ महिषासुरमथिनि० ॥

१४४. चाल—आरती ज्ञानराजा.

जय देवी विष्णुकांते ॥ महालक्ष्मीग माते ॥ आरती ओंवाळीन ॥ तूज विज्ञानसरीते ॥ जय० ॥ धृ० ॥ मर्दिला कोल्हासूर ॥ ख्याती केली कीं थोर ॥ श्रीलक्ष्मी नाम तूझें ॥ दैत्य कांपती फार॥ जय० ॥ १ ॥ धन्य तें कोलापूर ॥ धन्य तेथींचे नर ॥ सकळही मुक्त होती ॥ तुजला पाहतां सत्वर ॥ ज० ॥ २ ॥ रहिवास कोलापूरीं ॥ पंचगंगेच्या तीरीं ॥ सुविशाळ सिंहासन ॥ विराजसी तयावरी ॥ ज० ॥ ३ ॥ मागणें हेंचि माये ॥ आतां दाखवी पाये ॥ उशीर नको लावूं ॥ दास तुझा वाट पाहे ॥ ज० ॥ ४ ॥

१४५. चाल—साधी.

जय देवी आदिशक्ती ॥ सुंदरसगुणा मूर्ती ॥ आरति ओंवाळीतां ॥ मनउत्साहप्राप्ती ॥ धृ० ॥ अइ सगुण तूं हेंची ब्रह्म ॥ सदा आनंदपूर्ण ॥ विश्व हें व्यापीयेलें ॥ मायारूप धरियेलें ॥ जय० ॥ १ ॥ अइ देवही सकळ ध्याती ॥ तुझे पाय वंदीती ॥ अभयासीं पूर्ण घेती ॥ वेद स्तुती जे करिती ॥ जय ॥ २ ॥ अइ कीर्तीचे घोष गातां ॥ सदय होई तूं आतां ॥ मागणें हेंची आहे ॥ परशुरामासी पाहें ॥ जय० ॥ ३ ॥

१४६. चाल—ओंवाळुं आरती मदन गोपाळा.

जय जय आरती त्रिभुवनमाते ॥ तनमन कुर्वंडी तव पदीं शांते ॥ धृ० ॥ आवाहन ध्यान निवेदुनि आसन ॥ अर्घ्य पाद्य पूजा अर्चन वंदन ॥ जय० ॥ १ ॥ आभरणादी चिरे सुमनघन ॥ धूप दीप फल तांबूल अर्पण ॥ जय० ॥ २ ॥ वीणा टाळ मृदंग सुशो-

भित ॥ उजळुनि आरति गाइन नाचत ॥ जय० ॥ ३ ॥ मंत्रपुष्पें बहू आणि प्रदक्षिणा ॥ दीर्घ दंडवत आत्मनिवेदन ॥ जय जय० ॥ ॥ ४ ॥ शंकरसरस्वती वरदप्रसंगें ॥ मोरेश्वर नामीं तन्मय रंगें ॥ जय० ॥ ५ ॥

१४७. चाल–साधी.

शिवमनभ्रमरकमळिणी जय आदीशक्ती ॥ षण्मुखगजमुखजननी जय जय अव्यक्ती ॥ भवगदभेषजलतिके दासप्रियभक्ती ॥ रजतमसत्वां न कळे अगम्य तव शक्ती ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय जय श्रीअंबे ॥ ओंवाळूं आरति तुज भावें जगदंबे ॥ ध्रु० ॥ मोठा दुष्ट महातळिं महिषासुर झाला ॥ फोडुनि निर्जरप्रतिमा त्रासवि विप्रांला ॥ भोगित सुंदर स्त्रवळें नृपतींच्या बाळा ॥ हरिहरब्रह्मा-पाहुनि पळताती ज्याला ॥ जय० ॥ २ ॥ त्रासविलें गोब्राह्मण हें तुजला कळलें ॥ तत्क्षणिं भक्तहितास्तव प्रेमळ मन वळलें ॥ अरि-चमुमंडळ भड भड तवक्रोधें जळलें ॥ चरणतळें महिषासुर धुंधुरडें मळिलें ॥ जय ॥ ३ ॥ होउनि विजयी निर्जर स्थापियले स्वपदा ॥ ऐशी तूं निजदासां नेशी दिव्यपदा ॥ अनन्यचिंतुनि तुजला गाती नित्यपदा ॥ दास ह्मणे त्यां विपत्ति बाधे नाच कदा ॥ जय देवी जय देवी जय जय श्रीअंबे ॥ ओंवाळूं आर० ॥ ४ ॥

( १४८. जयजय त्र्यंबकराज या चालीवर. )

महालक्ष्मी करविरक्षेत्रीं ज्योतिरूप आहे ॥ जवाउणें काशी प्रयागवटिं गंगा आहे ॥ ध्रु० ॥ मारुनि कोल्हासूर दैत्य दत्तात्रयगुरु मा ॥ माया लावुनि विश्व भोंदी भजना लावी मा ॥ मान भक्तां-जवळुन घेई गोंधळ घाली मा ॥ माया स्त्रियांवर आहे अविनाश-प्रतिमा ॥ १ ॥ हरुनि दुःख पाप अवघें पुण्यवंत जिव हा ॥ हा नायक विश्वरूपी कीर्तन गाती हा ॥ हा दीनाचा अन्नदाता अंतर-साक्षी हा ॥ हा येऊनी भेट देई शांत करी हा ॥ २ ॥ ललित अलंकार पुतळ्या कांनीं तोंगल ॥ ललित माजि राखडी माथां

घालुनि मूदल॥ लहानथोर तुजला ध्याती स्मरणें करतील॥ लमाजी बहुसुंदर दाव चरणीं सांखळ्याल॥३॥ क्षुद्र न भूतें जवळुन येती भये पळती क्षू ॥ क्षु आदीशक्तीच्या क्रोधें काळ जळे क्षू ॥ क्षु रंकाळ्या-मध्यें देउळ रत्नखचीत क्षू ॥ क्षु पाण्याचा अंत न लागे कमळें फुलती क्षू ॥ ४ ॥ मी अंबिका देवा वडिल चंडमुंड मारी मी ॥ मी वेदांची माता म्हणवुनि शास्त्रपुराणीं मी ॥ मी जन्ममरण चुकवीं योगीयांचे ध्यानीं मी ॥ मी परशुरामाची स्वामिण अजरामर करीं मी ॥ ५ ॥

१४९. चाल—साधी

जय देवी जय देवी जय माहेश्वरी ॥ आरती ओंवाळूं तुज योगेश्वरी ॥धृ०॥ श्वासोच्छ्वास अवघा तुझिये स्वाधीन ॥ ज्ञानेंद्रियीं तेव्हां तुजलाची ज्ञान ॥ कर्मेंद्रियीं अवघें तव कर्माचरण ॥ अंतर्मनें करिसी तूंची जगरचन ॥ जय० ॥ १ ॥ तुझिया ज्ञानाअंगें मी तो सज्ञान ॥ तुझिया अज्ञानांगें मी तो अज्ञान ॥ कर्मोपासकज्ञान तव नाटक पूर्ण ॥ व्यर्थचि मीपण माझा देहाभिमान ॥ जय० ॥ २ ॥ अनंतब्रह्मांडें तीं तूंची होसी ॥ अंतःकरणद्वारें तूंची हो स्फुरसी ॥ जन्ममृत्युसंसृति तूंची हो वहासी ॥ बाळा व्यर्थचि मीपण माझी आसोशी ॥ ३ ॥

१५०. चाल—साधी.

जय जय परमानंदे महामाये शांते ॥ पंचारति ओंवाळूं तव पदिं कुळनाथे ॥ धृ० ॥ स्वेच्छें ब्रह्म तु कौतुकनट क्रीडनकामें ॥ धरूनी सगुणरूपा रचिलीं त्रयधामें ॥ विविधात्मे विरचुनि त्यां भोगवि कृतकर्मे ॥ निजरुप करिसी दावुनि पुनरपि निजवर्मे ॥ जय० ॥ १ ॥ त्या तव निजरूपातें शोधित घटमठ हा ॥ चारि साहा दश द्वादश षोडश द्विदलां हा ॥ पाहतां सद्यें गुरुरुपभासविलें जेव्हां ॥ निज-रुपपथ तो केला सुगमागम तेव्हां ॥ जय० ॥ २ ॥ तो तूं भार्गवराम द्विजकुळगुरु त्राता ॥ दशशतदळकेळीसीसुखधामीं नेता ॥ तेथें

शांतादुर्गा अद्वय हे माता ॥ पाहुनि तन्मय तल्लिन हरली भव-चिंता ॥ जय० ॥ ३ ॥ तापत्रयजाचणिनें तापलि तनु पुर्ती ॥ तेव्हां स्वियकरुणें मनिं प्रगटलि हे मूर्ती ॥ कुरवाळुनि आश्वासीं दानीं मनतृप्ति ॥ मंगेशात्मज तल्लिन तत्पदिं समचित्तीं ॥ जय जय० ॥ ४ ॥

१५१. चाल—साधी.

जय जय दुर्गे माते शांते चिच्छक्ते ॥ पंचारति ओंवाळूं तव पदिं कुळनाथे ॥ धृ०॥ स्वेच्छें ब्रह्म तूं स्फुरणिं प्रगटसि मुळमाये ॥ विधिहरिहर हीं बाळें निर्मुनि भुवनायें ॥ उत्पतिरक्षणप्रळयां निरखुनि सम पाये ॥ प्रकृतिपुरुषात्मक तूं वर्तसि इह न्यायें ॥ जय० ॥ १ ॥ ब्रह्मभुवनानिजवासा भक्तांस्तव त्यजुनि ॥ निशुंभशुंभादिक हे दानव संहरुनी ॥ क्रीडसि सर्वाभ्यंतरिं तुरियें उन्मनीं ॥ अपार तव गुण किति हे वर्णूं मि लघुवदनीं ॥ जय० ॥ २ ॥ देवी शांतादुर्गा ऐशा अभिमानीं ॥ केळोसीपुर येथें प्रसन्न राहोनी ॥ निजद्विजभजका स्मरणीं राक्षिसि धांवोनी ॥ अनुचरमंगीशात्मज अनन्य तव चरणीं ॥ जय जय दुर्गे माते शांते० ॥ ३ ॥

१५२. चाल—आवडी गंगाजळी.

जय जगदंबे सुखकर अंबे आरती करतों हें ॥ प्रणवापासुनी द्वीदलकमळीं ओंवाळिन पाहें ॥ धृ० ॥ सद्गुरु सदय द्विदळीं बसतो स्वयंज्योतिरूपा ॥ दर्शन घेतां जीव शिव ऐक्यरूपीं पाहा ॥ जय० ॥ १ ॥ पंचप्राणा पंचभूतात्मीं पांचा पंचविस तो ॥ सर्वत्रीं तो अधीकारी झाला सहजचि तो ॥ जय० ॥ २ ॥ मणिपुरद्वीपीं सहस्रदळीं जे श्री महामाया तूं ॥ चैतन्यरूपीं कर्ता कारण प्रकृति-पुरुष तूं ॥ जय० ॥ ३ ॥ सदाशीवजिवरूपी आत्मा समदृष्टि पाहासी ॥ आनंद असती गुणप्रतापी परमानंदें वससी जय० ॥ जय जग० ॥ ४ ॥

१५३. चाल—आवडी गंगावळी.

अनादि आदी माया ब्रह्मणि पंचारति करितों ॥ पंचप्राण पंचकतत्वें पंचदेहसह तो ॥ ध्रु० ॥ कामक्रोधादीक वैरी धूप जाळीतों ॥ जंवजंव धूप जळे तंवतंव सुवास निघतो ॥ अ ॥ १ ॥ त्रिविधताप त्रिकाळदीप सन्मुख लावीतों ॥ शोक भय चिंता दैन्य स्वरूपीं मावळतो ॥ अ० ॥ २ ॥ उपहारातें भक्तीभावादिक ठेवीतों ॥ दया क्षमा शांति नमुनी नैवेद्या देतों ॥ अ० ॥ ३ ॥ अमृतपान सत्रावी आणि प्रेम अर्पीतों ॥ अष्टांगें नमुनि मानस पूजा उल्हासें करितों ॥ ॥ अ० ॥ ४ ॥ आनंदानें सच्चिदानंदपरब्रह्म पाहतों ॥ सगुणस्वरूपीं शांतादुर्गा कुलदैवत ध्यातों ॥ ५ ॥

१५४. चाल—जय जय त्र्यंबकराज

शेजारति ओंवाळूं उन्मनी ध्यानें महामाया ॥ निरंजन मंदिरीं पहुडे रचिली सुखशय्या ॥ ध्रु० ॥ निर्गुणधामीं निर्विकल्पीं निरालंबीं ही ॥ अद्वयरूपा सद्वयमिळणी मग्न निरामयीं ॥ भागलां बहु देवा अनंत प्रपंच्याठायीं ॥ श्रमपरिहरणीं घ्यावी आतां विश्रांती शुभ ही ॥ शे० ॥ १ ॥ असतां उगाचि नसतां कारण द्वैता पावुनियां ॥ होवोनि अतिकारण ती विश्वें बहु घडामोडूनियां ॥ एक तूं अनेक झाला असतां परता राहुनियां ॥ भोगविसी कृतकर्मे वर्मे जीव मानवुनियां ॥ शे० ॥ २ ॥ ऐसी तूं महामाया वेषाजन हें मोहुनियां ॥ सुखदुःखादिकहर्षविषादाखेदा लावुनियां ॥ होसी पाहसी कौतुक दाविसी पुंस्त्री भावुनियां ॥ काय हि लीला परतंत्रा जन कष्ट घालुनियां ॥ शे० ॥ ३ ॥ पुरे आतां तव आवरोनि माया ज्ञाना देवुनियां ॥ पुरवीं मनोरथ देवा आपुल्या बिरुदा राखुनियां ॥ सेव्यसेवकभाव रीतीनें वांच्छित देवुनीयां ॥ चालवीं दास अविघ्नें नातरी देवा देई लया ॥ शे० ॥ ४ ॥ अनंतब्रह्मांडें तव शय्येठायीं बिजरूपीं ॥ होतीं लीन न उरतां कांहीं सर्वेहि तव रूपीं ॥ रूपा रूप मिळोनि अरूपीं निजसी स्वरूपीं ॥ मंगीशात्मज विनवी विठ्ठल काळीं साक्षेपी ॥ शे० ॥ ५ ॥

१५५. चाल—वरदे रुचिराधरबिंबे

दुर्गे अघसंकट दुर्गे ॥ हरि गे कुळस्वामिणि दुर्गे ॥ काघं हो मज पावसि मानसरंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ धृ० ॥ उदधीलहरीसि तरंगे ॥ दिससी जगभासतरंगे ॥ स्वरुपी तूंचि अहंकृतसंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ दु० ॥ १ ॥ रचिसी ब्रह्मांड निःसंगे ॥ करुणा न करिसी तूं अंगे ॥ त्रिगुणीं गुणसाम्यलिलारस अंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ दु० ॥ २ ॥ करिसी उत्पत्तिस्थितिभंगे ॥ दुर्गे लय हा सत्य विसंगे ॥ तुझिया आनंदपदाब्जसुरंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे० ॥ दु० ॥ ३ ॥ ब्रह्मीं ब्रह्मार्पण पिंगे ॥ फुगडी घालिसि सत्संगे ॥ वंदी हनुमंत पदाब्जसुरंगे ॥ जय जय भवभंगे दुर्गे ॥ दु० ॥ ४ ॥

१५६. चाल—साधी.

जय देवी जय देवी जय आदीशक्ती ॥ ओंवाळूं आरती तुज हो भगवती ॥ धृ० ॥ मूळमायारूप तुझें न कळे कवणासी ॥ ब्रह्मादिक सुरवर ध्याती मानसीं ॥ व्यापुनियां जग सर्व खेळा खेळसी ॥ वधुनी शुंभनिशुंभां देवां वर देसी ॥ जय० ॥ १ ॥ दृष्टीं व्यंकट पाहातां कांपे त्रिभुवन ॥ मुख पसरुनियां ग्रासिसी दैत्यांलागून ॥ दशभूजाआयुधें लखलखती जाण ॥ मर्दियेला महिषासुर चरणीं घालून ॥ जय० ॥ २ ॥ पवाडे वर्णितां खुंटलि मम वाणी ॥ विश्व त्वां मोहियलें लावीलें ध्यानीं ॥ माया तूं माउली जगताची जननी ॥ विनवुनियां गोविंद ध्यात असे मनीं ॥ जय० ॥ ३ ॥

१५७. चाल—आवडी गंगाजळ०

जय जय दीनदयाळे शांते देईं मज भेटी ॥ तव चरणाची स्वामिणि मजला आवडी मोठी ॥ धृ० ॥ कवणअपराधास्तव जननी केला तूं रुसवा ॥ मी तो ध्यातों हृदयीं तुजला अहर्निशीं भावा ॥ ज० ॥ १ ॥ चिंताकूपीं पडलों कोण काढिल बाहेरी ॥ धांवें पावें झडकरि अंबे करुणा तूं करीं ॥ ज० ॥ २ ॥ माता पिता गुरु दैवत

सर्वहि तूंची ॥ तुझ्यावांचुनि देवी मजला कोणी न लगेची ॥ ज० ॥ ३ ॥ काय असें पाहुनि अंगीकार त्वां केला ॥ आतां करणें त्याग तरि हें अघटित ओढाला ॥ जय ॥ ४ ॥ वेद शास्त्रें आणि पुराणें गर्जति अपार ॥ नाम घेतां हरती किल्मिष पुरवीं अंतर ॥ जय ॥ ५ ॥ दास शरण हा अनन्यभावें करितो विनंती ॥ तुजवांचोनी मजला न गमे निश्चय दे सुमती ॥ जय० ॥ ६ ॥

१५८. चाल—साधी.

जय देवी जय देवी जय महालक्ष्मी ॥ वससी करवीरीं तूं विश्वाच्या पक्ष्मीं ॥ धृ० ॥ श्रीपति तुझिया योगें श्रीहरिला नाम ॥ ब्रह्मादिकही ध्याती पुरविसि तत्काम ॥ निष्कामें जे भजती पावति निजधाम ॥ योगी ध्यानें पावति पद आत्माराम ॥ जय० ॥ १ ॥ जपतपसिद्धी तुजविण कांहीं साधेना ॥ प्रसन्न होतां भक्तां भवभय बाधेना ॥ तुजवांचुनियां अंबे शांती लाधेना ॥ वेदांतींचें सार हि शिष्यां बोधेना ॥ जय० ॥ २ ॥ गर्जति निगमागम परि वाणीला गौण्य ॥ जें जें वर्णिति तें तें माथे तव रूप ॥ कोण करी मग तूझ्या सगुणत्वा माप ॥ स्तविलों सहस्रवदनी श्रमला कीं साप ॥ जय० ॥ ॥ ३ ॥ दंभें दर्पें मानें क्रोधें जे रहित ॥ भजती तव चरणा त्यां साधे आत्महित ॥ उद्धरती ते प्राणी परिवारांसहित ॥ देवी त्याला करिसी श्रीपतिसन्निहित ॥ जय० ॥ ४ ॥ बाधा भवभीतीची तव दासां नाहीं ॥ माये न करिसि मोहा चंचळ तें कांहीं ॥ हृदयीं अखंड माझ्या तूं सदये राहीं ॥ गोविंदात्मजाविप्रा स्वपदासीं पाहीं ॥ ज०॥४॥

१५९. चाल—साधी.

जय अंबे जगदंबे जय जय महाकाली ॥ आरती ओंवाळूं पंचारति ओंवाळूं वंदूं पदभाळीं ॥ धृ० ॥ जगतारिणी दुःखहारिणी कुळस्वामिणि माते ॥ नाना विघ्नें वेष्टुनि कष्टविती मातें ॥ करुणा करिं शांकरि तूं अनाथजननाथे ॥ भवभय सर्वहि हरिसी हें तो तव नातें ॥ जय० ॥ १ ॥ बौद्धरूप दैवत या कलिमाजी आलें ॥

न मिळे फळ मनवांच्छित शंकित मन झालें ॥ तूं एक जागृत ऐकुनि मन माझें घालें ॥ जडलें दृढ मम मानस निश्चळ नाहालें ॥ जय० ॥ २ ॥ तव गुणप्रताप अद्भुत ऐकुनियां कानीं ॥ ध्यानीं मनिं दिनरजनीं स्तवितों निर्वाणीं ॥ लज्जा राखीं माते हे शुभकल्याणी ॥ कृपाकटाक्षें लक्ष्मीं रक्षीं तव चरणीं ॥ जय० ॥ ३ ॥ निर्जर मुनिवर सर्वहि तुजलागीं ध्याती ॥ केली त्याकैवारें दैत्यांवर ख्याती ॥ मर्दन शुंभनिशुंभां महिषासुरजाती ॥ सप्तशतीचा महिमा मृकंडुसुत गाती ॥ जय० ॥ ४ ॥ जिवजंतूमनांकिंतू जाणसि सर्वांचा ॥ अंतरसाक्ष तूं हेतु कां न कळे अमुचा ॥ संचितक्रियमाणा जरि मानूं मुळसंचा ॥ तरि मग काय पराक्रम वदला मुनि त्याचा ॥ जय० ॥ ५ ॥ विज्ञती श्रुत व्हावी सादर सुखशाली ॥ बद्धांजुळि विनवीतों विनतीच्या चालीं ॥ सुंदरपदपंकरजीं रखमा मिठि घाली ॥ षट्पदवत गुंजारव करितो भौंताली ॥ ६ ॥

१६०. चाल—साधी.

ओंवाळूं ओंवाळूं आरती कालिका अंबा । कालिका अंबा ॥ मागें पुढें पाहूं जातां अवघी जगदंबा ॥ ध्रु० ॥ आदि–मध्य अवसानीं व्यापक होसी । अंबे व्यापक होसी ॥ अणु रेणु जीव तूझा तया न त्यागिसी ॥ ओंवाळूं० ॥ १ ॥ भास हो आभास जीचा सौरस सारा । अंबे सौरस सारा । सारासार निवडूं जातां न दिसें थारा ॥ ओंवाळूं० ॥ २ ॥ कळातीत कळानिधीपर्वतीं ठाण । अंबे पर्वतीं ठाण ॥ भक्त शिवाजीसी दिधलें पूर्ण वरदान ॥ ओंवाळूं० ॥ ३ ॥ चिच्छक्ते चिन्मात्रे चित्तचैतन्य बाळे । अंबा चैतन्य बाळे ॥ विठ्ठल-सुतात्मजासी दावीं पूर्ण सोहाळे ॥ ओंवाळूं ॥ ४ ॥ जगदंब ! जगदंब ! उदयोऽस्तु !

# आरत्या विठ्ठलाच्या



१६१. चाल—साधी.

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ रखुमाईवल्लभा, राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ धृ० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेउनि कटीं कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥ देव सुरवर नित्य येती भेटी ॥ गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ॥ जय० ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अणुक्षेत्र पाळा ॥ सुवर्णाचीं कमळें वनमाळा गळां ॥ राई रखुमाबाई राणीया सकळा ॥ ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ जय० ॥ ३ ॥ धन्य पुष्पावतीभीमासंगम ॥ धन्य वेणू-नाद उभें परब्रह्म ॥ धन्य पुंडलीक भक्त निर्वाण ॥ यात्रेसी येती साधु सज्जन ॥ जय० ॥ ४ ॥ ओंवाळूं आरत्या कुरवंड्या येती ॥ चंद्रभागेमाजी सोडुनियां देती ॥ दिंड्या पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय० ॥ ५ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती ॥ चंद्रभागेमध्यें स्नानें जे करिती ॥ दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासी नामदेव भावें ओंवाळी ती ॥ जय० ॥ ६ ॥

१६२. चाल—चला बाई पांडुरंग०

येंई हो विठ्ठले माझे माउली ये ॥ निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ॥ धृ० ॥ आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ॥ पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥ येंई० ॥ १ ॥ पिंवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ॥ गरुडावरि बैसून माझा कैवारी आला ॥ येंई० ॥ २ ॥ विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिपवाळी ॥ विष्णुदास नामा जीवें भावें ओंवाळी ॥ येंई हो० ॥ ३ ॥

१६३. चाल—आरती ज्ञानराजा०

आरती अनंतभूजा ॥ विठो पंढरीराजा ॥ न चलती उपचार ॥ मनें सारिली पूजा ॥ धृ० ॥ परेस पार नाहीं ॥ न पडे निगमा ठायीं ॥ भुलला भक्तीभावें ॥ लाहो घेतला देहीं ॥ १ ॥ अनिर्वाच्य शुद्धबुद्ध ॥ उभा राहिला नीट ॥ रामा जनार्दनीं ॥ पायीं जोडली वीट ॥ २ ॥

१६४. चाल—साधी.

जय जय कटिकर विठ्ठल चिन्मयसुखराशी ॥ सर्वंहि व्यापक ब्रह्म तूं पंढरपुरवासी ॥ पुंडलीकवरप्रद अपणां म्हणवीसी ॥ निज-भक्तांस्तव नाना नटवेष धरिसी ॥ १ ॥ जय देव जय देव जय विठ्ठलराया ॥ करुणामृतसुखसागर वंदित तव पायां ॥ धृ० ॥ भीमातटानिजनिकटीं राहुनियां देवा ॥ विठ्ठल विठ्ठलस्मरणें तारीसी जीवा ॥ अखंड भजनानंदीं दृढ धरुनी भावा ॥ वैष्णव नाचति रंगणिं करिती तव सेवा ॥ २ ॥ रत्नखचित मुकुटादी तुळसीच्या माळा ॥ अम्लाना कुसुमांच्या घालुनियां गळां ॥ कस्तुर्यादी तिलकें शोभविसी भाळा ॥ मौनी वंदित चरणां अभेद गोपाळा ॥ ३ ॥

१६५. चाल—आरती ज्ञानराजा०

विठ्ठला मायबापा ॥ वारीं त्रिविधतापा ॥ संसारीं त्रासलों मी ॥ वय लागलें मापा धृ० ॥ बाळपणीं नाठविलें ॥ व्यर्थ तारुण्य गेलें ॥ जरा हें दुःख मोठें ॥ पुढें ठाकुनि आलें ॥ विठ्ठला० ॥ १ ॥ भक्तीचा

लेश कांहीं ॥ सत्समागम नाहीं ॥ परिणामीं काय आतां ॥ शरण आलों तुझे पायीं ॥ विठ्ठला० ॥ २ ॥ हरीं हरी माझी भ्रांती ॥ म्हणुनी आलों काकूळती ॥ कृपाळुया जगन्नाथा ॥ तारीं गंगाधरसूता ॥ ३ ॥

१६६. चाल–संत सनकादिक०

ऐसीया पायांलागीं मंगलआरती करूं ॥ कायावाचामनें जीवीं दृढ धरूं ॥ धृ० ॥ जपतपतीर्थें जयापायीं मिरविती ॥ संतमुनिवृंद तया सुखलागिं ध्याती ॥ १ ॥ शुभाशुभ उभे नमिती कर जोडोनी ॥ नारद तुंबरादि अखंड जयाचे ध्यानीं ॥ २ ॥ एका एकींच जडला जनार्दन पायीं ॥ आरती करितां देहभाव हा नाहीं ॥ ३ ॥

१६७. चाल–साधी.

जगदीश जगदीश देवा तुज म्हणती ॥ परि या जनामाजी देशील मुक्ती ॥ पुण्यपापाविरहित सकळां अधिपती ॥ जळीं नालिनी जैशी अलिप्त तव गती ॥ १ ॥ जय देव जय देव जय पंढरिनाथा ॥ नुरे पाप विठ्ठल म्हणतां सर्वथा ॥ धृ० ॥ आगम निगम तूज नेणती कोणी ॥ परि तूं भावभक्ती जवळीच दोन्ही ॥ नेणतां विधियुक्त हा तें पूजूनी ॥ न माये ब्रह्मांडीं तो संपुष्टशयनीं ॥ २ ॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें ॥ पसरी मूख एक चावी तो धूडें ॥ भक्तां शरणागतां चालतो पूढें ॥ दावी वाट जाऊं नेदी वांकुडें ॥ ३ ॥ एकाएकीं बहू विस्तरला सूखें ॥ खेळे त्याची लीला तोची कवतूकें ॥ तेथें नरनारी हीं कवण बाळकें ॥ काय पापपुण्य कवण सुखदुःखें ॥ ॥ ४ ॥ सकळां वर्मा तूंची जाणसी एक ॥ बंधमोक्ष प्राप्त आणिक सुखदुःख ॥ जाणों म्हणतां तूज थकलीं बहुतेक ॥ तुका म्हणे शरण आलों मज राख ॥ ५ ॥

१६८. चाल–संत सनकादिक भक्त०

भक्तीचे पोटीं बोध कांकडा ज्योती, कांकडा ज्योती ॥ पंचप्राणें जिवें भावें ओंवाळूं आरती ॥१॥ ओंवाळूं आरती सद्गुरूनाथा, माझ्या पंढरीनाथा ॥ दोनी कर जोडुनी चरणीं ठेविला माथा ॥ धृ० ॥ काय

महिमा वर्णू आतां सांगणें किती, अतां सांगणें किती ॥ कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥ २ ॥ राई रखुमाई दोघी उभ्या दोबाहीं, उभ्या दोबाहीं ॥ मयूरपिच्छचामरें ढ़ळकति ठायींचे ठायीं ॥ ३ ॥ इटेसहित पाउलें मनभावें ओंवाळीं, मनभावें ओंवाळीं ॥ कोटी रविशशि दिव्य उगवले ठायींचे ठायीं ॥ ४ ॥ तुका म्हणे दीप घेउनी उन्मनींत शोभा ॥ उन्मनींत शोभा ॥ इटेवरी उभा दीसे लावण्यगाभा ॥ ५ ॥

१६९. चाल—संत सनकादिक भक्त०

ओंवाळूं आरती माझ्या पंढरीराया, माझ्या पंढरीराया ॥ सर्वभावें शरण आलों तूझिया पायां ॥ ध्रु० ॥ सर्व व्यापुनि कैसें रूप राहिलें अकळ, रूप राहिलें अकळ ॥ तो हा गवळ्याघरीं झाला कृष्ण गोपाळ ॥ १ ॥ स्वरूप गुणातीत अवतार धरी, अवतार धरी ॥ तो हा पांडुरंग उभा विटेवरी ॥ २ ॥ भक्तांच्या काजा कैसा रूपासी आला, कैसा रूपासी आला ॥ ब्रीदाचा तोडरू चरणीं मिरवीला ॥ ३ ॥ आरतें आरती कैसीं ओंवाळीली, कैसी ओंवाळीली ॥ वाखाणितां कीर्ति वाचा परतली ॥ ४ ॥ भावभक्तीबळें होसी कृपाळू देवा, होसी कृपाळू देवा ॥ तुका म्हणे तुझ्या न कळती मावा ॥५॥

१७०. चाल—संत सनकादिक भक्त०

धन्य दिवस आजी दर्शन संतांचें, दर्शन संतांचें ॥ नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ॥ ध्रु० ॥ धन्य पुण्यरूप कैसा झाला संसारू, कैसा झाला संसारू ॥ देव आणि भक्त दूजा नाहीं विचारू ॥ १ ॥ धन्य पूर्वपुण्य ओढवलें निरुतें, पुण्य ओढवलें निरुतें ॥ संतांचें दर्शन झालें भाग्यें बहुतें ॥ २ ॥ तुका म्हणे धन्य आम्हां जोडिला जोडी, आम्हां जोडिला जोडी ॥ संतांचे चरण आतां जीवें न सोडीं ॥३॥

१७१. चाल—संत सनकादिक भक्त०

गावों नाचों विठो करूं तुझा अनुवाद, तुझा अनुवाद ॥ जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥ ध्रु० ॥ आनंद रे विठोबा झाला माझे

अनुक्रम २०६८२ वि. ...



२३३१० नों: दि: ७७

मनीं, झाला माझें मनीं ॥ देखिलीं विटेसहित पाउलें लोचनीं ॥१॥ न करिं तपसाधनें मुक्तीचे सायास, मुक्तीचे सायास ॥ हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें कायी, उणें तें कायी ॥ पंढरीचा राणा आम्हीं सांठविला हृदयीं ॥३॥

१७२. चाल—संत सनकादिक भक्त०

ओंवाळूं गे माये विठ्ठल सबाह्य साजिरा, सबाह्य साजिरा ॥ राईरखुमाई सत्यभामेच्या वरा ॥ धृ० ॥ कनकाचे पर्येळीं उजळोनी आरती, उजळोनी आरती ॥ रत्नदीपशोभा कैशा प्रकाशल्या ज्योती ॥ १ ॥ मंडितचतुर्भुज कानीं शोभति कुंडलें, कानीं शोभति कुंडलें ॥ श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥ २ ॥ वैजयंतीमाळ गळां शोभे स्यमंत, गळां शोभे स्यमंत ॥ शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥ ३ ॥ सांवळा सुंदर जैसा कर्दळिचा गाभा, जैसा कर्दळिचा गाभा ॥ चरणींचीं नूपुरें वांक्या गर्जती नाभा ॥ ४ ॥ ओंवाळीतां मन माझें ठाकलें ठायीं, माझें ठाकलें ठायीं ॥ समाधिस्थ समान तुकया लागला पायीं ॥ ओंवा० ॥ ५ ॥

१७३. चाल—साधी.

पंचदशीचे सारीं पंडितही श्रमले ॥ घटमठ खटपट करितां गुरुशिष्य श्रमले ॥ तव पादिं सुगर्मीं नमले स्वमुखीं ते रमले ॥ पंढरिनाथा नयनीं लक्षुनि विश्रमले ॥ १ ॥ जय देवा जय देवा पंढरिच्या राया ॥ वैकुंठा प्रति वससी जगदुद्धाराया ॥ धृ० ॥ ढकलति चिरडति पडती वरडति भेटाया ॥ क्षीरापति उडविति किति वणवति वेंचाया ॥ बडवे बडविति देवा झाला खेटा या ॥ पुनरपि जाणें खुंटे कालाच्या ठाया ॥ २ ॥ रिपुही चरणीं लोळति सांडुनियां गर्व ॥ वर्णावर्ण हि नेणति भेटति सम सर्व ॥ नाचति अप्सरसांगण गाती गंधर्व ॥ बहु जन्मींच्या पुण्यें साधे हें सर्व ॥ ३ ॥ नाचावें संतांसह गावें खेळावें ॥ आनंदें डोलावें प्रेमें लोळावें ॥ न्हावें भीमाजळिं मन भजनीं घोळावें ॥ पुंडलिका भेटावें तत्र वपु टेळावें ॥ ४ ॥ थकलों येरझारीं बहुविध

संसारीं ॥ तुज विस्मरलों दुःखें अनुभाविलीं सारीं ॥ ध्यानीं यावें विठ्ठल पीतांबरधारी ॥ नारायणदासा न्या भवनिधिपरपारीं ॥ ५ ॥

१७४. चाल—अवतार गोकुळीं हो०

सुंदर अंगकांती ॥ मूख भाळ सुरेख ॥ बाणली ऊटि अंगीं ॥ टिळा साजिरा रेख ॥ मस्तकीं मुगुट कानीं ॥ कुंडलतेज फांके ॥ आरक्त दंत हीरे ॥ तैसे शोभले नीके ॥ १ ॥ जय देवा चतुर्भुजा ॥ जय लावण्यतेजा ॥ आरती ओंवाळीन ॥ भवतारीं हो वोजा ॥ ध्रु० ॥ उदार झुंजार हा ॥ जया वनिती श्रुती ॥ परतल्या नेति म्हणती ॥ तयां न कळे गती ॥ भाट हे चतुर्मूख ॥ अनुवाद करीती ॥ पांगलीं साही अठरा ॥ रूप न कळे गती ॥ २ ॥ ऐकोनी रूप ऐसें ॥ तुजलागीं धुंडीती ॥ बोडके नग्न एक ॥ निराहारचि गाती ॥ साधनें योग नाना ॥ तपें दारुण कीती ॥ सांडिलें सूख दिल्हें ॥ संसाराची हो शांती ॥ ३ ॥ भरोनी माजी लोका ॥ तिहिं नांदसी एक ॥ कामिनीमनमोहना ॥ रूप नाम अनेक ॥ नासती नाममात्रें ॥ भवपातक शोक ॥ पाऊलें वंदिताती ॥ सिद्ध आणि साधक ॥ ४ ॥ उपमा द्यावयासी ॥ दुजें काय हें तुज ॥ सत्वासी तत्वसार ॥ तूं मूळ झालासी बीज ॥ खेळसी बाळलीला ॥ अवतार सहज ॥ विनावितो दास तूका ॥ कर जोडोनी तुज ॥ ५ ॥

१७५. चाल—अवतार गोकुळीं हो०

पंढरी पुण्यभूमी ॥ दक्षिण दिग्वाहीनी ॥ तीर्थ ते चंद्रभागा ॥ महापातकधूणी ॥ उतरलें वैकुंठ ॥ महासुख मेदीनी ॥ १ ॥ जय देवा पांडुरंगा ॥ जय अनाथनाथा ॥ आरती ओंवाळीन ॥ तुम्हां लक्ष्मीच्या कांता ॥ ध्रु० ॥ नित्य नवा सोहळा हो ॥ महावाद्यांचा गजर ॥ सन्मुख गरुडपारीं ॥ उभा जोडोनी कर ॥ मंडित चतुर्भूज ॥ कटिं मिरवती कर ॥२॥ हरिनाम कीर्तनें हो ॥ आनंद महाद्वारीं ॥ नाचती प्रेमसूखें ॥ नर तेथिंच्या नारि ॥ जीवन्मुक्त लोक ॥ नित्य पाहती हरी ॥ ३ ॥ आषाढी कार्तिकीं हो ॥ गरुड टक्याचे भार ॥ गर्जती

नामघोषें ॥ महावैष्णववीर ॥ पापासी रीग नाहीं ॥ असुर कांपती शूर ॥४॥ हें सुख पुंडलीकें ॥ कैसें आणिलें बापें ॥ निर्गुण साकारलें ॥ आम्हालागीं हें सोपें ॥ म्हणोनी चरण धरूनी ॥ तुका राहिला सूखें ॥ जय० ॥ ५ ॥

१७६. चाल—अवतार गोकुळीं हो०

सुकुमार मुखकमल ॥ निजसार निर्मळ ॥ सांवळी सुनील तनू ॥ भ्रमरांग कुरळ ॥ झळकती दिव्यतेजें ॥ दंत माजी पातळ ॥ मिरवलीं मयूरपत्रें ॥ मुकुट कुंडलें माळ ॥ १ ॥ जय देवा जगदीश्वरा ॥ धन्य रखुमाईवरा ॥ आरती करीन काया ॥ ओंवाळीन सुंदरा ॥धृ०॥ गोजिरें ठाणमाण ॥ भुजा मंडीत चारी ॥ शोभती शंख चक्र ॥ गदा पद्ममोहरी ॥ हृदयीं ब्रह्मपद ॥ बाणलेंसे शृंगारीं ॥ गर्जती चरणीं वांकी ॥ कंठ कोकिळस्वरीं ॥ २ ॥ धवधवीत उटी अंगीं ॥ पावन चंदनाची ॥ ललाटीं कस्तुरीची ॥ कास पीतांबराची ॥ कटिसूत्र वरि साजीरें ॥ प्रभा वर मोतीयांची ॥ संगीत सकळ मुद्रा ॥ पाऊलें कुंकुमाचीं ॥३॥ सौभाग्यसुखसागर ॥ गुणलावण्यखाणी ॥ लाघवी दीनवत्सल ॥ विश्व लाविलें ध्यानीं ॥ आश्चर्य देव करिती ॥ ऋषि राहिले ध्यानीं ॥ धन्य ते प्रसवली ॥ ऐसिया नंदपत्नी ॥४॥ वर्णितां ध्यानमहिमा ॥ श्रुति राहिल्या नेती ॥ रविकोटी चंद्र तारा ॥ प्रकाशा न तुळती ॥ उदार सुरंग ॥ गंभीर आनंदमूर्ती ॥ तुकयाबंधु म्हणे ॥ स्तवूं मी काय कीर्ती ॥ ५ ॥

१७७. चाल—साधी.

काय तूझा महिमा वर्णूं मी कीती ॥ नाममात्रें भवपाश पैं तुटती ॥ पाहतां पाऊलें हीं श्रीविष्णूमूर्ती ॥ कोटीकूळांसहित जग ते उद्धरती ॥ १ ॥ जय देव जय देव जय पंढरिराया ॥ करुनीयां कुर्वंडी सांडीन काया ॥ धृ० ॥ मंगल आरतीचा थोर हा महिमा ॥ आणिक द्याया नाहीं तीस ती उपमा ॥ श्रीमुखासहित देखे जो कर्मा- ॥ पासूनि सुटे जैसा रवि नाशी तमा ॥ २ ॥ धन्य व्रतकाळ हे एकादशी ॥ जाग-

रण उपवास घडे जयासी ॥ विष्णूचें पूजन एकभावेंसीं ॥ नित्य मुक्त पूज्य तीन्ही लोकांसी ॥ ३ ॥ न वचे वायां काळ जे तूज ध्याती ॥ अखंड तूझा वास तयांच्या चित्तीं ॥ घाले मुखें सदा प्रेमें डुलती ॥ तीर्थे मिळणी वास तयांचा पाहती ॥ ४ ॥ देव भक्त तूंची झालासी दोन्ही ॥ वाढावया सूख भक्ति हे जनीं ॥ जडजीवां उद्धार व्हाया लागोनी ॥ शरण तुका वंदी पाऊलें दोन्ही ॥ ५ ॥

१७८. चाल–साधी.

निर्जरवर स्मरहरधर भीमातिरवासी ॥ पीतांबर जघनींधर दुस्तर भव नाशी ॥ शरणागतवत्सल पाळक भक्तांसी ॥ चाळक गोपीजन-मनमोहन सुखराशी ॥ १ ॥ जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ निरसीं मम संगा निःसंगा भवभंगा ॥ध्रु०॥ अणिमा गरिमा लघिमा नेणति तव महिमा ॥ नीलोत्पल दलविमल घननीळ तनु श्यामा ॥ कंटकभंजन सज्जनमानसविश्रामा ॥ राघवदासीं विगलित कामा निष्कामा ॥२॥

१७९. चाल–सगुण हे आरती०

संत सनकादीक भक्त मिळाले अनेक ॥ स्वानंदे गर्जती पाहूं आले कौतुक ॥ १ ॥ नवल होताहे आरती देवाधिदेवा ॥ स्वर्गींहूनि सुरवर पाहूं येताति भावा ॥ ध्रु० ॥ नरनारी तटस्थ अवघे पडले नयना ॥ ओंवाळितां श्रीमुख धनी न पुरे मना ॥ २ ॥ एका जनार्दनीं मंगल कौतुकें गाती ॥ मंगल आरत्या गाती ॥ मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ॥ ३ ॥

१८०. चाल–अवतार गोकुळीं हो०

फळलें भाग्य माझें ॥ धन्य झालों संसारीं ॥ सद्गुरु भेटला हो ॥ तेणें धरियेलें करीं ॥ पश्चिमे चालवीलें ॥ आत्मस्तुती निर्धारीं ॥ त्रिकूटावरी नांदे देखीयेली पंढरी ॥ १ ॥ तें सुख काय सांगूं ॥ वाचे बोलतां न ये ॥ आरतीचेनि गूणें ॥ गेलें मीपण माये ॥ घृ० ॥ राउळामाजी जातां ॥ राहे देहअवस्था ॥ मन हें उन्मन झालें ॥ नसे

बद्धतेची वार्ता ॥ हेतु हा मावळला ॥ शब्दा आली निःशब्दता ॥ तटस्थ होउनि ठेलों नीजरूप पाहतां ॥ २ ॥ त्रिगुण गुणबाई ॥ पूर्ण जळल्या वाती ॥ नवलाव अविनाश ॥ न समाये स्वयंज्योती ॥ पाहतां लक्ष तेथें ॥ हालूं विसरलीं पातीं ॥ नातुडे माझें मन ॥ नाहीं दिवसराती ॥ ३ ॥ आरती विठ्ठलाची ॥ उजळली अंतरीं ॥ प्रकाश थोर झाला ॥ सांठवेना अंबरीं ॥ रविशशी मावळले ॥ तया तेजामाझारीं ॥ वाजती दिव्य वाद्यें ॥ अनुहातें गजरीं ॥ ४ ॥ आनंद सागरांत ॥ प्रेमें दीधली बूडी ॥ लाधलों सौख्य मोठें ॥ नये बोलतां बोलीं ॥ सद्‌गुरूचेनि संगें ॥ ऐसी आरती केली ॥ निवृत्तीनें आनंदाची ॥ तेथें वृत्ती नीमाली ॥ ५ ॥

१८१. चाल–साधी

जयं पांडुरंगदेवानंदद्रुमकंद ॥ प्रजय स्वीकुरु दीपं मुनिवरवरवरद ॥ धृ० ॥ श्रीपौंडरीकनगरं भीमातटरम्यं ॥ विलसति साधुजननानां ॥ मातृगृहरम्यं ॥ यत्राव्यक्तमनादि ब्रह्म विभाति परं ॥ समभिष्टकाधिरूढं कटिनिहिताद्विकरं ॥ जय० ॥ १ ॥ गोदा यमुना च सरस्वतिका या तुंगा ॥ नर्मसुदात्री कृष्णा गोमतिका गंगा ॥ ताः सकला मध्यान्हे चंद्रपुरोभागा, मेत्य श्रीविठ्ठलमाधियजंति सुविभागाः ॥ जय० ॥ २ ॥ श्रीवेणुनादनामा धन्योयं देशः ॥ श्रीगोविंदः क्रीडति यत्र हिसुपदेशः ॥ प्रत्यकू पद्मसुतीर्थे क्षेत्रपतिः पुरतः ॥ प्रेम्णा ध्रुवनारदऋष्यादिर्गानरतः ॥ जय० ॥ ३ ॥ श्रीपांडुरंगवसतिः क्षणमपि संजाता ॥ चिरमितरक्षेत्रादौ वासादुपरि मता ॥ श्रुतयो वै वामांगे रुक्मिण्या सेव्यं ॥ स्तुवंति देवा जयजयशब्दैरपि भव्यं ॥ ॥ जय० ॥ ४ ॥ देवानामधिदेवं पांडुरपुरराजं ॥ भक्तसमाजकुटुंबं विठ्ठलपदभाजं ॥ श्रीरुक्मवतीराजं श्रितजनकल्पतरुं ॥ याचे भक्ति मुक्ति काशीनाथगुरुं ॥ जय पांडुरंगदेवानंद० ॥ ५ ॥

...६

१८२. चाल—भजनाची.

ओंवाळुं ग माये विठ्ठल सबाह्य साजिरा ॥ राईरखुमाबाई सत्यभामेच्या वरा ॥ धृ० ॥ कनकाचे पर्येळीं उजळोनी आरती ॥ रत्नदीपशोभा कैशा प्रकाशल्या ज्योती ॥ ओंवा० ॥१॥ मंडितचतुर्भुज कानीं शोभति कुंडलें ॥ श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥ ओंवा ॥ २ ॥ वैजयंतीमाळ गळा शोभेस्यमंत ॥ शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥ ओंवा० ॥ ३ ॥ सांवळा सुंदर जैसा कर्दळीचा गाभा ॥ चरणींचीं नेपुरें वांक्या गर्जती नभा ॥ ओंवा० ॥ ४ ॥ ओंवाळीता मन माझें ठाकलें ठायीं ॥ समाधिस्थसमान तुकया लागला पायीं ॥ ५ ॥

## आरत्या दशावतारांच्या

१८३. चाल—जयजय त्र्यंबकराज०

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ॥ भक्तसंकटीं नाना स्वरूपीं स्थापिसि स्वधर्म ॥धृ०॥ अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी॥ वेद नेले चोरूनि ब्रह्मया आणुनियां देसी ॥ मत्स्यरूपि नारायण सप्तहि सागर धुंडीसी ॥ हस्त लागतां शंखासुरा तुझा वर देसी ॥ १ ॥ रसातळासी जातां पृथ्वी पाठीवर घेसी ॥ परोपकारासाठीं देवा कासव झालासी ॥ दाढें धरूनी पृथ्वी नेतां वराहरूप होसी ॥ प्रल्हादाकारणें स्तंभीं नरहरि गुरगुरसी ॥ २ ॥ पांचवे अवतारीं बळिच्या द्वाराला जासी ॥ भिक्षे स्थळ मागुनी बळीला पाताळा नेसी ॥ सर्व समर्पण केलें म्हणउनि प्रसन्न त्या होसी ॥ वामनरूप धरूनी बळीच्या द्वारीं तिष्ठसी ॥३॥ सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ॥ कष्टी ते रेणुका म्हणुनी सहस्रार्जुन वधिला ॥ निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ॥ सहावा अवतार परशुराम

प्रगटला ॥ ४ ॥ मातला रावण सर्वां उपद्रव केला ॥ तेहतिस कोटी देव बंदी हरिलें सीतेला ॥ पितृवचनालागीं रामें वनवास केला ॥ मिळोनी वानर सहित राजाराम प्रगटला ॥ ५ ॥ देवकीवसुदेव-बंदीमोचन त्वां केलें ॥ नंदाघरिं जाउनी निजसुख गोकुळा दिधलें ॥ गोरसचोरी करितां नवलक्ष गोपाळ मिळविले ॥ गोपिकांचें प्रेम देखुनि श्रीकृष्ण भुलले ॥ ६ ॥ बौद्ध कलंकी कलियुगिं झाला अधर्म हा अवघा ॥ सांडुनि नित्यधर्म सोडुनि नंदाची सेवा ॥ म्लेंच्छमर्दन करिसी म्हणुनि कलंकि केशवा ॥ बहिरवि जान्हवि द्यावि निजसुखानंदसेवा ॥ ७ ॥

१८४. चाल—जय जय त्र्यंबकराज०

जय जय पयोब्धिवासा सदया धरुनी दश अवतार ॥ सज्जन पाळुनि दुर्जन वधुनी उतरीसी भूभार ॥ ध्रु० ॥ मत्स्य अवतार घेउनि पहिला करिसी वेदोद्धार ॥ शंखासुर मारूनियां ब्रह्मा तोषविला उद्धार ॥ कूर्मावतारीं मंदर धरुनी निजपृष्ठीवरि भार ॥ जलधी मथुनी चवदा रत्नें काढुनि देसी सार ॥ १ ॥ वराहरूपें पृथ्वी धरूनी दाढेवरि हा काळ ॥ रसातळ शोधुनियां वधिला हिरण्याक्ष विकाळ ॥ होउनियां नरसिंह फाडिला हेमकशिपुअंत्राळ ॥ भक्तशिरोमणि प्रल्हादातें पदवी दिधलि विशाळ ॥२॥ बटुवामनरूपें त्वां छळिला इंद्रास्तव बळिराज ॥ द्वारपाल होउनि त्याचा राहसी भक्तजनकाज ॥ परशुराम तूं देवा सहाशा मारूनि क्षत्रिसमाज ॥ निःक्षत्री महि करुनी दिधली विप्रांतें महाराज ॥ ३ ॥ रामावतारीं एकवाण एकपत्निव्रत रणधीर ॥ मारूनि दुष्ट राक्षस रावण धन्य होसि रघुवीर ॥ कृष्णावतारीं विविधक्रीडा कौतुक करुनि रुचीर ॥ निर्वैरी महि करुनी स्थापिलि सद्धर्मासी रुचीर ॥ ४ ॥ बौद्धरूप त्वां धरिलें देवा भोगविसी कृतकर्म ॥ कल्कीरूपें म्लेंच्छ वधोनी निर्मिसि आश्रमधर्म ॥ यापरि अनेक रूपें भूमी पाळिसि इतुकें कर्म ॥ मंगीशात्मज शांतस्वरूपीं पाहे अद्वयवर्म ॥ ५ ॥

# आरत्या रामचंद्राच्या



१८५. चाल—जयदेवी जगदंबे०

अवतरला रघुपति जे ॥ आनंदली वसुधा ते ॥ गंधर्ववनिता माध्याह्न समयीं ॥ मंगल घोषें नाचति थैथै ॥ ध्रु० ॥ अमृतकल्या-वल्या ॥ चांफेकळ्या त्या फुलल्या ॥ प्रसूत झाली श्रीकौसल्या ॥ सरिता वाहे अमृततुल्या ॥ अवतरला० ॥ १ ॥ वाजंत्रांचे जोड ॥ वाजति द्वारपुढें ॥ अंगणिं कुंकुमकेशरि सडे ॥ गुढिया मखरें चहूं-कडे ॥ अवतरला० ॥ २ ॥ क्षीराब्धीसम वाडे ॥ सुरतरुचीं फुलझाडें ॥ अरुंधती बाळंतिणीकडे ॥ वांटीतसे हो वोळवीडे ॥ अवतरला० ॥ ३ ॥ देवांधर्मासाठीं ॥ किती सोसूं आटाटी ॥ मुक्तीचे मस्तकिं देउनि पाटी ॥ मध्वमुनीश्वर साखर वांटी ॥ अवतरला० ॥ ४ ॥

१८६ चाल—आरती भुवनसुंदराची०

आरती रामचंद्रजीची ॥ सुजानकि राघवेंद्रजीची ॥ घृ० ॥ ध्वजांकुश शंख पद्मचरणा ॥ कांती ती लाजविती अरुणा ॥ नख-मणिभाति मग्नशरणा ॥ फलद उपशमा जन्ममरणा ॥ चाल ॥ तोडर गुल्फ गजरशाली ॥ ग्रथित दशवदन, प्रभृति घृति कदन, विजित सुरसदन, भ्रमरसुर कीर्ति वंदनाची ॥ निरांजनी कीर्ति वंदनाची ॥ आरती० ॥ १ ॥ तडित्प्रभ पीतवसन जघनीं ॥ जडित कटि रत्नसूत्र वसनीं ॥ जनकजा अंकित शिवजघनी ॥ शिरद्रुमि मृगांकवदनी ॥ ॥ चाल ॥ सुरस हे मुक्तहार कंठीं ॥ सरळ करि घनुष, येष घरि मनुष, सत्वरी कलुषहरण उटि तनुसि चंदनाची ॥ उटि तनुसि मलयचंदनाची ॥ आरती० ॥ २ ॥ त्रिवली राजित कुंकुम गळां ॥ नाभिह्रद लाजविती इंगळा ॥ उत्तरी यज्ञोपवित गळां ॥ वक्षस्थलिं भृगपदांग संकलां ॥ चाल ॥ एकावलि दिव्य खड्गकोशी ॥ विष्टिशत त्रिशांग, शिरपर पिशांग, पक्षजी विशांग, घटितमणी कंकणांगदाची ॥ दीप्तिवर कंकणांगदाची ॥ आरती० ॥ ३ ॥ आनन पूर्णेंदु वसन मलिनें ॥ कृपार्द्रांकरणनयन मिलनें ॥ स्मिताघर रदनरवेवलिनें ॥ पाहतां धातृजन्म मलिनें ॥ चाल ॥ मृगमदातिलक उंच भाळीं ॥ घनुषकोटी; रमिरव कोटी, रसरव कोटी, रविद्युतितरळ कुंडलाची ॥ गुंतली स्फूर्ति कुंडलाची ॥ आरती० ॥ ४ ॥ सदासि पुष्पकासना-वरती ॥ शिरद्रुमि छत्र लसद मूर्ती ॥ सुशोभित सहोदरा वरती ॥ भक्तजन पूर्ण करिती आर्ती ॥ चाल ॥ तुंबर गान किन्नरादी ॥ अप्सरा छनन, नयन कृत अनन, तनन स्वर घनन, गर्ज ध्वनि बंदि जल्प-नाची ॥ मधुर ध्वनि बंदि जल्पनाची ॥ आरती० ॥ ५ ॥

१८७. चाल—त्रिभुवनमंडित माळ गळां०

श्यामसुंदर रामाचे चरणकमळीं ॥ ओंवाळूं आरती कनकपरि-येळीं ॥ घृ० ॥ बाळा मुग्धा यौवना प्रौढा सुंदरी ॥ आरत्या घेऊनी आलिया नारी ॥ श्याम० ॥ १ ॥ चौघे म्हणती निज गतीं चला मंदिरा ॥ नव त्याही इच्छिती सेवा सुंदरा ॥ श्याम० ॥ २ ॥ दास म्हणे सुमनशेजे चला श्रीहरी ॥ क्षण एक विश्रांति करा अंतरीं ॥ ३ ॥

१८८. चाल—साधी.

स्वस्वरूपोन्मुखबुद्धि वैदेही नेली ॥ देहात्मकाभिमानें दशग्रीवें हरिली ॥ सद्विवेकमारुतिनें तच्छुद्धि आणिली ॥ तव चरणांबुजिं येउनि वार्ता श्रुत केली ॥ १ ॥ जय देव जय देव निजबोधा रामा ॥ परमार्थें आरती सद्भावें आरती परिपूर्णकामा ॥धृ०॥ उत्कट साधुनि शिळा सेतु बांधोनी ॥ लिंगदेहलंकापुरि विध्वंसोनी ॥ कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी ॥ देह अहंभाव रावण निवटोनी ॥जय० ॥ २ ॥ प्रथम सीताशुद्धी हनुमंत गेला ॥ लंकादहन करुनी अखया मारीला ॥ वधिला जंबूमाळी भुवनीं आहाटीला ॥ आनंदाची गुढी घेउनियां आला ॥ जय० ॥ ३ ॥ निजबळें निजशक्ती सोडविली सीता ॥ म्हणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा ॥ आनंदे ओसंडे वैराग्य भरता ॥ आरति घेउनि आली कौसल्या माता ॥ जय० ॥ ४ ॥ अनुहतवाजित्रध्वनि गर्जति अपार ॥ अठरा पद्में वानर करिती भुभुःकार ॥ अयोध्येसी आले दशरथकुमार ॥ नगरीं होत आहे आनंद थोर ॥ जय० ॥ ५ ॥ सहज सिंहासनीं राजा रघुवीर ॥ सोहंभावें तया पूजा उपचार ॥ सहजांची आरती वाद्यांचा गजर ॥ माधवदासस्वामी आठव ना विसर ॥ जय० ॥ ६ ॥

१८९. चाल—साधी.

सर्वहि वस्तु त्वद्रुप मज भासिति रामा ॥ स्थिरचर सर्वहि विश्वा तूं मंगलधामा ॥ वर्णन करितां तव गुण झाली बहु सीमा ॥ कथितां मौनावलों तुज मेघश्यामा ॥ १ ॥ जय देव जय देव जय चिन्मय रामा ॥ आरती ओंवाळूं तुज पुरुषोत्तमा ॥ धृ० ॥ अरूप निर्गुण निर्भय सच्चित्तव रूप ॥ प्रेमानंदें पाहातां भासे चिद्रूप ॥ अनन्यभावें भजतां होती त्वद्रूप ॥ मी त्वद्ध्यान करीतां झालों सुखरूप ॥ २ ॥

१९० चाल—संत सनकादिक०

काय करूं गे माय आतां कवणा ओंवाळूं ॥ जिकडे पाहें तिकडे राजाराम कृपाळू ॥ धृ० ॥ ओंवाळूं गे माय निजमूर्ति रामा ॥

रामरूपीं दुजेपण न दिसे आम्हां ॥ १ ॥ सुरवर नर वानर अवघा राम सकल ॥ दैत्य निशाचर तेही राम केवळ ॥२॥ त्रैलोक्यस्वरूपें राम संचरला एक ॥ सद्गुरुरूपें केशवराजीं आनंद देख ॥ ३ ॥

१९१. चाल—साधी.

जय देव जय देव जय आत्मारामा ॥ निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥ ध्रु० ॥ नाना देहीं देव एक विराजे ॥ नाना नाटक लीला सुंदर रूप साजे ॥ नाना तीर्थी क्षेत्रीं अभिनव गति माजे ॥ अगाध महिमा पिंडब्रह्मांडी गाजे ॥ १ ॥ बहुरूपी बहुगुणी बहुतां कलांचा ॥ हरिहरब्रह्मादिक देव सकळांचा ॥ युगानुयुगीं आत्माराम आमुचा ॥ दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥ २ ॥

१९२. चाल—साधी.

कमळाधर कमळाकर कमळावर ईशा ॥ कमळानाथा कमळाकांता सूरेशा ॥ कमळानाभी कमळा साजे सूरेशा ॥ कमळीं कमळें साजे स्थापित सूरेशा ॥ १ ॥ जय देव जय देव जय सुंदर रामा ॥ करकमळीं ओंवाळूं तुज पुरुषोत्तमा ॥ ध्रु० ॥ कमळीं कमळें वाहे जनकाची बाळा ॥ कमळीं कमळें वाहुनि उद्धरली शीळा ॥ कमळीं कमळें ध्याती योगीजनमेळा ॥ कमळीं तारीयेल्या भवसागरिं शीळा ॥ जय० ॥ २ ॥ कमळीं कमळें ध्यातां तूटे बंधन ॥ कमळीं कमळें वहातां फीटे अज्ञान ॥ कमळीं कमळें गातां अपरोक्ष ज्ञान ॥ कमळीं एकजनार्दन आहे परिपूर्ण ॥ जय देव० ॥ ३ ॥

१९३. चाल—साधी.

दशरथराजकुमारा धृतमुक्ताहारा ॥ शरयूतीरविहारा शमितक्षितिभारा ॥ करुणापारावारा कपिगणपरिवारा ॥ निर्गतनिखिलविकारा निगमागमसारा ॥ १ ॥ जय देव जय देव जय सीतारामा ॥ सजलबलाहकश्यामा सच्चित्सुखधामा ॥ ध्रु० ॥ रविकुलराजललामा रम्यगुणग्रामा ॥ रूपविनिर्जितकामा रुद्रस्तुत नामा ॥ परिपालितसुत्रामा पूर्णसकलकामा ॥ विश्वविलासविरामा विठ्ठलविश्रामा ॥ जय देव जय देव जय सीतारामा ॥ २ ॥

१९४. चाल–साधी.

नयना देखत जन हें विलयातें जातें ॥ तशीच गति या देहा निश्चित हें कळतें ॥ न कळे मन हें कैसें विषयीं रत होतें ॥ कां हो न भजा रघुवरराघवरायातें ॥ १ ॥ जय देव जय देव जय सुंदर-वेषा ॥ संसृतिपारावारीं तारीं हरि तोषा ॥ घृ० ॥ अवतारादिक झाले तेही परि गेले ॥ ब्रह्मेंद्रादिक जातिल ऐशी श्रुति बोले ॥ न भजसि रामा जाण ऐशी ये लीळे ॥ भजतां बाधि न चिंता रघुवर-पदकमळें ॥ जय० ॥ २ ॥ टाकुनियां भवधंदा निज भज रे मंदा ॥ द्वंदा आणिसि कां तूं भजसि न गोविंदा ॥ त्याची सेवा करितां न पवसि भवखेदा ॥ श्रुतिही वदती निश्चित ऐसा अनुवादा ॥ जय० ॥ ३ ॥ दिनमणिवंशाभरणा भवसागर तरणा ॥ श्रमलों बहुतां जन्मीं करिं आतां करुणा ॥ पावन करिं या चित्ता लावीं दृढभजना ॥ गमना-गमनें चुकवीं दावीं निजचरणा ॥ जय० ॥ ४ ॥ श्रीरामा जयरामा जय जय सुखधामा ॥ आत्मारामा पावें आम्हां नृपसोमा ॥ देईं निजपदलोभा मुनिमनविश्रामा ॥ उत्कट तवगुण गातो नारायण नामा ॥ जय० ॥ ५ ॥

१९५. श्यामसुंदर रामाचे०

त्रिभुवनमंडितमाळ शोभतसे गळां ॥ आरती ओंवाळूं पाहूं ब्रह्म-पूतळा ॥ १ ॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥ आरती ओंवाळूं पाहूं सुंदर मेघश्याम ॥ घृ० ॥ ठकाराचें ठाण करीं धनुष्यबाण ॥ मारुती सन्मुख उभा कर जोडून ॥ श्रीराम० ॥ २ ॥ भरत शत्रुघ्न दोघे चौऱ्या ढाळिती ॥ स्वर्गींहूनी देव पुष्पवृष्टि करिती ॥ श्रीराम० ॥ ३ ॥ रत्नखचित माणिक वर्णूं काय मुगुटीं ॥ आरती ओंवाळूं चवदाभुवनांचे पोटीं ॥ श्रीराम० ॥ ४ ॥ विष्णुदास नामा म्हणे मागतों तूंतें ॥ आरती ओंवाळूं पाहूं सीतापतीतें ॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥ ५ ॥

१९६. चाल—साधी.

साफल्या निजवल्या कौसल्या माता ॥ जनकसुकन्याऽनन्या मुनिमान्या सीता ॥ खेचर वनचर फणिवर भरत निजभ्राता ॥ धन्य तो नृपनायक दशरथ पीता ॥ १ ॥ जय देव जय देव जय रविकुल-टिळका ॥ आरती ओंवाळूं त्रिभुवननायका ॥ धृ० ॥ आचार्या गुरुवर्या कार्याचें फळ ॥ रविकुळमंडण खंडण संसारमूळ ॥ सुरवर मुनिवर किन्नर ध्याती पैं सकळ ॥ धन्य तो निजदास भक्त प्रेमळ ॥ जय० ॥ २ ॥

१९७. चाल—साधी.

स्वात्मसुखामृतसागर जय सद्‌गुरुरामा ॥ वेदांतार्णवमथितां तिल-गुह्यापरमा ॥ निजनिर्गुणजगलीला जगदाकृतिहेमा ॥ जगदीश्वर तद्रूपा वरमंगलधामा ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्‌गुरुरामा ॥ ब्रह्म सुधाऽमर चिद्‌घन जय सार्वभौमा ॥ धृ० ॥ चिन्मय वस्तु तुं अगुणी सगुणाकृति धरिसी ॥ अगणितगुणगंभिर गुरु ईश्वरही होसी ॥ अज्ञानांध सुशिष्या स्वप्रकाश करिसी ॥ शरणागत भवपाशापासुनि सोडविसी ॥ जय० ॥ २ ॥ स्वस्वरुपोन्मुखबुद्धी वैदेही नेली ॥ देहात्मकाभिमानें दशग्रीवें हरिली ॥ सद्विवेकमारुतिनें सत् शुद्धी आणिली ॥ तव चरणांबुजिं येउनि वार्ता श्रुत केली ॥ जय० ॥ ३ ॥ देहादिक अहंकार रावणवध करिसी ॥ केवल स्वसुखानंदीं वससी अयोध्येसी ॥ सर्वांतरिं व्यापुनियां सबाह्य तूं अससी ॥ गुरुभक्तीहिनपुरुषा कोठें नाढळसी ॥ ४ ॥ देहत्रय व्यतिरिक्ता साक्षी समसंता ॥ परमानंदाऽनंता अद्वयरसभरिता ॥ करुणाऽगर भयनाशन श्रीदेशिकनाथा ॥ स्वानंदें पद मौनी वंदित रघुनाथा ॥ ५ ॥

१९८ चाल—संत सनकादिक भक्त०

ऐकावी कथा कानीं राघवाची, माझ्या माधवाची ॥ जेणें भ्रांती हरे सकलही साधकांची ॥ १ ॥ म्हणी भरी राम आजी गाईला हो॥

डोळे भरुनी राम आजी पाहिला हो ॥ धृ० ॥ राम कृष्ण शिव वाचे आठवा हो ॥ ब्रह्मांडनायका हृदयीं सांठवा हा झणी० ॥ २ ॥ जन्मा आलिया धन्य तोचि दिवस ॥ उद्धव चिद्घन हृदयीं सावकाश ॥ झणी भरी ॥ ३ ॥

१९९. चाल—साधी.

अयोध्यापुरपट्टण शरयूचे तीरीं ॥ अवतरले श्रीराम कौसल्येउदरीं ॥ स्वानंदें निर्भर होती नरनारी ॥ घेउनि येती दशरथमंदीरीं ॥ १ ॥ जय देव जय देव जयजी श्रीरामा ॥ आरती ओंवाळूं तुज पूर्णकामा ॥ धृ० ॥ पुष्पवृष्टी सुरवर गगनींहुनि करिती ॥ दानव दुष्ट भयाभित झाले या क्षीतीं ॥ अप्सरा गंधर्व गायने करिती ॥ त्रिभुवनीं आल्हादें मंगलें गाती ॥ जय० ॥ २ ॥ कर्णीं कुंडल माथां मुकुट सुविराजे ॥ नासिक सरळ भाळीं कस्तूरी साजे ॥ विशाळसुकपोलीं नेत्रद्वय जलजें ॥ षट्पदरुणझुणशब्दें नभमंडळ गाजे ॥ जय० ॥ ३ ॥ रामचंद्रा पाहतां वेधलि पैं वृत्ती ॥ नयनोन्मीलन ढाळूं विसरलीं पातीं ॥ सुरनर किन्नर जयजयकारें गर्जती ॥ कृष्णदासा अंतरिं श्रीराममूर्ती ॥ जय देव ॥ ४ ॥

२००. चाल—साधी.

श्रीमद्रामचंद्रा अयोध्यापुरवासी ॥ जन्म दशरथकुळीं चैत्र नवमीसी ॥ उत्साह सुखकर झाला मनासी ॥ थोर आनंद सकळां जनांसी ॥ १ ॥ जय देव जय देव जय रामचंद्रा, श्रीरामचंद्रा ॥ कृपानिधान विभो करुणासमुद्रा ॥ धृ० ॥ रामलक्ष्मण असतां वनवासी ॥ रावण भिक्षे आला होउनि संन्यासी ॥ राम मृगा वधूं गेला वनासी ॥ मागें हरिली सीता दुष्टें त्वरेंसी ॥ जय० ॥ २ ॥ रामें त्वरित मिळवुनि वानरसेनेसी ॥ सागरिं सेतु रचविला आपुल्या नामेंसीं ॥ तयावरूनि सत्वर गेला लंकेसी ॥ राक्षससैन्य वधोनी आणिलि सीतेसी ॥ जय० ॥ ३ ॥ अधिकारी केला बिभिषण लंकेसी ॥ सीता घेउनि आला अयोध्यापूरासी ॥ थोर आनंद सकळा जनासी ॥ कृष्ण गोपाळ लागे चरणांसी ॥ जय० ॥ ४ ॥

२०१. चाल—साधी.

तव ध्यानें माझें मन मोहीत झालें ॥ मनमोहन नाम तुझें म्हणुनी शोभलें ॥ भजनामृतप्रेमें प्राशन पैं केलें ॥ करुणा करिं देवा सार्थक हें गमलें ॥ १ ॥ जय देव जय देव जय मंगलधामा ॥ भावें भजतों तुजला दे सौख्या रामा ॥ धृ० ॥ देवा केले तुवां अगणित उपकार ॥ सकळहि जगताचा तूंची आधार ॥ निजभक्तांचा घेशी माथां तू भार ॥ ऐशी करुणा तूझी देवा अपार ॥ जय देव० ॥ २ ॥ अर्पीली काया अवघी ही तूतें ॥ पातकि आहें परि तूं उद्धरी मातें ॥ शिशुहातीं पडतां रक्षावें तातें ॥ सांभाळीं धरुनी निजभक्तांतें हातें ॥ जय० ॥ ३ ॥ आनंदाचा सतत दिन ऐसा यावा ॥ मग आम्ही प्रेमानें करूं उत्सवा ॥ दयेनें तो तुवां मान्य करावा ॥ हेंचि प्रार्थित आहे तुजपाशीं देवा ॥ जय देव० ॥ ४ ॥

२०२. चाल—साधी.

राक्षसभारें पृथ्वी बहुभारभूत ॥ गोरूपें देवादिक मुनिजनासहित ॥ जाउनि ब्रह्मदेवा रोदनयुक्त ॥ कथिला दुःखरूप सर्वहि वृत्तांत ॥१॥ जय देव जय देव जय जय श्रीरामा ॥ हरिहरब्रह्मादिकां न कळे गुणसीमा ॥ ध्रु० ॥ ऐकुनियां चतुरास्यें केलें ध्यानासी ॥ सत्वर गेले सर्वहि क्षिरसागरासी ॥ श्रुत्यादिक द्रुहिण स्तुति जाणुन प्रेमासी ॥ निजदासां दर्शन दे हरि तेजोराशी ॥ जय देव० ॥ २ ॥ प्रार्थित दशास्यवध तो जाणुनि अवतार ॥ धरितों ऐशी वाणी झाली साचार ॥ निर्गुण परि सगुणत्वें झाला साकार ॥ चारीरूपें प्रगटे राजा रघुवीर ॥ जय० ॥ ३ ॥ कौसल्येचा राम कैकयी भरत ॥ सुमित्रात्मज लक्ष्मण शत्रुघ्नसहित ॥ होतां पृथ्वी झाली भयकंपरहित ॥ सीतारूपें माया जनकागृहीं येत ॥ जय देव० ॥४॥ कौमारीं व्रतबंधन ब्रह्मनंदनें ॥ केलें झाले सर्वहि विद्यासंपन्न ॥ कौशिकमख रक्षोनी अहल्योद्धारण ॥ त्र्यंबकधनु भंगोनी सीताकरग्रहण ॥ जय० ॥ ५ ॥ भृगुनंदनमद हरुनी साकेतीं वास ॥ द्वादशवर्षें करितां सीताविलास ॥ पितृवचनोपास्यें सुखकर वनवास ॥ विराध

वधुनी दिधला स्वर्ग निर्दोष ॥ जय० ॥ ६ ॥ मायामारिच वधितां सीतेचें हरण ॥ होतां पक्षींद्रा प्रभु दे मोक्षदान ॥ कबंध वधुनी तैसें शबरीउद्धरण ॥ करुनी सुग्रिवमैत्री वाळीनिर्दळण ॥ जय० ॥ ७ ॥ सीताशुद्धी करुनी हरींद्र सहसैन्य ॥ समुद्रतीरीं जातां विभिषण ये शरण ॥ पाहुनि लंकाधिश त्या केला सन्मान ॥ श्रीरामेश्वर शंभु स्थापींला जेणें ॥ जय० ॥ ८ ॥ सेतूबंधन करुनी लंका आक्रमण ॥ सपुत्रपरिवारेंसीं वधिला रावण ॥ ऐसें करुनी श्रीशें भूभारहरण ॥ बिभीषणाप्रति केलें लंकेचें दान ॥ जय० ॥ ९ ॥ पुष्पकयानीं सीता-सहपरिवारेंसीं ॥ बैसुनि करुणासिंधू भेटे भरतासी ॥ साकेतामधिं सुरवर मुनिजन देवर्षी ॥ राज्याभिषेक करिती प्रजा बहु हर्षी ॥१०॥ रविवंशध्वजभूषण श्रीमद्दाशरथी ॥ रतिपतिदहनाहृदयीं प्रेमें करि वसती ॥ स्मरतां दीन जनांप्रति दे चारी मुक्ती ॥ रंगनाथसुत प्रभुतें करितो आरती ॥ जय० ॥ ११ ॥

### २०३. चाल-साधी.

रत्नांचीं कुंडलें माला सुविराजे ॥ झळझळ गंडस्थळ घननीळ तनू साजे ॥ घंटा किंकिणि अंबर अभिनव गति साजे ॥ अंदू वांकी तोडर नूपुर ब्रिद गाजे ॥ १ ॥ जय देव जय देव जय रघुवर ईशा ॥ आरती निर्जरवर ईशा जगदीशा ॥ ध्रु० ॥ राजिव लोचन मोचन सुरवर नरनारी ॥ परतपर अभयंकर शंकर वरधारी ॥ भूषणमंडित उभा श्रीदशकंधारी ॥ दासा मंडण खंडण भवभय अपहारी ॥ जय देव० ॥ २ ॥

### २०४. चाल-अवतार गोकुळीं हो०

बंबाळ कर्पूराचे ॥ दीप रत्नकीळांचे ॥ उजळलें दिग्मंडळ ॥ मेघ-विद्युलतांचे ॥ भासती तयांपरी ॥ भालचंद्रज्योतीचे ॥ अवचितें झळकताती ॥ घोंस मुक्ताफळांचे ॥ १ ॥ जय देवा दीनबंधू ॥ राम कारुण्यसिंधू ॥ आरती ओंवाळीन ॥ शिवा मानसीं वेधू ॥ ॥ ध्रु० ॥ त्राहाटिलीं दिव्य छत्रें ॥ लागल्या शंखभेरी ॥ तळपताती

नीशाणं ॥ तडक होतसे भारी ॥ तळपती मयूरपिच्छें॥ तेणें राम थरारा ॥ जय० ॥ २ ॥ मृदंगटाळघोळ ॥ उभे हरीदासमेळ ॥ वाजती ब्रह्मवीणे ॥ उठे नादकल्होळ ॥ साहित्य नटनाट्य ॥ भव्यरंगरसाळ ॥ गर्जती नामघोष ॥ लहानथोर सकळ ॥ जय० ॥३॥ चंपकपुष्पजाती॥ मेळवीले असंख्यात ॥ दुस्तरपरिमळाचे ॥ तेणें लोपली दीप्ती ॥ चमकती ब्रह्मवृंदें ॥ पाउलें उमटती ॥ आनंद सर्वकाळ ॥ धन्य जन पाहाती ॥ जय० ॥ ४ ॥ ऋषिकुळीं वेष्टित हो ॥ राम सूर्यवंशींचा॥ जाहाली अतिदाटी ॥ पुढें पवाड कैसा ॥ सर्वही एकवेळ ॥ गजर होतो वाद्यांचा ॥ शोभतो सिंहासनीं ॥ स्वामी रामदासाचा ॥ ५ ॥

२०५ चाल—तव मानस कैसें०

आजि रघुपति तव चरणीं करितों ही आरती ॥ ओंवाळितसें प्रेमभरें प्रभु तुज लागो रती ॥ घृ० ॥ तव नामामृत पानें करूनी जड मुढ उद्धरले ॥ दुष्ट निशाचर वधूनि सुरांचें रक्षण त्वां केलें ॥ बलवंत गाइ प्रीती ॥ आजि ॥ १ ॥

२०६ चाल—वारियानें कुंडल हाले०

आरती करितों राघवचरणीं ॥ राहुनि अनुदित नामस्मरणीं ॥ ध्रु ॥ ब्रह्मादिक मुनि सुर गाती ज्यातें ॥ कैलासाधिप करि ध्यानांतें ॥ आरती० ॥ रावण मारुनि सुरां सुखी केलें ॥ बिभीषणासी राज्यि स्थापिलें ॥ आरती० ॥ २ ॥ शरणागत मी तुज बलवंता ॥ पाहि कृपेनें या बलवंता ॥ आरती करितों० ॥ ३ ॥

२०७. चाल—विडा घ्याहो नारायणा०

विडा घ्याहो रामराया ॥ महाराज राजया ॥ घृ० ॥ रत्नजडित पानदान ॥ आली जानकी घेवोन ॥ विडा देत करुनीयां ॥ दीनबंधो रामराया ॥ १ ॥ सुगंध गंगेरी पानें ॥ मुक्त मोतियाचा चूना ॥ सुपारी कातगोळ्या ॥ भक्तिभावें मेळवीलिया ॥ २ ॥ जायपत्री जायफळ ॥ विडा जाहला सुफळ ॥ सीता रामालागीं देत ॥ केशरकस्तूरी युक्त ॥ ३ ॥ सीताराम विडा घेतां ॥ ऐक्यभावें एकात्मता ॥ रंगली ऐक्यरंगी ॥ रामदास पायालागीं ॥ ४ ॥

२०८. चाल—विडा घ्याहो नारायणा०

विडा घ्या हो रघुवीरा ॥ रामा रणरंगधीरा ॥ विनवीते जनकबाळी ॥ भावें जोडोनीयां करां ॥ ध्रु० ॥ शांतिवनामाजीं मृदु ॥ पिकलीं नागवेली पानें ॥ अहंभाव जाळुनीयां ॥ केला शुद्ध सत्वचुना ॥ विडा० ॥ १ ॥ प्रपंचसुपारी हे ॥ ऐक्यशस्त्रें फोडीयली मुमुक्षाकापुरानें ॥ निजरंगीं रंगविली ॥ विडा० ॥२॥ भावार्थ कात गोळ्या ॥ ज्ञानलवंगा उपरी ॥ वैराग्यजायफळ ॥ प्रेमजायपत्रीवरी॥ विडा० ॥३॥ सच्चिदानंदमूर्ती ॥ माझी परिसावी विनंती ॥ जयराम सेवक ऊभा ॥ तबक घेऊनीयां हातीं ॥ विडा० ॥ ४ ॥

२०९ शेजारती——चाल—संत सनकादिक०

परमात्मा श्रीराम महामाया जानकी ॥ विश्रांती पावलीं गजर न कीजे सेवकीं ॥ १ ॥ आरती आरत ऐक्यभावें ओंवाळूं ॥ प्रकाश स्वयंज्योती निजतेनें बंबाळूं ॥ध्रु॥ स्नेह ना भाजन नाहीं वाती पावक ॥ सबाह्य अभ्यंतरीं अवघा निघोर दीपक ॥ आरती०॥ २ ॥ ऐक्याचे सुमनशेजे आत्मा रघुपती ॥ वाचा पुरुषली शद्ब न बोलवे पुढती ॥आ० ॥३॥ राम आणि दास चैतन्य पहुडले रामीं ॥ हेंही बोलावयासी दूजा न ऊरे धामीं ॥ आरती० ।, ४ ॥

२१०. चाल—कांकड आरती.

कांकड आरती ॥ परमात्मया श्रीरघुपती ॥ जीवाशिवें ओंवाळीन ॥ निजीं निजात्मज्योती ॥ ध्रु० ॥ त्रिगुणकांकडा ॥ द्वैतघृतं तिंबिला ॥ उजळीतों आत्मज्योती ॥ तेणें प्रकाशला ॥ १ ॥ काजळी तामस ॥ अवघें तेज डळमळ ॥ अवनी आवर अवघा ॥ निजनिज निश्चळ ॥ कांकड० ॥२॥ उदय ना अस्त जेथें ॥ बोध प्रातःकाळीं ॥ रामीं रामदास ॥ सहजीं सहज ओंवाळी ॥ कांकड० ॥ ३ ॥

२११. चाल—संतसनकादिक भक्त०

आतां करूं माय आतां कवणा ओंवाळूं ॥ जिकडे पाहें तिकडे राजाराम कृपाळू ॥ध्रृ०॥ ओंवाळूं गेलिया सद्गुरुरामा ॥ क्षमा रूप

निजपण न दिसे आम्हां ॥ काय० ॥१॥ सुर नर वानर राम केवळ ॥ खेचर निशाचर तेही राम केवळ ॥ का० ॥ २ ॥ त्रैलोकीं रामरूप साचार एक ॥ सद्‍गुरूकृपें केशव राज आनंददीप ॥ काय करूं माय० ॥ ३ ॥

२१२. चाल—साधी

प्रथम सीता शुद्धि हनुमंत गेला ॥ लंकादहन करुनी अखया मारीला ॥ वधिला जंबूमाळी भुवनीं आहाटीला ॥ आनंदाची गुडी घेऊनी आला ॥ १ ॥ जय देवा जय देवा निजबोधा रामा ॥ परमार्थें आरती, सद्भावें आरती परिपूर्णकामा ॥ धृ० ॥ उत्कट साक्षुनि शिळा सेतु बांधोनी ॥ लिंगदेह लंकापुर विध्वंसोनी ॥ कामक्रोधादिक हे राक्षस मर्दोनी ॥ देहअहंभावरावण निवटोनी ॥ जय० ॥ ॥ २ ॥ निजबळें निजशक्ती सोडविली सीता ॥ म्हणुनी येणें झालें अयोध्ये रघुनाथा ॥ आनंदें वोसंडे वैराग्य भरता ॥ आरती घेउनि आली कौसल्या माता ॥ जय० ॥ ३ ॥ अनुहातध्वनी गर्जति अपार ॥ अठरापद्में वानर करिती भुभुःकार ॥ अयोध्येसी आले दशरथकुमर ॥ नगरीं होत आहे आनंद थोर ॥ जय० ॥ ४ ॥ सहज सिंहासनीं राजा रघुवीर ॥ सोहंभावें तया पूजा उपचार ॥ सहजाची आरती वाद्यांचा गजर ॥ माधवदासा स्वामी आठव ना विसर ॥ जयदेव०॥५॥

२१३. चाल—साधी.

जय देव जय देव जय चिन्मय रामा ॥ आरती ओंवाळूं तुज पुरुषोत्तमा ॥ धृ० ॥ सर्वेहि वस्तु त्वद्रूप मज भासति रामा ॥ स्थिरचर सर्वेहि विश्वा तूं मंगलधामा ॥ वर्णन करितां तव गुण झाली बहु सीमा ॥ कथितां मौनावलों तुज मेघश्यामा ॥ जय० ॥ ॥ १ ॥ अरूप निर्गुण निर्मय सच्चितव रूप ॥ प्रेमानंदें पाहतां भासे चिद्रूप ॥ अनन्यभावें भजतां होती त्वद्रूप ॥ हरि तव ध्यान करितां झाला सुखरूप ॥ जय० ॥ २ ॥

२१४. चाल—साधी.

जय देव जय देव जय मंगलधामा ॥ भावें भजतां तुजला दे सौख्य रामा ॥ ध्रु० ॥ तव ध्यानें माझें मन मोहीत झालें ॥ मनमोहन नामतुझें म्हणुनी शोभलें ॥ भजनामृतप्रेमें प्राशन पैं केलें ॥ करुणा करीं देवा सार्थक हें गमलें ॥ जय० ॥ १ ॥ देवा केले तुवां अगणित उपकार ॥ सकळहि जगताचा तूंची आधार ॥ निजभक्तांचा घेशी माथां तूं भार ॥ ऐशी करुणा तूझी देवा अपार ॥ जय० ॥ २ ॥ अर्पीली काया अवघी ही तूतें ॥ पातकि आहें परि तूं उद्धरीं मातें ॥ शिशुहारीं पडतां रक्षावें तातें ॥ सांभाळीं धरुनी निजभक्तांतें हातें ॥ जय० ॥ ३ ॥ आनंदाचा सतत दिन ऐसा यावा ॥ मग आह्मी प्रेमानें करूं उत्सवा ॥ दयेनें तो तुवां मान्य करावा ॥ हीच प्रार्थना आहे तुज पाशीं देवा ॥ जय० ॥ ४ ॥

२१५. चाल—साधी.

नानादेहीं देव एकचि वीराजे ॥ नानानाटकलीला सुंदर रूप साजे ॥ नानातीर्थी क्षेत्रीं अभिनव यश माजे ॥ अगाध महिमा तुझा ब्रह्मांडीं गाजे ॥ १ ॥ जय देव जय देव जय आत्मारामा ॥ निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥ ध्रु० ॥ बहुरूपी बहुगुणी बहुता-काळाचा ॥ हरिहरब्रह्मादिक देव सकळांचा ॥ युगानुयूगीं आत्मा-राम हा आमुचा ॥ दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥ २ ॥ जय०॥

२१६. चाल—अंगिकार करुनि०

जयजय श्रीरामचंद्रा भक्तवत्सला ॥ पंचारति करितों तुज दावि पाउला ॥ ध्रु० ॥ अयोध्यापुर पट्टण शरयुच्या तिरीं ॥ अवतरसि रवि कुळीं कौसल्यमंदिरीं ॥ नगरांतिल नारि सकल येति झडकरी ॥ ओंवाळिति प्रेमभरें आरती तुला ॥ ज० ॥ १ ॥ सुरवर मग पुष्पवृष्टि करुनि डोलती ॥ अप्सरादि गान अती मधुर बोलती ॥ दुष्ट दैत्य धाकें बहु विर्त्ति पोळती ॥ त्रिभुवनांत भक्तजनां हर्ष जाहला ॥ जय जय० ॥ २ ॥ पितृवचन मानुनियां विचरसी वनीं ॥ दशशिर तैं कपटें हरि जनकनंदिनी ॥ वानरदल अति तुंबळ निघासि घेउनि ॥

सागरांत नामबळें सेतु बांधिला ॥ जयजय० ॥ ३ ॥ रावणादि दुष्ट दैत्य वधिसि त्यांजला ॥ विबुध मुक्त करुनि भक्त राज्यि स्थापिला ॥ जानकीसह निजगजरें येसि निजस्थळा ॥ अभयवरें विठ्ठलसुत रक्षि आपुला ॥ जयजय० ॥ ४ ॥



२१७. चाल–लोपविली बहुत शोभा

दाशरथे रामचंद्रा कौसल्या प्रियसुता ॥ ओवाळूं प्रेमभावें जगताचा तूं पिता ॥ ध्रु० ॥ भक्तांतें तोषवाया अवतरली रघुवरा ॥ प्रेमानें पूजिती जे वर देसी त्यां नरां ॥ घेतांची नाम तुझें सुख झालें शंकरा ॥ संकटिं तूं धांव घेई विनवितों अच्युता ॥ १ ॥ दशवदना मर्दुनियां सोडविलें सुरवरां ॥ घेउनियां जानकिला आलांसी निजपुरा ॥ तोषवुनी सर्व लोकां बोळविलें वानरां ॥ प्रार्थितसे दत्तदास लावीं या सत्पथा ॥ २ ॥

# आरत्या कृष्णाच्या



२१८. चाल–मंगेश महारुद्रा०

अवतार गोकुळीं हो ॥ जन तारावयासी ॥ लावण्यरूपडें हो ॥ तेजःपुंजाळ राशी ॥ उगवलें कोटिबिंब ॥ रवि लोपला शशी ॥ उत्साह सुरवरां ॥ महाथोर मानसीं ॥ १ ॥ जय देवा कृष्णनाथा ॥ राईरखुमाईकांता ॥ आरती ओंवाळीन ॥ तुम्हां देवकीसुता ॥ ध्रु० ॥ कौतुक पहावया ॥ माव ब्रह्मयानें केली ॥ वत्सेंही चोरुनीयां ॥ सत्यलोकासी नेलीं ॥ गोपाळ गाई वत्सें ॥ दोन्हीं ठायीं रक्षिलीं ॥ सुखाचा प्रेमसिंधू ॥ अनाथांची माऊली ॥ २ ॥ चारितां गोधनें हो ॥ इंद्र कोपला भारी ॥ मेघ जो कडाडीला ॥ शिळा वर्षल्या धारीं ॥ रक्षिलें गोकुळ हो ॥ नखिं धरिला गीरी ॥ निर्भय लोकपाळ ॥ अवतरला हरी ॥ ३ ॥ वसुदेवदेवकींचे ॥ बंद फोडिली शाळ ॥ होउनियां विश्वजनिता ॥ तयां पोटिंचा बाळ ॥ दैत्य हे त्रासियेले ॥ समुळ कंसासी काळ ॥ राज्य हें उग्रसेना ॥ केला मथुरापाळ ॥ ४ ॥ तारिले भक्तजन ॥ दैत्य सर्व निर्दाळून ॥ पांडवां साहाकारी ॥ अडलिया निर्वाणीं ॥ गुण मी काय वर्णूं ॥ मति केवढी वानूं ॥ विनवितो दास तुका ॥ ठाव मागे चरणीं ॥ ५ ॥

अ.क्र. २०६६२ दि. ८।०५.....

नोंद ... ९-२-५८ नों दि. ७।७।०११

२१९. चाल—साधी.

कोणा शरण गेले विधि त्रिपुरहरणा ॥ गोरूपा भूदेवांसह दुःखोद्धरणा ॥ क्षीराब्धिस्थें कोणीं येउनियां करुणा ॥ नाभी नाभी गर्जुनि केलें अवतरणा ॥ १ ॥ जय देव जय देव जय मेघश्यामा ॥ ब्रह्मचारी म्हणविसी भोगुनियां श्यामा ॥ ध्रु० ॥ पद लाउनि विमलार्जुन कोणीं उद्धरिला ॥ क्षणमात्रें दावानल कोणीं प्राशियला ॥ बाळपणीं शकटासुर कोणीं नाशियला ॥ बालक देउनि कोणीं गुरु संतोषविला ॥ जय देव० ॥ २ ॥ वसुदेवासह जातां लावुनियां चरणां ॥ कोणीं उथळ केली अवलीळा यमुना ॥ अवतारें अरुणानुज निजवाहन कोणा ॥ मोहरिनादें कोणा लुब्ध व्रजललना ॥ जय देव० ॥ ३ ॥ भोगुनियां भोगातित कोणतें म्हणती ॥ भारत भागवतवादी कोणाची ख्याती ॥ ऐसा तूं परमात्मा परब्रह्ममूर्ती ॥ एकजनार्दनहृदयीं ध्याताहे चित्तीं ॥ जय देव० ॥ ४ ॥

२२०. चाल—साधी.

येउन मानवदेहा भुललों संसारीं ॥ धन सुत जाया माझीं म्हणुनीयां सारीं ॥ नाहीं स्मरलों तुजला क्षणही कंसारी ॥ वारीं भवदुःखातें शरणागत तारीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय राधारमणा ॥ चुकवीं लक्ष योनी चौऱ्यायशीं भ्रमणा ॥ ध्रु० ॥ जाणत जाणत अपुलें केलें अनहीत ॥ स्वेच्छें रतलों विषयीं त्यजुनियां विहित ॥ गेला जन्म सज्जनसंगाविरहीत ॥ त्वत्पदकमलीं भिनलें नाहीं हें चित्त ॥ जय० ॥ २ ॥ केलें अगणित पातक आतां तुज पाहीं ॥ आलों शरणागत मी रक्षीं लवलाहीं ॥ करुणादृष्टीं पूर्ण दीनातें पाहीं ॥ विनवी कृष्णदास मनिं येउन राहीं ॥ जय० ॥ ३ ॥

२२१. चाल—आरती कीजो०

चरणकमल ज्याचे अति सुकुमार ॥ ध्वजवज्रांकुश ब्रीदाचे तोडर ॥ १ ॥ ओंवाळूं आरती मदनगोपाळा ॥ श्यामसुंदर गळां वैजयंतीमाळा ॥ ध्रु० ॥ नाभिकमलीं ज्याचें ब्रह्मयाचें स्थान ॥ हृदयीं पदक

शोभे श्रीवत्सलांछन ॥ २ ॥ मुखकमल पाहातां सूर्याच्या कोटी ॥ मोहियलें मानस कोंदियेली दृष्टी ॥ ३ ॥ जडितमुगुट ज्याचा दैदीप्यमान ॥ तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभुवन ॥ ४ ॥ एका जनार्दनीं देखियेलें रूप ॥ रूप पाहों जातां झालेसें तद्रूप ॥ ५ ॥

२२२. चाल—अवतार गोकुळीं हो०

हरिनाम गोड झालें ॥ काय सांगूं गे माये ॥ गोपाळ वाहताती ॥ वेणु आरती पावे ॥धृ०॥ गेलें होतें वृंदावना ॥ तेथें भेटला कान्हा ॥ गोपाळांसी वेध माझा ॥ छंद लागला मना ॥ १ ॥ आणिक एक नवल कैसें ॥ ब्रह्मादिकांलागीं पीसें ॥ उच्छिष्टालागुनीयां ॥ देव झाले जळीं मासे ॥ २ ॥ आणिक एक नवल चोज ॥ गोपाळांसी सांगे गूज ॥ आचवूं जळींचें जीवन ॥ पाहतां नेत्र ते असून ॥ ३ ॥ आणिक एक नवलपरी ॥ करीं धरिली सिदोरी ॥ गोपाळांसी वाढीतसे ॥ नामयाचा स्वामी हरी ॥ हरिनाम० ॥ ४ ॥

२२३. चाल—साधी.

श्रावणकृष्णाष्टमिसीं गोकुळिं अवतरले ॥ तुमच्या दर्शनमात्रें बहु पापी तरले ॥ बाळपणीं स्तनपानें पुतना असु हरिले ॥ तुमची अनंतलीला वेदश्रुति बोले ॥ १ ॥ जय देवा जय देवा कृष्णा जगपाळा ॥ दामोदर गोपाळा बाळा घननीळा ॥धृ०॥ देवकिवसुदेवांच्या येउनि उदरासी ॥ कंसादिक निर्दाळुनि भक्तां सुख देसी ॥ राहसी स्थिरचर व्यापुनि स्थापुनि धर्मासी ॥ तूझी अनंतशक्ती न कळे अमरांसी ॥ जय० ॥ २ ॥ केशव माधव विष्णू वामन श्रीरंगा ॥ नारायण गोविंदा अच्युत अघभंगा ॥ मधुसूदन संकर्षण श्रीपांडुरंगा ॥ श्रीधर विरंचि शंभू इच्छिति तव संगा ॥ जय० ॥ ३ ॥ जगदात्मा गोवर्धनधारी जय कृष्णा ॥ गोपीजन मुनिमानसहंसा कुळभुषणा ॥ कृष्णा वस्त्रहरणीं तारिसि मुरहरणा ॥ करुणासिंधू सखया पुरवी मम तृष्णा ॥ जय० ॥ ४ ॥ शरणागत मी येतों तुझिया चरणांसी ॥ आज्ञा दे सर्वज्ञा मज अज्ञानासी ॥ तारीं सकळहि संकट वारुनि तम नाशीं ॥

पुनरपि येणें चुकवी जननी जठरासी ॥ जय० ॥ ५ ॥ भव गज मज बहु जाची दुस्तरगति याची ॥ म्हणउनि विष्णू इच्छा करि तव वरणाची ॥ मद्धय हरिं हरि होउनि श्रीहरि मुक्तीची ॥ इच्छा पुरवीं बापा जननी भक्तांची ॥ ६ ॥

२२४. चाल साधी.

वृंदारकगुणवृंदं परमामृतकंदं ॥ नित्यानंदं सुरवरवरदं गोविंदं ॥ स्वभक्तमोचितबंधं नाशितभवबंधं ॥ मंदस्मितवरमाननमगाधनिजबोधं ॥ १ ॥ वंदे नंदानंदं तारितमुचूकुंदं ॥ वंदितव्रजजनवृंदं तमगाधबोधं ॥ धृ० ॥ करुणापारावारं भुवनत्रय सारं ॥ जगदाकारं मुक्ताहारं सुखपारं ॥ विश्वाकारं दधिघृतनवनीतहारं ॥ सुपीतचीरं श्रीशं वीरं रणधीरं वंदे० ॥२॥ गोपाल तुलसीवनमालं वज्रबालं ॥ सनीरनीरदनीलं विधिहरनुतलीलं ॥ विशालभालं गुणगणजालं रिपुकालं ॥ मुरलीगायनलोलं पंडितजनपालं ॥ वंदे नंदानंद० ॥ ३ ॥

२२५. चाल–साधी.

वांकी चरणीं धरणीं रांगसि यदुतरणी ॥ तरुणी मोहिसि फोडिसि भरणी सुखकरणी ॥ पाणी डहुळिसि चोरिसि लोणी मृदुवाणी ॥ लोचनबाणें भुलविसि रमणी व्रजरानीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय गोकुळपाळा ॥ नवघननीळा गोपबाळांतें पाळा ॥ धृ० ॥ खुळखुळखुळ वाळे घुळघुळ घागरिया ॥ क्षुणक्षुण क्षुद्रघंटा वाजति साजिरिया ॥ झळझळ पिंपळपान भाळीं गोजिरिया ॥ अलिकुलकुटील सुनीळ जावळ सांवळिया ॥ २ ॥ दुडुदुडुदुडु रांगसी हांससि मग बससी ॥ सस्मितवदनें करिसी विस्मित मन हरिसी ॥ धरिसी भिंती उठती चालसि मग पडसी ॥ दडसी मातेपासीं पंडितप्रभु जडसी ॥३॥

२२६. चाल–साधी.

कमलानन खगवाहन माणिभूषण शौरी ॥ रथभंजन विमलार्जुनविटपांतें मारी ॥ अरिमर्दन मधुसूदन भक्तजना तारी ॥ यदुनंदन व्रजमंडन भवभय नीवारी ॥ १ ॥ जय देव जय देव जय यादवराया ॥

न कळे महिमा शेषा मग झाला शय्या ॥ ध्रु० ॥ व्रजावनिता सुखभरिता ध्याती भगवंता ॥ मनमोहन जगजीवन कामाचा जनिता सुरभीसमूहवेष्टित मुरलीस्वर गाता ॥ विगलितवसना धांवति गोपांच्या वनिता ॥ जय देव० ॥ २ ॥ करुणाकर गिरिवरधर वत्सासुरदमना ॥ अघशोषण बकनाशक कालियविषहरणा ॥ यमुनाजल करि निर्मळ गोगोवळ कान्हा ॥ धरुनी नाना लीला अघटित करि घटना ॥ जय० ॥ ३ ॥ विष भरुनी स्तनिं दोन्ही ते मातुलभगिनी ॥ येउनि बोले कृष्णा पाहिन मी नयनीं ॥ उचलुनि घेउनि कडिये लावीतां स्तनीं ॥ शोषुनि प्राण नेला निजपद सुखसदनीं ॥ जय० ॥ ॥ ४ ॥ कमलासन करि शोधन धरुनी अभिमान ॥ गाईगोवळवत्सें नेलीं चोरून ॥ पुनरपि तैसी देखुनि लज्जायमान ॥ जनपंडित शरणागत बोले हरिगूण ॥ जय० ॥ ५ ॥

२२७. चाल—साधी

निरसुनि देहत्रय अंतरमंदीरीं ॥ महाकारण तेजतुर्या ओंवाळीं ॥ अर्धमात्रासहित करोनि कुसरी ॥ महाराजया तूं सुखनिद्रा करीं ॥१॥ जय देव जय देव जय मंगळमूर्ती ॥ गोपीरमणा तूतें करूं शेजारती ॥ ॥ ध्रु० ॥ पुंनाग मोगरे आणिक जुई जाती ॥ बकूळ पारीजातक चंपक शेवंती ॥ परिमळद्रव्यें सहित या सुमनवाती ॥ त्यावरि निद्रा करिं तूं भुवनत्रयपती ॥ जय० ॥ २ ॥ या शेजेवरि निद्रा करिं देवदेवा ॥ लक्ष्मी करित आहे चरणाची सेवा ॥ सत्यभामा विंजणा वारितसे बरवा ॥ माधवदासा स्वामी अभय कर द्यावा ॥ जय० ॥३॥

२२८. चाल—साधी.

रजनी करकुल सुंदर देखुनि अवतरसी ॥ प्रगटे धरणीधर तो सोदर बहुत रसी ॥ धरुनी सगुणाकारा व्रजजन उद्धरिसी ॥ रक्षुनियां वृंदारक असुरांतें हारिसी ॥ १ ॥ जय देवा जय देवा जय राधारमणा ॥ पयसागरतनयावर धाराधरवर्णा ॥ सुंदरवर पीतांबर धारी मुरहरणा ॥ करुणाकर मुरलीधर नमितों तव चरणां ॥

॥ धृ० ॥ हस्ती धरुनी मुरली विचरसि गोपृष्ठीं ॥ मुष्टिक चाणुर दमिसी हाणुनि निजमुष्टी ॥ वृष्टी करितां इंद्रें बलव बहुकष्टी ॥ दृष्टीं देखुनी धरिसी गिरिवर अंगुष्टीं ॥ जय० ॥ २ ॥ कामा सोडुनि सकळां सत्वर व्रजरामा ॥ दामा देती तुजला देखुनि अभिरामा ॥ कामा पुरवुनि त्यांच्या टाळिसि भवभ्रमा ॥ मामा मारिसी वरिसि रुक्मिणी आणि भामा ॥ जय० ॥ ३ ॥ कालिंदीचे जळीं होता बहुकाळीं ॥ काळीया तो गरळें बहुतांतें जाळी ॥ मौळी त्याच्या रगडुनि मर्दिसि जें काळीं ॥ गौळी म्हणती विजयी झाला वनमाळी । जय० ॥४॥ मायावेषा धरिसी त्रिजगा सकळा या ॥ गाया करिसी कीर्ती अनुगां सकळाया ॥ देवा इच्छी बलव निशिदिनि यदुराया ॥ कायावाचामनें नमितों गुरुपायां ॥ जय० ॥ ५ ॥

२२९. चाल–साधी.

बन्सीधर पर्वतधर जय मथुरावासी ॥ तुम दीजो व्रजलाल दैत्यनकूं फांसी ॥ दासनपर किरपा कीजो अबिनासी ॥ गोकुलकी सुगराई क्या कहूं मैं कैसी ॥ १ ॥ जय जयजी रणछोड त्रिभुवनके छय्यां ॥ पंचारत करताहूं तुमकूं अज भय्यां ॥ धृ० ॥ कानमों कुंडल आच्छो तीलक मृगमदको ॥ वृंदावनमें गैय्यां राखत पति सुरको ॥ खेलत गावत नाचत सुत जो नंदनको ॥ बलहारी उस दिनसे ज्यामो सुत हरको ॥ जय० ॥ २ ॥ साहेब बलवारी तुम गज गणिका तारी ॥ शरनागत प्रभु वच्छल कुब्जा उद्धारी ॥ बाहर भीतर देखूं तुमकूं बलहारी ॥ ज्यादो मानक साधो तेरो पग धारी जय० ॥ ३ ॥

२३०. चाल–साधी.

बंधु बलरामासह गोकुळिं अवतरसी ॥ मारुनि सकळां दुष्टां भूभारा हरिसी ॥ गोपवधूसी रासक्रीडा बहु करिसी ॥ आत्मज्ञाना कथुनी त्यांसहि उद्धरिसी ॥ १ ॥ जय कृष्ण जय कृष्ण जय जय कंसांता ॥ वंशीवादनयोगें भुलविसि सुरकांता ॥ धृ० ॥ सीमा सोडुनि इंद्रे करितां बहु कोप ॥ गोवर्धन उचलोनी रक्षिसि गोगोप ॥

लाविसि गोरसरक्षक गोपीला झोंप ॥ सर्वहि चोरुनि भक्षिसि वांटिसि अमूप ॥जय०॥२॥ वाजवुनी मुरलीला रमविसि बल्लीला ॥ त्यांसहि यमुनातीरीं दाविसि बहु लीला ॥ कंठीं घालिसि मोहक सफुल्लवल्लीला ॥ स्कंधीं घेउनि नाचसि रुसल्या गोपींला ॥ ३ ॥ दमयिसि यमुनाडोहीं कालीया सर्पा ॥ नाचसि फणिवरि थे थे शमविसि तद्दर्पा ॥ गोपीचित्तें हरिसी उभयुनि कंदर्पा ॥ म्हणसी तनुमनधनकृत सर्वहि मज अर्पा ॥ जय० ॥ ४ ॥ नमितों तव चरणांतें जनना मरणांतें ॥ नासावें श्रीकृष्णा आलों शरणातें ॥ काढीं दीनदयाळा मायावरणातें ॥ मज द्यावें नारायण नामस्मरणातें ॥ ५ ॥

२३१. चाल—आरती दत्तराज गुरुची०

आरती भुवनसुंदराची ॥ इंदिरावरा मुकुंदाची ॥ धृ० ॥ पद्मसम पादयुग्मरंगा ॥ ओंवाळणी होति भृंगा ॥ नखमणि स्रवताहे गंगा जे कां त्रिविधतापभंगा ॥चाल॥ वर्तुळ गुल्फ भ्राजमाने ॥ किंकिणीक्वणित, नाद घणघणित, वांकिवर झुणित, नूपुरें झनन मंजिराची ॥ झनन ध्वनि मंजिराची ॥ आरती० ॥ १ ॥ पीतपट हाटकतरुवर्णी ॥ कांचीं नितंब सुस्थानीं ॥ नाभिची अगाध हो करणी ॥ विश्वजनकाची जे जननी ॥ चाल ॥ त्रिवली ललित उदरशोभा ॥ कंबुगळां माळ, विलंबित झळाळ, कौस्तुभ सरळ, बाहु श्रीवत्सतरळमणिमरळ कंकणाची ॥ प्रीति बहु जाडित कंकणाची ॥ आरती० ॥ २ ॥ इंदुसम आस्य कुंदरदना ॥ अधरारुणार्क बिंबवदना ॥ पाहतां भ्रांति पडे मदना ॥ सजलमेघाब्धि दैत्यदमना ॥ चाल ॥ झळकत मकरकुंडलाभा ॥ कुटिलकुंतली, मयूरपत्रावली, वेष्टिलें तिलक भाळिं केशरी झळाळित कृष्णाकस्तुरीची ॥ अक्षता काळि कस्तुरीची ॥ आरती० ॥ ३ ॥ कल्पद्रुमातळीं मूर्ती ॥ सौदामिनी कोटिदीप्ती ॥ गोपीगोपवलय भंवती ॥ त्रिविष्टप पुष्पवृष्टि करिती ॥ चाल ॥ मंजुळ मधुर मुरलिनादें ॥ चकित गंधर्व, चकित अप्सरा, सुरागिरिवरा, कर्पुराधरा, रतीनें प्रेमयुक्त साची ॥ आरती ओंवाळित साची ॥ आरती० ॥ ४ ॥ वृंदावनींचिये हरणीं ॥ सखे गे कृष्ण माय बहिणी ॥

श्रमलों भवाब्धिचे फिरणीं ॥ आतां मज ठाव देईं चरणीं ॥ चाल ॥ अहा हें पूर्ण पुण्यश्लोका ॥ नमितों चरण शरण, मी करुणा येऊं दे विषाणपाणी कृष्ण नेणतें, बाळ आपुलें राखिं लाज याची ॥ दयानिधे राखिं लाज याची ॥ आरती० ॥ ५ ॥

२३२. चाल—ऐसा शंभो साजणी हृदयीं०

कोटि कुर्वंडिया माधवपायां ॥ उजळों येती गोपि यादवराया ॥ मंगलस्नानें घालुनी लवलाह्यां ॥ आरत्या करिती अपुनियां काया ॥ १ ॥ जय जय कृष्णा केशवा पंकजनाभा ॥ तन्मय पाहतां लावण्यतेजगाभा ॥ धृ० ॥ सजणा व्यजना वारिती गोपीबाळा ॥ एकी ऊभ्या घेउनी चंपकमाळा ॥ एकि सुमनें रंगल्या गोपीबाळा ॥ एकी पाहती हरी घनसांवळा ॥ जय० ॥ २ ॥ दाटि कोटिसुर संगित गायन करिती ॥ नारद प्रेमें तुंबर सुस्वर गाती ॥ समाधिबोधें तल्लिन तद्रूप होती ॥ ऐसा साजे गोपाळकुळदैवतीं ॥ जय० ॥ ३ ॥

२३३ चाल—संत सनकादिक०.

हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका म्हणती राधिका ॥ भावें ओंवाळिती यदुकुलतिलका ॥ धृ० ॥ एकीकडे राई, एकीकडे रखुमाई, एकीकडे रखुमाई ॥ भावें ओंवाळितां हरि तूं होसी दोठायीं ॥ हरि० ॥ १ ॥ अष्टाधिक सोळासहस्र ज्याच्या सुंदरा, ज्याच्या सुंदरा ॥ जिणें जिणें प्रार्थिलें जासी तियेच्या घरा ॥ हरि० ॥ २ ॥ एकाजनार्दनीं हरि तूं लाघवी होसी, लाघवी होसी ॥ इतुक्याही भोगुनी ब्रह्मचारी म्हणवीसी ॥ हरि० ॥ ३ ॥

२३४. चाल—गोंधळाची.

सुमनाचे शेजेवरी ॥ पहुडलीं रमाहरी ॥ वारा घाली ते सुंदरी ॥ आरती देवी ॥ धृ ॥ अब्जोद्भव सदाशिव ॥ शेष ऋषीगण गंधर्व ॥ आदिकरुनी सर्व देव ॥ नमिताती देवा ॥१॥ पुढें उभा गदापाणी ॥ करितसे विनवणी ॥ सर्वही जिवांची करणी ॥ सांगतसे देवा ॥२॥ जे जे ज्यांहीं सेवा केली ॥ ते ते देवानें घेतली ॥ सर्वांवरी दया

केली ॥ देवाधिदेवा ॥ ३ ॥ जे जे ज्यांचे मनोरथ ॥ ते ते पुरवी श्रीनाथ ॥ देउनि प्रसाद तीर्थ ॥ केले ते सुखी ॥ ४ ॥ देव ऋषी मानव ॥ पुण्यश्लोक दानव ॥ सर्वांचा ही गौरव ॥ केलासी देवा ॥५॥ ऐसिये मंचकसेवा ॥ नयनीं पाहिली रे देवा ॥ प्रियोत्तमाहूनि सर्वां॥ जाहले वरिष्ठ ॥ ६ ॥ गणपतितातार्चे रे पुण्य ॥ पुण्यक्षेत्रवरदान ॥ टिमया करी सेवन ॥ ७ ॥

२३५. चाल–साधी.

दैत्यभारें पिडिली पृथिवी बाळा ॥ म्हणवुनि तुजला येणें लागे गोपाळा ॥ भक्तप्रतिपालक उत्साह सोहळा ॥ मंगळ तुजला गाती नर आणी अबला ॥ १ ॥ जय देव जय देव जय गरुडध्वजा ॥ आरती ओंवाळूं तुज भक्तकाजा ॥ धृ० ॥ गुण रूप नाम नाहीं जयासी ॥ चिंतीतांची तैसा होसी तयासी ॥ मत्स्य कूर्म वराह नृसिंह झालासी ॥ असुरां काळा ऐसा पूढें ठाकसी ॥ २ ॥ सहस्रनामरूपें सांवळा ना गोरा ॥ श्रुति नेति नेति म्हणसी तुज विश्वंभरा ॥ जिवना जीवन तूंचि होसी दातारा ॥ नकळे पार ब्रह्मादीकां सुरवरां ॥ ३ ॥ संतां महंतां घरीं म्हणवी म्हाणियारा ॥ शंख चक्र गदा आयुधांच्या भारा ॥ दिव्य सुदर्शन घरटी फिरे अवसरा ॥ सुकुमार ना स्थूल होसी गोजीरा ॥ ४ ॥ भावें वीण तूझें न घडे पूजन ॥ सकळहि गंगा झाल्या तूजपासून ॥ उत्पत्ति प्रलय तूंचि करिसी पाळण ॥ धरुनि राहिला तुका निश्चयीं चरण ॥ जय देव० ॥ ५ ॥

२३६. चाल–साधी.

कंसरायें गर्भ वधियेले सात ॥ म्हणउनि गोकुळासी आले अनंत ॥ घ्यावया अवतार हेंचि निमित्त ॥ असुर संहारोनी तारावे भक्त ॥१॥ जय देव जय देव जय विश्वरूपा ॥ ओंवाळूं तूतें देहदीपें बापा ॥ ॥ धृ० ॥ स्थूल होउनि रूप धरिसि तूं सानें ॥ जैसा भाव तैसा तयां कारणें ॥ दैत्यांसी भाससी सिंहगजमानें ॥ काळा महाकाळ यशोदे तान्हें ॥ २ ॥ अनंतवर्णी कोणा न कळेची पार ॥ सगुण कीं निर्गुण हाही निर्धार ॥ पांगले साही अठरा करितां वेव्हार ॥

तो वळितसे गवळीयाचें खिल्लार ॥ जय० ॥ ३ ॥ तेतिस कोटी तीन्हीं देवांसी श्रेष्ठ ॥ पाऊलें पाताळीं स्वर्गीं मुगूट ॥ गिळिलीं चवदा भुवनें तरि न भरे पोट ॥ खाउनि घालासे गोपालोच्छिष्ट ॥ ४ ॥ महिमा वर्णूं तरी पांगलिया श्रुती ॥ शेषजिव्हा किरल्या करितां पैं स्तूती ॥ भावेंवीण कांहीं न चलेची युक्ती ॥ राखें शरण तुकया बंधू करि विनती ॥ जय० ॥ ५ ॥

२३७. चाल—साधी.

परमानंदा परम पुरुषोत्तम रामा ॥ अच्युता अनंता हरि मेघश्यामा ॥ अविनाशा अलक्ष्या परता परब्रह्मा अकळकळा कमलापति ना कळे महिमा ॥ १ ॥ जय देव जय देव जय जय श्रीपती ॥ मंगळशुभदायका करीन आरती ॥ धृ० ॥ गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा ॥ गिरिवरधर भवसागर तारक दधिमथना ॥ मधूसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा ॥ दीनवत्सला सकळां मुळ जयनीधान ॥ ॥ २ ॥ विश्वंभर सर्वेश्वर तूं जगदोद्धारा ॥ चक्रधर करुणाकर पावसि गजेंद्रा ॥ सुखसागर गुणआगर मुकूटमणी शूरां ॥ कल्याण कैवल्य मूर्ति मनोहरा ॥ जय० ॥ ३ ॥ गरुडासना शेषशयना नरहरी ॥ नारायणध्याना सुरवर हर गोरी ॥ नंदानंदवंदित त्रिभुवन भीतरीं ॥ अनंतनामीं ठसा अवतारावरी ॥ जय० ॥ ४ ॥ सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंतां संतां ॥ भगवान भगवंता काळकृतांता ॥ उत्पातिपाळण पासुनि संहारणसत्ता ॥ शरण तुकयाबंधु तारीं बहूतां ॥ जय० ॥ ५ ॥

२३८. चाल—साधी.

नंदयशोदाबाला कुटिलालकजाला ॥ मृगमदतिलकितभाला अघमुरमधुकाला द्युतिनिततरुणतमाला दमितविषव्याला ॥ गोपीगोधनपाला धृतसुमनोमाला ॥ १ ॥ जय देव जय देव जय राधाकृष्णा ॥ पूर्णब्रह्म सनातन हृतनतजनतृष्णा ॥ धृ० ॥ कृतकालिशमलध्वंसा पीनविलसदंसा ॥ बर्हिण पिच्छावतंसा कविजनकृतशंसा ॥ यमुनातीरारिरंसा निहतकुमति कंसा ॥ विठ्ठलमानसहंसा यदुवंशीतंसा ॥ जय देव जय देव० ॥ २ ॥

२३९. चाल–साधी.

कंसवधार्थ धरातल धरिली भक्तांच्या॥ उद्धारार्थ जगद्गुरु होसी विश्वाचा ॥ श्रमले चारी शास्त्रें श्रमल्या मनवाचा ॥ तो तूं गोकुळ-नायक साक्षी त्रिजगाचा ॥ १ ॥ जय देव जय देव जय आदी-पुरुषा॥ अहिविषमदहरणा श्रीगोविंद परेशा ॥धृ०॥ विश्वविद्यासागर निशिदिनीं तत्पर तूं ॥ शशिकलिकामित सहस्रयुवतीजनपति तूं ॥ गोवर्धनधर कौतुक गुरुसुतदायक तूं ॥ सुरनरकिन्नरमुनिजनशंकर-हृदयीं तूं ॥ जय० ॥ २ ॥ निजशरणागतरक्षक नंदघरीं नटतां ॥ गोपीजनमनमोहन करिसी वन अटतां ॥ उद्धव पार्था ज्ञानें तारिसि भव असतां ॥ तरला गणकात्मज कविलक्ष्मीधर जपतां ॥ ३ ॥

२४०. चाल–मेरा गमका तराना

जय बासूरिया तूंतें कृपाळा करितों ही आरती ॥ धृ० ॥ माधवा हे वामना मधूसूदन यदूराया ॥ ब्रह्मादिक सूर प्रेमानंदें वांच्छितााति तव पाय ॥ जय दीनदयाळा तूंतें कृपाळा० जय० ॥१॥ जगदात्मा हे केशवा गोविंदा जगपाल ॥ बाळपणीं स्तनपानें पूजता वधियली तत्काल ॥ जय व्रजगोपाळा तूंतें कृपाळा० ॥ जय० ॥ २ ॥ विठ्ठलात्मज ध्यातसे धांव आर्ता मम माय ॥ मद्भय हरीं हरी सदय होउनी मुक्तीचा दे ठाय ॥ जय भक्तवत्सला तूंते कृपाळा० ॥ ३ ॥

२४१. चाल–काय मला भूल०

जयजयजी कृष्णनाथ रुक्मिणीवरा ॥ पंचारति करितों तुज तारिं पामरा ॥ धृ० ॥ गोकुळांत जन्मुनियां भक्त तारिले ॥ सजलजलदरूप तुझें केविं शोभलें ॥ तेजें तव भानुशशी खचित लोपले ॥ उत्सव बहु थोर मनीं जाहला सुरां ॥ जय० ॥ १ ॥ माव करुनि विधिनें गोवत्सें चोरिलीं ॥ कौतुकानें सत्य लोकिं अवधिं लपविलीं ॥ दोन्हि ठाईं गोवत्सें तूंचि दाविलीं ॥ न कळे तव पार कदा निगममंदिरा ॥ जयजयाजी० ॥ २ ॥ वसुदेवदेवकीचा बाळ म्हणविला ॥ मुक्त करुनि पितृबंध कंस मर्दिला ॥ उग्रसेन मथुरेचा भूप स्थापिला ॥ दुष्ट दैत्य मर्दियले भक्तभवहरा ॥ जय० ॥ ३ ॥

सन्मार्गी भक्तजना लाविसी खरा ॥ निशिदिनिं जे ध्याती त्यां तारिसी पुरा ॥ दास विनवि हें तुजला इंदिरावरा ॥ बलवंता भजन-प्रेम दे गदाधरा ॥ जय० ॥ ४ ॥

२४२. चाल—पंचतुंड नररुंड०

श्यामल वर्णा षड्रिपुदमना राधारमणा तूंच हरी ॥ आरति करितों बहु प्रेमानें भवभयसंकट दूर करीं ॥ धृ० ॥ दानवदमना भूभयहरणा भक्तरक्षणा अवतरसी ॥ भक्तकाजकल्पद्रूम म्हणुनी निशिदिनिं ध्याती भक्त तुसी ॥ अतिविषधर जो काळा फणिवर कालिय यमुना-जलवासी ॥ तत्फणिवर तूं नृत्य करूनी पोंचविलें त्या मुक्तीसी ॥ १ ॥ कैटभ चाणुर कंसादिक हे शौर्यें वधिले अमित अरी ॥ नारद तुंबर गाती सुस्वर वर्णिति लीला बहुत परी ॥ अपार महिमा श्रवण करोनी भजती त्यातें मुक्त करीं ॥ दास तुझा दत्तात्रय नमुनी प्रार्थित अज्ञानास हरीं ॥ २ ॥

२४३. चाल—साधी.

निर्गुणसगुणाकारं संहृतभूभारं ॥ मुरहरनंदकुमारं मुनिजनसुखकारं ॥ वृंदावनसंचारं कौस्तुभमणिहारं ॥ करुणापारावरं गोवर्धनधारं ॥ १॥ जय देव जय देव वंदे गोपालं ॥ मृगमदशोभितभालं भुवनत्रय-पालं ॥ धृ० ॥ मुरलीवादनलालं सप्तस्वरगीतं ॥ स्थलचरजलचर-वनचररंजितसद्गीतं ॥ स्तंभितयमुनातोयं अगणितवरचारतं ॥ गोपीजनमनमोहनदांतं श्रीकांतं ॥ जय० ॥ २ ॥ रासक्रीडामंडल-वेष्टितव्रजललनं ॥ मध्येतांडवमंडितकुवलयदलनयनं ॥ कुसुमित-काननरंजितमंदस्मितवदनं ॥ फणिवरकालियदमनं पक्षीश्वरगमनं ॥ जय देव० ॥ ३ ॥ अभिनववनित चोरंकरघृतदाधगोलं ॥ लीलानट-सेलं घृतकांचनचैलं ॥ निर्जररक्षणशीलं विदलितरिपुजालं ॥ स्वभक्तजनतापालं जय जय गोपालं ॥ जय० ॥ ४ ॥

२४४. चाल—साधी.

प्रभुवर जय जय जय देव गीतगोविंद ॥ प्रबंधमूर्तें नंदितन तमुहृदरविंद ॥ धृ० ॥ श्रीमद्राधामतिरतिनातिनुतिपरवदनं ॥ सेवे

त्वां ललितादिकवरलीलासदनं ॥ नानालक्षव्रजभूललनार तिलालित ॥ रासरसं कलयंतं नवरससंवलितं ॥ प्र० ॥ १ ॥ सिद्धाष्टपदीरूपा अनुभवदातारः ॥ किंवा सिद्धाः केशवमुखमूर्त्याकाराः ॥ बहुविध-वर्णा अथवा तत्त्वानां निकरा, भजंति परमं त्वां बुधपरमानंदकराः ॥ प्रभु० ॥ २ ॥ त्वां सेवंते भक्ता मुक्ता अति सक्ता ॥ गतसारे संसारेऽपि च मुक्तयनुरक्ताः ॥ सर्वं भवंति वांछितफलिनो बहुम-लिनो बहुमलिनोऽनंतोपाध्यायसुता भवंतुवरबालिनः ॥ ३ ॥

२४५. चाल—संत सनकादिक भक्त०

हरी चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका, म्हणती राधिका ॥ भावें ओंवाळिती यदुकुलतिलका ॥ धृ० ॥ एकीकडे राई एकीकडे रखुमाई एकीकडे रखुमाई ॥ भावें ओंवाळितां हरितूं होसी दोठायीं ॥ हरी० ॥ १ ॥ अष्टाधिक सोळासहस्र ज्याच्या सुंदरा, ज्याच्या सुंदरा ॥ जिणें जिणें प्रार्थिलें जासी तियेच्या ॥ हरी० ॥ २ ॥ एका जनार्दनीं हरी तूं लाघवी होसी, लाघवी होसी ॥ इतुक्याही भोगुनी ब्रह्मचारी म्हणवीसी हरी० ॥ ३ ॥

२४६. चाल—साधी.

करुणाकरगुणसागर गिरिवरधरदेवें ॥ लीलानाटकवेष धारिला स्वभावें ॥ अगणितगुणलाघव हें कवणाला ठावें ॥ व्रजनायक सुखदायक काय मि वर्णावें ॥१॥ जय देव जय देव जय राधारमणा ॥ आरती ओंवाळूं तुज नारायणा ॥धृ०॥ जय० ॥१॥ वृंदावनहरिभुवन नूतन तनु शोभे ॥ वक्रांगे श्रीरंगे यमुनातटिं शोभे ॥ मुनिजनमान-सहारी जगजीवन ऊभे ॥ रविकुळटीळकदास पदरज त्या लाभे ॥ जय० ॥ २ ॥

२४७. चाल—तृपाल कोप०

कुंददंत मंदहास्य नंदनंदना ॥ पंचारति करितों तुज कंसकंदना ॥ धृ० ॥ गोपसख्या कोप टाक पाहि नतजनां ॥ करीं कृपा कृपार्णवा ॥ बाळकृष्ण विठ्ठलास रक्षिं सज्जना ॥ कुंद दंत० ॥ १ ॥

# आरत्या विष्णूच्या



२४८. चाल—साधी.

आरती आरती करूं गोपाळा ॥ मीतूंपण सांडोनी वेळोवेळां ॥ ध्रु० ॥ आवडीगंगाजळें देवा न्हाणीलें ॥ भक्तीचें भूषण प्रेमसुगंध अर्पीलें ॥ अहं हा धूप जाळूं श्रीहरिपुढें ॥ जंव जंव धूप जळे तंव तंव देवा आवडे ॥ आर० ॥ १ ॥ रमावल्लभदासाचें अहंधूप जाळिला ॥ एका आरतीचा मग प्रारंभ केला ॥ सोहं हा दीप ओंवाळूं गोविंदा ॥ समाधी लागली पाहतां मुखारविंदा ॥ आर० ॥ २ ॥ हरिखें हरीख होतो मुख पाहतां ॥ प्रकटल्या ह्या नारी सर्वही अवस्था ॥ सद्भावा लागीं बहु हा देव भुकेला ॥ रमावल्लभदासें अहं नैवेद्य अर्पिला ॥ आर० ॥ ३ ॥ फल तांबूल दक्षिणा अर्पिली ॥ तया उपरीं नीरंजनें मांडिलीं ॥ पंचप्राण पंचज्योति आरति उजळली ॥ विश्व हें लोपलें तया प्रकाशातळीं ॥ आर० ॥ ४ ॥ आरती प्रकाशें चंद्रसूर्य लोपले ॥ सुरवर नभीं तेथें तटस्थ ठेले ॥ देवभक्तपण न दिसे कांहीं पैशा- परी दास रमावल्लभापायीं ॥ आर० ॥ ५ ॥

२४९. चाल-साधी

जय जय जगनकनका चिन्मय विधिजनका ।। सुखकर ब्रह्म-परात्पर प्रियतरमुनिसनका ।। भवदलभंजन सुरपति हरि माया-हरका ।। कमलावर कमलप्रिय चुकवीं भवनरका ।। १ ।। जय देव जय देव जय माधव विष्णो, श्रीमाधव विष्णो ।। व्यापक सर्वचराचर, ब्रह्माचि पूर्ण परात्पर प्रसीद प्रभ विष्णो ।। धृ० ।। जलचर मच्छ हि कच्छ वराह हृषिकेशी ।। नरसिंहाकृति वामन द्विज रघुपति होसी ।। यदुपति बौद्ध हि कल्की दशविध तनु ऐशी ।। भक्तजनप्रिय धरुनी जगपालन करिसी ।। जय० ।।२।। सच्चित्स्वरूप-सुखता विसरुनि हे जीव ।। व्यर्थचि अविवेकानें पावति देहभाव ।। स्मरतां तव पद हृदयीं दृढतर सद्भाव ।। प्रकटुनि सद्गुरुरूपें उद्धरसी देव ।। जय० ।।३।। त्वं पद तत्पद माया सकलहि जगसर्गा ।। सच्चित्सुख तूं साक्षीविरहित जडवर्गा ।। साक्षी शब्दहि गाळुनि वससी निजअंगा ।। अगणित निःशब्दचि तूं अससी निःसंगा ।। जय० ।। ४ ।। विवर्त जडजग सर्वहि हे माया नसतां ।। सर्वहि साक्षी म्हणणें नसेचि मग पाहतां ।। अद्वय अनंत तव पद निर्भय निज-सत्ता ।। पदरज वंदित मौनी अभेद समचित्ता ।। जय देव० ।। ५ ।।

२५०. चाल-साधी.

करुणाकर गुणसागर गिरिवरधर देवें ।। लीला नाटकवेष धरिला स्वभावें ।। अगणित गुण लाघव हें कवणाला ठावें ।। व्रजनायक सुख-दायक काय किं वर्णावें ।। १ ।। जय देव जय देव जय लक्ष्मीरमणा ।। आरति ही ओंवाळू तुज नारायणा ।। धृ० ।। वृंदावन हरिभवन नूतन तनु लाभे ।। वक्रांग श्रीरंगें यमुनातट शोभे ।। मुनिजनमानसहरी जगजीवन ऊभे ।। रविकुळटिळक दास पदरज त्या लाभे ।। १ ।।

२५१. चाल-साधी.

नारायण खगवाहन चतुराननताता ।। स्मरअरितापविमोचन पयोनिधिजामाता ।। वैकुंठाधिपते तव महिमा मुखिं गातां ।। सहस्र-

मुखांचा तोही थकला अनंता ॥ १ ॥ जय देव जय देव जय लक्ष्मी-कांता ॥ मंगल आरति करितों भावें सुजनहिता ॥ ध्रु० ॥ सदैव लालन पालन विश्वाचें करिसी ॥ दासांस्तव तूं नाना अवतार धरिसी ॥ दुष्टां मर्दुनि दुःखा भक्तांच्या हरिसी ॥ निशिदिनिं षण्मुख-तातातें हृदयीं स्मरसी ॥ २ ॥ चपला सहस्र जयाच्या जडल्या वसनासी ॥ कोटिशशि क्षयवरहित शोभति वदनासि ॥ कौस्तुभ-मुगुटविराजित मूर्ती अविनाशी ॥ ज्यातें हृदयीं ध्यातां भवभय अघ नाशी ॥ ३ ॥ तारीं वारीं संकट मारीं षड्रिपुला ॥ स्मरती त्यांतें देई संपत्ती विपुला ॥ तापत्रय जाळितसे निशिदिनिं मम वपुला ॥ दास म्हणे वोसंगा घे बालक आपुला ॥ ४ ॥

२५२. चाल—व्यर्थ आम्ही अबला०

आरती ही तुजला ॥ माधवा ॥ ध्रु० ॥ तन मन अर्पुनी करितों भावें ॥ तारीं हो मजला ॥ माधवा आरति० ॥ १ ॥ कविजन थकले तव गुत गातां ॥ अघटित तव लीला ॥ माधवा आरति० ॥ २ ॥ संत मुनीही तव पद ध्याती ॥ न कळे कवणाला ॥ माधवा० ॥ ३ ॥ विठ्ठलसुत बलवत्कवि प्रेमें ॥ गातो तव लीला ॥ माधवा० ॥ ४ ॥

२५३. चाल—पंचतुंड नररुंडमालधर०

लक्ष्मीरमणा भवभयहरणा चित्सुखसदना हृत्कमला ॥ बहु प्रेमानें पंचारति ही करित असों बा तुज विमला ॥ ध्रु० ॥ दृढ भक्ती पाहुनीयां दिधलें ध्रुवपद जैसें ध्रुवबाला ॥ अर्जुनरथीं सार-थ्यहि करुनी अवगाहीलें अश्वांला ॥ ऐकुनि पेशा तव औदार्या आठवितो तव पदकमला ॥ दृढ भक्तीनें रुक्मिणिसुत हा, देइं दर्शना तव विमला ॥ १ ॥

२५४. चाल—शशिकुलभूषण०

जय जय चतुराननताता ॥ आरति तुज ही श्रीकांता ॥ ध्रु० ॥ तन मन अर्पुनि पुजनाला ॥ प्रेमें तुज हृदयीं धरिला ॥ षड्रिपु नेउनी विलयाला ॥ रक्षीं तव या दासाला ॥ चाल ॥ विठ्ठलसुत तव लीन पदांबुजिं तारीं या भक्ता ॥ विनंती ही तुज भगवंता ॥१॥

२५५. विडा०

विडा घ्याहो नारायणा ॥ कृष्ण जगज्जीवना ॥ विनविते रखुमाई ॥ दासी होईन मी कान्हा ॥ धृ० ॥ वासना फोडूनीयां ॥ चूर्ण केली सुपारी ॥ भावार्थ कापुरानें ॥ घोळियेली निर्धारीं ॥ १ ॥ शांति हे नागवेल ॥ पानें घेऊनियां करीं ॥ मीपणा जाळूनियां ॥ चुना लाविला वरी ॥ २ ॥ विवेक हा कात रंग ॥ रंगीं रंगला सुरंग ॥ वैराग्य जायफळ ॥ मेळविलें सकळ ॥३॥ दया हे जायपत्री ॥ क्षमा लवंग आणील्या ॥ सुबुद्धि वेलदोडे ॥ शिवरामीं अर्पियेले ॥ ४ ॥

# आरत्या मारुतीच्या



२५६. चाल–साधी.

अघटित भीमपराक्रम जय जय हनुमंता ॥ अंजनिबालक म्हणविसि अपणा बलवंता ॥ उपजत किलाणमात्रें आक्रमिसी सविता ॥ रावण गर्वनिकंदन कपिबलयशदाता ॥ १ ॥ जय देव जय देव जय मारुतिराया ॥ ब्रह्मसुखामृतसागर वंदित मी सदया ॥ धृ०॥ दुर्घटसागर उडोनि सीतेची शुद्धी ॥ मर्दुनि जंबूमाळी करिसी सद्बुद्धी ॥ भवलंकापुर जाळुनि नावरसी युद्धीं ॥ रघुपतिनिजकार्यांची करिसी तूं शुद्धी ॥ जय० ॥ २ ॥ जिंकिसि विषयसमुद्रा पवनात्मज रुद्रा ॥

निजजनदुःखदारिद्रा पळविसि तूं भद्रा ॥ कपिकुलमंडणचंद्रा हरिं हे जडतंद्रा ॥ सुखकर यतिवर वंदित मौनी पदमुद्रा ॥ जय० ॥ ३ ॥

२५७. चाल—साधी.

मायाशोधाविषयीं तरलासि समुद्रा ॥ मध्यें भयंकरीला करिसी हृच्छिद्रा ॥ नमुनी श्रीला देसी दाशरथीमुद्रा ॥ लंका जाळुनि येसी एकादशरुद्रा ॥ १ ॥ जय देव जय देव जय मारुतिराया ॥ जगदुद्धार कराया येसी या ठाया ॥ धृ० ॥ रुदन करी राम तया बहुसुखिया केला ॥ सेतू बांधुनि सकपी नेशी लंकेला ॥ दशवदनादिक मारुनि आणिसि सीतेला ॥ दासा बिभीषणाला लंकापति केला ॥ जय० ॥ २ ॥ ती कीर्ति तव अतुला वर्णिल कोण जनीं ॥ तरले दुःखसमुद्रीं बहु नर तव भजनीं ॥ सत्वर पावसि ऐसें कथिलेंसे सुजनीं ॥ तव दर्शन-रवियोगें निरसे भ्रम रजनी ॥ जय० ॥ ३ ॥ राहावें ममहृदयीं सदया कपिराया ॥ अखिलहि आधिव्याधी निर्मूल कराया ॥ मन्मन निर्मल व्हावें निस्पृह विचराया ॥ न जसा विलंब उदकीं लवणास विराया ॥ जय० ॥४॥ या देहीं या नयनीं ब्रह्मचि खेळावें ॥ ज्ञानाग्नीनें संचित सर्वहि जाळावें ॥ क्रियमाणहि बाधेना ऐसें वाळावें ॥ नारायणदासा तव चरणीं पाळावें ॥ जय० ॥ ५ ॥

२५८. चाल—साधी.

कोटीच्या ही कोटी गगनीं उडाला ॥ अचपळ चंचळ द्रोणाचळ घेउनि आला ॥ आला गेला आला कामां बहुतांला ॥ वानरकटका चुटका लावुनियां गेला ॥ १ ॥ जय देव जय देव जयजी बलभीमा ॥ आरती ओवाळूं सुंदर गुणसीमा ॥ धृ० ॥ उत्कटबळ तें तुंबळ खळ-बळली सेना ॥ चळवळ करितां त्यासी तुळणा दीसेना ॥ उदंड कीर्ती तेथें मन हें बैसेना ॥ दास म्हणे न कळे मोठा कीं साना ॥२॥

२५९. चाल—साधी

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं ॥ करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥ गडबडिलें ब्रह्मांड धाकें त्रिभुवनीं ॥ सुर नर निशाचर

त्यां झाल्या पळणी ॥ १ ॥ जय देव जय देव जय हनुमंता ॥ तुमचेनि प्रसादें न भीं कृतांता ॥ धृ० ॥ दुमदुमलीं पाताळें उठिला प्रतिशद्ब ॥ थरथरला धरणीधर मानीला खेद ॥ कडकाडिले पर्वत उडुगण उच्छेद ॥ रामीं रामदासा शक्तीचा बोध ॥ जय देव० ॥२॥


२६०. चाल—अवतार गोकुळीं हो०

जय देवा हनुमंता ॥ जय अंजनीसुता ॥ ॐ नमो देवदेवा ॥ राया रामाच्या दूता ॥ आरती ओंवाळीन ॥ ब्रह्मचारी पवित्रा ॥ धृ० ॥ वानररूपधारी ॥ ज्याची अंजनी माता ॥ हिंडती वनांतरीं ॥ भेटी झाली रघुनाथा ॥ धन्य तो रामभक्त ॥ ज्यानें मांडिली कथा ॥१॥ सीतेच्या शोधासाठीं ॥ रामें दिधली आज्ञा ॥ उलंघुनी समुद्रतीर ॥ गेला लंकेच्या भुवना ॥ शोधूनी अशोकवना ॥ मुद्रा टाकिली खुणा ॥ २ ॥ सीतेसी दंडवत ॥ दोन्ही कर जोडून ॥ वन हें विध्वंसिलें ॥ मारिला अखया दारुण ॥ परतोनी लंकेवरी ॥ तंव केलें दहन ॥३॥ निजबळें इंद्राजित ॥ होम करी आपण ॥ तोही त्वां विध्वंसिला ॥ लघुशंका करून ॥ देखोनी पळताती ॥ महाभूतें दारुण ॥ ४ ॥ राम हो लक्षुमण ॥ जरी पाताळीं नेले ॥ तयांच्या शुद्धीसाठीं ॥ जळीं प्रवेश केले ॥ अहिरावण महिरावण ॥ क्षणामाजी मर्दिले ॥ ५ ॥ देउनी भुभुःकार ॥ नरलोक आटीले ॥ दीनानाथा माहेरा त्वां ॥ स्वामिसी सोडविलें ॥ घेऊनी स्वामी खांदीं ॥ अयोध्येसी आणिलें ॥ ६ ॥ हनुमंत नाम तूझें ॥ किती वर्णूं दातारा ॥ असशी सर्वांठायीं ॥ हारोहारीं अंबरा ॥ एका जनार्दनीं ॥ मुक्त झाले संसारा ॥ ७ ॥

२६१. चाल—साध्य नसे मुनिकन्या०

जय जय अंजनिबाला ॥ पंचारति ही करितों तुजला ॥ धृ० ॥ सीताशुद्धिस्तव जावोनी ॥ जाळिली लंका दुष्ट वधोनी ॥ जानकिसह रामाला ॥ नेसी अयोध्ये सुखधामाला ॥ जय० ॥ १ ॥ चरणीं शरण मीं भावें आलों ॥ ब्रह्म सदोदित हृदयीं खेळों ॥ पेशा दे ज्ञानाला ॥ धन्य करीं या बलवत्कविला ॥ जय० ॥ २ ॥

# आरत्या सूर्याच्या



२६२. चाल—साधी.

जगदात्मा जगचक्षू उदयाचलिं मूर्ती ॥ पाहुनि वृंदे अरुणोदयिं युद्धा येती ॥ प्रातःकाळीं अर्घ्यें द्विजवर वर देती ॥ तेणें राक्षस मूर्च्छित द्वीपाप्रति जाती ॥ १ ॥ जय भानू श्रीभानू कांचन मणि-हारा ॥ मघवादिक पद वंदित निगमागमसारा ॥ ध्रु० ॥ म्हणउनि रविनारायण विप्रां वर देसी ॥ प्रतप्तस्वर्णाऐसी द्विजकाया करिसी ॥ कलियुगकिल्मिषदैन्यें विप्रांचीं हरिसी ॥ तव पदभजनें नमनें रवि-लोका नेसी ॥ जय० ॥ २ ॥ भवभयभ्रांती तिमिरें तव तेजें गेलीं ॥ ज्ञानोदय प्राप्तीनें दुरितें मावळलीं ॥ स्तुति करितां शेषाची जिव्हा ही चिरली ॥ सहजचि अल्पज्ञाची कुंठित मति झाली ॥ जय० ॥ ३ ॥

२६३. चाल—साधी.

ब्रह्मादिस्तंभातेऽखिलजीवसमूहे ॥ तिष्ठन्नंर्बोहिरपि भिन्नतनुव्यूहे ॥ त्वमपां ग्रहणोत्सर्गैःप्रवहसि हिननिवहे ॥ सवितर्जगतो यात्रां भुवन-त्रयगेहे ॥ १ ॥ जय देव जय देव जय सूर्य द्युम्ने ॥ भास्कर जय खग पूषन् जय दिनकर तरणे ॥ ध्रु० ॥ आदित्यामरवर्यातद्भु-तेजोबिंबं ॥ निगमोदितनिष्ठानां ध्वस्तघकदंबं ॥ स्थिरचरकरण-प्रेरक तव जगदवलंबं ॥ ध्यायेसकलाभीष्टदमनुकंपितसांबं ॥ जय० ॥ २ ॥ यस्त्वं निद्राग्रस्तं लोकमिमं विकलं ॥ कृपयैवोत्थापयसे

वर्तयसे सकलं ॥ तोषयसे दुष्टानां जनयन् भयमतुलं ॥ कलयसि दिक्पालानां पूजनमतिसफलं ॥ जय० ॥ ३ ॥ विधिहरिरुद्रैः कुरुषे सर्गस्थितिनाशं॥ वेदत्रयमय भगवन् कुरु पापविनाशं ॥ हर भवदुःखं विधेहि सुकृते मतिवेशं॥ काशीतनुजानंतं पालय निजदासं ॥ ४ ॥

२६४ चाल—आरती भुवनसुंदराची०

आरती तिमिरहारकाची ॥ भवांबुधिभक्ततारकाची ॥ घृ० ॥ कवर्तिनहरितवीतिवहनी ॥ मूर्ति अनुवर्ति अर्तिदहनी ॥ पूर्ति भवहर्ति कीर्ति गहनी ॥ कर्ति मनस्फूर्ति धूर्तिसहनीं ॥ चाल ॥ श्वेतसारंगघृतपाणे ॥ प्रखरकर दुरित, तिमिरहरत्वरित, चरित रसभरित, हाति अलिदनुज कंदनाची ॥ मंजरी अमरवंदनाची ॥ १ ॥ खंडपाखंडचंडवीर्या ॥ बंडखलदंडमंडनार्या ॥ भवांडः कृतांडपंडवर्या ॥ दंडधरथंडमार्तंड सूर्या ॥ चाल ॥ मकरमणिहारकंठधारा ॥ विशदयशउदय, विबुधवशहृदय, विपद्वशासदय, विषयवर्णनीय कीर्ति ज्याची ॥ गाति सुर अखिल कीर्ति ज्याची ॥ आरती० ॥ २ ॥ शिष्टविधिनिष्ठतुष्टकरणा ॥ दुष्टआधिकुष्ठक्लिष्टहरणा ॥ त्रिविष्टपसुपुष्टचरणा ॥ नष्टअलिकष्टश्रेष्ठकिरणा ॥ चाल ॥ अमरसारंगअंगकांता ॥ हाटकापितपटी, घटीकटि तटीं, भटीचाटिपटी, दिटीवटिउटी चंदनाची ॥ रेखिली पीत चंदनाची ॥ आरती० ॥३॥ दशमखरक्षकक्षमाघा ॥ लक्षद्विजपक्षहृत्क्षपाधा ॥ लक्षगुणरक्षकभवेधा ॥ अभयाक्षरक्षरा सुबोधा ॥ चाल ॥ कमलपत्राक्ष तीक्ष्णरश्मे ॥ त्रिदशगुरुवर, त्रिशिरसुखकर, त्रिपथपरिकर, विविधगरहर त्रिगुणाची ॥ मूर्ति निशिहरात्रिपुराची ॥ आरती० ॥ ४ ॥ मित्र मुनिपुत्रगात्रपूता ॥ चित्रशतपत्रवक्त्रधौता ॥ छात्र सुखपात्रसौत्रभूता॥ क्षेत्रधरनेत्रमात्रनीता ॥चाल॥ सकल रविदासकामदा हे ॥ ललितगवजनन, गलितरवसुमन, कलितभवशमन, चरणिं तव नमन योजण्याची ॥ आस मम पुरविं पाहण्याची ॥ आरती० ॥ ५ ॥

२६५. चाल—साधी

नारायण चतुराक्षर वेदीं जो स्तविला ॥ येतां उदया भास्कर रजनीस्तव सरला ॥ रविमंडळ शशिमंडळ भूमंडळ जाहला ॥

त्रिकाळ संध्या अर्घ्ये देती सवित्याला ॥१॥ जय देव जय देव दिनकर दिनबंधू ॥ द्विजवरतारक हारक दुस्तरभवसिंधू ॥ ध्रु०॥ सप्तमुखांचा बाजी रथ गगनीं चाले ॥ रविरथ सुंदर उदया सहस्त्रकर आले ॥ त्रिभुवनिं प्रकाश पडतां दैत्य लया गेले ॥ तो श्रीदिनकर आत्मा तेजें जन चाले ॥२॥ सर्वात्मक तूं जे तेजा तेजोगुणराशी ॥ दिनकर अघभय-हारक तारक सर्वांशीं ॥ गंधाक्षत आरक्त कुसूमें प्रिय ज्यासी ॥ अपूप घृत पय पायस अर्पिती यज्ञासी ॥ जय० ॥ ३ ॥ त्रिभुवनिं फेरे फिरतां अस्तोदय होसी ॥ रजनीं दिनकर सकळां यावें उद-यासी ॥ तटस्थ राहति कर्मे सुरनर उपवासी ॥ तुझिया वांचूनि मुक्ती न घडे यज्ञासी ॥ ४ ॥ त्रिकाळ संध्या अर्घ्ये देती सूर्याला ॥ द्विजकुळगुरु जो भास्कर आराधिति त्याला ॥ करितां भक्तिभावें द्वादश नामांला ॥ दामोदर जोडुनि कर शरणागत त्याला ॥ ५ ॥

२६६. चाल—साधी.

सप्तमुखी अतिचपळ रथिं तूझ्या वाजी ॥ पदद्वयविरहित अरुण सारथ्यकाजीं ॥ ऐसा तूं दिनकर बैससि त्यामाजीं ॥ चिंतन करितां तूझें पावसि तूं सहजीं ॥१॥ जय देव जय देव जय श्रीभास्करा ॥ पंचारति ओंवाळूं तुज सहस्त्रकरा ॥ ध्रु० ॥ तमनाशक प्रकाशक छायेचा रमण ॥ प्रातःकाळीं द्विजवर करिती अर्चन ॥ त्यांतें तूं दिन-कर करिसी पावन ॥ महिमा न कळे तूझा तोंडी अज्ञान ॥ जयदेव० ॥ २ ॥ तुजवांचुनियां लोकीं सर्वेहि शून्यता ॥ सकळां सौख्य होतें तव उगम होतां ॥ ब्रह्मा हरिहर हेची तूझी स्वरूपता ॥ शरणागत वासुदेव रक्षीं तूं सविता ॥ जय० ॥ ३ ॥

२६७. चाल—भजनाची.

जय जय जगतमहरणा दिनकर सुखकिरणा ॥ उदयाचल जग-भासक दिनमणि शुभस्मरणा ॥ पद्मासन सुखमूर्ती सुहास्य वर वदना ॥ पद्मकरा वरप्रभ भास्वत सुखसदना ॥ १ ॥ जय देव जय देव जय भास्कर सूर्या ॥ विधिहरिशंकररूपा जय सुरवरवर्या ॥ध्रु०॥

कनकाकृतिरथ एकचक्रांकित तरणी ॥ सप्ताननाश्वभूषित रथिं त्या बैसोनी ॥ योजनसहस्त्र द्वे द्वे शतयोजन दोनी ॥ निमिषार्धें जग क्रमिसी अद्भुत तर-करणी ॥ जय० ॥ २ ॥ जगदुद्भवस्थितिप्रलय करणाद्यरूपा ॥ ब्रह्मपरात्पर पूर्ण तूं अद्वय तद्रूपा ॥ तत्त्वंपदव्यतिरिक्ता अखंडसुखरूपा ॥ अनन्य तव पद मौनी वंदित चिद्रूपा ॥३॥

# आरत्या दत्तात्रेयाच्या



२६८. चाल—साधी.

कृष्णापंचगंगासंगम निजस्थान ॥ चरित्र दाउनि केलें गाणगापुरिं गमन ॥ तेथें भक्तश्रेष्ठ त्रिविक्रमयति जाण ॥ विश्वरूपें तया दिधलें दर्शन ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्गुरु दत्ता ॥ नृसिंह सरस्वति जय विश्वंभरिता ॥ धृ० ॥ वंध्या साठीं वर्षें पुत्रनीधान ॥ मृत ब्राह्मण उठविला तीर्थ शिंपून ॥ वांझ महिषी काढवि दुग्ध दोहोन ॥ अंत्यजवक्रें वदवी निगमागम पूर्ण ॥ जय० ॥ २ ॥ शुष्ककाष्ठीं पल्लव दावुनि लवलाहीं ॥ कुष्ठी ब्राह्मण केला शुद्ध निजदेही ॥ अभिनव महिमा त्याचा वर्णू मी कायी ॥ म्लेंच्छराजा येउनि वंदी श्रीपायीं ॥ जय देव० ॥ ३ ॥ दिपवाळीचे दिवशीं भक्त येउनि ॥ आठहिजण ठेवीती मस्तक श्रीचरणीं ॥ आठहि ग्रामीं भिक्षा केली तद्दीनीं ॥

निमिषमात्रें तंतुक नेला शिवस्थानीं ॥ जय० ॥ ४ ॥ ऐसें चरित्र दावुनि जडमुढ उद्धरिले ॥ भक्तवत्सल ऐसें ब्रीद मिरवीलें ॥ अगाध महिमा म्हणउनि वेदश्रुति बोले ॥ गंगाधरतनय सदा वंदी पाउलें ॥ ५ ॥

२६९. चाल—साधी.

विधिहरिहर सुंदर दिगंबर झाले ॥ अनसूयेचें सत्व पाहावया आले ॥ तेथें तीन बाळक करुनी ठेवीले ॥ दत्त दत्त ऐसें नाम पावले ॥१॥ जय देव जय देव जय दत्तात्रेया ॥ आरती ओंवाळूं तुज देवत्रया ॥ ध्रु० ॥ त्रिदेवांच्या युवती पति मागों आल्या ॥ त्यांसि म्हणे ओळखुनि न्या आपुल्या पतिला ॥ कोमल शब्दें करुनी करुणा भाकील्या ॥ त्यांसीं समजावीतां स्वस्थाना गेल्या ॥ जय० ॥ २ ॥ काशीं स्नान करविरक्षेत्रीं भोजन ॥ मातापूरीं शयन होतें प्रतिदीन ॥ ऐसें हें अघटित सिद्धमहिमान ॥ दास म्हणे हें तों नव्हे सामान्य ॥ ३ ॥

२७०. चाल—संत सनकादिक०

दत्तात्रय अवधूत जनार्दन स्वामी एकनाथ ॥ जनार्दन स्वामी एकनाथ ॥ हीं नामें जे जपती त्यांसी साधे निजस्वार्थ ॥ ध्रु० ॥ अनन्यभावें अखंड जे कां भजती निजभक्त ॥ जे कां भजती निजभक्त ॥ भक्ति देउनी दत्त तयांसी करी सहज मुक्त ॥ दत्ता० ॥ ॥ १ ॥ ठाकुरदासा अनाथ जाणुनि करितो सनाथ ॥ जाणुनि करितो सनाथ ॥ एकपणें विनटला दावी सद्गुरु एकनाथ ॥ दत्ता० ॥ २ ॥

२७१. चाल—आरती भुवनसुंदराची०

आरती दत्तात्रयप्रभुची ॥ करावी सद्भावें त्याची ॥ ध्रु० ॥ श्रीपद-कमला लाजविती ॥ वर्तुल गुल्फ रम्य दिसती ॥ कटिस्थित कौपिन तीं वरती ॥ छाटी अरुणोदय वरि ती ॥ चाल ॥ वर्णूं काय तिची लीळा ॥ हीच प्रसवली, मिष्टान्न बहु, तुष्टचि झाले, ब्रह्म क्षेत्र आणि, वैश्य शुद्रही सेवुनियां जीवी ॥ अभिरुची सेवुनिया० ॥ १ ॥ गुरुवर सुंदर जगजेठी ॥ ज्याचे ब्रह्मांडें पोटीं ॥ माळा सुविलंबित कंठीं ॥

बिंबफळ रम्य वर्ण ओष्ठीं ॥ चाल ॥ अहा ती कुंदरदनशोभा ॥ दंड-कमंडलु, शंखचक्र करिं, गदापद्म धरि, जटामुगुट परि, शोभतसे ज्याची ॥ मनोहर शोभतसे० ॥ २ ॥ रुचिरा सौम्य युग्मदृष्टी ॥ जिनें द्विज तारियेला कुष्ठी ॥ दरिद्रें ब्राह्मण बहु कष्टी ॥ केला तिनेंच संतुष्टी ॥ चाल ॥ दयाळा किती म्हणुनि वर्णूं ॥ वंध्या वृद्धा, तिची सुश्रद्धा, पाहुनि विबुधची, पुत्ररत्न जिस देउनियां सतिची ॥ इच्छा पुरविली मनिंची ॥ ३ ॥ देवा अघटित तव लीला ॥ रजकही चक्रवर्ति केला ॥ दावुनि विश्वरूप मुनिला ॥ द्विजादरशूल पळें हरिला ॥ चाल ॥ दुभविली वांझमहिषि एक ॥ निमिषामाजीं, श्रीशैल्याला, तंतुक नेला, पतिताकरवीं, वेद वदविला, महिमा अशी ज्याची ॥ स्मरा हो महिमा० ॥ ४ ॥ ओळखुनि क्षुद्रभाव चित्तीं ॥ दिधलें पीक अमित शेतीं ॥ भूसुर एक शुष्क वृत्ती ॥ क्षणार्धें धनद तया करिती ॥ चाल ॥ ज्याची अतुल असे करणी ॥ नयन झांकुनी, सवें उघडितां, नेला काशिस, भक्त पाहतां, वार्ता अशि ज्याची ॥ स्मरा हो वार्ता अशि ज्याची ॥ ५ ॥ दयाकुल औदुंबरिं मूर्ती ॥ नमितां होय शांतवृत्ती ॥ न देती जननमरण पुढती ॥ सत्य हें न धरा मनिं भ्रांती ॥ चाल ॥ सनातन सर्वसाक्षि ऐसा ॥ दुस्तर हा भव, निस्तरावया, जाउनि सत्वर, आम्हि सविस्तर, पूजा करूं त्याची ॥ चला हो पूजा करूं त्याची ॥ ६ ॥ तल्लिन होउनि गुरु-चरणीं जोडुनि भक्तराजपाणी ॥ मागे हेंचि जनकजननी ॥ अंतीं ठाव देई चरणीं ॥ चाल ॥ नको मज दुजें आणिक कांहीं ॥ भक्त-वत्सला, दीनदयाळा, परम कृपाळा, श्रीपदकमळा, दास नित्य याचा ॥ उपेक्षा करूं नको साची० ॥ ७ ॥

२७२. चाल–आरती ज्ञानराजा०

जय देवा दत्तराया ॥ स्वामी करुणालया ॥ आरती ओंवाळीन ॥ तूज महाराजया ॥ धृ० ॥ प्रपंचताट करीं ॥ त्रिविधताप निरंजनीं ॥ त्रिगुण शुभ्रवाती ॥ उजळिल्या ज्ञानज्योती ॥ जय० ॥ १ ॥ कल्पना मंत्रपुष्प ॥ भेद दक्षिणा वरी ॥ अहंभाव पूगीफळ ॥ न्यूनपूर्ण सकळ

॥ जय० ॥ २ ॥ श्रीपाद श्रीगुरुनाथा ॥ चरणीं ठेऊनि माथा ॥ विनवीतो दास हरी ॥ अवघा त्रास दूर करीं ॥ जय० ॥ ३ ॥

२७३. चाल—आरति भुवन०

आरती दत्तराजगुरुची ॥ भवभयतारक स्वामीची ॥ धृ०॥ दिगंबर, उग्र ज्याचि मूर्ती ॥ कटीवर छाटि रम्य दिसती ॥ चर्चुनि अंगि सर्व विभुती ॥ कमंडलु धरोनियां हातीं ॥ चाल ॥ पृष्ठीं लोळे जटेचा भार ॥ औदुंबरतळीं, कृष्णेजवळीं, प्रभातकाळीं, वर्णिति भक्त कीर्ति ज्याची ॥ दिगंतरीं वाहे कीर्ति ज्याची ॥ आरती० ॥१॥ अनुसूयेच्या त्वां पोटीं जन्म घेतला जगजेठी ॥ दिव्य तव पादभक्तिसाठीं ॥ जाहली अमित शिष्यदाटी ॥ चाल ॥ राज्यपद दिधलें रजकाला ॥ जो रत जाहला, त्वत्पदकमला, किमपि न ढळला, पाहुनि पूर्ण भक्ति त्याची ॥ अंतीं दिली मुक्ति त्यांची ॥ आरती० ॥ ॥ २ ॥ सती तव प्रताप ऐकोनी ॥ आली पतिशव घेवोनी ॥ जाहली रत ती तव चरणीं ॥ क्षणभंगुर भव मानोनी ॥ चाल ॥ तिजला धर्म त्वांचि कथिला ॥ जी सहगमनीं, जातां आणुनी, तीर्थ शिंपुनी, काया सजिव केलि पतिची ॥ आवड तुज बहु भक्तांची ॥ आरती० ॥ ३ ॥ ऐसा अगाध तव महिमा ॥ नाहीं वर्णाया सीमा ॥ धनाढ्य केला द्विजोत्तमा ॥ दरिद्र हरुनी पुरुषोत्तमा ॥ चाल ॥ नेला तंतुक शिवस्थानीं ॥ वांझ महिषिसी, दुग्ध दोहविसी, प्रेत उठविसी काया बहुत कुष्ठि ज्याची ॥ केली पवित्र ते साची ॥ आरती० ॥ ४ ॥ ठेवुनि मस्तक तव चरणीं ॥ जोडूनि दामोदर पाणी ॥ ऐसी अघटित तव करणी ॥ वर्णू न शके मम वाणी ॥ चाल ॥ अहा हें दिनानाथ स्वामिन् ॥ धांव दयाळा, पूर्ण कृपाळा, श्रीपदकमळा, परिसुनि विनंति दासाची ॥ भक्ति दे त्वत्पदकमलाची ॥ आरती० ॥ ५ ॥

२७४. चाल—साधी.

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ॥ त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ॥ नेती नेती शब्द न ये अनुमाना ॥ सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ॥

आरति ओंवाळितां हरली भवचिंता ॥ घृ० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥ अभाग्यासी कैंची कळेल ही मात ॥ पराही परतली तेथें कैंचा हेत ॥ जन्ममरणाचा ही पुरलासे अंत ॥ जय० ॥ २ ॥ दत्त येऊनीयां ऊभा ठाकला ॥ भावें साष्टांगेसी प्रणिपात केला ॥ प्रसन्न होउनि आशीर्वाद दिधला ॥ जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥ ॥ ३ ॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ॥ हारपलें मन झालें उन्मन ॥ मी तूं पणाची झाली बोळवण ॥ एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥४॥

२७५. चाल—साधी.

जय जय दत्त दिगंबर अत्रिऋषीपुत्रा ॥ अनुसूया निजबालक म्हणविसि जगमित्रा ॥ जगदुद्भवस्थितिप्रलयां कारण आदिसूत्रा ॥ ब्रह्म चिदंबर सुरवरवंद्य तुं सुखवक्त्रा ॥ १ ॥ जय देव जय देव जय दत्तात्रेया ॥ श्रीदत्तात्रेया भवहर वंदित चरणा सद्गुरुवर सदया ॥ घृ० ॥ भक्तिज्ञानविरागास्तव हे सन्मूर्ती ॥ नरसिंहादिक म्हणविसि अपणा सरस्वती ॥ यतिवर वेषा धरुनी रक्षिसि धर्मरिती ॥ दर्शनस्पर्शनबोधें पावन हे जगती ॥ जय देव० ॥ २ ॥ विधिहरिशंकररूपा त्रिगुणात्मकदीपा ॥ सच्चिन्मयसुखरूपा केवळ अरूपा ॥ स्थानत्रय देहत्रय तापत्रकुणपा ॥ विरहित सर्व उपाधी निर्गतभवतापा ॥ जय० ॥ ३ ॥ अगणितप्रलयांबूसम चिद्घन रूप तुझें ॥ बुद्बुदवत जग सर्वहि जगदाभास सुजे ॥ विवर्त सिद्धांतीं हे मृषाचि सर्व दुजें ॥ अद्वैता करिं पावन निर्भय पादरजें ॥ जय० ॥ ४ ॥ अज्ञानांधसमुद्रा करिं शोषण भद्रा ॥ अनादिजीव कुनिद्रा पळविं तुं अमरेंद्रा ॥ निजजनचकोरचंद्रा अवगुणजडतंद्रा ॥ नाशय कुबुद्धि मौनी वंदितपदमुद्रा ॥ जय० ॥ ५ ॥

२७६. चाल—साधी.

देहत्रय अवतारा तापत्रय हरिसी ॥ अक्षय सुख अवदुंबर छाये विचरसी ॥ श्रीकृष्णातटिं राहुनि दासां उद्धरिसी ॥ जडमूढां ताराया अवतार धरिसी ॥ १ ॥ जय जय श्रीदत्तात्रय औदुंबरवासी ॥ मंगल आरति करितों मम भवभय नाशी ॥ धृ० ॥ काय तुझा महिमा

वर्णावा आतां ॥ मारिसि भूतसमंधां सक्रोधें लाता ॥ नानारोग दुर॰ त्यय तव तीर्थ घेतां ॥ पुनरपि श्रवण न ऐकति गदरिपुची वार्ता ॥ जय० ॥ २ ॥ तूझें क्षेत्र मनोहर या अवनीवरती ॥ त्यातें पहातां वाटे स्वर्गासम धरती ॥ आनंदें द्विज भारतपारायण करिती ॥ त्रिकाळ सप्रेमानें करिती आरती ॥ ३ ॥ मी अघसागर तूं हो अगस्तिऋषि देवा ॥ प्राशुनि वारी दे मज त्वत्पदिंचा ठेवा ॥ बाधो ना मज किमपी प्रापंचिक हेवा ॥ दास म्हणे हें बाळक आपुल्या पदिं ठेवा ॥ ४ ॥

२७७. चाल—साधी.

सुखसहिता दुःखरहिता निर्मळ एकांता ॥ कलिमलदहना गहना स्वामी समर्था ॥ न कळे ब्रह्मादिकां अंत अनंता ॥ तो तूं आम्हां सुलभ जय कृपावंता ॥ १ ॥ जय देव जय देव जय करुणाकरा ॥ आरती ओंवाळूं सद्गुरुमाहेरा ॥ धृ० ॥ मायेविण माहेर विश्रांती ठाव ॥ शब्दीं अर्थीं लाव बोलणें वाव ॥ सद्गुरुच्या प्रसादें सुगम ऊपाव ॥ रामीं रामदास फळला सद्भाव ॥ जय० ॥ २ ॥

२७८. चाल—साधी

पतिव्रता सती अनुसूया माता ॥ भक्तीतें पाहुनियां तारिसि अनंता ॥ अत्रिऋषीच्या तपा तुष्टसि भगवंता ॥ इच्छित पुरवित धांवसि हे त्रिगुणातीता ॥ ब्रह्मस्फूर्ती मूर्ती निजभक्तताता ॥ तुझिया प्रसादें कैवल्य हाता ॥ १ ॥ जय देव जय देव दत्तात्रय सिद्धा ॥ आरती ओंवाळूं ॐकारा शुद्धा ॥ धृ० ॥ शंखचक्रगदाकटिसूत्र॰ नागा ॥ दंडकमंडलुडमरू स्वरुपें सदा जागा ॥ जटामुकुट कुंडलें कर्णी शोभत आहे ॥ षट्पाणि द्वयजंघा पदिं जान्हवि वाहे ॥ गौरश्यामश्वेत त्रिशीर विलसत हे ॥ वक्षस्थल कटिप्रदेश अतिशोभित आहे ॥ जय० ॥ २ ॥ धूर्मितलोचन भाळीं त्रिपुंड्र चमकतसे ॥ भस्मोध्दूलन व्याघ्राजिन प्रावर्ण असे ॥ नित्य प्रयागीं स्नान करवीरीं भिक्षा ॥ श्वानासंगें चेष्टसि मातापुरीं दीक्षा ॥ हिंडसि चेष्टसि भेटसि भक्तां प्रत्यक्षा ॥ देउनि शमना अमना उन्मनिच्या साक्षा ॥ जय० ॥ ३ ॥ निखिल ब्रह्म उघड हें विरचत स्वानंदें ॥

प्रवर्तवर्तीछंदें निजपरमानंदें ॥ स्थूलसूक्ष्मसाक्षी तो प्रकट हाची ॥ सुभट झाला झल्लित ज्योती निजज्योती ॥ भक्तप्रेमा मोहासि करिसी साऊली ॥ तुकयासाठीं धांवे वत्सा माउली ॥ जय देव० ॥ ४ ॥

२७९. चाल—चला बाई पांडुरंग०

धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ॥ झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ धृ० ॥ गुरुभजनाचा महिमा नकळे अगमानिगमांसी ॥ अनुभविते जाणति जे गुरुपदिंचे अभिलाषी ॥ धन्य० ॥ १ ॥ पदोपदीं झाल्या अपार पुण्याच्या राशी ॥ सर्वहि तीर्थे घडलीं आम्हां आदिकरुनि काशी ॥ धन्य० ॥ २ ॥ मृदंगतालघोषीं भक्त भावार्थें गाती ॥ नामसंकीर्तनें नित्यनंदें नाचताती ॥ धन्य० ॥ ३ ॥ कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ॥ लोटांगण घालितां मोक्ष लागे पायांत ॥ धन्य० ॥ ४ ॥ प्रदक्षिणा करुनी देहभाव हरवीला ॥ श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ धन्य हे प्रदक्षिणा० ॥ ५ ॥

२८०. चाल—भजनी.

स्वामी नरसिंहसरस्वती ॥ जय गुरुमूर्ती ॥ जय यतिवर्या जय मंगल ॥ धृ० ॥ कामितकामफलश्रुति जय मंगल ॥ निरुपम नित्य निरामय जय मंगल ॥ निर्वाण भक्त यतिराया जय मंगल ॥ स्वामी० ॥ १ ॥ भक्तजनवर कल्पवृक्षा जय मंगल ॥ भक्तदुदयकरणदक्षा जय मंगल ॥ भीमागंधर्वगुरुवेषा जय मंगल ॥ स्वामी० ॥ २ ॥

२८१ चाल—संतसनकादिक भक्त०

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि तारिं तारिं मजला, दयाळा तारिं तारिं मजला ॥ श्रमलों मी या प्रपंचधामीं आलों शरण तुला ॥ धृ० ॥ करितां आटाआटी प्रपंच अवघा दिसलो मिथ्यत्व, अवघा दिसतो मिथ्यत्व ॥ म्हणवुनि भजन तुझें मज देवा भासे सत्यत्व ॥ १ ॥ किंचिन्मात्र कृपा जरि मजवरि करिसि उदार मन, दयाळा करिसि उदार मन ॥ चुकलों मी या विषयसुखाच्या आहारांतुनि जाण ॥२॥ कृष्णातटिं निकटी जो विलसे औदुंबर छायीं, दयाळा औदुंबर छायीं ॥ हंस परात्पर भारतिनायक लीन तुझे पायीं ॥ ३ ॥

२८२. चाल–विडा घ्याहो नारायणा०

विडा घेईं नरहरिराया ॥ धरुनी मानवाची काया ॥ यतिवेष घेउनीयां ॥ वससी दीनांसी ताराया ॥ धृ० ॥ ज्ञान हें पूगीफळ ॥ भक्ती नागवल्लीदळ ॥ वैराग्य चूर्ण विमळ ॥ लवंगा सत्क्रिया सकळ ॥ विडा० ॥ १ ॥ प्रेम रंगीत कात ॥ वेला अष्टभावसहीत ॥ जायफळ क्रोधरहीत ॥ पत्री सर्व भूतहीत ॥ विडा० ॥ २ ॥ खोबरें हेंचि क्षमा ॥ फोडुनि द्वैताच्या बदामा ॥ मनोजय वर्ख हेमा ॥ कापूर हे शांतिनामा ॥ विडा० ॥ ३ ॥ कस्तुरी निरहंकार ॥ न मिळती हे उपचार ॥ भीमापौत्र यास्तव फार ॥ सत्वर देईं वारंवार ॥ विडा घेईं० ॥ ४ ॥

२८३. चाल–आरती ज्ञानराजा०

नृसिंहसरस्वती ॥ मनिं धरुनियां प्रीती ॥ ओंवाळीतों शेजारती अंगीकाराया श्रीपती ॥ धृ० ॥ ब्रह्मा येउनि देव देवा ॥ म्हणे कोण कोण जीवा ॥ उपजवूं कोठें केव्हां ॥ संदेश हा मज व्हावा ॥ नृसिंह० ॥ १ ॥ विष्णुही येऊनीयां ॥ आज्ञा मागे वंदुनीयां ॥ कोण जीवा काय खाया ॥ कैसें देऊं कवणे ठाया ॥ नृसिंह० ॥२॥ येऊनियां महादेव ॥ वंदूनीया पादद्वंद्व ॥ ज्ञान कोणा देउं देवा ॥ आज्ञा करा स्वयमेवा ॥ नृसिंह० ॥ ३ ॥ अंबा म्हणे बाळ यती ॥ फार झाली असे राती ॥ झोंप आली तुजप्रती ॥ भक्त रक्षुनी श्रम होती ॥ नृसिंह० ॥ ॥ ४ ॥ विनविती भक्तवृंद ॥ सेवा घेउनिया छंद ॥ पुरवुनि दे ब्रह्मानंद ॥ भीमापौत्रानंदकंद ॥ नृसिंहसरस्वती० ॥ ५ ॥

२८४. चाल–संत सनकादिक०

आतां स्वामी सुखें निद्रा करा अवधूता, करा अवधूता ॥ चिन्मयसुखधामा जाउनि पहुडा एकांता ॥ धृ० ॥ वैराग्याचा कुंचा घेउनि चौक झाडीला, स्वामी चौक झाडीला ॥ तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला ॥ आतां० ॥ १ ॥ पायघड्या घातल्या सुंदर नवविधाभक्ती, स्वामी नवविधाभक्ती ॥ ज्ञानाच्या समया उजळुनी लावियल्या ज्योती ॥ आतां० ॥ २ ॥ अशातृष्णाकल्पनांचा सांडुनि

गलबला, स्वामी सांडुनि गलबला ॥ दया क्षमा शांती दासी उभ्या सेवेला ॥ आतां० ॥ ३ ॥ द्वैताचें कपाट लाउनी एकत्र केलें, स्वामी एकत्र केलें ॥ दुर्बुद्धीच्या गांठी सोडुनी पडदे सोडीले ॥ आतां० ॥ ४ ॥ भावार्थाचा मंचक हृदयाकाशीं टांगीला, हृदयकाशीं टांगीला ॥ मनाची सुमनें जोडुनी केलें शेजेला ॥ आतां० ॥ ५ ॥ अलक्ष्य उन्मनि घेउनी नाजुक दूशेला, स्वामी नाजुक दूशेला ॥ निरंजनीं सद्गुरु माझा निजीं निजेला ॥ आतां० ॥ ६ ॥

२८५. चाल—संत सनकादिक०

आरती आरती दत्त ओंवाळूं दाता, स्वामी ओंवाळूं दाता ॥ आरतीचें हरण दत्तें केलें तत्त्वतां ॥ घृ० ॥ आरती खुंटली आतां ओंवाळूं कैसें, स्वामी ओंवाळूं कैसें ॥ तरी भजन निरंजनी नित्य होतसे ॥ आरती० ॥ १ ॥ आरतीचे आर्त पुरवीले श्रीदत्तें, पुरवीले श्रीदत्तें ॥ एकाजनार्दनीं सहज ओंवाळीतसे ॥ आरती० ॥ २ ॥

२८६. चाल—साधी.

जय देव जय देव जय जय अवधूता ॥ अगम्यें लीला स्वामी त्रिभुवनिं तुझि सत्ता ॥ घृ० ॥ तूझें दर्शन होतां जाती हीं पापें ॥ स्पर्शनमात्रें विलया जाती भवदुरितें ॥ चरणीं मस्तक ठेउनि मनिं समजा पुरतें ॥ वैकुंठींचें सुख नाहीं यापरतें ॥ जय० ॥ १ ॥ सुगंध-केशर भाळीं वर टोपीटीळा ॥ कर्णिं कुंडलें शोभति वक्षःस्थळिं माळा ॥ शरणागत तुज होतां भय पडलें काळा ॥ तुझे दास करिती सेवासोहाळा ॥ २ ॥ मानवरूपी काया दिससी आम्हांस ॥ अक्कलकोटीं केला यतिवेषें वास ॥ पूर्णब्रह्म तोची अवतरला खास ॥ अज्ञानी जीवांस विपरित हा भास ॥ जय० ॥३॥ निर्गुण निर्विकार विश्वव्यापक ॥ स्थिरचर व्यापुनि अवघा उरलासी एक ॥ अनंत रूपें धरिसी करणें मायीक ॥ तूझे गुण वर्णितां थकले विधिलेख ॥ ४ ॥ घडतां अनंतजन्मसुकृत हें गांठीं ॥ त्याची ही फलप्राप्ती सद्गुरुची भेटी ॥ सुवर्णतार्टी भरली अमृतरसवाटीं ॥ शरणागत दासावरि करीं कृपादृष्टी ॥ ५ ॥

२८७ चाल—पंचतुंड नर०

अनुसूयासुत, दत्तदिगंबर त्रिगुणरहित, तव चरणांतें ॥ पंचारति ही करुनी भावें अर्पि काय पदकमलांतें ॥ ध्रु० ॥ शांतिरूपी सेना दाउनियां पुनित केलें भारतितें ॥ काष्ठा फुलवुनी दुग्ध दोहविसी निमिषीं वंध्ये महिषीतें ॥ ऐसा तव महिमा पाहुनियां, मोहियलें मज तव चरितें ॥ म्हणुनी शरणागत रुक्मिणिसुत तारीं या तव दासातें ॥ १ ॥

२८८. चाल—काय मला भूल पडली०

जयजयजी दत्तराज भो दिगंबरा ॥ पंचारति करितों तुज तारिं किंकरा ॥ ध्रु० ॥ त्रिगुणात्मक रूप तुझें केंवि शोभलें ॥ शुद्ध कांति तेजें रविशशिही लोपले ॥ शरणागत भाविक नर बहुत तारिले ॥ संकटिं मज पाव विभो देई आसरा ॥ १ ॥ अघसंचित दोषें चौऱ्यांशिं हिंडलों ॥ कवण योगसामर्थ्यें देहि पातलों ॥ धांव आतां दुःखें बहु पिडित जाहलों ॥ अभयवरें विठ्ठलसुत रक्षिं भवहरा ॥२॥

२८९. चाल—नृपतनयेवर०

जयजयजी श्रीदत्तराज ही पंचारति मी तव चरणा ॥ तनमन अर्पूनि प्रेमानंदें करितों आजी सुखसदना ॥ ध्रु० ॥ अधम पातकी सत्य मी जनीं ॥ क्षणिक सौख्य तें, नित्य मानुनी ॥ विषयिं गुंतलों मोहकाननीं ॥ मुक्त करि प्रभो, सदय होउनी ॥ बाळकृष्ण विठ्ठल दीना ॥ सुखकर होई भवहरणा ॥ १ ॥

२९०. चाल—अष्टमूर्तिपरमेश०

जय श्रीदत्ता आरती तुजला करितों मी भावें ॥ मंदमती हा पातकि परि तव दर्शन मज द्यावें ॥ ध्रु० ॥ अनाथ आम्ही अधम पातकी नकळे हित आपुलें ॥ क्षणिक सुखातें नित्य मानुनी मन विषयीं रमलें ॥ धनमानादिक संचित करणें सार्थक हें गमलें ॥ अति गहन या मोहविपिनीं चित्त सुचिर भ्रमलें ॥ यांतुन दत्ता योगी जन ते तव नामें तरलें ॥ विठ्ठलात्मज विनवितसे मज भवनदी उतरावें ॥ १ ॥

२९१. चाल—बलसागर तुम्ही०

आरति ओंवाळितों जय जय दिगंबरा दत्ता ॥ मंदमतीं मी पातकी देवा तारीं मज आतां ॥ ध्रु० ॥ दंडकमंडलु हस्तीं शोभव तुझिया गुरुनाथा ॥ पापी जन हे बहु उद्धरले गूण तुझे गातां ॥ १ ॥ ध्यानीं आणुनि तुजला दत्ता रूप तुझें पाहतां ॥ आनंदानें तल्लिन होतें मन माझें आतां ॥ २ ॥ दत्त दत्त हें वदनिं नित्यही नाम तुझें घेतां ॥ भवसागरिं तूं तारिशी त्यातें शरण तुला जातां ॥ ३ ॥ कृष्णातिरिंच्या कुरवपुरीं तूं वससी गुणवंता ॥ दर्शनमात्रें तरती प्राणी हरिशी भवाचिंता ॥ ४ ॥ इच्छा मनिंची पूर्णकरिशि बा तूंची गुरुदत्ता ॥ हरि तव चरणीं लीन सर्वदा रक्षी गुरुनाथा ॥ ५ ॥

२९२. चाल—अवतार गोकुळीं हो,

जय देवा दत्तराया ॥ स्वामी करुणालया ॥ आरती ओंवाळीन ॥ तूज महाराजया ॥ ध्रु० ॥ प्रपंचताट करीं त्रिविधताप निरंजनी ॥ त्रिगूण शुभ्रवाती ॥ उजाळिल्या ज्ञानज्योती ॥ १ ॥ कल्पना मंत्र-पुष्प ॥ भेददक्षिणा वरी ॥ अहंभाव पूगीफल ॥ न्यून पूर्ण सकळ ॥ २ ॥ श्रीपाद श्रीगुरुनाथा ॥ चरणीं ठेवूनि माथा ॥ विनवितो दास हरी ॥ अवघा त्रास दूर करीं ॥ ३ ॥ जय देवा० ॥

२९३. चाल—पंचतुंड नररुंड०

दत्त दिगंबर त्रिमूर्ति सुंदर अनुसूयासुत तुज म्हणती ॥ आरति ओंवाळितां तरले असंख्यजन हे मूढमती ॥ ध्रु० ॥ जग ताराया हरि हर ब्रह्मा त्रिमूर्तिरूपें अवतरती । दंडकमंडलु हस्तीं धरुनी काषायांबर पांघरती ॥ १ ॥ कुष्ठी ब्राह्मण शुद्ध करूनी वंध्ये पुत्र देताती ॥ मृत ब्राह्मणही उठविसि तीर्थें काष्ठीं पल्लव फुटताती ॥ २ ॥ दत्त दत्त हें नाम स्मरतां पिशाच्च भूतें झणिं पळती ॥ गाणगाभुवनीं गुप्त राहुनियां अघटित लीला दाखविती ॥ ३ ॥ महिमा काय वर्णुं किति मी भक्तवत्सल तुज म्हणती ॥ मोरेश्वरसुत वासुदेव या अखंड भजना देईं प्रीती ॥ ४ ॥

२९४. चाल—आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म.

आरती ओंवाळूं श्री गुरु त्रैमूर्तीरूपा ॥ सद्भावें पूजितां पावसि वारुनि हृत्तापा ॥ धृ० ॥ स्वरूप गुरूचें वर्णन करण्या मति नाहीं मजला ॥ पाय तुमचे श्रीगुरुदत्ता लाजविति कमळा ॥ वर्तुळ गुल्फ सुंदर रम्य दिसती नेत्रांला ॥ कटिस्थित ती कौपिन शोभे अघटित गुरुलीला ॥ १ ॥ अरुणोदयसम छाटि शोभवि श्रीगुरुमूर्तीला ॥ हीच प्रसवली मिष्ट अन्न बहु कौतुक सर्वांला ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रही तुष्टविलें त्यांला ॥ अतृप्त ऐसा कोणी प्राणी ग्रामिं नाहिं उरला ॥ २ ॥ दंडकमंडलु शंख चक्र आणि पद्म गदा हस्तीं ॥ जटा मुकुट मस्तकीं कंठीं माळा शोभती ॥ कुंदरदन हे बिंबफळासम ओष्ठ विलसती ॥ ऐसी श्रीगुरु त्रैमूर्तींची अति सुंदर मूर्ती ॥ ३ ॥ नवस करूनी धनकरि वेगें उदिमाप्रति गेला ॥ तव कृपेनें उदीम वाढुनि लाभ तया झाला ॥ परतुनि येतां द्रव्याशेनें तस्करिं वधियेला ॥ संकट जाणुनि वधुनि तस्करां उठवीलें त्याला ॥ ४ ॥ अन्न भक्षितां विप्रापोटीं चाळविला शूळ ॥ दुःखें तळमळ करुनि प्राण त्यागी दुर्बळ ॥ आपणा जवळी आणविसी तूं द्रवुनी दयाळ ॥ अन्नचि औषध देउनि शूळा हरिसी तत्काळ ॥ ५ ॥ संततिसाठीं वंध्या नारी प्रार्थितसे तुजला ॥ कन्या पुत्र देउनि तीनें हरिसी दुःखाला ॥ श्वेत कुष्ठि तो ब्राह्मण धांवत स्वामिपुढें आला ॥ शुष्क काष्ठद्रुम निर्मुनि निर्मळ करिशी तयाला ॥ ६ ॥ कोल्हापुरिचा द्विज पुत्र तो अज्ञ अपवित्र ॥ जिव्हा छेदुनि भुवनेश्वरिसी स्तवित अहोरात्र ॥ चौदा विद्या देउनि त्यातें करिसी सुपवित्र ॥ त्रैमूर्तींचा महिमा अपार अघटित गुरुसूत्र ॥ ७ ॥ त्रिविक्रमानें दांभिक म्हणुनी केली तव निंदा ॥ विश्वरूप या दाउनि गर्व हरिला गोविंदा ॥ पतितामुखिं तूं सामर्थ्यानें बोलविशि वेदां ॥ वांझ माहिषिला दोहुनियां तूं प्राशियलें दुग्धा ॥ ८ ॥ दिपवाळीचे दिवशीं स्वामी अष्टरूप होशी ॥ अष्टगृहांसी जाउनि प्रेमें भिक्षा तूं घेशी ॥ गाणगापुरिचा शूद्र स्तवितां प्रसन्न तूं होशी ॥ शेतीं त्याच्या सहस्रपटीनें धान्यपीक देशी ॥ ९ ॥ ऐसा अपार गुरुमहिमा हा वर्णूं मी कैसा ॥ भक्तरक्षणा अवतरलासी श्रीगुरु

सर्वेशा ॥ नरहरि दत्ता स्वामी समर्था पावे जगदीशा ॥ मोरेश्वर सुत वासुदेव दिन तारीं या दासा आरती ओंवाळूं० ॥ १० ॥

२९५. चाल– येई हो विठ्ठले माझे माउलीये

ओंवाळूं आरती श्रीगुरुराज स्वामीया ॥ भक्तांतें पावसी करुनी कृपेची छाया ॥ धृ० ॥ मदांध होउनि आलों तव चरण पाहाया ॥ १ ॥ तारुनि शरणांगता ठाय देईं निजचरणीं ॥ हेंच मागणें श्रीगुरु तुजला जोडुनियां पाणी ॥ २ ॥ कामक्रोधादिक हे शत्रु पीडिति बहु मजला ॥ वारुनि त्यांतें रक्षीं मातें आपुल्या सेवेला ॥ ३ ॥ मोरेश्वरसुत वसुदेव हा तत्पर सेवेसीं ॥ श्रीगुरुदत्ता स्वामि समर्था तारीं दासासी ॥ ४ ॥

२९६. चाल– येई हो विठ्ठले माझे माउलिये

येईं वा नरहरीदत्ता गाणगापुरवासी ॥ भक्तीभावें सेवा करितां पावसि भक्तांसी ॥ धृ० ॥ महिमा कितीक वर्णूं मी तरी पामर मतिहीन ॥ सेवेकरितां चरणीं आलों निरसीं अज्ञान ॥ १ ॥ नानारोग दुरितें जाती घेतां तव तीर्थ ॥ प्रपंच टाकुनि साधायासी आलों परमार्थ ॥ २ ॥ सेवक मी गुरुराया तुमचा शरणांगत चरणीं ॥ जिवन्मुक्त व्हावया तत्व उपदेशीं कर्णीं ॥ ३ ॥ मोरेश्वर-सुत वासुदेव हा स्वामीगुण गाई ॥ निश्चय माझा राहो देवा अखंड गुरुपायीं ॥ ४ ॥

२९७. चाल–येई हो विठ्ठले माझे माउलिये

आरती ओंवाळूं श्रीगुरु दत्तराज स्वामी ॥ शरण आलों तुला देवा भक्तीनें हा मी ॥ धृ० ॥ तारीं तारीं स्वामी आतां बुडतों भवडोहीं ॥ अहंभाव जाळुनि मातें कृपेनें पाहीं ॥ १ ॥ शुद्धभाव देऊनि मजला लावीं तव भजनीं ॥ प्रपंची त्रासलों यांतुनि काढावें झणी ॥ २ ॥ तवगुणलीला नित्यनिरंतर ऐकावी श्रवणीं ॥ हाची वर मजला द्यावा श्रीगुरुमूर्तीनीं ॥ ३ ॥ मोरेश्वरसुत वासुदेव हा करितो तव सेवा ॥ स्वामि समर्था देईं यासी भक्तीचा ठेवा ॥ ४ ॥

२९८. चाल—सुंदर मुख तुंदिल तनु.

जयजय श्रीदत्तगुरु आरती तुला ॥ ओंवाळित प्रेमभरें तारि तूं मला ॥ ध्रु० ॥ तव भजनीं मग्न सदा तारि पामरा ॥ दुष्ट जनां दंड करूनि मज रक्षि मन बरा ॥ पाप लया नेइं जसें अग्नि कर्पुरा ॥ हारी ॥ वारी ॥ तारी ॥ जगतरणा ॥ ह्या शरणा ॥ वारि करुणा ॥ करि सुनिर्मला ॥ ज० ॥ ॥ १ ॥ बाळकृष्ण कवि तुजला विनति ही करी ॥ सद्गुरु तव दर्शन मज देइं झडकरी ॥ इच्छा मम हीच असे पूर्ण ती करीं ॥ धावें ॥ यावें ॥ पावें ॥ करुनि त्वरा ॥ भक्तवरा ॥ मुक्त करा ॥ भो प्रभो मला ॥ ज० ॥ २ ॥

२९९. चाल—काय मला भूल पडली०

जयजयजी दत्तराज भो दिगंबरा ॥ पंचारति करितों तुज तारिं किंकरा ॥ ध्रु० ॥ त्रिगुणात्मक रूप तुझें केंवि शोभलें ॥ शुद्ध कांति तेजें रविशशिहि लोपले ॥ शरणागत भाविक नर बहुत तारिले ॥ संकटिं मज पाव विभा देइं आसरा ॥ जय० ॥ १ ॥ अघसंचित दोषें चौऱ्यांशि हिंडलों ॥ कवण योग सामर्थ्यें देहिं पातलों ॥ धांव आतां दुःखें बहु पिडित जाहलों ॥ अभयवरें विठ्ठलसुत रक्षिं भवहरा ॥ जयजयजी दत्त० ॥ २ ॥

# आरत्या नरसिंहाच्या

३००. चाल—साधी.

कडकडिला स्तंभ गडगडिलें गगन ॥ अवनी होत आहे कंपायमान ॥ तडतडलीं नक्षत्रें पडताती जाण ॥ उग्ररूपें प्रगटे तो सिंहवदन ॥ १ ॥ जय देव जय देव जय नरहरिराया ॥ आरती ओंवाळूं

महाराजवर्या ॥ धृ० ॥ एकविस स्वर्गमाळा डळमळली कैसी ॥ ब्रह्मयाच्या वाटे अभिनव चित्तासी ॥ चंद्रसूर्य दोन्ही लोपती प्रकाशीं ॥ कैलासीं शंकर दचके मानसीं ॥ जय० ॥ २ ॥ थरथरती त्या जटा जिव्हा लळलाळित ॥ तीक्ष्ण नखें तो दैत्य विदारीत ॥ अर्धांगी कमलजा शिरिं छाया धरित ॥ माधवदासा स्वामी नरहरि शोभत ॥ जय देव आरती० ॥ ३ ॥

२०१. चाल—साधी.

कडकडकडशब्दें स्तंभहि कडकला ॥ नरहरि तव रव दुर्धर भयानकी उठिला ॥ थरथर कंपित धरणी दिग्गज पळ सुटला ॥ तडतडि अंडकटाह मेरुहि डगडगिला ॥१॥ जय देव जय देव जय नरहरि विष्णो, श्रीनरहरि विष्णो ॥ निजभक्तां सुखकारी, असुरांतें भयकारी प्रसीद प्रभाविष्णो ॥ धृ० ॥ जनकें प्रल्हादासी अति पीडा करितां ॥ प्रकटसि भक्तकृपाळु स्तंभिंच अवचीता ॥ स्थावर-जंगमव्यापक समान जी समता ॥ वेदप्रणीत दाविसि सत्याचि ब्रह्म तता ॥ जय० ॥ २ ॥ जडतनुत्रयाद्यहं जडहिरण्यकशिपूला ॥ संधिनखें विदारुनि दुर्घट मारियला ॥ प्रसन्न सम्यग्ज्ञानें निजप्रल्हादाला ॥ अमरचि करिसी मौनी वंदित चरणाला ॥ जय देव० ॥३॥

२०२. चाल—व्यर्थ आम्ही अबला

आरति ही तुजला नरहरी ॥ आरति ही० ॥ धृ० ॥ प्रेमानंदें करितों आजी ॥ तारीं दीनाला ॥ नरहरी० ॥१॥ प्रल्हादातें छळितां प्रगटसि ॥ फोडुनि स्तंभाला ॥ नरहरी० ॥ २ ॥ स्थावर जंगम व्यापक आहे ॥ दाविसि हें रिपुला ॥ नरहरी० ॥३॥ कनककशिपु वधुनि सत्वरीं ॥ तारिसि दासाला ॥ नरहरी० ॥ ४ ॥ विठ्ठलसुत बलवत्कवि विनवी ॥ रक्षिं विभो मजला ॥ नरहरी० ॥ ५ ॥

# आरत्या परशुरामाच्या

२०३. चाल—साधी.

जमदग्नीकुळभूषण मुक्ताफळदशना ॥ अतिसज्जन मनमोहन रजनीकरवदना ॥ अगणित महिमा तूझा न कळे सुरगणा ॥ वदतां कंठीं वाणी सरसीरुहनयना ॥१॥ जय राम श्रीराम जय भार्गवरामा नीरांजन करुं तुजला परिपूर्णकामा ॥ ध्रु० ॥ सह्याद्रिगिरिशिखरीं शर घेउनि येसी ॥ सोडुनि शर पळवीसी पश्चिमजलधीसी ॥ तुज सम रणधीर जगीं न पडे दृष्टीसी ॥ प्रताप थोर तूझा नकळे कवणासी ॥ जय० ॥ २ ॥ तव कोप बहू पापी बाणें संहारी ॥ दानवदहन करोनि वससी गिरिशिखरीं ॥ क्षत्रिय मारुनि अवनी केली निर्वैरी ॥ सात्विक राजस तामस त्रिगुणां उद्धरी ॥ जय० ॥ ३ ॥ दृढ भावें तव वंदन करिती जे चरणीं ॥ त्यांतें भवभय नाहीं जंववरि शशितरणी ॥ शर मारुनि उद्धविली गंगा जनतरणी ॥ चिंतामणि शरणागत निश्चित तव चरणीं ॥ जय राम श्रीराम० ॥ ४ ॥

२०४. चाल—साधी.

जय जय जय जमदग्निज भृगुकुलकुमुदविधो ॥ अवलोकय नीरांजनमगणितगुणसिंधो ॥ ध्रु० ॥ पितुरपराधविधायिनि हैहय भूमिपतो ॥ आवहतात्क्रुधमचिराद्भवता यदि ह मतौ ॥ क्षितिरक्षात्रियनिवहाऽक्रियतेयं समितो ॥ तत्र हि पार्श्वचहायौ स्वभुजावेव मतौ ॥ जय० ॥ १ ॥ क्काभिजनो वा क्क तपः क्क च संगरवार्ता ॥ क्क दया क्कारिवधूनां क्षितिरार्तववार्ता ॥ ननु पितृचरणपरायणधर्मावनकर्ता ॥ युक्तं तदपि यदासीः किल नृपमदहर्ता ॥ जय० ॥ २ ॥ इष्टं नानायोगैः पर्यटिता च रसा ॥ दत्ता च दक्षिणायै ऋत्विग्भ्यस्तरसा ॥ इत्यखिला च कृतिस्ते भगवन्निह सुरसा ॥ तद्रामनो नमेति शुभपदयुगुलं शिरसा ॥ जय देव० ॥ ३ ॥

# आरत्या श्रीगुरूच्या

३०५. चाल—साधी.

स्वानुभवें भवतारक जय सद्गुरु मौनी ॥ वेदप्रणीत निजगुजरहस्य प्रकटोनी ॥ मृगजलवत जग मिथ्या सर्वहि निरसोनी ॥ स्वानंदामृत चिन्मय प्रकटसि हृद्भुवनीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्गुरु मौनी, श्रीसद्गुरु मौनी ॥ डुल्लसि ब्रह्मानंदें अतिप्रेमें करुनी ॥धृ०॥ अखंड परमानंदचि विसरुनि हे प्राणी ॥ अविवेकें अपणातें जीवचि मानोनी ॥ विषवत विषयसुखातें सुख हें कल्पोनी ॥ पावति अति दुःखचि ते हिंडति बहु योनी ॥ २ ॥ दुर्लभ दुर्लभ त्यांतहि पुण्यकृत कोणीं ॥ वैराग्याद्यधिकारी भाविक वरदानी ॥ तत्तत्कर्तास्तव तूं सगुणाकृति धरुनी ॥ त्या त्या स्थळासि जाउनि तारिसि ते प्राणी ॥ ३ ॥ दृढतर वैराग्यानें विषयेच्छा हरिली ॥ प्रपंच निरसुनि बुद्धी स्वरुपीं मेळविली ॥ देहद्वाराशीं नश्वर नगरी हे त्याजिली ॥ रघुनाथीं गुरुचरणीं भगवन्मति रमली ॥ ४ ॥ त्वंपदतत्पदसाक्षी सन्मय सुख-राशी ॥ अंतरबाहेर सर्वहि व्यापुनि तूं असती ॥ विरहितगुरुभक्ती जे त्यांतें नाढळसी ॥ लक्ष्मण वंदित आत्मा अभेदचरणांसी ॥ ५ ॥

३०६. चाल—आरती ज्ञानराजा०

आरती सद्गुरुची ॥ सुखकल्पतरूची ॥ सच्चिदानंदनामें ॥ गातां अतर्क्य रूची ॥ धृ० ॥ चिच्छक्ति सत्व झालें ॥ ज्ञान प्रत्यया आलें ॥ सत्पदात्माचि तेव्हां ॥ नाम चित्पद केलें ॥१॥ इंद्रियां विश्वगम्य ॥ रजतमही शम्य ॥ सत्पदीं भासताहे ॥ दोरी भुजगोपम ॥ २ ॥ सत्व हें उपनेत्र ॥ त्यागें पाहती नेत्र ॥ पाहणें नेत्रधर्मे ॥ हा उपनेत्र हेतु मात्र ॥ ३ ॥ सत्पद अधिष्ठान ॥ तेंची चित्पदज्ञान ॥ उठतां ज्ञानशक्ति ॥ नसे वस्तूची आन ॥ ४ ॥ शर्करा शुभ्र साची ॥ गोडी चाखतां तीची ॥ वस्तूसी बोध नाहीं ॥ रीति अनुभवाची ॥५॥ दृष्टीसी शुभ्ररूप ॥ गोड नसतें तूप ॥ सच्चिदानंद

तीन्ही ॥ पिंड एक स्वरूप ॥ ६ ॥ सुषुप्तीमाजीं ऊरे ॥ नित्यसूख तें स्फूरे ॥ लाभ तो बोलवेना ॥ जेथें मन ही मुरे ॥ ७ ॥ मृगास जल भेटे ॥ सूख विषयीं वाटे ॥ विषय मृगजल ॥ ऊर धांवतां फुटे ॥ ८ ॥ इंद्रिया भोग लाहो ॥ दोहीं तरंग देहो ॥ दोहींत अंत्य वस्तू ॥ तेचि आनंद डोहो ॥ ९ ॥ श्रीगुरू स्वात्मयोगी ॥ तो चित्स्वरूपा भोगी ॥ वामन भाग्यवंत ॥ अनुभवी या जगीं ॥ १० ॥

३०७. चाल–साधी.

देहत्रय नीरसीतां चिन्मय जें उरलें ॥ तें मी ऐसें तुझिया वचनें जाणवलें ॥ पांचाच्या अन्वयें अवघें समरसलें ॥ ज्ञानादि त्रिपुटीचें भानहि मावळलें ॥ १ ॥ जय देव जय देव जय सदुगुरुनाथा ॥ तव पददर्शनमात्रें हरली भवव्यथा ॥ धृ० ॥ आहे नाहीं पण या विरहित मी साचा ॥ माझ्या ठायीं व्यापक स्थितिलय विश्वाचा ॥ तेथें भेदाभेद मायिक तो कैंचा ॥ घडला अनुभव ऐसा प्रकार स्वामीचा ॥२॥ जें कांहीं बोलणें जललहरिप्राय ॥ त्याहुनि वर भिन्नत्वें विनवावें काय ॥ आतां मौन्यें तूझे वंदावे पाय ॥ गोसावीनंदन सहजचि चिन्मय ॥ जय० ॥ ३ ॥

३०८. चाल–आरती ज्ञानराजा.

जय देवा गुरुराया ॥ ब्रह्मानंद हे आचार्य ॥ आरती ओंवाळीतों ॥ स्वामी रघुराया ॥ धृ० ॥ अज्ञानभ्रांतियोगें ॥ जगीं लोपलें ज्ञान ॥ प्रकटोनि जनस्थानीं ॥ करुनि अज्ञानखंडन ॥ अधिकारी शिष्यजीव ॥ करि ब्रह्मपरिपूर्ण ॥१॥ तत्वंपदजीवेशांची ॥ छेदुनि वाच्यांश उपाधी ॥ लक्ष्यार्थी साक्षिबोधें ॥ करिसि ऐक्य असिपदीं ॥ अखंड स्वस्वरूपीं ॥ स्थापिसी तूं परमानंदीं ॥ २ ॥ जगद्भ्रमविवर्तांचें ॥ अधिष्ठान तूं साचार ॥ अनंतब्रह्मांडांचे ॥ खालीं मध्यें आणि वर ॥ मौनी म्हणे तूंची सर्व ॥ रामा व्यापक निर्धार ॥ जय० ॥ ३ ॥

३०९. चाल-आरती ज्ञानराजा.

आरती सद्गुरूची ॥ सुखकल्पतरूची ॥ सच्चिदानंदनामें ॥ गातां अतर्क्य रूपी ॥ धृ० ॥ देह हा सात वीति ॥ ते मी ऐसी प्रतीती ॥ नसोनि विश्वकर्ता ॥ दावी करुणामूर्ती ॥१॥ देहात्मबुद्धि खोटी ॥ नासोनियां कोटि कोटी ॥ ब्रह्मांड रचना हे दावी माझिये पोटीं ॥२॥ संन्यासरूप देवें ॥ धरिले वासुदेवें ॥ गुरुत्वें उद्धरीलें ॥ तया देवाधिदेवें ॥ ३ ॥ ज्या मनें आठवीतों ॥ मन तेंही तोची होतो ॥ मी करूं काय आतां ॥ माझें मीपणही तो ॥ ४ ॥ वामनें बुद्धिदेहीं ॥ देहापवढी तेही ॥ स्वानंदसिंधु केली ॥ जेथें दैव नुरे कांहीं ॥ ५ ॥

३१०. चाल-संत सनकादिक भक्त०

शांतीकल्याण सहजानंद आरती, सहजानंद आरती ॥ अखंड ओंवाळूं कृष्णा कैवल्यपती ॥ १ ॥ आरती रे माझ्या प्राणवल्लभा, माझ्या प्राणवल्लभा ॥ जिकडे पहावा तिकडे अवघा सद्गुरु ऊभा ॥ धृ० ॥ अलक्ष्याचें लक्ष्य तेथें कैचें लक्षण, कैचें लक्षण ॥ सद्गुरुची आरत न कळे जन ॥ २ ॥ नित्य हरिकथा नित्यानंद दिपवाळी ॥ नित्य गणेशदास नीरांजन ओवाळी ॥ ३ ॥

३११. चाल-साधी.

ब्रह्मानंद सुखाचा तूं कंद बापा ॥ भावातीता हरसी दासत्रयतापा ॥ अगाध महिमा तूंझा कोण करी मापा ॥ मंगळधामा रामा सद्गुरु निष्पापा ॥ १ ॥ जय देव जय देव जय आलक्ष्य लक्ष्या ॥ जय गुरुराज दयाघन विश्वांतर साक्षा ॥ धृ० ॥ होउनि सकृप मूर्धां तूं हातीं धरिसी ॥ अघनग भस्म करोनी त्यांतें उद्धरिसी ॥ स्पर्शुनि मस्तकिं पाणी त्यां ब्रह्म करिसी ॥ आत्मस्वरुपा दाविसि होउनियां अरसी ॥ २ ॥ अग्नी काष्ठां देतो अपुलें रूप जसे ॥ आपण करितां प्रेमें शिष्यांलागि तसें ॥ शिष्यांचे तव स्मरणें भवभय नासतसे ॥ सदैव ब्रह्मस्वरूपी होउनि राहतसे ॥ ३ ॥ ऐसा तूं गुरुराया विश्वाचा दाता ॥ सकृप होउनि कळवी मजला वेदांता ॥ महा·

राजा अजुनी तरि अंत किती पाहतां ॥ दास म्हणे मी बुडतों काढि धरुनि हाता ॥ जय० ॥ ४ ॥

३१२. चाल—साधी.

मनवाणीचा प्रवेश त्वद्रूपीं नाहीं ॥ फणिवर श्रुति बोले ना ज्यापरतें कांहीं ॥ सच्चित्तत्वं पद हे रतिघटना नाहीं ॥ अत्यानंदातितसुख चिद्गगनीं पाहीं ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्गुरुनाथा ॥ स्तुति करितां शिणल्या तव निगमागमगाथा ॥ धृ० ॥ हिमकर बहुतापापह वरि तुलना नाहीं ॥ दिनकर कुलवर कोटी तेजासम नाहीं ॥ जगदाभासाबोधें मोडुनि लवलाहीं ॥ शून्यांती तन्मयमन मुनि ध्याती कांहीं ॥ २ ॥ लवपल जनमन जडलें जरि कां तव नामीं ॥ अत्यद्भुत करणी शुचि होतों बहुकामीं ॥ कळतें शुद्ध निरंजन निर्मळ जो तो मी ॥ मुळमायातित होउनि राहे निजधामीं ॥ ३ ॥ तो महिमा पाहाते पण टाकुनि निजनयनी ॥ पाहुनि तन्मय राहे सच्चिद्धनगगनीं ॥ अद्वय ब्रह्मानंदामृत प्राशन करुनी ॥ नारायण वंदन करि सद्गुरुच्या चरणीं ॥ ४ ॥

३१३ चाल—संत सनकादिक०

सगुण हे आरती निर्गुण ओंवाळूं ॥ कल्पनेचें घृत घालूं दीप पाजळूं ॥ १ ॥ ओंवाळूं आरती सद्गुरुनाथा, श्रीगुरुनाथा ॥ भावें चरणकमळावरी ठेविला माथा ॥ धृ० ॥ अविद्येचा मोह पडला उपडोनी सांडू ॥ आशा मनशा तृष्णा काम क्रोध कुरवंडूं ॥ २ ॥ सद्गुरूचें पूजन केलें षोडशोपचारीं ॥ रामानंद जीवन्मुक्त झाला संसारीं ॥ ओंवाळूं आरती० ॥ ३ ॥

३१४. चाल—साधी

दावुनि साक्षी अंतरिं भवभय छेदीलें ॥ कारण भेदुनि करणां चरणीं वेधीलें ॥ सर्वहि चिन्मय निश्चल या रीतिं बोधीलें ॥ वेधाबोधापरते घनमंडल दीलें ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्गुरुनाथा ॥ आरति आरत तव पदिं ठेवूं निजमाथा ॥ धृ० ॥ समता

देऊनि ममता माया निरसीली ॥ सबाह्य अभ्यंतरिं ही संवित् प्रगटली ॥ अलभ्यलाभें देहबुद्धी निवटीली ॥ द्वैताद्वैतापरती निजप्राप्ती दिधली ॥ जय० ॥ २ ॥ त्रिपुटी ग्रासुनि लावुनि मुळानुसंधाना ॥ प्रेमानंदे दिधलें समाधिव्युत्थाना ॥ उदयो अस्त दोनी गेलेऽस्तमाना केशवयोगी भोगी निजात्ममहिमाना ॥ जय देव० ॥ ३ ॥

३१५. चाल—संत सनकादिक भक्त०

वेदां शास्त्रां आणि अठरा पुराणां ॥ सद्गुरुची आरती न कळे जना ॥ १ ॥ नवल गुरुरायाची धन्य आरती ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र जय जय म्हणती ॥ धृ० ॥ सिद्ध मुनि ऋषी तटस्थ पाहती ॥ न कळे न कळे ऐसें आम्हां बोलती ॥ २ ॥ रमावल्लभदासीं अलभ्य प्राप्ती ॥ सकळीक मिळोनि जय जय कारे गर्जती ॥ ३ ॥

३१६. चाल—साधी.

दीननाथ दीनबंधु दयाळा ॥ पतितोद्धारकब्रीदा भक्तवत्सला ॥ शरण येती त्याला आनंदें वेळा ॥ परब्रह्मसूख देसी प्रेमळा ॥ १ ॥ जय देव जय देव स्वामी समर्था ॥ आरती ओंवाळूं तव चरणीं माथा धृ० ॥ तुजवांचुनि कोणी नाहीं आम्हांसी ॥ माता पिता बंधु मित्र तूं होसी ॥ उरोसीचे तीरीं सज्जनगिरिवासी ॥ भावें लक्षूं जातां भवपार करिसी ॥ २ ॥

३१७. चाल—संत सनकादिक भक्त०

ब्रह्माविष्णुहरादिक मानसीं ध्याती, मानसीं ध्याती ॥ सुरवर किन्नर नारद तुंबर कीर्तनीं गाती ॥ १ ॥ जय जय आरती श्रीगुरु-स्वामी समर्था, दयाळा स्वामी समर्था ॥ कायावाचाजीवें भावें ओंवाळिन आतां ॥ ध्रु० ॥ अगम निगम शेष स्तवितां मंदली मती, स्तवितां मंदली मती ॥ तो तूं आम्हां पूर्णकामा मानवां प्राप्ती ॥२॥ सुरवर मुनिवर किन्नर देवा तुझे स्थापीले, देवा तुझे स्थापीले ॥ षड्दर्शनमित्तगुमानिपंथ चालिले ॥ ३ ॥ अपरंपरा परात्परा पार न कळे, पार न कळे ॥ पतीतप्राणी पदा लागुनी कल्याण झालें ॥ ४ ॥

३१८. चाल—साधी.

मौजेची आरती मौजेचा देव ॥ मौजेचे ही भक्त करिती उत्सव ॥ मौजेचा येथें धरुनी दृढ भाव ॥ मौज तेथें प्रगटे श्रीसद्गुरुराव ॥१॥ जय देव जय देव जय मौजरूपा ॥ नाना मौजा करिसी केशव-गुरुकृपा ॥ धृ० ॥ मौजेची आरती मौजेचें घृत ॥ पंचप्राण उजळुनि लावियली ज्योत ॥ जिकडे पाहावें तिकडे मौज भरीत ॥ सर्वांघटीं भरला तो मौजनाथ ॥ २ ॥ मौजेची आरती मौजेचें गान ॥ मौजेचें येथें जाहलें कीर्तन ॥ मौजेवांचुनि न दिसे आणिक शिवदीन ॥ मौज पाहातां येथें न भासे विघ्न ॥ ३ ॥

३१९. अवतार गोकुळीं हो०

फळलें भाग्य माझें ॥ धन्य झालों संसारीं ॥ सद्गुरु भेटला हो ॥ तेणें धरियेलें करीं ॥ पाश्चिमे चालवीलें ॥ आत्मस्तुती निर्धारीं ॥ त्रिकूटावरी नांदे ॥ देखीयेली पंढरी ॥ १ ॥ तें सुख काय सांगू ॥ वाचे बोलतां न ये ॥ आरतीचेनि गुणें ॥ गेलें मीपण माये ॥ धृ० ॥ राउळामाजीं जातां ॥ राहे देह अवस्था ॥ मन हें उन्मन झालें ॥ नसे बद्धतेची वार्ता ॥ हेतु हा मावळला ॥ शब्द आली निःशब्दता ॥ तटस्थ होउनि ठेलों ॥ नीजरूप पाहातां ॥ २ ॥ त्रिगुण गुण बाई ॥ पूर्ण जळल्या वाती ॥ नवलाव अविनाश ॥ न समाये स्वयंज्योती ॥ पाहतां लक्ष तेथें ॥ हालूं विसरलीं पातीं ॥ नातुडे माझें मन ॥ नाहीं दिवसराती ॥ ३ ॥ आरती सद्गुरूची ॥ उजळली अंतरीं ॥ प्रकाश थोर झाला ॥ सांठवेना अंबरीं ॥ रविशशि मावळले ॥ तया तेजा-माझारीं ॥ वाजती दिव्य वाद्यें ॥ अनुहातें गजरीं ॥ ४ ॥ आनंद-सागरांत ॥ प्रेमें दीधली बूडी ॥ लाधलों सौख्य मोठें ॥ न ये बोलतां बोली ॥ सद्गुरुचेनि संगें ॥ ऐसी आरती केली ॥ निवृत्तीनें आनंदाची ॥ तेथें वृत्ती नीमाली ॥ ५ ॥

# आरत्या सत्यनारायणाच्या

३२०. चाल–आरती सप्रेम०

जय जय दीनदयाळा सत्यनारायणा देवा ॥ पंचारति ओंवाळूं श्रीपती तुज भक्तिभावा ॥ धृ० ॥ विधियुक्त पूजुनि करिती पुराण श्रवण ॥ परिमळद्रव्यांसहित पुष्पमाळा अर्पून ॥ घृतयुक्तशर्करा-मिश्रित गोधूमचुर्ण ॥ प्रसाद भक्षण करितां प्रसन्न तूं नारायण ॥ जय०॥१॥ शतानंदें विप्रें पूर्वी व्रत हें आचरिलें ॥ दरिद्र दवडुनि अंतीं त्यातें मोक्षपदा नेलें ॥ त्यापासुनि हें व्रत या कलियुगीं सकळां श्रुत झालें ॥ भावार्थें पूजितां सर्वां इच्छित लाधलें ॥ जय० ॥ २ ॥ साधुवैश्यें संततिसाठीं तुजला प्रार्थियलें ॥ इच्छित पुरतां ॥ मदांध होउनि व्रत न आचरिलें ॥ त्या पापानें संकटिं पडुनी दुःखहि भोगीलें ॥ स्मृति होउनि आचारितां व्रत त्या तुवांचि उद्धरिलें ॥ जय० ॥ ३ ॥ प्रसाद विसरुनि पतिभेटीला कलावती गेली ॥ क्षोभ तूझा होतांचि तयाची नौका बूडाली ॥ अंगध्वजरायासी यापरि दुःखस्थिति आली ॥ मृतवार्ता शतपुत्रांची सत्वर कर्णीं परिसीली ॥ जय० ॥४॥ पुनरपि पूजुनि प्रसाद ग्रहण करितां तत्क्षणीं ॥ पतिची नौका तरली देखे कलावती नयनीं ॥ अंगध्वजरायासी पुत्र भेटति येऊनी ॥ ऐसा भक्तां संकटिं पावसी तूं चक्रपाणी ॥५॥ अनन्यभावें पूजुनि हें व्रत जे जन आचरती ॥ इच्छित पुरविसी त्यातें देउनि संतति संपत्ती ॥ संहरती भय दुरितें सर्वहि बंधनें तुटती ॥ राजा रंका समान मानुनि पावसी श्रीपती ॥६॥ ऐसा तव व्रत महिमा अपार वर्णूं मी कैसा ॥ भक्तिपुरःसर आचरती त्यां पावसि जगदीशा ॥ भक्तांचा कनवाळू कल्पद्रूम तूं सर्वेशा ॥ मोरेश्वरसुत वासुदेव तुज विनवी भवनाशा ॥७॥

३२१ चाल–लेलुनी लतिकासंगें०

आरति करितों सत्यप्रभूजी भाव धरुनि सुमनीं ॥ तुजविण नाहीं ध्यान दुजें मज न्यावें निजचरणीं ॥ धृ ॥ प्रेमें पूजुनि तुजला करिती पुराण तें श्रवण ॥ परिमळ द्रव्यांसहित माळिका पुष्पांच्या

आणुन ॥ घृत शर्करा गोधूमांचें करोनियां चूर्ण ॥ तीर्थ प्रसादा सेवन करितां होशी सुप्रसन्न ॥ आरती० ॥ १ ॥ शतानंदें वाराणसिमधिं व्रत तूझें केलें ॥ दारिद्रदुःखा दवडुनि अंतीं मोक्षपदा नेलें ॥ तैंपासूनि हें व्रत कलियुगिं या सकळां श्रुत झालें ॥ भावें पुजितां इच्छित फल त्वां निजभक्तां दिधलें ॥ आ० ॥ २ ॥ साधुवैश्यें संततिस्तव वा बहु तुज बाहियलें ॥ वांच्छा पुरतां मदांध होउनी व्रतची नच केलें ॥ त्या पापानें पडुनि संकटीं दुःखहि भोगियले ॥ होतां स्मृति त्या पूजन करितां सत्वर उद्धरिलें ॥ आ० ॥ ३ ॥ कलावतीही प्रसाद त्यागुनी पतिदर्शना गेली ॥ शीघ्रगतीनें तव क्षोभानें पतितरी जाळिं बुडली ॥ मागुती येउनि कलावतीनें पूजा तव केली ॥ तीर्थ प्रसादा घेतां पतिची नाव जळीं तरली ॥ आ० ॥ ४ ॥ त्यापरि अंगध्वजराजासी दुःखदशा आली ॥ शतपुत्रांची मरणकुवार्ता त्याणें आयकिली ॥ तववरदानें शतपुत्रांची भेट पुन्हां झाली ॥ दीनजनोद्धर भक्तजनांची तूं असती माउली ॥ आ० ॥ ॥५॥ तवव्रत करितां पाप ताप भय सर्व बंध तुटती ॥ ऐसा महिमा जाणुनियां जे पूजा तुझि करिती ॥ नरपति भणगही समान मानुनि ॥ पावसि शीघ्रगती ॥ पूर्णमनोरथ होउनि त्यांचे भावें पदिं रमति ॥ आ० ॥ ६ ॥ कोठवरी हा तवव्रतमहिमा वर्णूं तरि कैसा ॥ भावें भजती जे नर त्यांतें पावसि परमेशा ॥ भक्तजनांचा कल्पतरू तूं असर्सी जगदीशा ॥ विठ्ठलसुत बळवत्कवि स्तवितो तोडीं भवपाशा ॥ आरती करितों सत्य प्रभुजी० ॥ ७ ॥

# आरत्या खंडोबाच्या

३२२. चाल—अवतार गोकुळीं हो०

जय देवा खंडेराया ॥ निजशिवरूप सखया ॥ आरती ओंवाळीतों ॥ भावभंडारसुप्रीया ॥ धृ० ॥ देहत्रय गड थोर ॥ हाचि दुर्घट जेजूर ॥ तेथें तूं नांदतोसी ॥ आत्मसाक्षित्वें निर्धार ॥ उन्मनी म्हाळसा हे ॥

शांतिबाणाई सकुमार ॥ भुक्ति मुक्ति दया क्षमा ॥ मुरळ्या नाचती सुंदर ॥ जय० ॥ १ ॥ स्वानंद अश्व थोर ॥ त्यावरि बैसोनि सत्वर अद्वैतबोध तीव्र ॥ हातीं घेउनी तरवार ॥ अहंकारमल्लासूर ॥ त्यातें मारिसी साचार ॥ निवटुनी दैत्यगार ॥ विजयी होसी तूं मल्हार ॥ जय० ॥ २ ॥ निरसोनी द्वैत भाव ॥ करिसी तूं ठाणें अपूर्व ॥ अद्वैतची भक्तदेव ॥ भेदबुद्धि मिथ्या वाव ॥ तुजवीज न दिसे कोणी ॥ जगिं या एकाचि तूं धर्णी ॥ मौनी म्हणे तूंची सर्व ॥ असशी व्यापक खंडेराव ॥ जय देवा० ॥ ३ ॥

२२३. चाल–साधी.

पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा ॥ खंडामंडित दंडित दानव अवलीळा ॥ मणिमल्लां मर्दुनियां जो धुसूर पिंवळा ॥ हिरे कंकण बासिंगे सुमनांच्या माळा ॥१॥ जय देव जय देव जय शिव मल्हारी ॥ वारीं दुर्जनअसुरां भवदुस्तर तारीं ॥धृ०॥ सुरवरसंवर वर दे मज-लागीं देवा ॥ नाना नामें गाइन ही तुमची सेवा ॥ अघटितगुण गावया वाटतसे हेवा ॥ फणिवर शिणला किती नर पामर केवा ॥२॥ रघुविरस्मरणीं शंकर हृदयीं नीवाला ॥ तो हा मल्लांतक अवतार झाला ॥ यालागीं आवडीं भावें वर्णीला ॥ रामीं रामदासा जिवलग भेटला ॥ जय देव० ॥ ३ ॥

२२४. चाल–अवतार गोकुळीं हो०

जय देवा मार्तंडा ॥ हातीं घेउनिया खंडा ॥ मारिले दुष्ट दैत्य ॥ उडे त्रैलोकीं झेंडा ॥ धृ० ॥ मातले पृथ्वीवरी ॥ मणी मल्ल दैत्य दोनी ॥ टाकिले ऋषीयाग ॥ यज्ञकुंड विध्वंसूनी ॥ म्हणुनीयां अव-तरले ॥ गौरीहर शूळपाणी ॥ जय० ॥ १ ॥ साठ कोटी गण सर्वे ॥ घेऊनियां दैत्यांवरी ॥ जाऊनियां युद्ध केलें ॥ रण तुंबळ भारी ॥ शिवचक्र दैत्यचक्र ॥ युद्ध होय बरोबरी ॥ जय० ॥ २ ॥ त्रिशूळपाणी तप्त ॥ थोर झाले क्रोधानळें ॥ मारिलें खड्ग जेव्हां ॥ दैत्याचे कंठ-नाळीं ॥ वरदान मागताती ॥ प्राण अंताचे वेळीं ॥ जय० ॥ ३ ॥ मल्ल म्हणे कर्पुरगौरा ॥ हर हर महादेवा ॥ मल्लारी जनमुखीं ॥ ऐसा

उच्चार व्हावा ॥ उद्धरिलें असुरांतें ॥ म्हणुनी मल्लारी नांवा ॥ जय० ॥४॥ चंपाषष्ठीचे दिवशीं ॥ ऐसा अवतार झाला ॥ आनंदले सुरवर ॥ म्हणुनि येळकोट बोला ॥ चरणीं तूझे लीन नामा ॥ देवा सांभाळीं त्याला ॥ जय देवा० ॥ ५ ॥

३२५. चाल–साधी.

जेजुरगडपर्वत शिवलिंगाकार ॥ मृत्युलोकीं दुसरें कैलास शिखर ॥ नानापरिची रचना रचिली अपार ॥ तये स्थळीं नांदे स्वामी शंकर ॥ १ ॥ जय देव जय देव जय शिवमार्तंडा ॥ अरिमर्दन मल्लारी तूंची प्रचंडा ॥ ध्रु० ॥ मणिमल्ल दैत्य प्रबळ तो झाला ॥ त्रिभुवनीं त्यानें प्रळय मांडीला ॥ नाटोपे कोणास वरें मातला ॥ देवगण गंधर्व कांपती त्याला ॥ जय० ॥ २ ॥ चंपाषष्ठी दिवसी अवतार धरिसी ॥ मणिमल्ल दैत्याचा संहार करिसी ॥ चरणीं पृष्ठीं खड्ग वर्मी स्थापीसी ॥ अंतीं वर देउनि त्या मुक्तीतें देशी ॥ जय० ॥ ३ ॥ मणिमल्ल दैत्य मर्दुनि मल्लारी ॥ देवां संकट पडतां राहे जेजूरी ॥ अर्धांगीं म्हाळसा शोभे सुंदरी ॥ देवा ठाव मागे दास नरहरी ॥ जय० ॥ ४ ॥

---

# आरती विश्वंभराची.

३२६. चाल–आरती ज्ञानराजा.

आरती विश्वंभरा ॥ पूर्णसाक्षी ओंकारा ॥ सद्यन व्यापुनीयां ॥ गोपीवृंदमाहेरा ॥ धृ० ॥ निर्गुण निरामया ॥ निर्विकारा अद्वया ॥ सच्चिदानंदरूपा ॥ निरंजना अव्यया ॥ आरती० ॥ १ ॥ अचपळा शाश्वता ॥ निर्मळा हो अच्युता ॥ सोज्वळा शुद्धबुद्धा ॥ नित्य सत्य अनंता ॥ आरती० ॥ २ ॥ ब्रह्मादिदेववंद्या ॥ परमवेदांतवेद्या ॥ अपार रूप तूझें ॥ शक्तीसमेत आद्या ॥ आरती० ॥ ३ ॥ सहस्र-मुखीं शेषें ॥ वर्णियेला विशेषें ॥ न कळे परी पार ॥ गाती नारद घोषें ॥ आरती० ॥ ४ ॥ उद्दालिका तापीतीर जया सन्निध अवतार ॥ प्रगटोनी धर्मासी तूं ॥ पापी तारीयेले थोर ॥ आरती० ॥ ५ ॥ शरण मी तुज आतां ॥ पायीं ठेवियेला माथा ॥ संतोषें सूता रक्षीं ॥ गुरू विश्वंभरनाथा ॥ आ० ॥ ६ ॥

---

# आरत्या पंचायतनाच्या

३२७. चाल—साधी.

अघसंकटभयनाशन सुखदा विघ्नेशा॥ आद्या सुरवरवंद्या नरवारण वेशा ॥ पाशांकुशधर सुंदर पुरवीसी आशा ॥ निजवर देउनि हरिसी भ्रांतीच्या पाशा ॥ १ ॥ जय देव जय देव जय सुखकर मूर्ती गणपति हरि शिवभास्कर अंबा सुखमूर्ती ॥ धृ० ॥ पय-सागरजाकांता धरणीधरशयना ॥ करुणालय वारिसि भववारिजद-लनयना ॥ गरुडध्वज भजनप्रिय पीतप्रभवसना ॥ अनुदिनि तव कीर्तनरस चाखो हे रसना ॥ जय० ॥ २ ॥ नंदीवहना गहना पार्वतिच्या रमणा ॥ मन्मथदहना शंभो वातात्मजनयना ॥ सर्वोपाय विवर्जित तापत्रयशमना ॥ कैलासाचलवासा करिती सुरनमना ॥ जय० ॥ ३ ॥ पद्मप्रबोधकरणा नेत्रभ्रमहरणा ॥ गोधनबंधनहर्ता द्योतक आचरणा ॥ किरणस्पर्शें वारिसि या तम आवरणा ॥ शर-णागत भयनाशन सुखवर्धनकरणा ॥ जय० ॥ ४ ॥ त्रिभुवनउत्पत्ति पालन करिसी तूं माया ॥ नाहीं तुझिया रूपा दुसरी उपमा या ॥ तूझे गुणगणमहिमा न कळे निगमा या ॥ करुणा करिसी अंबे मनविश्रामा या ॥ जय० ॥ ५ ॥

३२८. चाल—साधी.

गजवदना सुखसदना गिरजानंदना ॥ लंबोदर करुणाकर मानस मोहना ॥ एकदंता प्रथमा प्रभु मूषकवाहना ॥ वंदिति सुरनर भावें कलिकल्मषदहना ॥ १ ॥ जय देव जय देव जय मंगलमूर्ती ॥ गण-पति शक्ती सूर्या हरिहर घनदीप्ती ॥ध्रु०॥ आदी शक्ती सदये दुर्गे निजधैर्यें ॥ अंबे सकळारंभे धरितां तव पाय ॥ माझें मीपण समुळीं विसरूनी जाय ॥ काय सांगु गोडी उन्मनि जाय ॥ जय० ॥ २ ॥ दिनकर सुखकर सुंदर सीता तमनाशा ॥ निजतेजाच्या अंशीं व्यापुनि दशदीशा ॥ तुजविण न कळे मार्ग स्वयंप्रकाशा ॥ सकळाचा

तूं नेत्र जय परमपुरुषा ॥ जय देव० ॥ ३ ॥ लक्ष्मीरमणा पूर्णा भुजगारीवहना ॥ चतुर्भुज पीतांबरधर शेषशयना ॥ अरिमर्दन गोवर्धनधर वारिज नयना ॥ तुझिया स्मरणमात्रें सुख नारायणा ॥ जय० ॥ ४ ॥ दीनोद्धारी गौरीवल्लभ मदनारी ॥ भवगपंचानन तूं शंभो त्रिपुरारी ॥ देवेश्वर देवोत्तम भक्तां साहकारी ॥ विनवी ज्ञानदेव हृदयामाझारीं ॥ जय० ॥ ५ ॥

३२९. चाल—साधी.

गजवदना देवा तूं विश्वाचा कर्ता ॥ विद्यांचा सिद्धींचा सिद्धांचा भर्ता ॥ प्रणताही सर्वांधी विघ्नांचा हर्ता ॥ लंघिति तव भक्त सुखें मोहमहागर्ता ॥ १ ॥ जय जय कारुण्यनिधे नतकामितपूर्ते ॥ श्रीगणपतिहरिशंकररविअंबामूर्ते ॥ धृ० ॥ श्रीकांता श्रीकृष्णा दुर्लभवरदाता ॥ माता तात प्रभू तूं दीनाचा भ्राता ॥ धाता तूंचि विधाता दानवघनवाता ॥ वा तारीं तुजवांचुनि अन्य नसे त्राता ॥ जय० ॥ २ ॥ श्रीकंठा जगदीशा त्रिपुराच्या काळा ॥ व्यालाधीश्वर हरा शंभो शशिभाळा ॥ पाळा देव ऋषींचा तुजचि म्हणे पाळा ॥ हालाहलशमना तूं विश्वाच्या आळा ॥ जय० ॥३॥ सूर्यासूर्याराध्या स्वद्भजनीं शमतें ॥ दुःख दुरित दारिद्र्य क्षिप्र जसें तम तें ॥ विकसित पद्म कसें जग तव उदयीं गमतें ॥ भ्रमतें तुजवांचुनि बहु पावुनियां रमतें ॥ जय० ॥४॥ असुरां वधूनी केली मुदित महि माते ॥ ते बहुमुखें न शकती गाया महिमा ते ॥ दैवतपंचक एकचि लेश नसे भेद ॥ करितो प्रमाणराज स्पष्ट असे वेद ॥ जय० ॥ ५ ॥

---

# आरत्या शनिदेवाच्या

३३०. चाल—अवतार गोकुळीं हो०

जय जय श्रीशनिदेवा ॥ पद्मकर शिरीं ठेवा ॥ आरति ओंवाळीतों ॥ मनोभावें करुनी सेवा ॥धृ०॥ सूर्यसुता शनिमूर्ती ॥ तूझी

अगाध कीर्ती ।। एकमुखें काय वर्णूं ।। शेषा न चले स्फूर्ती ।। जय० ।। १ ।। नवग्रहांमाजीं श्रेष्ठ ।। पराक्रम थोर तूझा ।। ज्यावरी तूं कृपा करिसी ।। होय रंकाचा राजा ।। जय० ।। २ ।। विक्रमासारिखा हो ।। शककर्ता पुण्यराशी ।। गर्व धरितां शिक्षा केली ।। बहु छळियेलें त्यासी ।। जय० ।। ३ ।। शंकराच्या वरदानें ।। गर्व रावणें केला ।। साडेसाती येतां त्यासी ।। समूळ नाशासी नेला ।। जय० ।। ४ ।। प्रत्यक्ष गुरुनाथा ।। चमत्कार दावियेला ।। नेऊनी शूळापासीं ।। पुन्हा सन्मान केला ।। जय० ।। ५ ।। ऐसे गुण किती गाऊं ।। धणी न पुरे गातां ।। कृपा करीं दीनावरी ।। महाराजा समर्था ।। जय० । ६ ।। दोन्ही कर जोडोनियां ।। रूक्मा लीन सदा पायीं ।। प्रसाद हाचि मागे ।। उदयकाळ सौख्य दावीं ।। जय० ।। ७ ।।

३३१. चाल—लग्नाला जातों मी०

जय जयाजी शनिदेवा आरती तुला ।। ओंवाळी दास तुझा तारिं वा मला ।। ध्रु० ।। तव लीला न कळे मजसि ।। वक्रदृष्टि ज्यास बघसि ।। रावाचा रंक करिसि ।। कीर्ती तव वर्णूं कशी ।। सहस्रमुखी शेषराज तोहि भागला ।। जय जय० ।। १ ।। पुण्यशील विक्रमाशि ।। गर्व झाला म्हणुनि छळिसी ।। वक्रदृष्टि दशाननासि ।। करुनि दया समूळ नेसि ।। गुरुनाथा बहुताचि त्यां दाविली लीला ।। जय जय० ।। २ ।। ऐसे गुण गाऊं किती ।। लाजे मम अल्पमती ।। करुनी तव भक्ति किती ।। तरले त्यां नाहीं मिती ।। जाणुनि हें बलवंता ध्यास लागला ।। जय० ।। ३ ।।

---

## आरत्या व्यंकटेशाच्या

३३२. चाल—साधी

शेषाचल अवतार तारक तूं देवा ।। सुरवरमुनिवर भावें करिती जन सेवा ।। कमळारमणा अससी अगणित गुणठेवा ।। कमळाक्षा

मज रक्षुनि सत्वर वर द्यावा ॥ १ ॥ जय देव जय देव जय व्यंकटेशा ॥ केवळ करुणासिंधु पुरवीसी आशा ॥ध्रु०॥ हें निजवैकुंठ म्हणुनि ध्यातों मी तूतें ॥ दाखविसी गुण कैसे सकळिक लोकांतें ॥ देखुनि तूझें स्वरूप सुख अद्भुत होतें ॥ ध्यातों तुजला श्रीपति दृढ मानस होतें ॥ जय० ॥ २ ॥

३३३. चाल—आरति ज्ञानराजा.

जय देवा वेंकटेशा ॥ महाविष्णु हे परेशा ॥ आरती ओंवाळीतों ॥ तुज चिन्मय अविनाशा ॥ धृ० ॥ भावार्थ कानगोसी ॥ भक्तांपासीं तूं मागसी ॥ अज्ञान छेदूनीयां ॥ भवसंकट वारीसी ॥ देवोनी स्वात्वबोधा ॥ परमानंदीं तूं ठेवीसी ॥ जय० ॥ १ ॥ तत्त्वंपदभेद-बुद्धी ॥ निरमुन शबलांशउपाधी ॥ लक्ष्यार्थिं जीवेशांचें ॥ करिसी ऐक्य असिपदीं ॥ जीवन्मुक्तीसुख थोर ॥ देसी परमकृपानिधी ॥ जय० ॥ २ ॥ विवर्त हे नामरूप ॥ जगद्भवाचि असार ॥ अधिष्ठान पूर्ण याचें ॥ देवा सन्मय साचार ॥ मौनी ह्मणे तूंची सर्व ॥ भूमानंद हे अपार ॥ जय० ॥ ३ ॥

---

# आरत्या अनंताच्या

३३४. चाल—साधी.

आगमिं निगमीं तूझा न कळेची अंत ॥ भक्तीभावें प्रेमें भक्तां वर देत ॥ मुनिजन लक्षीं लाक्षितां नव्हे तूं प्राप्त ॥ शेष सहस्रमुखीं वर्णितां श्रमत ॥ १ ॥ जय देव जय देव जय श्रीअनंता ॥ आरति ओंवाळूं तुज आनंदभरिता ॥ धृ० ॥ भाद्रचतुर्दशीव्रता जे जन आचरती ॥ षोडश पूजा करुनी ब्राह्मण पूजिती ॥ गोधुमवायन चौदा द्विजांसि अर्पीती ॥ त्यांसी सर्वहि सिद्धी देसी श्रीपती ॥ २ ॥ कौंडिण्यब्राह्मण व्रत हें आचरला ॥ करुणासागर तया प्रसन्न झाला ॥ भक्तीचा अंकुर त्रिभुवनिं विस्तरला ॥ एका जनार्दन चरणीं नीवाला ॥ ३ ॥

३३५. चाल—आवडी गंगाजळी.

जय श्रीअनंता लक्ष्मीकांता आरति ओंवाळूं ॥ भक्तां संकट पडतां धांवे अनंत कनवाळू ॥ धृ० ॥ भाद्रपदमासीं शुक्ल चतुर्दशी तव व्रत नेमानें ॥ दुकूलदोरक करुनी पूजिति अनंत नामानें ॥ १ ॥ नानापरिचीं पुष्पें द्रव्यें तुजला अर्पीती ॥ षोडशपूजा करुनी ब्राह्मण संतर्पण करिती ॥ २ ॥ अपूपवायन दंपातिपूजन त्या दिवशीं करिती ॥ अनंत संतुष्टोनि देतो संतति संपत्ती ॥ ३ ॥ रामा धर्में आचरितां व्रत क्लेशांतुनि सुटला ॥ कौंडिण्यानें पुजितां तुजला उद्धरिलें त्याला ॥ ४ ॥ मोरेश्वरसुत वासुदेव हा तिष्ठत सेवेसी ॥ संकटकाळीं रक्षि अनंता आपुल्या दासासी ॥ ५ ॥

३३६. चाल—साधी.

जय देव जय देव अनाथजनबंधो ॥ अनंत सगुणातीता परमामृतसिंधो ॥ धृ० ॥ अखंडाचिन्मयरूपा सर्वोत्तमलीला ॥ विश्वपटस्थिततंतू विबुधार्चित विमला ॥ अजहरसुरनर किन्नर हरिगुण तूं सकळां ॥ तारिसि अनुभवपंथें दंडिसि कळिकाळा ॥ जय० ॥ १ ॥ ग्रंथीं मनु नवदोरकसूत्रीं तूं वससी ॥ व्रतपद्धति वनवासी धर्मा जाणविसी ॥ भाद्रपदांत चतुर्दशि शुक्ला तिथिदिवशीं ॥ दोरकधारणविधि इतिहासादिकिं कथिसी ॥ २ ॥ धर्में बहुविधभावें हें व्रत आचरितां ॥ दरिद्रदुःखापासुनि जाहला तो सुटता ॥ प्रतिवर्षी अनुजांसह नवदोरक याजितां ॥ ममतातमदुर्योधन जाहला मग निरुता ॥ जय० ॥ ३ ॥ बहुविधधनसंपत्ती संपादुनि धर्में ॥ तव यज्ञें सुरभूसुर तोपवितो धर्में ॥ तत्पूर्वी अणि मगही सात्त्विकमखवर्में ॥ केलीं अनंतमाहिमाव्रतपूजाधर्मैं ॥ जय० ॥ ४ ॥ तेंपासुनि सुरनर मुनि हें व्रत आचरती ॥ निजनारीसह दोरकसूत्रातें यजिती ॥ इहपरलोकीं भोगामोक्षातें वरिती ॥ कवि गणकात्मजहृद्गत षड्रिपु संहरती ॥ ५ ॥

# आरती गरुडाची

३३७. चाल—साधी.

जय देव जय देव जय वैनतेया ॥ आरती ओंवाळूं तुज पक्षीवर्या ॥ धृ० ॥ हरिवहनाऽमृतहरणा कश्यपनंदना ॥ दिनसारथिबंधो खगकुलमंडना ॥ कांचनमयवाहू नाम सूपर्ण ॥ नारायणसान्निध्यें वंद्य तूं जाण ॥ जय० ॥ १ ॥ स्वस्थारूढ होउनि विष्णूचें गमन ॥ मुनींद्रवचनें केलें सागरझडपण ॥ जलचरीं वर्तला आकांत जाण ॥ विनतें पयोब्धीनें केलें सांत्वन ॥ जय० ॥ २ ॥ तूझे नाममंत्र जपती जे कोण ॥ सर्पादिक विषबाधा नोहे निशिदीन ॥ ऐसा तूं महारजा पक्षींद्र जाण ॥ म्हणउनि कवि हा तुजला अनन्य शरण ॥ ३ ॥

---

# आरत्या बहिरोबाच्या

३३८. चाल—साधी.

दक्षिणदेशामाजी भैरव देव ॥ क्षेत्रपाळ वंदी लोकत्रय भाव ॥ भक्तांसी देखूनी चरणीं दे ठाव ॥ देवांचा तारक तूं श्रीभैरवदेव ॥१॥ जय देव जय देव जय भैरव देवा ॥ सद्भावें आरती करितो मी देवा ॥ धृ० ॥ वामार्गी जोगेश्वरि शोभे सुंदर ॥ कांसे पीतांबर वाद्यांचा गजर ॥ भक्तांसी देखूनी हारि कृपाकर ॥ रामदास चरणीं त्या मागे थोर ॥ जय देव० ॥ २ ॥

३३९. चाल—साधी

भैरवराया गौरव दे मज भजनाचें ॥ रौरव संकट नाशीं जननानिधनाचें ॥ निशिदिनिं देवा दे मज गुणकीर्तन वाचे ॥ कैरवपदनखचंद्रीं करिं मन मम साचें ॥ १ ॥ जय देव जय देव जय भैरवनाथा ॥ सुंदर पदयुग तूझें वंदिन निजमाथां ॥ धृ० ॥ भवभयभंजन सज्जनरंजन गुरुदेवा ॥ पदरजअंजन लेतां प्रकटे निजठेवा ॥ जेव्हां दर्शन देसी भाग्योदय तेव्हां ॥ अनंत पुण्यें साधे लाधे तव सेवा ॥२॥

कलिमलशमना दमना दानव दे पाणी ॥ डमरूरव अमरांते निर्भय सुखदानी ॥ काशीरक्षक तक्षकमालाधर चरणीं ॥ तोडर मिरवी अरिगण मस्तकिं मनकर्णीं ॥३॥ लक्षीं करुणाचक्षीं अनुचर निजपक्षीं ॥ भक्षीं दुष्टां नष्टां सुष्टां संरक्षी ॥ साक्षी कर्माकर्मीं जगदंतर कुक्षी ॥ मुमुक्षुपक्षी वसती तव पदसुरवृक्षीं ॥४॥ सोनारीं पुरधामीं भैरव कुळस्वामी ॥ स्मरतां सत्वर पावसि संकट हरनामीं ॥ इच्छित देसी दासां जो जो जें कामी ॥ मुक्तेश्वरी हेतू निश्चळ कुळधर्मीं ॥५॥

३४०. चाल—साधी.

जय देव जय देव जय भैरवनाथा ॥ सुंदर पदयुग तूझें वंदिन निजमाथां ॥ धृ० ॥ भैरवनाथा गौरव दे मज भजनाचें ॥ रौरव-संकट नाशीं जनना-निधनाचें ॥ निशिदिनि देवा दे मज गुणकीर्तन वाचे ॥ कैरवपदनखचंद्रीं करिं मन मम साचें ॥ जय० ॥१॥ भवभय-भंजन सज्जनरंजन गुरुदेवा ॥ पदरजअंजन लेतां प्रगटे निज ठेवा ॥ जेव्हां दर्शन देसी भाग्योदय तेव्हां ॥ अनंत पुण्यें साधे लाधे तव सेवा ॥ जय० ॥ २ ॥ कलिमलशमना दानवदमना दे पाणी ॥ डमरूरव अमरांतें निर्भय सुखदानी ॥ काशीरक्षक तक्षकमालाधर चरणीं ॥ तोडर मिरवी अरिगण मस्तकिं मनकर्णीं ॥ जय० ॥ ३ ॥ लक्षीं करुणाचक्षीं अनुचर निजपक्षीं ॥ भक्षीं दुष्टां नष्टां सुष्टां संरक्षीं ॥ साक्षी कर्माकर्मीं जगदंतरकुक्षीं ॥ मुमुक्षुपक्षी वसती तव पदसुरवृक्षीं ॥ जय० ॥ ४ ॥ सोनारीं पुरधामीं भैरव कुळस्वामी ॥ स्मरतां सत्वर पावसि संकटहरनामीं ॥ इच्छित देसी दासां जो जो जें कामी ॥ मुक्तेश्वरीं हेतू निश्चळ कुळधर्मीं ॥ जय० ॥ ५ ॥

---

# आरत्या पल्लीनाथाच्या

३४१. चाल—साधी.

श्रावणमासीं रविदिनिं जे दर्शन घेती ॥ त्यांचीं सर्वहि पापें नाशा-प्रति जाती ॥ प्रेमानंदे त्याची करितां हो स्तूती ॥ अंतीं निजपद

पावुनि मुक्तीसी जाती ॥ १ ॥ जय देव जय देव जय पल्लीनाथा ॥ भावें तूझे चरणीं ठेवीला माथा ॥ धृ० ॥ कोंकणप्रांतीं नांदे दक्षिण-केदार ॥ करावया पापीयांचा उद्धार ॥ ब्रह्मा विष्णु शंकर हे एकाकार ॥ भक्तांलागीं येथें धरिला अवतार ॥ २ ॥ भक्तजनांचा हा हो देव भुकेला ॥ यास्तव येतो नित्य यात्रेचा मेळा ॥ दर्शन घेउनि जाती अपुल्या हो स्थळा ॥ भावें हृदयीं जपती नामाची माळा ॥४॥ पल्लीक्षेत्रीं नांदे आमुचा कुळस्वामी ॥ सेवेसी तत्पर आहे ती लक्ष्मी ॥ अज्ञान मूढ जन हे सर्वस्वें आम्हीं ॥ यास्तव जडो प्रीती तूझीया नामीं ॥४॥ त्रैमूर्ती देव हा आहे पै जाण ॥ कराया भक्तांचें प्रेमें पाळण ॥ धरिलें अवनीवरी रूप हें सगुण ॥ म्हणउनि सखाराम वंदित चरण ॥ ५ ॥

३४२. चाल—साधी.

भक्तांलागीं अवनी घेउनि सहदारा ॥ पल्लीग्रामीं वसती करुनी मंदीरा ॥ दैत्य संहारूनी कृपया दातारा ॥ मुक्ती देसी दासां सगुणा सुंदरा ॥ १ ॥ जय देव जय देव जय करुणाकरा ॥ पल्लीनाथा स्वामी दक्षिण केदारा ॥ धृ० ॥ अमृत वाटी त्रिशूळ डमरूसह खड्ग ॥ धरिसी वहन शोभे तुजला पन्नग ॥ म्हणती ज्यातें शेष दुसरा तूं रंग ॥ स्मरतां भवभय टाळुनि करिसी अघभंग ॥ २ ॥ शेषारूढ तुजला विष्णु श्रुति म्हणती ॥ त्रिशूळ हातीं म्हणउनि म्हणती पशुपती ॥ उपवीतें तूं ब्रह्मा खड्गा तूं शक्ती ॥ आरति तुज ओंवाळी हरिसुत दृढभक्ती ॥३॥

---

# आरती हाटकेश्वराची

३४३. चाल—साधी.

पयसा दधिघृतमधुभिः शर्करया सहितं ॥ स्नानं समर्पये शिवगंगाजलमिलितं ॥ कस्तूरीकेशरयुक्त श्रीखंडेन कृतं ॥ सर्वांगेषु विलेपनमंगीकुरुसततं ॥ १ ॥ जय जय जय मंगलमय जय हाटकशंभो ॥ करुणासागर नागर पालक पाहि प्रभो ॥ जय हर हर महादेव ॥धृ०॥

बिल्वीदलतुलसीदल प्रफुल्लकमलानि ॥ जातीचंपककुसुमानि समर्पये तानि ॥ अष्टांगं तव पुरतः कल्पितमिह धूपं ॥ दीपं प्रदर्श्य घृतजं वीक्षे तव रूपं ॥ जय जय जय मंगलमय० ॥ २ ॥ भक्ष्यं लेह्यं पेयं चोष्यं नैवेद्यं ॥ लड्डुकपायसदुग्धान्याम्रफलं हृद्यं ॥ शतवर्तीहारार्त्तिक-मटतिशतवर्तिं ॥ भूषणगणे विदूषणमिह न वरीवर्ती ॥ जय० ॥ ३ ॥ थनथनथैताथैता नृत्यंति भक्तां ॥ क्वणिंहिककिणिचरणाः करताले-सक्ताः ॥ विदधति झणंकझणणण झल्लरिकानादं ॥ दुंदुभिघोषः कुरुते स्तनितेन विवादं ॥ जय० ॥ ४ ॥ घणंकघणणण घणणण घंटां वाद्यते ॥ भेरीशंखस्तूर्यं डमरुर्नादयते ॥ वल्लभलज्जाशंकर निर्मितनुतिगीतं ॥ हाटकनाथे भक्ति यच्छति तदधीतं ॥ जय० ॥ ५ ॥

# आरत्या केदाराच्या

३४४. चाल—साधी.

जय देव जय देव जयाजी केदारा ॥ दारासंकटवारा भवभय-अपहारा ॥ धृ० गंगाउगमशीतळहिमपर्वतवासी ॥ नलगतपळ दुर्जनखळ संहारी त्यांसी ॥ तो हा हिमकेदार करवीरापाशीं ॥ रत्नागिरिवरि शोभे कैवल्यराशी ॥ जय० ॥ १ ॥ उत्तरेचा देव दक्षिणे आला ॥ दक्षिणकेदार हें नाम पावला ॥ रत्नासुर मर्दुनी भक्तां पावला ॥ दास ह्मणे थोरा दैवें धांवला ॥ जय० ॥ २ ॥

३४५. चाल—साधी

गंगाउगमशीतळहिमपर्वतवासी ॥ न लगत पळ दुर्जनखळ संहारी त्यांसी ॥ तो हा हिमकेदार करवीरापाशीं ॥ रत्नागिरिवरि शोभे कैवल्यराशी ॥ १ ॥ जय देव जय देव जयजी केदारा ॥ दारासंकट-वारा भवभय अपहारा ॥ धृ० ॥ उत्तरेचा देव दक्षिणे आला ॥ दक्षिण केदार हें नाम पावला ॥ रत्नासुर मर्दूनी भक्तां पावला ॥ दास म्हणे थोरा दैवें धांवला ॥ जय देव० ॥ २ ॥

# आरती कृष्णेची.

२४६. चाल—साधी.

सुखसरिता गुणभरिता दुरितां नीवारी ॥ निःसंगा भवभंगा चिद्गंगा तारी ॥ श्रीकृष्णानिजतनू जळवेषधारी ॥ कालिमलदल जळ निर्मळ साक्षत्वें हरी ॥ १ ॥ जय देवी जय देवी जय माये कृष्णे ॥ आलों तुझिया उदरा निरसीं मम तृष्णे ॥ धृ० ॥ हरिहरसुंदरओघ ऐक्यासी आले ॥ परमानंद ओघें मिळणी मीळाले ॥ ऐशीये संगमीं मिसळोनी गेले ॥ रामदास त्यांचीं वंदी पाऊलें ॥ २ ॥

---

# आरती चंद्राची

२४७. चाल—साधी.

जय देव जय देव जय श्रीशशिनाथा ॥ आरती ओंवाळूं पदिं ठेउनि माथा ॥ धृ० उदयीं हृदयीं तुझ्या सीतळता उपजे ॥ हेलावुनि क्षीरब्धि आनंदें गर्जे ॥ विकसितकुमुदिनि देखुनि मन तें बहु रंजे ॥ चकोर नृत्य करिती सुख अद्भुत माजे ॥ जय० ॥ १ ॥ विशेष महिमा तूझा न कळे कोणासी ॥ त्रिभुवनि द्वादशराशी व्यापुनि आहेसी ॥ नवही ग्रहांमध्यें उत्तम तूं होसी ॥ तूझें बळ वांछीती सकळहि कार्यासी ॥ जय० ॥ २ ॥ शंकरगणनाथादिक भूषण मिरवीती ॥ भाळीं मौळीं तुजला संतोषें धरिती ॥ संकटनामचतुर्थिस पूजन जे करिती ॥ संततिसंपति पावुनि भवसागर तरती ॥ ज० ॥ ३ ॥ केवळ अमृतरूप अनुपम्य वळसी ॥ स्थावर जंगम यांचें जीवन आहेसी ॥ प्रकाश अवलोकितां मन हें उल्हासी ॥ प्रसन्न होउनि आतां लावीं निजकासीं ॥ जय० ॥ ४ ॥ सिंधूतनया इंदु बंधु श्रीयेचा ॥ सुकीर्तिदायक नायक उडुगण जो यांचा ॥ कुरंगवाहनचंद्रा अनुचित हे वाचा ॥ गोसावीसुत विनवी वर दे मज साचा ॥ जय० ॥ ५ ॥

# आरती गीतेची

३४८. चाल—साधी.

जय देवी जय देवी जय भगवद्गीते ॥ आरती ओंवाळूं तुज वेदमाते ॥धृ०॥ सुखकरणी दुःखहरणी जननी वेदांची ॥ अगाध महिमा तूझा नेणें वीरिंची ॥ ते तूं ब्रह्मीं तल्लिन होसी ठायींची ॥ अर्जूनाचे भावें प्रगटे मूर्खींची ॥ १ ॥ सातशतें श्लोक व्यासोक्ती सार ॥ अष्टादशाध्याय इतुका विस्तार ॥ एक अर्ध पाद करितो उच्चार ॥ स्मरणामात्रें त्यांचा निरसें संसार ॥ जय० ॥ २ ॥ तूझा पार वर्णूं मी दीन ॥ अनन्यभावें तूज आलों मी शरण ॥ सनाथ करीं मायें कृपा करून ॥ बाप रखुमादेवी वरदासमान ॥ जय देवी० ॥ ३ ॥

---

# आरत्या गंगेच्या

३४९. चाल—साधी

जय देवी जय देवी जय गंगाबाई ॥ पावन करिं मज सत्वर विश्वाचे आई ॥ ध्रु० ॥ माते दर्शनमात्रें प्राणी उद्धरसी ॥ हरिसी पातक अवघें जग पावन करिसी ॥ दुष्कर्मी मी रचिल्या पापांच्या राशी ॥ हरहर आतां स्मरतों गति होईल कैशी ॥ १ ॥ पडले प्रसंग तैशीं कर्में आचरलों ॥ विषयांचें मोहानें त्यांताचि रत झालों ॥ त्यांचे योगें दुष्कृत सिंधूंत बुडालों ॥ त्यांतुनि मजला तारिसि ह्या हेतुन आलों ॥ २ ॥ निर्दय यमदुत नेती यासमयीं राखीं ॥ क्षालीं यमधर्माच्या खात्यांतील बाकी ॥ मत्संगतिं जन अवघे तारियेले त्वां कीं ॥ उरलों पाहें एकाचि मी पतितांपैकीं ॥ ३ ॥ अघहरणे जय करुणे विनवितसें भावें ॥ नोपेक्षीं मज आतां स्वरपात्रीं घ्यावें ॥ केला पदर पुढें मीं मज इतुकें द्यावें ॥ जीवें त्या विष्णूच्या परमात्मानि व्हावें ॥ ४ ॥

३५०. चाल—साधी.

माते दर्शनमात्रें प्राणी उद्धारिसी ॥ हरिसी पातक अवघें जग पावन करिसी ॥ दुष्कर्मी मीं रचिल्या पापांच्य राशी ॥ हर

हर आतां स्मरतों मति होईल केसी ।। १ ।। जय देवी जय देवी जय गंगाबाई ।। पावन करिं मज सत्वर विश्वाचे आई ।। ध्रु० ।। पडले प्रसंग तैशीं कर्मे आचरलों ।। विषयांचे मोहानें त्यांतचि रत झालों ।। त्याचे योगे दुष्कृत सिंधूंत बुडालों ।। त्यांतुनि मजला तारिसि ह्या हेतूनें आलों ।। जय० ।। २ ।। निर्दय यमदुत नेती त्या समयीं राखीं ।। क्षाळीं यमधर्माच्या खात्यांतील बाकी ।। मत्संगती जन अवघे तारियले त्वां कीं ।। उरलों पाहें एकचि मी पतितांपैकीं ।। जय० ।। ३ ।। अघहरणे जय करुणे विनवितसे भावें ।। नोपेक्षीं मज आतां त्वत्पात्रीं घ्यावें ।। केला पदर पुढें मीं मज इतुकें द्यावें ।। जीवें त्या विष्णूच्या परमात्मनि व्हावें ।। जय० ।। ४ ।।

---

# आरत्या तुळशीच्या

३५१. चाल—साधी.

तुळसीमळमृत्तिका जो लावी भाळीं ।। अनुदिनिं तुळसी तीर्थी करितो आंघोळी ।। तुळसीकाष्ठीं ग्रीवा मंडित वनमाळी ।। त्याच्या संगें राहे हरि सर्वकाळीं ।।१।। जय देवी जय देवी जय माये तुळसी ।। अक्षय मोक्षाचें निजपद भावें देसी ।। घ्रु० ।। मंजरिया हो तुझ्या वज्राच्या धारा ।। पापाचे पर्वत जळती तनुभारा ।। आले यमकिंकर म्हणती रविकुमरा ।। तुळसीमूळें न दिसे पापासी थारा ।। जय० ।। २ ।। तुझिया एका दळें सोडविले देव ।। म्हणुनी तुझ्या चरणीं धरिला दृढ भाव ।। वृंदे वस्तीसी तूं मज देई ठाव ।। मुक्तेश्वर म्हणे पै मुख्य सद्भाव ।। जय देवी० ।। ३ ।।

३५२. चाल—साधी.

जय देवी जय देवी जय माये तुळसी ।। निज पत्राहुनि लघुतर त्रिभुवन हें तुळसी ।। घृ० ।। ब्रह्मा केवळ मूळीं मध्यें तो शौरी ।। अग्रीं शंकर तीर्थें शाखापरिवारीं ।। सेवा करिती भावें सकळहि नरनारी ।। दर्शनमात्रें पापें हरती निर्धारीं ।। जय देवी० ।। १ ।।

शीतल छाया भूतल व्यापक तूं कैसी ॥ मंजिरिची बहु आवड कमलारमणासी ॥ तव दलविरहित विष्णू राहे उपवासी ॥ विशेष महिमा तूझा शुभ कार्तिकमासीं ॥ जय देवी० ॥ २॥ अच्युत माधव केशव पीतांबरधारी ॥ तूझे पूजनकालीं जो हें उच्चारी ॥ त्यासी देसी संतति संपति सुखकारी ॥ गोसावीसुत विनवी मजला तुं तारी ॥३॥

३५३. चाल—साधी

वृंदावनवासी जय माये तुळसी ॥ शिवहरिब्रह्मादीकां तूं वंद्य होसी ॥ मृत्युलोकीं प्रगटुनि भक्तां उद्धरिसी ॥ तुझें दर्शन होतां जळती अघराशी ॥१॥ जय देवी जय देवी जय तुळसी माते ॥ करिं वृद्धी आयुष्या नारायणवनिते ॥धृ०॥ कार्तिकशुक्लद्वादशि कृष्णाशीं लग्न ॥ तुझे वृंदावनीं निशिदिनिं श्रीकृष्ण ॥ स्वर्गीहुनी वृष्टी करिती सुरगण ॥ भक्त चिंतन करितां करिसी पावन ॥ जय० ॥ २ ॥ त्रिभुवनिं तूझी सेवा करिती त्रीकाळ ॥ त्यातें सुख देउनी तारी गोपाळ ॥ तूझें स्तवन ऐकुनि कांपति कळिकाळ ॥ पावन करिं मज म्हणे मोरो बल्लाळ ॥ जय देवी० ॥ ३ ॥

३५४. चाल—श्रीहरीच्या वेणुनादें०

जय देवी तुळसि माते बहु पुण्यपावनी ॥ तुज करितों आरती ही लीन पदीं होउनी ॥ धृ० ॥ त्रिभुवन हें लघु आहे तव पत्राहुनि अती ॥ मुळिं ब्रह्मा मध्यें शौरी राहे तो बहु प्रीतीं ॥ अग्नि शंकर तीर्थें शाखापरिवारीं शोभती ॥ दर्शनें तुझ्या पापें हरती गे मुळिहुनी ॥ जय देवी० ॥१॥ तव छाया शीतल दे व्यापक तूं भूतळीं ॥ बहु प्रीती मंजिरीची विधिजनका लागली ॥ तव दलावीण होते बहु त्यातें काहिली ॥ कार्तिकीं बहु आहे तव महिमा या जनीं ॥ जय० ॥ २ ॥ अच्युता माधवा हे मधुसुदना जगत्पती ॥ तव पूजनीं बहु प्रेमें ऐसें जे गर्जती ॥ देशी त्यां संततीही सुख सारें बहु प्रीतीं ॥ विठ्ठलात्मज विनवि भावें मज तारीं स्वामिनी ॥ जय० ॥ ३ ॥

अनुक्रम 20662 दि: ........
क्रमांक 9336 नों: दि: ........

# आरती वटसावित्रीची

३५५. चाल—आरती ज्ञानराजा

अश्वपती पुसता झाला ॥ नारद सांगताती तयाला ॥ अल्पायुषी सत्यवंत ॥ सावित्रीनें कां प्रणीला ॥ आणखी वर वरी बाळे ॥ मनीं निश्चय जो केला ॥ आरती वडराजा ॥ १ ॥ दयावंत यमदूजा ॥ सत्यवंत ही सावित्री ॥ भावें करीन मी पूजा ॥ आरती वडराजा ॥ ध्रु० ॥ जेष्ठमास त्रयोदशी ॥ करिती पूजन वडाशीं ॥ त्रिरात्र व्रत करुनियां ॥ जिंकी तूं सत्यवंताशी ॥ आरती वडराजा ॥ २ ॥ स्वर्गावरी जाऊनिया ॥ अग्निखांब कवळीला ॥ धर्मराज उचकला ॥ हत्या घालील जीवाला ॥ येई गे पतिव्रते ॥ पती नेई गे आपुला ॥ आरती वडराजा ॥ ३ ॥ जाऊनिया यमापाशीं ॥ मागतसे आपल्या पती ॥ चारी वर देऊनिया ॥ दयावंत द्यावा पती ॥ आरती वडराजा ॥ ४ ॥ पतिव्रते तुझी कीर्ति ॥ ऐकुनि ज्या नारी येती ॥ तुझी व्रतें आचरती ॥ तुझी भुवनें पावती ॥ आरती वडराजा ॥ ५ ॥ पतिव्रते तुझी स्तुती ॥ त्रिभुवनीं ज्या करी ती ॥ स्वर्गी पुष्पवृष्टी करुनिया ॥ आणिलासी आपला पती ॥ अभय देऊ नियां ॥ पतिव्रते तारी त्यासी ॥ आरती वडराजा ॥ ६ ॥

---

# आरती रामलिंगाची

३५६. चाल—साधी.

शतगांवीं सिंधू श्वेत रामें बांधिला ॥ कार्याकारण रामें मोडिला मागुता, धनुष्य घोषे फिरवुनी करता, मुहूर्त रत्नकाच्या उचालिल्या लावा, जयदेव जयदेव जय रामलिंगा ॥ अर्धांगी पार्वती मस्तकी गंगा ॥ भाळीं अर्धचंद्र विभुती सर्वे अंगा ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥ संतमुख नदी वहात जे ज्योतीलिंगा, जयदेव ॥ शतगांवीं रामें फिरविले, धनुष्या कोटी बाण सोडिले, तीर्थलिंग पूजा पाहिजे

म्हणूनी हनुमंता बोलावूं पाठविले ॥ २ ॥ इतके बोलून कपी संतापले पोटीं, पुच्छ वेटाळुन घातली मीठी; हालविता न हाले थोर झाला कष्टी, ढळतांना टळे झाला हीन पोटीं ॥ ३ ॥ म्हणती रघुराज कपी तुम्ही श्रमी न व्हावें जानकीनें लिंग आणिलें स्वभावें मी आणिलें काशींतून ते प्रथम तूं पूजावें, मग त्या रामेश्वराचे दर्शन घ्यावें ॥ ४ ॥

# आरती श्रीअदितिवामनाची

३५७. चाल-साधी.

आरति अदितिवामनाची । करावी भावबळें साची ॥ धृ० ॥ मुनिवर कश्यप देवपिता । माय ही अदिति देवमाता ॥ सकलगुण-मंडित सुत त्यांना । ठेंगणा घरी वामन नामा ॥ क्षणीं ब्रह्मांड करुनि थोटें । दाविलें नवल जनीं मोठें ॥ रगाडिलें बळितें । वारिली विपदा विबुधांची ॥ करावी० ॥ १ ॥ बळीची स्वर्गावरि स्वारी । भयाकुल पाहुनि वृत्रारी ॥ शरण निज गुरुलागीं जातां । गुरु म्हणे काळ तुम्हां उलटा ॥ ऐकुनी सोडियला स्वर्ग । अदितिच्या अंतरिं बहु खेद ॥ प्रार्थिता पति करि तिज बोध । पयोव्रत आचरि देवि सती ॥ करावी० ॥ २ ॥ भाद्रपद शुक्ल द्वादशीतें । प्रगटला श्रीहरि बटुरूपें ॥ पदत्रय- मागुनि सुमीतें । नमविलें निज तेजें बळितें ॥ तोषवी देवेंद्रालागीं । पुनरपि स्थापुनि त्या स्वर्गी ॥ सनातन पथ करि सुगम जगीं । वंदूं त्या विश्वव्यापकासी ॥ करावी० ॥ ३ ॥ पातला काळ कठिण कलिचा । वालि श्रीहरिविण नाहिं दुजा ॥ अदिति जगिं धन्य धन्य माता । धन्य सुत वामन जनत्राता ॥ जगीं सत्पुत्र सुमातांचा । सर्वदा विजय असो साचा ॥ द्यावि वर वामन अदितींचा । असो, हें 'वासुदेव' प्रार्थी ॥ करावी० ॥ ४ ॥

## आरती अवधूताची

३५८. चाल–साधी

आरति अवधूता ॥ जय जय आरति अवधूता ॥ धृ० ॥ मीतूं-पणाचा भाव टाकुनी ॥ दर्शन दे संता ॥ जय जय० ॥१॥ ज्ञानाज्ञान खेळ कल्पुनी ॥ सुख देसी चित्ता ॥ जय जय० ॥ २ ॥ प्रेमास्तव हा जन्म घेतला ॥ बाणली खुण दत्ता ॥ जय जय आरति अवधूता ॥३॥

---

## आरती कोकिलेची

३५९. चाल–साधी

गजमुखमाते शुभदे दाक्षायणि गौरी ॥ आरति करितों माते अशिवादूरकरी ॥ तुझिया पिकरूपाचें वर्णन कोण करी ॥ संपत्संतति देई सकलां सुखकारी ॥ १ ॥ जयदेवी जगदंबे हिमनगजादेवी ॥ तूझा गुणगणमहिमा तापत्रय शमवी ॥ जयदेवी० ॥ ध्रु० ॥ दक्षक्रतुमिष अग्नित निज तनु अर्पियली ॥ यास्तव शिव रोषानें रणभू झणि झाली ॥ तोषें रोषें तव तनु कोकिलरुप केली ॥ दक्षस्तवनें पूजा भजकां मनि आली ॥ २ ॥ प्रेमें गाती तव गुण जे सुमनें पुजुनी ॥ प्रेमे वंदिति भजती सेविति मन रमुनी ॥ त्यांचे दुःख हराया येसी धांवोनी ॥ यास्तव विनवी चरणीं दामोदर नमुनी ॥ ४ ॥ जय०

---

## आरती विश्वेश्वराची

३६०. चाल–साधी.

मन कर्णीके दीप लावू । आत्मज्योत ओंवाळूं । ज्ञानाच्या वाती वळू । ज्ञानाच्या वाती वळूं । आऊक्षाची रीत घालु, आरती विश्वेश्वरा ।

जय पार्वती वरा चुकवी येरझारा, ॥ पुन्हां न ये संसारा, आरती विश्वेश्वरा ॥ १ ॥ मन कर्णीका अर्धांगजळीं, तारकमंत्र जपे कानीं मन माझ्या मांडीवरी, जन्म कष्ट निवारी ॥ २ ॥ आरती विश्वेश्वराच्या देऊळीं गेले, भक्तिमंडप विश्रांति पावले, मज द्यावे मुक्तिपद महादेवाचें दर्शन, आरती विश्वेश्वरा ॥ ३ ॥

# आरती बोडणाची

३६१. चाल—साधी.

उग्र तुझे रूप तेज हे किती, । शशी सुधासम असे तव कांती, ॥ अष्ट भुजा अष्ट आयुधें हातीं, । करिसी रिपु संहार भक्त वंदीती ॥ जयदेवी जयदेवी जय कुलस्वामिनी, ॥ आम्ही बहु अपराधी आलो तव चरणी ॥ १ ॥ पंचामृती तुज घालुनी स्नान, ॥ सर्व अलंकार सर्व भूषण, ॥ नीलवर्ण वस्त्र करिसी परिधान, ॥ अंबे व्याघ्र तुजला आवडे वहान, जयदेवी जयदेवी जय कुल स्वामिनी आम्ही ॥ २ ॥ नाकी तुझ्या नथ पायीं पैजंण, जय जननी शक्ती आदि माया पूर्ण, ॥ धूपदीप कर्पूर करू आरतिला, ॥ पंचपक्वान्नांचा नैवेद्य तुला जयदेवी ॥ ३ ॥ संसार तापाचें भय आम्हा भारी, ॥ कृपा करूनिया सर्व निवारी, ॥ आमुचें मनोरथ पूर्ण तूं करी, ॥ उमा तुझे दृढ चरण धरीं ॥ ४ ॥

# आरती मनोबोधाची

३६२. चाल—साधी,

वेदांचें जें गुह्य शास्त्रांचें जें सार ॥ प्राकृत शब्दांमाजी केला विस्तार ॥ कर्म उपासना ज्ञानगंभीर ॥ ज्याच्या मनन मार्गे आत्मा गोचर ॥ जयदेव जयदेव जय मनोबोधा ॥ पंचप्राणे आरती तुज स्वात्मशुद्धा ॥ जय० ॥ दोन शतें पांचश्लोक हे जाण ॥ श्रवणें अर्थे साधक पावति हे खूण ॥ परमार्थासि सुलभ मार्ग हा पूर्ण ॥ यशवंत सद्गुरुदासाचा प्राण ॥ जय० ॥

## आरती मंगळागौरीची

३६३. चाल–साधी.

ओवाळूं आरतीला मंगल गौरी तुजला । सौभाग्या देई आम्हां हीच विनंती तुला । ओवाळूं ॥ ध्रु० ॥ श्रावण-मंगळवारीं जमुं सगळ्या आम्ही नारी । अर्पूं वसनं जरतारीं तुजला बहुत प्रकारीं । माला ह्या सुमनांच्या अर्पुनी पूजनाला ॥ १ ॥ षोडश परिची पत्री ठेवूनिया सत्पात्रीं । वाहूं तुज अति प्रीति आनंदें आम्हीं युवती । स्वीकारीं पूजेला वंदित तव चरणा ॥ २ ॥ वंदन करितों भावें भक्तीनें आम्हीं बाला । दावीं सन्मार्गाला यास्तव नमूं चरणाला ॥ प्रेमानें परिसावें करी या विनंतीला ॥ ३ ॥ प्रार्थी रमातनयाही चिरसौभाग्या तूं देई । मागत नच तव पायीं याविण अंबाबाई ॥ अज्ञानी आम्हीं बाला नमितों चरणाला ॥ ४ ॥ ओवाळूं आरतीला मंगल गौरी तुजला । सौभाग्या देई आम्हां हीच विनंती तुला ॥

---

## आरती ज्ञानेश्वरीची

३६४. चाल–साधी.

श्रीशंकरगिरि हृदयापासुनि तूं प्रगटा ॥ गिरिजा अंगीं विस्तर जाहला बहु मोठा ॥ श्रुत्यादि पुराणांच्या गति झाल्या थोंटा ॥ न कळे मनबुद्धींसी तव प्रभाव मोठा ॥ १ ॥ जय जय स्वयंप्रकाशे ज्ञानेश्वरि देवी ॥ ज्ञानाज्ञानपणाची अज्ञानें पदवी ॥ ध्रु० ॥ मच्छिंद्र सखोल देखुनि भरला वेगान ॥ गोरक्षाला झालें तें अमृतपान ॥ अतृप्त होउनि भरले गहिनीचे कान ॥ वृत्त्यधीन जगत्त्रय फिरती भ्रमरान ॥२॥ हरिहरविधिमुनिसुरनर असुरादिक सारे ॥ वृत्तिग्रस्त म्हणुनियां न सरे भ्रमवारें ॥ म्हणउनि वृत्तीरूपें प्रगटुनि जग सारें ॥ ताराया संसृतिवर धरिले खर शारे ॥ ३ ॥ श्रीज्ञानेश्वरमेघें शोषुनि तव सलिला ॥ सहजें वृष्टि केली सहजासनमहिला ॥ दुष्करकालि

नाशाया दाखविली लीला ॥ तरले असंख्य तरती तारिति सत्कविला ॥ ४ ॥ पूजन श्रवण प्रदक्षिण आवर्तन करिती ॥ मोक्षहि सुलभ तयां पेशी तव कीर्ती ॥ परिसुनि स्थावर माणिक लागे तव पंथीं ॥ परतीं झालीं ज्ञानें तूं आलिस अरती ॥ ५ ॥

# आरत्या दासबोधाच्या

३६५. चाल—अवतार गोकुळीं हो०

वेदांतसंमतीचा ॥ काव्यसिंधू भरला ॥ श्रुतिशास्त्रग्रंथ गीता ॥ साक्ष संगमू केला ॥ माहानुभाव संतजनीं ॥ अनुभव चाखियला ॥ अज्ञान जड जीवां मार्ग सुगम केला ॥ १ ॥ जयजया दासबोधा ॥ ग्रंथराजा प्रसिद्धा ॥ आरती ओंवाळीन ॥ विमळज्ञान बाळबोधा ॥ ध्रु० ॥ नवविधाभक्तिपंथें ॥ रामरूपानुभवी ॥ चातुर्यनिधि मोठा ॥ मायाचक्र उगवी ॥ हरिहर हृदयींचें ॥ गुह्य प्रकट दावी ॥ बद्धचि सिद्ध झाले ॥ असंख्यात मानवी ॥ २ ॥ वीसही दशकांचा ॥ अनुभव जो पाहे ॥ नित्यनेमें विवरीतां ॥ स्वयें ब्रह्मचि होये ॥ अपार पुण्य गांठीं ॥ तरी श्रवण लाहे ॥ कल्याण लेखकाचे ॥ भावगर्भ हृदयीं ॥ ३ ॥

३६६. चाल-साधी.

जय जय दासबोधा ॥ ग्रंथराज प्रसिद्धा ॥ आरती ओंवाळीन ॥ विमलज्ञान बाळबोधा ॥ धृ० ॥ वेदांतसंमतीचा ॥ काव्यसिंधु भरला ॥ श्रुतिशास्त्रग्रंथ गीता । साक्ष संगम केला ॥ महानुभाव संतजनीं । अनुभव चाखीला ॥ अज्ञान जड जीतां । मार्ग सुगम जाला ॥ १ ॥ नवविधा भक्तिपंथें । रामरूप अनुभवी ॥ चातुर्यनिधि मोठा । मायाचक्र उगवी ॥ हरिहरहृदयींचें । गुह्य प्रगट दावी ॥ बद्धाचि सिद्ध झाले । असंख्यात मानवी ॥ २ ॥ वीसही दशकांचा । अनुभव जो पाहे ॥ नित्यनेमें विवरीतां । स्वयें ब्रह्मचि होये ॥ अपार पुण्य गांठीं । तरी श्रवण लाहे ॥ कल्याण लेखकाचें । भावगर्भ हृदयीं ॥ जयजय दासबोधा० ॥ ३ ॥

# आरत्या भागवताच्या

३६७. चाल—साधी.

स्कंधैर्द्वादशसंख्यैरध्यायैरंगैः ॥ पंचत्रिंशत्त्रिशतैःसुखसिंधुतरंगैः ॥ शोभितमष्टादशसाहस्रंतमजस्रं ॥ प्रतिघस्रं संसेवे हतमोहतमिस्रं ॥१॥ जय जय भगवान् श्रीमद्भागवताकारम् ॥ हयवतारं वंदे त्वामहमविकारं ॥ ध्रु० ॥ भक्त्यत्यैकपरार्थं त्वां धर्मोत्कर्षपरं ॥ श्रीकृष्णं जानेऽर्जुनमताविख्यातिकरं ॥ आविद्वद्गोपालांगनकृतसुखनिकरं ॥ श्रवणात्कीर्तनमननाच्छमनात्तापहरं ॥ जय० ॥ २ ॥ अघवात्यासंहारं गोवर्धननिरतं ॥ विधिनारदशुककीर्तितमुद्धाराभिरतं ॥ आनिरुद्धार्थकशिव विग्रहि कामप्रभवं ॥ नवरसमभिरामपदं सततोद्भवमभवं ॥ ३ ॥ त्वद्रससेवी मनुते न परं ब्रह्मसुखं ॥ भक्तिज्ञानविरतयोऽभियंतितं स्वसखं ॥ तं मन्यंते मुनयः कृतनिःशेषमखं ॥ काशीनाथोपि नमति तत्पदयुगलनखं ॥ जय० ॥ ४ ॥

३६८. चाल—भजनाची.

जय जय भगवन् श्रीमद्भागवताकारम् ॥ हयवतारं वंदे त्वामहमविकारं ॥ ध्रु० ॥ स्कंधैर्द्वादशसंख्यैरध्यायैरंगैः ॥ पंचत्रिंशत्रिशतैः सुखसिंधुतरंगैः ॥ शोभितमष्टादशसाहस्रंतमजस्रं ॥ प्रतिघस्रं संसेवे हतमोहतमिस्रं ॥ जय० ॥ १ ॥ भक्त्यैकपरार्थं त्वां धर्मोत्कर्षपरं ॥ श्रीकृष्णं जानेऽर्जुनमतविख्यातिकरं ॥ आविद्वद्गोपालांगनकृतसुखनिकरं ॥ श्रवणात्कीर्तनमननाच्छमनात्ता पहरं ॥ जय० ॥ २ ॥ अघवात्यासंहारं गोवर्धननिरतं ॥ विधिनारदशुककीर्तितमुद्धाराभिरतं ॥ अनिरुद्धार्थकशिवविग्रहि कामप्रभवं ॥ नवरसमभिरामपदं सततोद्भवमभवं जय० ॥३॥ त्वद्रससेवी मनुते न परं ब्रह्मसुखं ॥ भक्तिज्ञानविरतयो ऽभियंति तं स्वसखं ॥ तं मन्यंते मुनयः कृतनिःशेषमखं ॥ काशीनाथोपि नमति तत्पदयुगलनखं जय० ॥ ४ ॥

३६९. चाल–आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म

आरती ओंवाळूं जय जय श्रीमद्भागवता ॥ या कलिकालामाजि दयाळा सुलभ मार्ग भक्तां ॥ दाविसी सुलभ मार्ग भक्तां ॥ आरती० ॥ ध्रु० ॥ अनंतकोटि ब्रह्मांडांचा स्वामी श्रीकृष्ण ॥ सांठविला या ग्रंथीं प्रेमें गाउनि गुणगान ॥ प्रथमस्कंधीं राव परिक्षिति गुणगानीं मग्न ॥ विरागें गुणगानीं मग्न ॥ दुर्लभ भेटी होई शुकांची जाइ तया शरण ॥ आरती० ॥ १ ॥ द्वितीयस्कंधीं मोक्षसाधनें कथिती शुकदेव ॥ भक्तीविणें या जगतीं म्हणती व्यर्थ मनुजदेह ॥ चतुःश्लोकमय मूळ भागवत, तेंवि सकल विश्व ॥ निर्मिलें कंवि सकल विश्व कथुनी, विविध अवतार हरीचे गाती मुनिराय ॥ आरती० ॥२॥ तृतीयस्कंधीं मैत्रेयांचा विदुरासी बोध ॥ वराहरूपें वधिला हरिनें दुष्ट हिरण्याक्ष ॥ देवहूतितें कर्दमआश्रमिं कपिल करिती मुक्त । बोधुनी कपिल करिती० श्रीहरि साक्षात् कपिलस्वरूपें गाति सांख्य-शास्त्र ॥ आरती० ॥३॥ चतुर्थस्कंधीं दक्षकथा, ध्रुव अढळपदीं बैसे ॥ वेनविनाशन, पृथुचरित्र जें तारक सुजनांतें ॥ पुरंजनाचें रूपक अंतीं धन्य ते प्रचेते ॥ विरागें धन्य ते प्रचेते ॥ विदुरालागीं मैत्रेयांचें बोधवचन ऐसें ॥ आरती० ॥ ४ ॥ पंचमस्कंधीं प्रियव्रत, नाभि ऋषभदेव श्रेष्ठ ॥ भरतकथा उद्बोधक कथिली तेंवि भुवनकोश ॥ खगोल वर्णुनि नरक कथियले जनउद्धारार्थ ॥ कथियले जनउद्धा-रार्थ ॥ स्थूल प्रभूचें रूप जाणितां कळे सूक्ष्मरूप ॥ आरती० ॥५॥ षष्ठस्कंधीं अजामिळाची कथा दुरितहारी । कूटबोध तै दक्षकन्य-कावृत बोधकारी ॥ वृत्रकथा तैं मरुद्गणांचा संभव सुखकारी । कथियला संभव सुखकारी ॥ पुंसवनव्रतें दितिनें स्तविला वैकुंठ-विहारी ॥ आरती० ॥ ६ ॥ सप्तमांत ती बालभक्त प्रल्हादकथा कथिली । अष्टमस्कंधीं गजेंद्रमुक्ति, सुधाहि मेळविली ॥ कूर्म, मोहिनी, पावन वामनलीला वर्णियली ॥ शुकांनीं लीला वर्णियली ॥ हयग्रीववध करुनि मत्स्यहरि वेदां सांभाळी ॥ आरती० ॥ ७ ॥ नवमस्कंधीं इला, सुकन्या, अंबरीषभक्त । हरिश्चंद्र श्रीराम पुरुरवा परशुराम श्रेष्ठ ॥ तेंवि ययाति दिवोदास त्यापुढती यदुवंश ।

कथियला पुढती यदुवंश ॥ संक्षेपें श्रीकृष्णकथाही गाइली स्पष्ट ॥ आरती० ॥ ८ ॥ दशमस्कंधीं मूर्तिमंत श्रीकृष्ण उभा केला ॥ मथुरा गोकुळ वृंदावनिच्या निवेदिल्या लीला ॥ कंसादिक खळ वधुनि भूमिचा भार दूर केला । भूमिचा भार दूर केला ॥ द्वारावतिपुरवास करोनिया तोषवि जगताला ॥ आरती० ॥ ९ ॥ एकादशस्कंधांत उद्धवा ज्ञानामृत कथिलें । भक्ती-ज्ञानें धर्म सजवुनी मंदिर बांधियलें ॥ साधुनियां निजकार्य विप्रवच अंति सत्य केलें । विप्रवच अंति सत्य केलें ॥ स्वीकारुनि निजधाम शेवटीं विबुधां तोषविलें ॥ आरती० ॥ १० ॥ द्वादशस्कंधीं युगधर्मादिक वर्णुनि कलिमाजी । तारक सकलां एक हरिकथा शुक मुनि हें कथिती ॥ परीक्षितीउद्धार जाहला हरीभक्ती ऐसी । सुलभ जनिं हरीभक्ती ऐसी ॥ भागवतीं या भक्ती निरंतर वासुदेव प्रार्थी ॥ आरती० ॥ ११ ॥

---

# आरती संतांची

३७०. चाल—आरती ज्ञानराजा०

आरती संतमंडळी ॥ हातीं घेउनि पुष्पांजुळी ॥ ओंवाळीन पंचप्राणें ॥ त्यांचे चरण न्याहाळी ॥ धृ० ॥ मच्छिंद्र गोरक्ष ॥ गैनी निवृत्तीनाथ ॥ ज्ञानदेव नामदेव ॥ खेचर विसोबा संत ॥ सोपान चांगदेव ॥ गोरा जगमित्र भक्त ॥ कबीर पाठक नामा ॥ चोखा परसा भागवत ॥ आरती० ॥ १ ॥ भानुदास कृष्णदास ॥ वडवळसिद्ध नागनाथ ॥ बहिरा पिसा मुकुंदराज ॥ केशवस्वामी सूरदास ॥ रंगनाथ वामनस्वामी ॥ जनजसवंत दास ॥२॥ एकनाथ रामदास ॥ यांचा हरिपदीं वास ॥ गुरुकृपा संपादिली ॥ स्वामी जनार्दन त्यास ॥ मिराबाई मुक्ताबाई ॥ बहिणाबाई उदास ॥ सोनार नरहरी हा ॥ माळी सांवता दास ॥३॥ रोहिदास संताबाई ॥ जनी राजाई गोणाई ॥ जोगापरमानंदसाळ्या ॥ शेखमहंमद भाई ॥ निंबराज बोधराज ॥

माथा तयांचे पायीं ॥ कूर्मदास शिवदास ॥ मलुकदास कर्माबाई ॥ ॥ ४ ॥ नारा म्हादा गोंदा वीठा ॥ प्रेमळ दामाजीपंत ॥ तुकोबा गणेशनाथ ॥ सेना नरसीमहत ॥ तुळसीदास कसाबया ॥ पवार संतोबा भक्त ॥ महिपती तुम्हांपासीं ॥ चरणसेवा मागत ॥ ५ ॥

# आरत्या तुकारामाच्या

३७१. चाल—आरती ज्ञानराजा०

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरुधामा ॥ सच्चिदानंदमूर्ती ॥ पाय दाखवीं आम्हां ॥ ध्रु० ॥ राघवें सागरांत ॥ पाषाण तारीले ॥ तैसें हे तुकोबाचे ॥ अभंग उदकीं रक्षिले ॥ आरती० ॥ १ ॥ तुकी ना तुलनेसी ॥ ब्रह्म तुकासी आलें ॥ म्हणोनी रामेश्वरें ॥ चरणीं मस्तक ठेविलें ॥ आरती० ॥ २ ॥

३७२. चाल—साधी

प्रपंचरचना सर्वहि भोगुनि त्यागिली ॥ अनुतापाचे ज्वाळीं देह-बुद्धि हरविली ॥ वैराग्याची निष्ठा प्रगटुनि दाखविली ॥ अहंममता दवडुनि निजशांती वरीली ॥१॥ जय जयाजी सद्गुरु तुकया दातारा ॥ तारक तूं सकळांचा जिवलग सोयरा ॥ध्रु०॥ हरिभक्तीचा महिमा विशेष वाढविला ॥ विरक्त ज्ञानाचा ठेवा उघडुनि दाखविला ॥ जगदुद्धारालागीं उपाय सुचविला ॥ निंदक दुर्जनाचा संदेह निरसीला ॥ जय० ॥ २ ॥ तेरा दिवस वह्या रक्षुनियां उदकीं ॥ कोरड्याचि काढुनि दाखविल्या शेखीं ॥ अपार कविताशक्ति मिरवुनि इहलोकीं ॥ कीर्तनश्रवणें तुमच्या उद्धरति जन लोकीं ॥ ३ ॥ बाळवेष घेउनि श्रीहरी भेटला ॥ विधिचा जनिता तोचि आठव हा दिधला ॥ तेणें ब्रह्मानंदें प्रेमा डोलविला ॥ न तुके म्हणोनि तुका नामीं गौरविला ॥ ४ ॥ प्रयाणकाळीं देवें विमान पाठविलें ॥ कळिच्या काळामाजीं अद्भुत वर्तविलें ॥ मानव देह घेउनि निजधामा गेले ॥ निळा म्हणे सकल संत तोषविले ॥ जय० ॥ ५ ॥

३७३. चाल–अभंगाची०

घेऊनी आरती॥ चक्रपाणी ओंवाळिती ॥१॥ आजी पुरले नवस ॥ धन्य काळ हा दिवस ॥ २ ॥ पाहा पाहा वो सकळां ॥ पुण्यवंता तुम्ही बाळा ॥३॥ तुका वाहे टाळी ॥ उभा सन्निध जवळी ॥ ४ ॥

# आरत्या ज्ञानदेवाच्या

३७४. चाल–साधी.

इंद्रायणिचे तटीं धरिला राहिवास ॥ विश्व तारावया लक्ष्मीनीवास ॥ ज्ञानेश्वर रूपें धरिला निजवेष ॥ वर्म जाणे तया सद्गुरु उपदेश ॥ १ ॥ जय देव जय देव जय ज्ञानदेवा ॥ जीवाशिवाआदी परब्रह्म ठेवा ॥ ध्रु० ॥ कृष्णएकादशी कार्तीकमासीं ॥ आपण पंढरिनाथ सनकादींकेंसीं ॥ यात्रेलागीं येती स्वानंदराशी ॥ दर्शन घडे तयां निजमुक्ती देसी ॥ जय० ॥ २ ॥ महिषीपुत्र केला वाचक वेदाचा ॥ प्रतिष्ठानीं गर्व हारिला विप्रांचा ॥ विशेष अर्थ केला भगवद्गीतेचा ॥ अजान वृक्ष पिंपळ शोभे कनकाचा ॥ जय० ॥ ३ ॥ सकळ सिद्धगणांमाजी तूं श्रेष्ठ ॥ ज्ञानदेव अनुभवी ज्ञान वरिष्ठ ॥४॥ अनुताप ज्याचा विश्वघनदाट ॥ मुक्तेश्वरीं न धरे प्रेमाचा लोट ॥ ५ ॥

३७५. चाल–साधी.

कलियुगिं त्रासुनि गेले सज्जन भवउष्णें ॥ ते समर्थी अवतारा घेउनि श्रीकृष्णें ॥ तोषविले सज्जन त्या नाना प्रश्नें ॥ तेणें निरसुनि गेलें अज्ञान तृष्णे ॥ १ ॥ जय देव जय देव जय ज्ञानदेवा ॥ मंगल आरति करितों दे स्वपद ठेवा ॥ध्रु०॥ गीतादेवी केली सोपी सकळांला ॥ निजरगुरु परिसुनियां ॥ घोटिति मुखलाळा ॥ टीकारूपी घालुनि दासांला माळा ॥ तेणें छेदुनि नेली अज्ञानज्वाळा ॥ जय० ॥ २ ॥ करितां वाद द्विजांशीं रेडा बोलाविला ॥ विप्रांचा गर्वनिधी तेणें कालविला ॥ अज्ञानांधःकार ज्ञानें घालविला ॥ ब्रह्मज्ञानें

मत्सरदीप मालविला ॥ जय० ॥ ३ ॥ दासांचा सारथी म्हणवुनि मी तुजला ॥ बाहातां दीनदयाळा न पवसि कां मजला ॥ नुलंघति या मातें अज्ञविपिन मजला ॥ दास म्हणे मम जिव हा तद्योगें बुजला ॥ जय देव० ॥ ४ ॥

३७६. चाल–अवतर गोकुळीं हो०

आरती ज्ञानराजा ॥ महाकैवल्यतेजा ॥ सेविती साधु संत ॥ मनु वेधला माझा ॥धृ०॥ लोपलें ज्ञान जगीं ॥ हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥ नांव ठेविलें ज्ञानी ॥ आरती० ॥ १ ॥ कनकाचें ताट करीं ॥ उभ्या गोपिका नारी ॥ नारद तुंबर हो ॥ साम गायन करी ॥ आरती० ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोले ॥ विश्व ब्रह्मची केलें ॥ रामा जनार्दनीं ॥ पाई ठकची ठेले ॥ आरती० ॥ ३ ॥

३७७. चाल–साधी.

होतां कृपा तुझी पशु बोले वेद ॥ निर्जिव चाले भिंती महिमा अगाध ॥ भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरि शुद्ध ॥ करुनी भाविक लोकां केला निजबोध ॥१॥ जय देव जय देव जय ज्ञानसिंधु ॥ नामस्मरणें तुमच्या तुटे भवबंधु ॥ धृ० ॥ चौदाशें वरुषांचे तप्तीतिरवासी ॥ येउनी चांगदेव लागति चरणांसी ॥ करुनी कृपा देवें अनुग्रहिलें त्यांसीं ॥ देउनि आत्मज्ञान केलें सहवासी ॥ २ ॥ समाधिसमयीं सकल समुदाय ॥ घेउनि सुरवर आले श्रीपंढरिराय ॥ द्वारीं सुवर्ण-अजानपिंपळ अनुमाये ॥ जाणुनि महिमा नीळा चरणातळिं राहे ॥३॥

# आरत्या एकनाथाच्या

३७८. चाल–आरती ज्ञानराजा०

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनीं तूंची थोर ॥ जगद्गुरु जगन्नाथा ॥धृ०॥ एकनाथ नाम सार ॥ वेदशास्त्रांचें गूज ॥ संसारदुःख नासे ॥ महामंत्राचें बीज ॥ १ ॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुखवाटलें चित्ता ॥ अनंतगोपाळाची ॥ धरणी न पुरे गुण गातां ॥२॥

३७९. चाल—साधी.

नामरूपीं चालक व्यापक तूं एक ॥ म्हणुनी एका नामें पावा-रिति लोक ॥ ज्याचे नामें न चले विषयांचा पंच ॥ जनार्दनाजवळी कीर्तीचा जनक ॥१॥ जय देव जय देव जय एकनाथा ॥ निर्विकार ब्रह्म तूंचि तत्त्वतां ॥ नामें भवकुंजर ताडूनि लाथा ॥ भक्तप्रतिपालक कळिकाळ माथा ॥ध्रु०॥ निर्मळ गोदातटीं मुनिराज हंस ॥ निर्गुण प्रतिष्ठानीं केला रहिवास ॥ लोकत्रयीं मिरवी कीर्तीचा घोष ॥ आचार विचार निर्मळ निर्दोष ॥ जय० ॥२॥ अपर भानुकुळ उगवला भानू ॥ सूर्याचा सूर्य दैदीप्यमानू ॥ काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर मानू ॥ कृपादृष्टी करुनी तारिसी रजरेणू ॥ जय० ॥ ३ ॥ भगवद्भावें करुनी सकळांशी मैत्री ॥ जन्म म्हणुनी विश्वामित्राचे गोत्रीं ॥ विश्व तरलें हरिहरनामाचे मंत्रीं ॥ पाहूं न शके जवळ कळिकाळ नेत्रीं ॥ जय देव० ॥४॥ ब्राह्मण तीर्थी पूजा, नामाचा महिमा ॥ सत्कर्में लोटलीं मोक्षाची सीमा ॥ नाना मतांचिया वंदूनी गरिमा ॥ मुक्तेश्वरें तेथें धरियेला प्रेमा ॥ जय० ॥ ५ ॥

# आरती नामदेवाची

३८०. चाल—साधी.

जन्मतां पांडुरंगें । जिव्हेवरी लिहिलें ॥ अभंग शतकोटी । प्रमाण कवित्व रचिलें ॥ १ ॥ जय जयाजी भक्तराया । जिवलग नामया ॥ आरती ओंवाळीतां । चित्त पालटे काया ॥ धृ० ॥ घ्यावया भक्ति-सुख । पांडुरंगें अवतार ॥ धरूनियां तीर्थमिषें । केला जगाचा उद्धार ॥ जय० ॥ २ ॥ प्रत्यक्ष प्रचीती हे । वाळवंट पारिस केली ॥ हारपली विषमता । द्वैतबुद्धी निरसली ॥ जय० ॥ ३ ॥ समाधि महाद्वारीं । श्रीविठ्ठलचरणीं ॥ आरती ओंवाळीतों । परिसा कर जोडूनी ॥ जय जयाजी भक्तराया० ॥ ४ ॥

# आरत्या रामदासाच्या

३८१. चाल—संत सनकादीक०

ओंवाळूं ओंवाळूं सद्गुरु रामदास राणा ॥ पंचही प्राणांचा दीप लाविला जाणा ॥ धृ० ॥ अज्ञान तिमिर ज्योति सद्गुरु उजळल्या वाती ॥ ज्ञानबोध प्रगटला तेणें प्रकाशली दीसी ॥ १ ॥ निर्गुण निरंजन ज्योति सद्गुरु रामदास ॥ दर्शन मंगलप्रद कल्याणाचा कळस ॥२॥

३८२. चाल—आरती ज्ञानराजा

साक्षात् शंकराचा ॥ अवतार मारुतीचा ॥ कलिमाजीं तेचि जाली ॥ रामदासाची मूर्ती ॥ १ ॥ आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा ॥ उगवला ज्ञानसूर्य ॥ उजळोनि प्रकाशा ॥ धृ० ॥ वीसही दशकांचा ॥ दासबोध ग्रंथ केला ॥ जडजीवां उद्धरीलें ॥ नृप शिवासि तारिलें ॥ २ ॥ ब्रह्मचर्य व्रत ज्याचें ॥ रामरूप सृष्टि पाहे ॥ कल्याण तिहीं लोकीं ॥ समर्थ सद्गुरुपाय ॥ ३ ॥

३८३. चाल—साधी.

आरती रामदासा ॥ भक्तविरक्त ईशा ॥ उगवला ज्ञानसूर्य ॥ उजळोनी प्रकाशा ॥ धृ० ॥ साक्षात् शंकराचा अवतार मारुती ॥ कलिमाजीं तेंचि जाली ॥ रामदासाची मूर्ती ॥ १ ॥ वीसही दशकांचा ॥ दासबोध ग्रंथ केला ॥ जडजीवां उद्धरीलें नृप शिवासीं तारिलें ॥ २ ॥ ब्रह्मचर्य व्रत ज्याचें । रामरूप सृष्टि पाहे ॥ कल्याण तिहीं लोकीं । समर्थ सद्गुरुपाय ॥ ३ ॥

---

# आरत्या श्रीसाईनाथांच्या

३८४. चाल—साधी

जय देव जय देव जय साईनाथा । श्री सद्गुरुनाथा । विश्वंभर विश्वेशा तारक तूं जगता ॥ धृ० ॥ ब्रह्मांडाचा नायक देवा तूं

कळलें । प्रत्यय निजभक्तांते अद्भुत दावियले । ब्रह्मां, विष्णु शंकर गणपति तूं त्राता । भजतां तव पदकमला हरसी भवचिंता ॥१॥ हरुनी दारिद्याते रंका रक्षियलें । रोगग्रस्तां तुझिया उदिनें तारियले । वांझेसी तोषविले देउनिया पुत्रा । जो जो वांछिल त्यांचा तूं असती दाता ॥ २ ॥ ज्ञान रवी तूं दिधले, ज्ञाना अज्ञाना । सन्मार्गा लाउनिया उद्धरिले त्यांना । ऐशी तूं सकलांची ममताळू माता । रोमांचित तनु होई गुण महिमा गातां ॥ ३ ॥ यमपाशा तोडुनी तूं भक्त सोडविले । आयुर्बल देऊनि त्यां, सकला तोषविले । ऐसे सामर्थ्याचे प्रताप तव गाता । शिणली मति मम आलो शरण तुला नाथा ॥ ४ ॥ मद्वचनी विश्वासुनि जे सेवा करिती । त्यांची चिंता लागे रात्रंदिन मजसी । ऐसें दृढ आश्वासन दिधलेसी जगता । करुणेचा सागर तूं असती गुरुनाथा ॥ ५ ॥ समतेची योगाची मूर्ती श्रीसाई । ऋद्धी सिद्धी घेती लोळण तव पायीं । अंतर साक्षी तुजला सर्वांची वार्ता । अगम्य तुजला कांहीं ऐसा तूं ज्ञाता ॥ ६ ॥ लाभे फळ, करितां तव नवस समाधीला । दाखविसी अद्यापी निज दासा लीला । चुकतां पथ दर्शविसी देउनि दृष्टांता । हीना दीनांचा तूं स्वामी हितकर्ता ॥ ७ ॥ जन्मोजन्मीं मजला घडु दे श्रीसेवा । आशिर्वचनाची तव लाभो मज सेवा । घालुनिया लोटांगण याचितसे नाथा । पापात्मा मी यास्तव लोटुं नका परता ॥ ८ ॥

३८५. चाल—साधी.

आरती साईबाबा ॥ सौख्यदातारा जीवा चरणरजतळीं ॥ द्यावा दासां विसांवा, भक्तां विसांवा ॥धृ०॥ जाळुनियां अनंग ॥ स्वरूपीं राहे दंग ॥ मुमुक्षु जनां दावी ॥ निज डोळां श्रीरंग ॥डोळा०॥आ०॥१॥ जया मनीं जैसा भाव ॥ तया तैसा अनुभव ॥ दाविसी दयाघना ॥ ऐसी तुझी ही माव ॥ तु० ॥ आ० ॥ २ ॥ तुमचें नाम ध्यातां ॥ हरे संसृतिव्यथा अगाध तव करणी ॥ मार्ग दावीसि अनाथा ॥ ॥ दा० ॥ आ० ॥ ३ ॥ कलियुगीं अवतार ॥ सगुणब्रह्म साचार ॥

अवतीर्ण झालासे ॥ स्वामी दत्त दिगंबर ॥द० ॥आ० ॥ ४ ॥ आठां दिवसां गुरुवारीं ॥ भक्त कारिती वारी ॥ प्रभुपद पहावया ॥ भवभय निवारी ॥ भ० ॥ आ० ॥ ५ ॥ माझा निज द्रव्य ठेवा ॥ तव चरण-रजसेवा ॥ मागणें हेंचि आतां ॥ तुम्हां देवाधिदेवा ॥द०॥आ०॥६॥ इच्छित दीन चातक निर्मल तोय ॥ निजसुख पाजावें माधवा या ॥ सांभाळ आपुली भाक ॥ आ० भा० ॥ आ० ॥ ७ ॥

---

# आरती श्रीसिद्धारूढस्वामींची

३८६. चाल—साधी

आरती सिद्धराया । करूं, द्वैत सोडोनीयां । आशा ममता तृष्णा बीज । टाका तुम्ही जाळोनीयां ॥ धृ० ॥ चित्सुख परात्पर । नाम सिद्धारूढ सार । देव भक्त तूंचि होसी क्रीडा करिसी अपार ॥१॥ काम-क्रोध-लोभ । देहीं नांदतो स्वयंभ । हेची शत्रू दूर होता । आम्हां होसी तूं सुलभ ॥ २ ॥ भक्ति प्रेम तुज प्रीय । म्हणुनि सगुणरूपीं सोय । हुबळींत सिद्ध रूपें । होसी भक्तांची तूं माय ॥ ३ ॥ नामाचा तूं अभिमानी । आलें तें पूर्ण कळोनी । कधीं नाहीं उपेक्षिले । जे कां लागले भजनीं ॥ ४ ॥ श्रीधर दास तुझें पोर । करूं नको कधीं दूर । अखंडित तुझ्या पायीं । ठेवा करूनि स्थिर ॥ ५ ॥

---

# आरती श्रीअक्कलकोटस्वामींची

३८७. चाल—साधी

जयदेव जयदेव जय श्रीस्वामिसमर्था । आरति ओंवाळूं चरणीं, ठेवुनियां माथा ॥ धृ० ॥ छेली-खेडेग्रामीं, तूं अवतरलासी । जगदुद्धारासाठीं, राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा, तूं एक होसी ।

म्हणुनि शरण आलों, तूझे चरणांसी ॥ जय० ॥ १ ॥ त्रैगुण-परब्रह्म, तूझा अवतार । त्याची काय वर्णू, लीला पामर ॥ शेषादिक शिणले, नलगे त्या पार । तेथें जडमूढ कसा, करुं मी विस्तार ॥ जय० ॥ २ ॥ देवांदी देव, तूं स्वामीराया । निर्जर मुनिजन ध्याति, भावें तव पाया ॥ तुजसी अर्पण केली, आपुली ही काया । शरणागता तारीं, तूं स्वामीराया ॥ जय० ॥ ३ ॥ अघटित लीला करुनी जडमुढ उद्धरिले । कीर्ती ऐकुनि कानीं, चरणीं मी लोळें ॥ चरण-प्रसाद मोठा, मज हें अनुभवलें। तूझ्या सुता नलगे, चरणा वेगळें॥ जयदेव० ॥ ४ ॥

---

# आरती श्रीगोंदवलेकर महाराज

३८८. चाल–साधी. (कानडी)

आरति बेळगुवे सद्गुरु श्रीब्रह्मचैतन्या । परब्रह्मा परात्परा सनकादिकमान्या ॥ आ० पल्ला ॥ नित्यशुद्धा निजानंदा निरुपम-वैभवा । निरंजना निष्प्रपंचा निजजनभवदावा । निरीह निर्मळ मुनिगणनुतपद कायो राघवा ॥ आरति बे० ॥ १ ॥ वाराणसी क्षेत्रदि प्रेतव वदकिसिदातने । इदलिदूबू दूरिन भक्तगे दर्शन कोट्टवने वंदु पाविन अन्नव सावेर मंदिगुणसिदवने ॥ आरति बे० ॥ २ ॥ सुंदरानना कुंदरादना इंदीवरनयना । मंदस्मित हृन्मंदिर-स्थापित इंदिरारमण गंधवाह प्रिय पाहि ब्रह्मानंदना ॥ आरती बेळगुवे ॥ ३ ॥

---

# आरती यशवंतराव महाराजांची

३८९. चाल–साधी.

जय देव जय देव जय जय यशवंता ॥ आरति ओंवाळीतां हरली भवचिंता ॥ धृ० ॥ अहंपणाची आरति धरिली मी हातीं ॥

कामक्रोधादिकांच्या वळिल्या त्या वाती ॥ कल्पनेच्या घृतें उजळिल्या ज्योति ॥ आरति ओंवाळीतां हरली भवभीती ॥ जय० ॥ १ ॥ पूर्ण-ब्रह्मरूप असतां निर्गुण ॥ भक्तांसाठीं रूप धरिलेंसी सगुण ॥ त्या स्वरुपाची अनुभवि जाणती खूण ॥ तयासि पाहतां हरि हा गेला रंगून ॥ जय० ॥ २

---

# सकाळच्या कांकडआरत्या

३९०. चाल–साधी.

उठा उठा साधुसंत साधा आपुलालें हित ॥ जाईल जाईल हा नरदेह मग कैंचा भगवंत ॥ १ ॥ उठोनियां वेगेसी चला जाऊं राऊ-ळासी ॥ जळती पातकांच्या राशी कांकडआरती देखिलिया ॥ २ ॥ उठा उठा हो पांहटे विठ्ठल पहावा उभा विटे ॥ चरण रायाचे गोमटे अमृत दृष्टी अवलोका ॥ ३ ॥ जागें करा रुक्मिणीवरा देव आहे निदसुरा ॥ जीवें निंबलोण करा दृष्ट होईल तयासी ॥ ४ ॥ पुढें वांजत्रे वाजती ढोल दमामे गर्जती ॥ होती कांकडआरती माझ्या पंढरीरायाची ॥ ५ ॥ सिंहनाद शंख भेरी गजर होतो महाद्वारीं ॥ केशवराज विटेवरी नामा चरण वंदितो ॥ ६ ॥

३९१. चाल–साधी.

उठोनियां हरिजन मिळोनी आले राउळा ॥ जोडुनियां कर विनंती करिती गोपाळा ॥ १ ॥ उठा पांडुरंग हरिभक्तां सांभाळीं ॥ पाहुंद्या वदन वंदु पायांची धुळी ॥ २ ॥ उगवला दिनकर जाल्या उजळल्या दिशा ॥ कोठवर निद्रा आली तुम्हां परियेसा ॥ ३ ॥ तुका म्हणे उभे तिष्ठत महाद्वारापाशीं ॥ गाई गोप वत्स पक्ष्या ठाया सरशीं ॥४॥

३९२. चाल–साधी

उठा सकळ उठले जन नारायण ॥ आनंदाले मुनि तिन्ही लोक ॥ १ ॥ करा जयजयकार वाद्यांचा गजर ॥ मृदंग विणे अपार

टाळ घोळ ॥ २ ॥ जोडुनी दोन्ही कर मुख पाहा सादर ॥ पायांवरी शिर ठेवूनीयां ॥ ३ ॥ तुका म्हणे काय पढियंतें मागा ॥ आपुलालें सांगा सुखदुःख ॥ ४ ॥

३९३ चाल—संतसनकादिक भक्त०

भक्तीचीये पोटीं बोधकांकडा ज्योती ॥ पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती ॥१॥ ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा ॥ दोन्ही कर जोडुनी चरणीं ठेविला माथा ॥ २ ॥ काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती ॥ कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥३॥ विटेसहित पाउलें जिवें भावें ओंवाळूं ॥ कोटि रवि शशि जैसे उगवले हेळूं ॥४॥ राई रखुमाबाई दोघी उभ्या दों बाहीं ॥ मयूरपिच्छचामरें ढाळिती ठाईंच्या ठाईं ॥ ५ ॥ तुका म्हणे दीप घेउनी उन्मनीत शोभा ॥ विटेवरी उभा जैसा लावण्यगाभा ॥ ६ ॥

३९४. चाल—अवतार गोकुळीं हो०

अनुपम नगर ॥ वसे पंढरपुर ॥ भीमा मनोहर ॥ संतांचें माहेर ॥ अव्यक्त आदिमूर्ति ॥ परब्रह्म साकार ॥ विटेवरी नीट उभा कटिं ठेवुनी कर ॥१॥ जय देवा पांडुरंगा ॥ जय आनंदकंदा ॥ आरती ओंवाळीन ॥ पुंडरीकवरदा ॥धृ०॥ गोमती गोदावरी ॥ यमुना सरस्वती ॥ कृष्णा तुंगभद्रा ॥ नर्मदा भागिरथी ॥ सकाळिक माध्यान्हीं ॥ चंद्रभागेसी येती ॥ कनकपात्र आरतीया ॥ विठोबा ओंवाळिती ॥ २ ॥ धन्य हा वेणुनाद ॥ क्रीडा करी गोविंद ॥ पश्चिमे पद्मतीर्थ ॥ क्षेत्रपाळ प्रसिद्ध ॥ नारद तुंबर हो ॥ गाती ध्रुवप्रल्हाद ॥ प्रेमें आनंदभरित ॥ करिताती आनंद ॥ जय० ॥ ३ ॥ तीर्थक्षेत्राच्या पेशा मिळती कोटी पांडुरंग एकसरी ॥ न ये एकचि घडी ॥ वामांगीं रखुमाई ॥ वेद बोलती प्रौढी ॥ जयजयकार करिती ॥ देव तेहतिस कोटी ॥ जय० ॥ ४ ॥ ऐसा देवाधिदेवो ॥ विठु पंढरीरावो ॥ भक्तजन कुटुंबिया ॥ देवीरखुमाबाईनाहो ॥ पुरविल मनकामना ॥ कैवल्या उपावो ॥ कान्होया हरिदास ॥ मागे प्रेमपासावो ॥ जय० ॥ ५ ॥

---

# धूपारती

३९५. चाल—साधी.

जय देव जय देव जय पंढरिराया ॥ धूप अर्पितसें मी भावें तव पाया ॥ धृ० ॥ सोज्वळ अग्नीरूपा निजतेजोराशी ॥ अहंभाव धूप कृपें जाळीसी ॥ त्याचा आनंद माझे मानसी ॥ तव दर्शनमोदें सुख हें सर्वांसी ॥ जय० ॥ १ ॥ पूर्णानंद देवा तूं सच्चिदानंदकंदा ॥ परमात्मा तूं असती आनंदकंदा ॥ पूर्ण करीं तूंची भक्तांच्या छंदा ॥ अंगीकारुन धूपा दे ब्रह्मानंदा ॥ जय देव० ॥ २ ॥

# दीपारती

३९६. चाल—साधी.

जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ एकार्ती ओंवाळूं तुजला जिवलगा ॥ धृ० ॥ स्वयंप्रकाशा तुझी सर्वही दीप्ती ॥ पूर्णानंद प्राप्त करितां तव भक्ती ॥ देहत्रय वाती पाजळोनी पीर्ती ॥ ओंवाळितों प्रेमें देवा तुजप्रती ॥ जय ॥ १ ॥ देवा तुज पावेतों येतो प्रेमपूर ॥ नाम निरंतर गातां होतो भवपार ॥ वाटे तव भक्ती ही मोठी प्रियकर ॥ विष्णुदासा देईं अखंड हा भर ॥ जय० ॥ २ ॥

# नैवेद्यारती

३९७. चाल—साधी.

जय देव जय देव जय विठाबाई ॥ पक्कान्नादी सिद्धी अर्पीं तुज ठायीं ॥ धृ० ॥ षड्रसपक्कान्नें हीं आर्पित तुज माई ॥ कृपा धरुनी ती तूं मान्य करुन घेईं ॥ तृप्ती सर्व जीवां जेवितां तूं आई ॥ जीवन

सर्वांचें हें असे तव पायीं ॥ जय० ॥ १ ॥ आनंदें भोजन करावें आतां ॥ यथेच्छ जेउनी उच्छिष्ट उरतां ॥ तो प्रसाद देई आपुल्या भक्तां ॥ हेंचि मागें ठेवुनि तव चरणीं माथा ॥ जय० ॥ २ ॥

# महा आरती

३९८. चाल–साधी.

जय देव जय देव जय पांडुरंगा ॥ आरती ओंवाळूं भावें जिवलगा ॥ धृ० ॥ पंढरीक्षेत्रासी तूं अवतरलासी ॥ जगदुद्धारासाठीं राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा तूं एक होसी ॥ म्हणुनी शरण आलों तूझे चरणांसी ॥ जय० ॥ १ ॥ त्रिगुण परब्रह्म तूझा अवतार॥ त्याची काय वर्णूं लीला पामर ॥ शेषादिक शिणले न लगे त्यां पार ॥ तें जडमूढ मी कैसा करूं विस्तार ॥ जय० ॥ २ ॥ देवाधिदेव तूं पंढरिराया ॥ निर्जर मुनिजन ध्याती भावें तव पायां ॥ तुजसी अर्पण केली अपुली मीं काया ॥ शरणागता तारीं तूं देवराया ॥ जय० ॥ ३ ॥ अघटित लीला करुनी जढ मूढ उद्धरिले ॥ कीर्ती ऐकुनि कानीं चरणीं मी लोळें ॥ चरणप्रसाद मोठा मज हें अनुभवलें ॥ तुझ्या भक्तां न लगे चरणाविगळें ॥ ४ ॥

# निरांजन आरती

३९९. चाल–साधी.

जय देव जय देव नीरांजन सांई ॥ नीरांजन ओंवाळूं भावें तवपायीं ॥ धृ० ॥ पंचतत्वांचें हें केलें नीरांजन ॥ पंचप्राणवाती बरव्या घालून ॥ मोहेस्नेहें तेंची करुनी परिपूर्ण ॥ दीपज्योती ज्ञानतेजें पाजळून ॥ जय देव० ॥ १ ॥ सच्चिदानंद तूं आनंदमूर्ती ॥ तुझ्या प्रतापाची सर्वेही दीप्ती ॥ तुझिया चरणीं जडो माझी ही भक्ती ॥ विष्णुदासा नसे अन्यत्र प्रीति ॥ जय० ॥ २ ॥

# निरोप गीत

४००. चाल—संत सनकादिक भक्त०

जाहलें भजन आम्ही नमितों तव चरणा, नमितों तव चरणा ॥ वारुनिया विघ्नें देवा रक्षावें दीना ॥ धृ० ॥ दास तूझे आम्ही देवा तुजलाची ध्यातों, देवा तुजलाची ध्यातों ॥ प्रेमें करूनियां देवा गुण तूझे गातों ॥ १ ॥ तरी न्यावी सिद्धी देवा हेची वासना, देवा हेची वासना ॥ रक्षूनीयां सर्वां द्यावी आम्हांसी आज्ञा ॥ २ ॥ मागणें तें देवा आतां एकची आहे, आतां एकची आहे ॥ तारूनीयां सकळां आम्हां कृपादृष्टिं पाहें ॥ ३ ॥ जेव्हां सर्व आम्ही मिळूं ऐशा या ठाया, ऐशा या ठाया ॥ प्रेमानंदें लागूं तुझी कीर्ती गावया ॥ ४ ॥ सदां ऐशी भक्ती राहो आमुच्या मनीं, आमुच्या मनीं ॥ हेची देवा तुम्हां असे नित्य विनवाणी ॥ ५ ॥ वारुनियां संकटें आतां आमुचीं सारीं, आतां आमुचीं सारीं ॥ कृपेची साउली देवा दीनावरि करीं ॥ जाहलें० ॥ ६ ॥ निरंतर आमुची चिंता तुम्हां असावी, चिंता तुम्हां असावी ॥ सर्वांची लज्जा देवा तुम्हीं रक्षावी ॥ जाहलें० ॥७॥

---

# शेजारत्या

४०१. चाल—संत सनकादिक भक्त०

आरती आरत ऐक्यभावें ओंवाळूं ॥ प्रकाश स्वयंज्योती निजतेजें बंबाळूं ॥ धृ० ॥ परमात्मा श्रीराम महामाया जानकी ॥ विश्रांति पावली गजर न कीजे सेवकीं ॥ १ ॥ स्नेह ना भाजन नाहीं वाती पावक ॥ सबाह्याभ्यंतरीं अवघा निघोट दीपक ॥ २ ॥ ऐक्याचे सुमनशेजे आत्मा रघुपती, राजाराम रघुपती ॥ वाचा परुषली शब्द न बोलवे पुढती ॥३॥ राम आणि दास चैतन्य पहुडलें रामीं ॥ हेंही बोलावया दुजा न उरे धामीं ॥ ४ ॥

४०२. चाल—संत सनकादिक भक्त०

पावला प्रसाद आतां विठो निजावें विठो निजावें ॥ आपला तो श्रम कळों येतसे भावें ॥१॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा निद्रा करा गोपाळा ॥ पुरले मनोरथ जातो आपुलिया स्थळां ॥२॥ तुम्हांसी जागविलें आम्हीं आपुलिया चाडा, आपुलिया चाडा ॥ शुभाशुभ कर्में दोष हरावया पीडा ॥३॥ तुका म्हणे उच्छिष्टाचें दिलें भोजन, दिलें भोजन ॥ नाहीं निवडिलें आम्हां आपुलिया भिन्न ॥४॥

४०३. चाल—संत सनकादिक भक्त०

रामा रामा रामा रामा रघुनंदना, रघुनंदना ॥ रामा रामा रामा रामा कुळभूषणा ॥१॥ रामा रामा रामा रामा जानकीपते, जानकीपते ॥ रामा रामा रामा रामा विमलपते ॥२॥ रामा रामा रामा रामा दीनवत्सला, भक्तवत्सला ॥ रामदास म्हणे तुझी अगम्य लीला ॥३॥ रामा रामा रामा रामा रामा हो, जय रामा हो ॥ तारीं तारीं तारीं तारीं आम्हां हो ॥४॥ तोडी तोडीं तोडीं तोडीं भवपाश, भवपाश अनन्यशरण रामीं रामदास ॥५॥ राम राम राम जप सीताभिराम, सीताभिराम ॥ राम राम राम जप सीताभिराम ॥६॥

---

# प्रार्थना

४०४. चाल—साधी.

जाणें न आवाहन वा विसर्जन। पूजा न जाणें तव ती जनार्दन ॥ जाणें न कांहीं तुजवीण ईश्वरा। क्षमा करावी मज दीन पामरा ॥१॥ गेलेंच पाप मम दुःखहि सर्व गेलें। दारिद्र्य सर्वहि तुवां विलयासि नेलें। संपत्ति सौख्य सगळें क्षणिं येत हाता। कारुण्यसिंधु तुजला नयनीं पहातां ॥२॥ मंत्रहीन क्रियाहीन। भक्तिहीन असें तरी ॥ पूजा ही आदरें सेवीं। पूर्ण आणोनी अंतरीं ॥३॥ अपराधसहस्त्रें जीं। प्रत्यहीं घडतीं करीं ॥ दास मानूनि पायांचा। परमेश क्षमा करीं ॥४॥ रूपा देई जया देई। यशा देई वधीं अरी ॥ सौभाग्या दे सुतांतें दे। पूर्णकाम मला करीं ॥५॥

४०५. चल-साधी.

घालीन लोटांगण, वंदीन चरण। डोळ्यांनिं पाहिन रूप तुझें॥ प्रेमें आलिंगिन, आनंदें पूजिन, भावें ओंवाळिन म्हणे नामा॥ १॥ त्वमेव माता पिता त्वमेव त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देवदेव॥ २॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्॥ करोमि यद्यत् सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि॥ ३॥ अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे॥ ४॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे॥
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे॥ ५॥

---

# मंत्रपुष्पांजलि

४०६. चाल-साधी.

ॐयज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। तेहनाक महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः॥ ॐराजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं। कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः॥ ॐस्वस्ति। साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं राज्यं, माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापारार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति॥ तदप्येषश्लोकोभिगीतो "मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्याऽवसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद" इति॥

— समाप्त —

# सूचि


| आरत्या | पृष्ठांक | आरत्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| अइ सगुण | ४५ | आरती आरत | १८० |
| अघटित भीम परा. | ११४ | आरती आरती दत्त | १२८ |
| अघसंकट भय | १४६ | आरती एकनाथा | १७० |
| अनादि आदि | ६९ | आरती ओवाळितों | १३० |
| अनादि गणना | ५ | आरती ओवाळूं जय | १६६ |
| अनुपम नगर | १७७ | आरती ओवाळूं श्रीगुरु | १३१ |
| अनुसूया सुत | १२९ | आरती ओ० श्रीगुरुदत्त | १३२ |
| अभिनव सुंदर | ३६ | आरती करितो गणपती | १६ |
| अयोध्या पुर | ९० | आरती करितो सत्यप्रभु | १४२ |
| अर्णव समिप | ४६ | आरती करितो राघव | ९३ |
| अर्धांगी हे | ३४ | आरती करूं गोपाळा | ११८ |
| अवतरला रघुपति | ८४ | आरती करूं तुज | ३ |
| अवतार गोकुळी | ९८ | आरती गणपती | ८ |
| अश्वपति पुसता | १५९ | आरती गौरिनंदनाची | १७ |
| आगमी निगमी | १४९ | आरती चंद्रशेखराची | २३ |
| आजि रघुपती | ९३ | आरती जगन्मोहिनी | ६१ |
| आजुनि अंत | ४३ | आरती तिमिर | ११८ |
| आतां करू माय | ९४ | आरती तुकारामा | १६८ |
| आतां स्वामी | १२७ | आरती त्रिजगदंबिकेची | ५६ |
| आदि अवतार | ४ | आरती दत्तात्रय प्रभु० | १२१ |
| आद्यस्थान तुझें | ४१ | आरती दत्तराज गुरु | १२३ |
| आनंदे उदो | ४१ | आरती परम ईश्व० | ३० |
| आरती आदिती | १६० | आरती बेळगुवे | १७५ |
| आरती अनंतभुजा | ७४ | आरती भुवनसुंदराची | १०४ |
| आरती अवधूता | १६१ | आरती मी करिन | १४ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| आरती रामचंद्रजी | ८५ |
| आरती रामदासा | १७२ |
| आरती विश्वंभरा | १४५ |
| आरती शंभुनंदनाची | १० |
| आरती सद्गुरूची | १३६ |
| आरती सद्गुरूची | १३८ |
| आरती सप्रेम | ८२ |
| आरती साईबाबा | १७३ |
| आरती सिद्धराया | १७४ |
| आरती संतमंडळीं | १६७ |
| आरती ही तुजला | ११३ |
| आरती ही तुजला नरहरी | १३४ |
| आरती ज्ञानराजा | १७० |
| आवडी गंगाजळी | ८ |
| आवाहन ध्यान | ४७ |
| आश्विन शुद्धपक्षी | ३८ |
| इंद्रायणीचे तटीं | १६९ |
| उग्र तुझें रूप | १६२ |
| उठाउठा साधूसंत | १७६ |
| उठा सकळ उठले | १७७ |
| उठोनिया हरिजन | १७६ |
| उदधि लहरीसी | ५२ |
| उंदिरावरी | ३ |
| उपमा नाहीं | २१ |
| एकदंता गुणवंता | ४ |
| ऐकावी कथा | ८९ |
| ऐसी या पाया | ७५ |
| ओवाळिन ओजा | ६३ |
| ओवाळूं आरती देवा | ९ |
| ओवाळूं आरती महा | ५६ |
| ओवाळूं आरती माझ्या | ७६ |
| ओवाळूं आरतीला | १६३ |
| ओवाळूं आरती श्रीगुरू | १३२ |
| ओवाळू ओवाळू आरती | ७२ |
| ओवाळू ओवाळूं सद्गुरु | १७२ |
| ओवाळू गे माये | ७७ |
| अंबे प्रार्थितसे | ३९ |
| ओंकार प्रणवाक्षरी | १० |
| ओंम नमो आद्यरूपें | ४४ |
| कडकड शद्वे | १३४ |
| कडकाडिला स्तंभ | १३३ |
| कपोल झरती | ९ |
| कमलानन खग | १०१ |
| कमलाधर कमलाकर | ८७ |
| कर्पूर गौरा | ३३ |
| करवीर पुर वासिनी | ४० |
| करवीरालय वासिनी | ६२ |
| करुणाकर | ११० |
| कलियुगी त्रासुनी | १६९ |
| कवण अपराधा | ५५ |
| काकड आरती पर | ९४ |
| कामक्रोधादिक | ५१ |
| काय करूंगे | ८६ |
| काय तुझा महिमा | ७९ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| कुंददंत मंद हास्य | ११० |
| कुलदैवत तूं | २८ |
| कृष्णा पंचगंगा | १२० |
| कोटी कुर्वंडिया | १०५ |
| कोटीच्या ही कोटी | ११५ |
| कोणा शरण | ९९ |
| कोल्हापुरी देवी | ६१ |
| कंस रायें गर्भ | १०६ |
| कंस वधार्थ धरातल | १०८ |
| गजवदना देवा | १४७ |
| गजमुख माते शुभ | १६१ |
| गजवदना पुजुनी | १८ |
| गजवदना सुखसदना | १४६ |
| गजवदना मन | ८ |
| गणपती नमिती | ६ |
| गणराज आज | १३ |
| गणराया आरती | १५ |
| गणराया हें माझ्या | १६ |
| गावो नाचो विठो | ७६ |
| गौरीवर गंगाधर | ३७ |
| घालीन लोटांगण | १८२ |
| घेऊनी आरती | १६९ |
| चिल्कला चिद्रुपा | ४३ |
| चतुरानन भय | ५३ |
| चरण कमल ज्याचें | ९९ |
| जग ताराया | १४ |
| जग तारिणी | ५८ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| जगदात्मा जगदात्मा | ११७ |
| जगदीश जगदीश | १७५ |
| जमदग्नी कुळ | १३५ |
| जन्मतां पांडुरंगे | १५१ |
| जय आरती त्रिभुवन | ६५ |
| जय आरती पार्वती | ३४ |
| जय अंबे जगदंबे | ७१ |
| जय जगदंबे सुखकर | ६८ |
| जय जय अंजनि बाला | ११६ |
| जय जय आरती | १५ |
| जय जय कटिकर | ७४ |
| जय जय गणपति | ११ |
| जय जय गणपति अघ | १३ |
| जय जय चतुरानन | ११३ |
| जय जय जगतम हरणा | ११९ |
| जय जय जगनकनका | ११२ |
| जय जय जय जमदग्नीज | १३५ |
| जय जय जयजी कृष्णनाथा | १०८ |
| जय जयजी दत्तराज भो | १२९ |
| जय जयजी दत्तराज हि | १२९ |
| जय जयजी मदनांतक | ३२ |
| जयजयाजी शिवकुमरा | १८ |
| जयजयाजी विघ्नहरा | १४ |
| जयजय दत्तदिगंबर | १२४ |
| जय जय दीनदयाळे | ७० |
| जय जय दीन दयाळा | १४२ |
| जय जय त्र्यंबकराज | २५ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| जय जय दासबोधा | १६४ |
| जज जय दुर्गे माते | ६८ |
| जय जय नाथ निरामय | २९ |
| जय जय निजादिमाता | ४२ |
| जय जय पयोब्धि | ८१ |
| जय जय परमानंदे | ६७ |
| जय जय भगवत् | ५२ |
| जय जय भगवन् | १६५ |
| जय जय विघ्न वि. | ७ |
| जय जय श्रीदत्तगुरु | १३३ |
| जय जय श्रीरामचंद्र | ९६ |
| जय जय श्रीशनिदेवा | १४७ |
| जय जय सिद्धि० | १६ |
| जय जयाजी शनिदेवा | १४८ |
| जय जयाजी विघ्नांतका | १२ |
| जयति जयति जगदंब | ५८ |
| जयदेव आदिपुरुषा | १९ |
| जयदेव अनाथबंधो | १५० |
| जयदेव गिरिजा रमणा | २७ |
| जयदेव जय अवधूता | १२८ |
| जयदेव जय आत्मारामा | ८७ |
| जयदेव जय चिन्मय | ८५ |
| जयदेव जय पंढरी | १७८ |
| जयदेव जय पांडुरंगा | १७९ |
| जयदेव जय पांडुरंगा | १७८ |
| जयदेव जय भैरवनाथा | ५२ |
| जयदेव जय मंगलधामा | ९६ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| जयदेव जय यशवंता | १७५ |
| जयदेव जय वक्रतुंडा | ३ |
| जयदेव जय विठाबाई | १७९ |
| जयदेव जय श्रीशशि | १५५ |
| जयदेव जयश्री स्वामी | १७४ |
| जयदेव जय साईनाथा | १७२ |
| जयदेव जय वैनतेया | १५१ |
| जयदेव जयाजी केदारा | १५४ |
| जयदेवजी मंगेशा | २६ |
| जयदेव नीरांजन | १७९ |
| जयदेव रति पति | ३० |
| जयदेव शंकर | २७ |
| जयदेव श्री मंगेशा | १२१ |
| जयदेव वंदे तं | २४ |
| जयदेवा खंडेराया | १४३ |
| जयदेवा गुरुराया | १३७ |
| जयदेवा दत्तराया | १२२ |
| जयदेवा दत्तराया | १३० |
| जयदेवा धूतपापा | २२ |
| जयदेवा नीलकंठा | २० |
| जयदेवा मार्तंडा | १४४ |
| जयदेवा व्यंकटेशा | १४९ |
| जयदेवा हनुमंता | ११६ |
| जयदेवी आदिशक्ति | ६५ |
| जयदेवी आद्यरूपे | ६४ |
| जयदेवी जगदंबे | ४० |
| जयदेवी जयआदि | ७० |

२०६८२ वि:
७३३७ .. नों: दि:
क्रमांक


| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| जयदेवी जय गंगाबाई | १५६ |
| जयदेवी जय दुर्गेमाते | ६४ |
| जयदेवी जय भगवत्गीते | १५६ |
| जयदेवी जय महालक्ष्मी | ७१ |
| जयदेवी जय माये तुळशी | १५७ |
| जयदेवी जय माहेश्वरी | ६७ |
| जयदेवी तुळशी माते | १५८ |
| जयदेवी मंगळागौरी | ५९ |
| जयदेवी विष्णुकांते | ६५ |
| जय पांडुरंग देवानंद | ८१ |
| जय बाँसुरिया | १०८ |
| जय मृड शंभो | २९ |
| जय शिवशंभो | २८ |
| जय शिवहर | ३५ |
| जय श्रीअनंता | १५० |
| जय श्रीदत्ता | १२९ |
| जाणे न आवाहन | १८२ |
| जाहले भजन | १८० |
| जेजूरगड पर्वत | १४५ |
| तवध्यान माझें | ९१ |
| तुझें स्वरुप | ४९ |
| तुळसी मळ मृत्तिका | १५७ |
| त्रिगुणात्मक त्रैमूर्ति | १२३ |
| त्रिपुरासुर वधुनि | ९ |
| त्रिभुवन मंडित | ८८ |
| दत्त दिगंबर | १३० |
| दत्तात्रय अवधूत | १२१ |
| दशनखचंद्रालंकृत | ५३ |
| दशरथ राजकुमारा | ८७ |
| दाक्षिण देशा माजी एक | ५७ |
| दाक्षिण देशामाजी भैरव | १५१ |
| दाशरथे रामचंद्रा | ९७ |
| दाउनि साक्षी | १३९ |
| दीनदयाळा गणपती | ६ |
| दीनानाथ दीनबंधु | १४० |
| दुर्गे अघसंकट | ७० |
| दुर्गे दुर्घट | ३८ |
| दे मति निर्मळ | १० |
| देह त्रय अवतारा | १२४ |
| देह त्रय निरासिता | १३७ |
| दैत्य भारे पीडिली | १०६ |
| धन्य दिवस | ७६ |
| धन्य हे प्रदक्षिणा | १२६ |
| नयना देखता | ८८ |
| नसता मारुत | ५९ |
| नानादेहीं देव | ९६ |
| नाना परिमळ दुर्वा | १ |
| नाना रूपी चालक | १७१ |
| नारायण खगवाहन | ११२ |
| नारायण चतुराक्षर | ११८ |
| निर्गुण जे होते | ६३ |
| निर्गुण धार्मी | ५२ |
| निर्गुण सगुणाकार | १०९ |
| निर्गुण निर्विकारा | ३४ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| निर्जरवर स्मरहर | ८० |
| निरसुनी देहत्रय | १०२ |
| नृसिंह सरस्वती | १२७ |
| नंद यशोदाबाला | १०७ |
| पतिव्रता सती | १२५ |
| परमात्मा श्रीराम | ९४ |
| परमानंदा परम | १०७ |
| पयसा दधिघृत | १५३ |
| पावला प्रसाद | १८१ |
| पाश करीं | ११ |
| पंचदशीचे सारी | ७७ |
| पंचानन हयवाहन | १४४ |
| पंढरी पुण्यभूमि | ७८ |
| प्रथम सीता | ९५ |
| प्रपंच रचनासर्व | १६८ |
| प्रभुवर जय जय | १०९ |
| प्रेमगंगा जळीं | ७ |
| फळलें भाग्य | १४१ |
| बन्सीधर पर्वतधर | १०३ |
| बारो मे आरती | ६ |
| बंधु बलरामासह | १०३ |
| बंबाळ कर्पुराचे | ९२ |
| ब्रह्मादिस्तंभातेऽ | ११७ |
| ब्रह्मानंद सुखाचा | १३८ |
| ब्रह्मा विष्णु हरादिक | १४० |
| भक्तालागी अवनी | १५३ |
| भक्तीचीये पोटीं | १७७ |
| भक्तीचे पोटी | ७५ |
| भक्ति प्रेमें | ४८ |
| भस्मप्रिया भूतपते | ३३ |
| भूकैलास ऐसी | ४५ |
| भैरव राया गौरव | १५१ |
| मन कर्णिके दीप | १६१ |
| मन वाणीचा प्रवेश | १३९ |
| मर्दिला कोल्हासुर | ४२ |
| मस्तकी जन्हुतनया | २२ |
| महाजी महादेवा | ३२ |
| महारुद्रा जगन्नाथा | ३२ |
| महालक्ष्मी करवीर | ६६ |
| महास्थान तूझें | ३६ |
| महिषासुरमथिनि | ६४ |
| माते दर्शन मात्रे | १५६ |
| माया शोधा विषयीं | ११५ |
| मारुनि कोल्हासुर | ४९ |
| मी तूं विरहित | ४२ |
| मूळ पीठ यमुना | ४४ |
| मूळ माया रूप | ५४ |
| मौजेची आरती | १४१ |
| मंगला गौरी नाम | ६० |
| मंगेश महारुद्रा | १९ |
| यर्हिनसन्नासदपि | ५४ |
| युगे अठ्ठावीस | ७३ |
| येई बा नरहरी | १३२ |
| येई हो विठ्ठले | ७४ |

| आरत्या | पृष्ठांक | आरत्या | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| रजनी करकुल | १०२ | शिवमनभ्रमरकमलिनी | ४८ |
| रत्नांचीं कुंडलें | ९२ | शिव सांब शिव | २५ |
| रामा रामा रामा | १८१ | शुंक्रेश्वर सिद्धेश्वर | २४ |
| राक्षस भारें | ९१ | शेजारती ओवाळुं | ६९ |
| लक्ष्मी रमणा | ११३ | शेषाचल अवतार | १४८ |
| लवथवती विक्राळा | २१ | शंकर तनया | १२ |
| वक्रतुंड एकदंत | १२ | शांति कल्याण | १३८ |
| वरदे रुचिरा धर | ५५ | शेंदुरलाल | २ |
| वांकी चरणी | १०१ | श्यामलवार्णा | १०९ |
| विघ्नांतक विघ्नेशा | १३ | शामसुंदर रामाचे | ८५ |
| विठ्ठला मायबापा | ७४ | श्वासोच्छ्वास अवघा | ५० |
| विडा घ्याहो अंबा | ६२ | श्रावण कृष्णाष्टमी | १०० |
| विडा घ्याहो नरहरी | १२७ | श्रावणमासी रवि | १५२ |
| विडा घ्याहो नारायणा | ११४ | श्रीगणराया | १३ |
| विडा घ्याहो रघुराया | ९४ | श्रीपती तुझिया | ५६ |
| विडा घ्याहो रामराया | ९३ | श्रीपाद श्रीवल्लभ | १२६ |
| विधि हरिहर | १२१ | श्रीमद्रामचंद्रा | ९० |
| वृषवाहन वृंदारक | २६ | श्रीशंकरागिरीह्वदया | १६३ |
| वृंदारक गुणवृंद | १०१ | सगुण हे | १३९ |
| वृंदावनवासी जय | १५८ | सत्राणे उड्डाणे | ११५ |
| वेदांचें जें गुह्य | १६२ | सद्गुरु सदय | ५१ |
| वेंदान्त संमतीचा | १६४ | सद्योजातं | ३१ |
| वेदशास्त्रा माजी तूं | ४ | सप्तमुखीं अति | ११९ |
| वेदशास्त्रा आणिं | १०४ | सर्वंहि वस्तु | ८६ |
| शतगांवीं सिंधू | १५९ | साफल्या निजवल्या | ८९ |
| शिव तनया आजि | १८ | साक्षात् शंकराचा | १७२ |
| शिव तनया वक्रतुंडा | १५ | सुकुमार मुखकमल | ७९ |

| आरत्या | पृष्ठांक |
|---|---|
| सुखकर्ता दुःख हर्ता | १ |
| सुखकर वरदायिनी | ६३ |
| सुख सदने | ४६ |
| सुख सरिता | १५५ |
| सुख सहिता | १२५ |
| सुमनाचे शेजे | १०५ |
| सौम्यशद्वे उदोकार | ४६ |
| सुंदर अंगकांति | ७८ |
| संत सनकादिक | ८० |
| स्कंधैर्द्रादशसंख्यै | १६५ |
| स्थापित प्रथमारंभीं | २ |
| स्वरूपोन्मुख बुद्धि | ८६ |
| स्वात्मसुखामृत सागर | ८९ |
| स्वानुभवे भवतारक | १३८ |
| स्वामी नरसिंह सरस्वति | १२६ |
| स्वेच्छे ब्रह्म तुं कौतुक | ५० |
| स्वैच्छे ब्रह्म तुं स्फुरणीं | ५० |
| हर अर्धांगी वससी | ६० |
| हरी चला मंदिरा | १०५ |
| हरी नाम गोड झाले | १०० |
| हरिहर ब्रह्मादीकी | ५ |
| होता कृपा तुझी | १७० |
| हंसाग्नीश्रीचंद्रे | ४७ |


राठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
नुक्रम वि:
माांक नों: दि:
REFBK-0009119

# संपूर्ण चातुर्मास

## सर्व कुटुंबाचा धार्मिक मार्गदर्शक

☆ सचित्र कहाण्या

☆ शनिमाहात्म्य, व्यंकटेशस्तोत्र, अकरावा अध्याय, बावन-श्लोकी गुरुचरित्र, सोळा सोमवार, आरत्या, शेजारत्या, काकड आरत्या, विडा, पाळणा, मंगलाष्टकें, तुलसी माहात्म्य इत्यादि.

☆ रामरक्षा, मारुती स्तोत्र, गुरुपादुकाष्टक, लक्ष्मी स्तोत्र, मंगलाचरण, भूपाळ्या.

☆ सूर्य नमस्कार, सायंकालचे श्लोक, तिथी, वार, महिने, लहान स्तोत्रें, मनाचे श्लोक, इत्यादि.

☆ सर्व वर्षांतील सण व व्रतें.

☆ संतांचे निवडक अभंग, सुभाषितें व लहान मुलांना पाठ करण्याचे श्लोक व विविध माहिती.

पृष्ठें २५६ अर्धकापडी बाईंडिंग

पांचरंगी मुखपृष्ठ

किंमत फक्त दोन रुपये

# राजाभाऊ जोशी

२३० सदाशीव पुणे २. ७९/८० जीवनजी महाराज चाळ मुगभाट मुंबई ४.